म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ~~५१९~~ ३०१

REFBK-0006974

# कै. तात्यासाहेब केळकर
# विविधदर्शन

संपादक

नरहर मोरेश्वर जोशी, एम. ए. बी. टी.

प्रकाशक

**हिंद प्रकाशन**

आंग्रेवाडी, गिरगांव, मुंबई.

Bombay Agents:-
Shri Samarth Book Depot,
Book Sellers & Publisher,
Girgaon, Bombay, 4

REFBK-0006974

मूल्य दोन रुपये

# अनुक्रमणिका


दैनिकें:- लोकमान्य (१), नवाकाळ (९), प्रभात (१२) नवशक्ति (१७) लोकशक्ती (१९), त्रिकाळ (२५), तरुण भारत (२९), ज्ञानप्रकाश (३६), सकाळ (३९), काळ (४४),

साप्ताहिकें:- समर्थ (४९), महाराष्ट्र (५७), उदय (६२), कुलाबा समाचार (६५), बलवंत (६८), वैनतेय (७५), केसरी (७९, ८२, ८७, ८९), धनुर्धारी (१००), विविध वृत्त (१०५),

मासिकें:- महाराष्ट्र साहित्य पत्रिका (७७), चित्रमय जगत् (११०), नवभारत (११९), हिंद (१३१), साहित्य (१४६)

इंग्रजी वृत्तपत्रांतील उतारे–पान १६५ पासून पुढें.


* कंसांतील आंकडे पृष्ठांचे आहेत.


मुद्रक

**नरहर मोरेश्वर जोशी,**

हिंद मुद्रणालय, आंग्रेवाडी, गिरगांव मुंबई नं. ४.

# हृद्गत

कै. तात्यासाहेब केळकरांच्या, इंग्रजी तारखेप्रमाणें, पहिल्या पुण्यतिथीच्या दिवशीं त्यांच्यासंबंधी निरनिराळ्या वृत्तपत्रांतील त्यांच्या मृत्यूनंतर आलेले मृत्युलेख आणि गुणगौरवपर लेख यांचा संग्रह प्रसिद्ध करण्यास आम्हांला अत्यंत आनंद होत आहे. कै. तात्यासाहेब केळकर ही व्यक्ती महाराष्ट्रांतील असली तरी ती अखिल भारतीय कीर्तीची आहे. लोकमान्य टिळकांचे ते सहकारी आणि उजवे हात होते. आपल्या देशाच्या राजकारणांत, साहित्याच्या क्षेत्रांत, समाजजीवनांत, आर्थिक जीवनांत आणि एकंदर राष्ट्रीय प्रवृत्तीच्या दृष्टीनें देशांतील नागरिकांच्या विचारसरणीला आकार विकार देण्यास तात्यासाहेब केळकर यांचा हातभार फार मोलाचा आहे. कै. तात्यासाहेब केळकर यांनी आपल्या हयातींत अनेक प्रसंगानुरुप केलेल्या लिखाणांतून स्वतः संबंधीं विपुल माहिती इतस्ततः विखरून ठेविलेली आहे. त्यांनी स्वतः आपलें सुमारें हजार पृष्ठांचें आत्मचरित्रही प्रसिद्ध केलेलें आहे. कै. तात्यासाहेबांच्या या पहिल्या पुण्यतिथीच्या निमित्तानें लोकमान्यांचे आठवणी व आख्यायिकाकार श्री. बापट हे सुमारें सातशें पृष्ठांचा तात्यासाहेब केळकरांच्या आठवणी व आख्यायिका यांचा ग्रंथ प्रसिद्ध करीत आहेतच. आम्ही असेंही ऐकतों कीं सुप्रसिद्ध महाराष्ट्र साहित्यिक श्री. वि. स. खांडेकर हेही कै. तात्यासाहेबांच्या संबंधी एक पुस्तक प्रसिद्ध करणार आहेत. इतकें जरी सर्व असलें तरी कै. तात्यासाहेबांचें चरित्र व चारित्र्य अलौकिक कर्तबगारीनें इतकें भरगच्च भरलेलें आहे कीं त्यांच्या विषयीं आम्ही प्रसिद्ध करीत असलेल्या संकलनात्मक स्वरुपाच्या या पुस्तकाची भर ही आवश्यकच नव्हे तर अमोलही वाटेल.

कै. तात्यासाहेब केळकरांच्या मृत्यूनंतर आपल्या देशांतील बहुतेक वृत्त-पत्रांनीं—दैनिकें, साप्ताहिकें, मासिकें वगैरेनीं—त्यांच्या संबंधीं उत्स्फूर्त असे मृत्युलेख, गुणवर्णनपर लेख मोठ्या आदरानें लिहून त्यांच्या पुण्यस्मृतीला जी श्रद्धांजली अर्पण केली त्या श्रद्धांजलींचा हा संग्रह सर्वसाधारण वाचक

आणि कै. तात्यासाहेबांच्याबद्दल आदर व प्रेम बाळगणारे यांना मोठा मनोरंजक व उद्‌बोधक वाटेल. कै. लोकमान्य टिळक यांचा काळ, त्या काळांतील साधनें, लोकस्थिती वगैरेंची नीट माहिती असलेला समाज काळाच्या ओघांत त्यांच्यापासून दुरावत आहे. आजचा काळ आणि लोकमान्य टिळकांचा काळ यांना बेमालूम सांधणारे कै. तात्यासाहेब हे होते. टिळकांच्या पश्चात् महात्माजींनीं हिंदी राजकारण हातांत घेतल्यापासून गेल्या पंचवीस तीस वर्षांत वृत्तपत्रकार, लेखक, वक्ते, पुढारी, यांची जी एक पिढी निर्माण झाली आहे त्या पिढीला तात्यासाहेब केळकर यांचीं राजकीय मतें आदरणीय वाटली नाहींत. या संग्रहांत ज्या वृत्तपत्रांतील लेखांचें संकलन केलेलें आहे, त्यांतील बहुतेक लोक असे आहेत. तथापि त्यांनासुद्धां तात्यासाहेब केळकरांसंबंधानें त्यांच्या मृत्यूनंतर लगेच बरेंच लिहावें लागलें यावरूनच तात्यासाहेबांच्या अखिल भारतीय थोरवीचें महत्त्व प्रत्ययास येतें. बहुतेक लेखांतून तात्यासाहेबांच्या संबंधानें असा सूर निघत आहे कीं तात्यासाहेब गांधींच्या राजकीय चळवळींत मागें पडण्याचें कारण गांधी राजकारणाचें तत्वज्ञान व भूमिका तात्यासाहेबांना आकलन झालेली नाहीं आणि गांधींच्या राजकारणाला ज्या प्रकारचा त्याग लागत होता त्या प्रकारचा त्याग करण्याला तात्यासाहेबांची तयारी नव्हती. या ठिकाणी या वादांगांत शिरण्याचें संकलनकाराला मुळींच कारण नाहीं. तथापि महात्मा गांधींची राजकीय चळवळ आणि खुद्द महात्माजी, तसेंच तात्यासाहेबांचें राजकीय धोरण आणि स्वतः तात्यासाहेब हीं इतिहासप्रविष्टच झालेलीं असल्यानें आणि आतां या उभय राजकारण–धुरंधरांच्या हयातींतच आपल्याला स्वराज्य मिळालेलें असल्याकारणानें भावी इतिहासकाराला या दोन्ही थोर व्यक्ती आणि त्यांची राजकीय चळवळींची मतप्रणाली यासंबंधी निश्चित अनुमानें बांधता येतील. कोणी जर उद्यां असें म्हणाला कीं तात्यासाहेबांना गांधींचे राजकीय तत्व ज्ञान समजलें नव्हतें असें म्हणण्याऐवजीं महात्माजींनाच तात्यासाहेबांच्या व्यवहारी राजकारणाचा उमज पडला नव्हता तर त्यांत विशेषसी चूक आहे असें भासणार नाहीं. कारण १९३५ नंतर तात्यासाहेबांचें राजकीय धोरणच

व्यवहार्य म्हणून स्वीकारण्यांत आलेलें आहे.—तात्यासाहेबांच्या त्यागाविषयीं सुद्धां भावी इतिहासकार निराळा सूर काढल्याशिवाय रहाणार नाहींत. लोकमान्यांशीं १८९६ सारख्या काळापासून सहकार्य करणें ही गोष्ट अग्निदिव्याइतकीच कठीण आहे. महात्माजींच्या राजकीय चळवळींतील त्याग केळकरांच्या त्यागाच्या पासंगालाही पुरणार नाहीं. असो. तात्यासाहेबांच्या अनेक अनन्यसामान्य गुणाबद्दल आणि साहित्यांतील त्यांच्या सम्राट पदवीबद्दल सर्व वृत्तपत्रकारांची एकवाक्यता असल्याचें या संग्रहावरून वाचकांना आढळून येईलच.

आम्हांला या ठिकाणीं या दोन्हींही थोर पुरुषांच्या जीवनाची तुलना करावयाची नाहीं. वृत्तपत्रकारांना तात्यासाहेबांच्या संबंधानें जें वाटत होतें तें त्यांनी निःसंकोचपणें लिहिलें आहे. आणि हे वृत्तपत्रकार आजच्या देशांतील जनतेचे मार्गदर्शक असल्यानें त्यांना म्हणजेंच ते ज्या लोकांचें प्रतिनिधी असल्याचें समजतात त्या भारतवासीयांना तात्यासाहेबांच्या संबंधानें जें जें वाटतें तें तें भावी पिढीला या लेखसंग्रहात वाचावयाला सांपडणार आहे. तात्यासाहेबांचें **विविध दर्शन** भावी पिढ्यांना या लेखसंग्रहानें होणार आहे. आम्ही या ठिकाणीं बृहन्महाराष्ट्रांतील महत्वाच्या वृत्तपत्रांतील लेखांचे संकलन केलेलें आहे. बृहन्महाराष्ट्रांतील ज्या वृत्तपत्रांचें लेख या संग्रहांत घेतले गेले नाहींत त्यांबद्दल आम्हांला या ठिकाणीं एवढेंच म्हणावयाचें आहे कीं पुस्तकाच्या मर्यादा आणि त्यांच्या लिखाणाचे प्रतिनिधीभूत झालेले इतर वृत्तपत्रांतील लेख या दोहोंचा समन्वय घालतांना आम्हांला कांहीं वृत्तपत्रें बाजूला ठेवावीं लागलीं. अशा ज्या वृत्तपत्रांतील लेख आम्ही या पुस्तकांत संग्रहीत करूं शकलों नाहीं त्यांबद्दल त्या वृत्तपत्रकारांनीं आमच्याबद्दल कसलाहि गैरसमज करून घेऊं नये. वृत्तपत्रसृष्टींत त्यांचें कार्य अमोल असून त्याबद्दल नितांत आदर बाळगणारा या संग्रहाचा संकलनकार आहे एवढें आश्वासन आम्ही त्यांना नम्रपणें देतों.

ज्या ज्या वृत्तपत्रांतील लेख आम्ही या पुस्तकांत संग्रहीत केलेले आहेत त्या त्या वृत्तपत्रकारांची परवानगी आम्ही आगाऊ घेतलेली नाहीं. कै. तात्यासाहेब केळकर हे भारतीय वंद्य थोर पुढारी असल्यानें त्यांच्यासंबंधानें जनतेचे प्रतिनिधीभूत असलेले वृत्तपत्रकार क. तात्यासाहेबांच्या संबंधानें त्यांच्या मृत्यूनंतर जे लेख लिहितील ते " कॉपी राईट् " स्वरुपाचे नसणार अशी आमची प्रामाणिक भावना असल्यामुळें आणि या प्रसंगानें तात्यासाहेबांसंबंधी त्यांनीं व्यक्तविलेले विचार हें भावी पिढयांनीं वाचावे हीच त्यांची इच्छा असल्यानें या लेखांच्या संकलनाचेवेळीं त्या त्या वृत्तपत्रकर्त्यांची परवानगी घेण्याचें वास्तविक कारणच नाहीं अशीच आमची समजूत आहे. बहुमताला हीं आमची समजूत बरोबर नाहींशी वाटल्यास अशी समजूत बाळगण्यांत आमच्या हातून जी चूक झालेली दिसेल त्याबद्दल केव्हांही दिलगिरी प्रदर्शित करण्याला आम्हीं तयार आहों.

कै. तात्यासाहेबांच्या संबंधानें मराठी व इंग्रजी वृत्तपत्रांतून ज्याप्रमाणें लेख व स्फुटें आलीं त्याप्रमाणें देशांतील इतर भाषीय वृत्तपत्रांतून कांहीं तरी लिखाण आलेलें असणार. या सर्वांचा संग्रह करता आला असतां तर आम्हांला अधिकच आनंद झाला असतां; परंतु इतकी सगळीं वृत्तपत्रें एकत्र मिळविणें आणि त्यांतील लेखांचें भांषातर मराठी भाषिकांपुढें ठेवणें हें काम अतिशय जिकीरीचें झालें असतें. कागद, छापखाने यांच्या अडचणीचीहीं यांत भर पडली असती. शिवाय पुस्तकाची पृष्ठसंख्याहीं अमर्याद वाढून सामान्य वाचकांनाही हें पुस्तक किमतीच्या दृष्टीनें घेणें परवडले नसतें. आम्हीं हें पुस्तक आहे या स्थितींत प्रसिद्ध करण्यामध्यें एक औचित्य साधीत आहोंत. कधीं काळीं अनुकूलतेच्या दृष्टीनें द्वितीयावृत्ती या पुस्तकाचीं निघाल्यास यांत अनेक भाषांतील गौरवपरं लेखांचा समावेश करण्याचा प्रयत्न होईल.

हें पुस्तक तात्यासाहेबांच्या मृत्यूनंतर चारदोन महिन्यांतच प्रसिद्ध करण्याचा आमचा विचार होता. पण पूज्य महात्माजींच्या आकस्मिक मृत्यूची भयंकर आपत्ती भारतावर कोसळल्यामुळें या पुस्तक प्रकाशनाचा विचार

कै. तात्यासाहेबांच्या पहिल्या पुण्यतिथीच्या दिवसापर्यंत ढकलावा लागला. या पुस्तकांत तात्यासाहेबांचे आजपर्यंत कधीही प्रसिद्ध न झालेले तीन फोटो आणि इतरहीं कांहीं फोटो आम्ही येथें समाविष्ट केलेले आहेत.

या संग्रहाला नामदार लोकनायक अणे, बिहार प्रांताचे गव्हर्नर, यांनी पुरस्कार लिहावा अशी आमची इच्छा व प्रयत्न होता. ना. अणे यांनी आमच्या विनंतिला मान देऊन पुरस्कार लिहिण्याचें कबूलही केलें होतें. पण त्यांच्यावरच्या जबाबदारीमुळें हा पुरस्कार लिहिण्याला लागणारी शांत मनःस्थिती या महिना अखेरपर्यंत त्यांना मिळणारी नसल्यानें आणि हा संग्रह कै. तात्यांसाहेबांच्या पहिल्याच पुण्यतिथीच्या दिवशी प्रसिद्ध करण्याचा आमचा मनोदय त्यांना माहींत असल्यामुळें हें पुस्तक त्या पुरस्काराशिवायच प्रसिद्ध करावें लागत आहे. कै. तात्यासाहेबांच्या संबंधानें अधिकारानें लिहणारे ना. अणे हेच आहेत. जरि त्यांचा पुरस्कार या पुस्तकांत समाविष्ट झालेला नसला तरी त्यांचा आशीर्वाद याला आहे असें वाचकांनीं धरुन चालण्यास हरकत नाहीं. ना. अणें यांच्याबद्दल आदर व कृतज्ञता या ठिकाणी आम्ही व्यक्त करीत आहों.

या पुस्तकाच्या कामीं कै. तात्यासाहेबांचे चिरंजीव श्री. यशवंत नरसिंह केळकर यांनी आम्हाला अमोल सहाय्य केलें. कै. तात्यासाहेबांचे मोठें चिरंजीव श्री. काशिनाथ नरसिंह केळकर यांनीं आम्हाला पत्र पाठवून या पुस्तकांचे नांव '**कै. तात्यासाहेबांचें पुण्यस्मरण**' असें ठेवण्याला सुचविलें. हें नांव खरोखरच आकर्षक असूनसुद्धां संग्रहाच्या दृष्टीनें आम्हांला तितकेंसें अन्वर्थक न वाटल्यानें आम्ही जरी तें स्वीकारलें नाहीं तरी आमच्या प्रयत्नाला, त्यांनी पत्र पाठवून जो पाठिंबा दिला त्याबद्दल व श्री. य. न. केळकर यांच्या सहाय्याबद्दल आम्ही आमची अंतःकरणपूर्वक कृतज्ञता नमूद करतों.

मुंबईचे प्रसिद्ध फोटोग्राफर श्री. एन्. व्ही. वीरकर यांनी मोठ्या औदार्यानें तात्यासाहेबांची त्यांच्याकडील छायाचित्रें या संग्रहांत घालण्या-

साठीं आम्हांला दिलीं त्याबद्दल त्यांच्याबद्दलचें आमचें ऋण आम्हीं येथें नमूद करतों. फोटोग्राफर वीरकर यांची राष्ट्रीय वृत्ती अनेक प्रसंगी अशीच प्रदर्शित झालेली आहे. खुद्द आमच्या संबंधानें तर त्यांच्या मनांत नितांत मित्रप्रेम वसत आहे. तेव्हां त्यांची परवानगी नसतानांहीं त्यांच्या विषयींची फक्त कृतज्ञता व्यक्त करून हा प्रश्न येथेच संपवितो. ज्या वृत्तपत्रकारानीं आम्हांला आपले तात्यासाहेबासंबंधी मजकूर असलेले अंक दिले त्यांचे कृतज्ञतापूर्वक येथें आभार मानणें आम्हांला कर्तव्य वाटेंत. तसेंच मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचें जबाबदार व्यवस्थापक यांनीं निरनिराळ्या वृत्तपत्रांच्या फायली आम्हांला पुरवून आमच्या या संकलनाला जें सहाय्य केलें त्याबद्दल त्यांच्याविषयीं कृतज्ञता व्यक्त करणें जरूर आहे. कै. तात्यासाहेब केळकर यांच्याबद्दल मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाला नेहमीच परमादर वाटत आलेला आहे. आणि हा संग्रह हें राष्ट्रीय वाङ्मयांत भर घालण्याजोगें पुस्तक होणार आहे अशी त्यांची भावना आहे. तेव्हां असल्या सत्कार्यास नेहमींच सहाय्य करण्याला तयार असलेल्या ग्रंथ–संग्रहालयाचे आभार मानण्याव्यतिरिक्त दुसरें आम्ही काय करणार ! तात्यासाहेब केळकरांच्या हजारों चहात्यांना आणि भावी पिढातील हाशी वाचकांना हें पुस्तक वाचनीय वाटो एवढींच येथें इच्छा प्रदर्शित करून वाचकांची आम्ही रजा घेतों.

संग्राहक

ता. १४-१०-४८ नरहर मोरेश्वर जोशी.

कै. तात्यासाहेब केळकर-विविध दर्शन



कै. तात्यासाहेब केळकर-विविध दर्शन



८८२४

# कै. तात्यासाहेब केळकर

( दैनिक लोकमान्य १५ ऑक्टोबर १९४७ )

श्री. नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर हे गेल्या मंगळवारीं पहाटे पुणें मुक्कामीं मृत्यु पावले ही बातमी वाचून सर्व महाराष्ट्रास खचित धक्का बसेल. ते आजारी असल्याची बातमी नव्हती. थोड्या-दिवसांपूर्वी देवधर सत्कारास ते अध्यक्ष होते. गेल्या रविवारीं धोंडूमामा साठे यांचे सत्काराला ते अध्यक्ष होते. सोमवारी रात्रीं एक अर्धवट लेखहि त्यांनी लिहिला. त्यानंतर त्यांना झोंप लागली व तींतून ते पुन्हा उठलेच नाहींत. वयाला पंचाहत्तर वर्षे उलटून गेल्यामुळें ते आतांशा थकलेले दिसत. अलीकडे आवाज खोल गेला होता. ऐकूं कमी येई. थोड्याशा मनःस्तापानें त्रासत असत. तथापि आतांच त्यांचा अंतकाल इतका जवळ आला आहे अशी कल्पना करण्याइतकी त्यांची प्रकृति बिघडल्याचें कोणासच माहीत नव्हतें. यामुळें महाराष्ट्रभर या बातमीनें आज हळहळ पसरेल यांत शंका नाहीं. महाराष्ट्राच्या निदान गेल्या चाळीस वर्षांच्या इतिहासांत एक महनीय आणि सर्व पक्षांचें व सर्व विचारवंतांचें लक्ष वेधून घेणारी व्यक्ति या दृष्टीनें केळकरांचें स्थान महाराष्ट्रांत फार उच्च आहे. राजकारणांत ते अखिल भारतीय पुढारी मंडळांत कांहीं दिवस होते, पण तेथून ते आपण होऊन लवकर माघारे फिरले व महाराष्ट्राच्या जीवनांतील आपली समरसता मात्र त्यांनीं कायम टिकाविली. गेलीं कित्येक वर्षें ते राजकारण व वृत्तव्यवसाय यांपासून निवृत्त झाले होते. पण राजकारणांतून व समाजकारणांतून त्यांचें मन कधींच कायमचें बाहेर निघालें नाहीं. प्रचलित राजकीय घडामोडींसंबंधानें अली-कडे ते नेहमीं मतप्रदर्शन करीत, तेव्हां तें मत नेहमींच बरोबर अथवा लोकमतास धरून नसे. पण तें मत निःस्पृह व खरमरीत खास असे व त्यामुळें केळकर राजकारणांतून निवृत्त झाले नाहीत, होणें शक्य नाहीं अशी खात्री वाटे.

* * *

मिरज संस्थानांतील मोडनिंब गांवी नरसिंह चिंतामण केळकरांचा १८७२ सालीं जन्म झाला. त्यांच्या वडिलांची प्रापंचिक परिस्थिति मध्यम प्रकारची होती. केळकर एल. एल बी. झाल्यावर साताऱ्यास वकीली करीत होते तेव्हांपासून त्यांना लेखनाची हौस होती. त्यावेळीं टिळक एकदां साताऱ्यास गेले असतां केसरी मराठ्याचें काम पाहील असा एक मदतनीस आपणांस हवा अशी त्यांनीं दादासाहेब करंदीकरांचेकडे चौकशी केली व दादासाहेबांनीं शिफारस केल्यावरून केळकर १८९५ सालीं टिळकांकडे गेले. तेव्हांपासून गेलीं ५२ वर्षें म्हणजे आमरण केसरी मराठा संस्थेची सेवा केळकरांच्या इतकी दीर्घकाल व त्यांच्याइतक्या निष्ठेनें व यशस्वितेनें दुसऱ्या कोणीहि केली नाहीं. 'केसरी' म्हणजे केळकर व केळकर म्हणजे 'केसरी' असें समीकरण निदान एक पिढीहून अधिक काळ कायम होतें. १९०८ सालीं टिळकांना मोठी शिक्षा होईपर्यंत केळकर 'केसरी' कडे नसून 'मराठा' पत्राकडे असत. केळकर नेमस्त होते कीं जहाल होते यासंबंधाने महाराष्ट्रांत कांहींसें दुमत आहे. पण त्यासंबंधानें बारकाईनें पाहिलें असतां असें दिसून येतें कीं गोपाळ कृष्ण गोखले यांचा ब्रिटिश मुत्सद्यांचीं तत्त्वज्ञानें व आश्वासनें यांवर जेवढा विश्वास असे तेवढा केळकरांना कधींहि वाटला नाहीं. पण केळकरांची विशिष्ट लेखनशैली त्यांना मवाळ ठरविण्यास कारण झाली.

* * *

जहालपणा म्हणजे ब्रिटिशांवर अविश्वास, दहशतवादाबद्दल प्रेम असें त्यावेळीं मानलें जाई. पण यापेक्षां सामान्य वाचकांच्या दृष्टीनें ब्रिटिशांविरुद्ध कडक भाषा व विशेषतः नेमस्तांविरुद्ध कडक व विषारी टीका म्हणजे जहालपणा असें लोक मानीत. नेमस्त हे स्वार्थी आहेत, कचखाऊ आहेत असें मानणें हें जहालपणाचें लक्षण मानलें जात असे. केळकरांना हें मान्य नसे. इंग्रजांची आर्जवें करीत रहाण्याचें नेमस्तांचें धोरण केळकरांना कधींच पटलें नाहीं. आणि कांहीं लोक नेमस्तपणाचा उपयोग सरकारदरबारीं आपला वशीला वाढविण्यासाठीं करतात ही गोष्ट त्यांच्या नजरेंतून सुटली नव्हती. पण नेमस्त हे प्रामाणिक आहेत व गोखले यांच्यासारखे थोर पुरुष राष्ट्रसेवे-

साठींच आयुष्य घालवितात हें स्पष्ट दिसत असल्यानें नेमस्तांबद्दल लिहितांनाहि आदरानें व भारदस्तपणानें लिहिलें पाहिजे, याबद्दल केळकरांचा कटाक्ष होता. यामुळें नेमस्तांत केळकरांचे अनेक मित्र होते तर टिळकांच्या अनुयायांतील अनेक प्रमुख लोक केळकरांचा तिटकारा करीत. १९१४ सालीं टिळक सुटून आल्यानंतर केळकरानीं केसरी मवाळ केला अशा कागाळ्या अनेकांनीं टिळकांचेकडे केल्या. तेव्हां आपल्या गैरहजेरींत केळकरांच्या या जहाल टीकाकारांनींहि कांहींच न करतां नुसत्या माशा मारल्या ही गोष्ट या टीकाकारांचे नजरेस आणून टिळकांनीं या सर्वांची खरडपट्टी काढली आणि केळकरांनीं आपल्या गैरहजेरींत 'केसरी' उत्तम प्रकारें चालविला अशी त्यांना शाबासकी दिली.

* * *

केळकरांनीं टिळकांच्या या गैरहजेरीच्या काळांत 'केसरी' चांगला चालविला ही गोष्ट खरीच होती. 'केसरी'चें धोरण त्यांनीं बदललें नाहीं पण भाषा कांहींशी सौम्य व कलायुक्त केली. विविध विषयांवर मेहेनतीनें व्यासंग करून अभ्यासयुक्त लेख या काळांत केळकरांनीं लिहिले व 'केसरी'ची लोकप्रियता कायम टिकविली. केळकरांचा 'आयर्लंडचा इतिहास' हा अजूनहि लोकप्रिय असलेला ग्रंथ त्याकाळीं केसरींत लेखमालेच्या रूपानें प्रथम प्रसिद्ध झाला. वृत्तपत्रावरील दडपशाहीचें स्वरूप त्यावेळीं फार कठोर होतें आणि कायदा तोडून लिहिणारा लेखकच त्यावेळीं लोकप्रिय होई. पण टिळक तुरुंगांत गेल्यानें केळकरांच्यावर जेव्हां 'केसरी'ची जबाबदारी पडली तेव्हां 'केसरी' हीच टिळकांची एकटी एक दौलत असल्यानें ती टिकवावयाची, कायद्याच्या कचाट्यांत सापडूं द्यायची नाहीं आणि 'केसरी' ची लोकप्रियताहि गमवूं द्यायची नाहीं असा निश्चय करून केळकरांनीं तो मोठ्या धैर्यानें तडीस नेला. टिळक तुरुंगांत असल्यानें त्यांची पुढारीपणाची जागा आपण भरून काढली पाहिजे असा स्वतांच्या थोरवीसंबंधानें त्यांनीं आपला गैरसमज करून न घेतां संपादक टिळकांचीच भूमिका त्यांनीं घेतली व लोकमतास शिक्षण व वळण देण्याचें संपादकाचें जें

मुख्य काम तें उत्तम प्रकारें पार पाडून महाराष्ट्रांतल्या संपादकांत पहिल्या दर्जाचें स्थान त्यांनीं त्यावेळींच मिळविलें. केसरींतून केळकर निवृत्त होईपर्यंत त्यांचें तें स्थान बऱ्याच अंशीं कायम होतें. केळकरांनीं 'केसरी' सोडल्यानंतर भारदस्त, संयमी असूनहि कलायुक्त अशी जी त्यांची लेखणी ती आजतागायत अद्वितीयच ठरली आहे.

* * *

लो. टिळक १९१४ सालीं सुटून आल्यानंतर त्यांनीं होमरूल लीग, कॉंग्रेस–लीग करार, स्वराज्य शिष्टाई वगैरे ज्या विविध चळवळी केल्या त्यांत केळकर हे टिळकांच्या फार विश्वासांतले होते. 'केस फॉर इंडिअन होमरूल' हें त्याकाळीं फार ख्याति पावलेलें पुस्तक अत्यंत माहितीपूर्ण असूनहि केळकरांनीं अठरा कामांच्या धांदलींत लिहिलें. केळकर हे टेबलावरच्या कामास फार दांडगे. कागदपत्राच्या केवढ्याहि गळाठ्यानें ते बावरून जात नसत. डोक्यांत चारपांच विषय असले तरी त्या सर्वांची पृथक्पृथक् सामुग्री जमवून सगळे विषय सारखेच तडीस लावीत. 'केसरी'चें लेखन, इतिहाससंबंधीचें एकादें चालू प्रकरण, विलायतेस पाठवायचीं कांहीं पत्रें, दुसरे दिवशीं एकाद्या शिष्टाईसाठीं कोठें जायचें असलें तर त्याचे कागदपत्र, कॉंग्रेससंबंधीचें कांहीं कामकाज, टिळकांचा एकादा तांतडीचा निरोप अशा सर्व गोष्टी त्यांच्या डोक्याच्या कपाटांत त्यावेळीं कप्प्याकप्प्यांत नीट ठेवलेल्या असत व त्या सर्व ते अनुक्रमानें पार पाडीत. 'मराठे आणि इंग्रज' हा त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ १९१८ च्या सुमारास अनेक कामांच्या घबडग्यांत त्यांनीं लिहून काढला. टिळकांच्या मागोमाग टिळकांच्या बोलावण्यावरून केळकर विलायतेस शिष्टमंडळावर गेले त्यांत शिष्टाईपेक्षां टिळकांचीं व शिष्टमंडळाचीं बैठीं व भानगडीचीं कामें उरकणारा कोणीतरी बुद्धिमान व साक्षेपी माणूस मिळविणें हा टिळकांचा हेतु होता. पत्करलेल्या कामाची जबाबदारी ओळखून व कक्षा ठरवून पद्धतशीरपणें, प्रसन्नपणें व कलायुक्ततेनें काम उरकणें हा केळकरांचा विशेष होता. 'केसरी' चालविण्यास याच गुणामुळें

केळकर हे टिळकांना योग्य वाटले व टिळकांनीं मृत्युपत्राअन्वयें त्यांच्यावर ' केसरी ' सोंपविला.

* * *

टिळकांच्या मृत्यूनंतर केळकर अतीशय गाजले. लोकप्रियतेच्या ते एकदां शिखरावर गेले व नंतर लोकांत ते अत्यंत अप्रियहि झाले. टिळकांच्या हयातींत जे त्यांचे दोष झाकले गेले होते ते नंतर उघडे पडले. त्यांना न झेपणाऱ्या जबाबदाऱ्या त्यांचेवर पडल्या व त्यांत त्यांना अपयशहि फार आलें. याहून वेगळ्या प्रकारें त्यांचें आयुष्य जायला हवें होतें. पण ऐतिहासिक नियति तशी नव्हती. टिळकांच्या मृत्यूनंतर गांधी हे अगदीं वेगळ्या प्रकृतीचे पुढारी हिंदी राजकारणांत अवतरले. केळकरांना त्यांचें आकलनच झालें नाहीं. स्वार्थत्याग, कार्यनिष्ठा वगैरे गुणांत केळकर कधींहि कमी पडले नसते. १९२० सालीं कलकत्ता येथें कॉंग्रेसच्या जादा अधिवेशनांत कायदेमंडळ बहिष्काराची योजना मंजूर झाल्यावर कौन्सिलबहिष्कार मान्य नसतांहि केळकरांनीं कॉंग्रेसची आज्ञा मानली. नंतर त्यावेळचे गव्हर्नर सर जॉर्ज लॉइड यांनीं केळकरांचें मत बदलविण्याचा व्यक्तिशः प्रयत्न केला. पण "मी कोण त्याहि मोहासाठीं कॉंग्रेसची शिस्त मोडणार नाहीं" असें त्यांनीं स्पष्टपणें कळविल्याची आख्यायिका आहे. गांधींच्या धोरणाशीं त्यांचें मुळींच जमत नव्हतें. पण महाराष्ट्र स्वार्थत्यागांत मागें राहणार नाहीं हें सिद्ध करण्यासाठीं आपण असहकारितेच्या चळवळींत उतरलों असें केळकरांनीं दादासाहेब खापर्डे यांना उत्तर देतांना एकदां म्हटलें आहे. गांधींच्या विचारांत तार्किक दोष आहेत, पण कोट्यवधि लोकांच्या भावनेची पकड घेण्याचा जो अलौकिक गुण गांधींचे ठिकाणीं आहे त्यांचें वैशिष्ट्य केळकरांनीं ओळखलें असतें तर महाराष्ट्राचा इतिहास फार वेगळा झाला असता.

* * *

टिळकांच्या अंगचे पुढारीपणाचे, कालदर्शित्वाचे, प्रभुत्वाचे गुण केळकरांचे ठिकाणीं नव्हतेच. ह्या दृष्टीनें ते हाडाचे फक्त संपादकच होते. तेवढेंच कार्य त्यांनीं चालविलें असतें तर त्यांची कीर्ति आजवर सतत वाढत राहिली

असती. पण केळकर टिळकांचे गादीवर आले तेव्हां टिळकांच्यासारखें सर्व कांहीं त्यांनीं केलें पाहिजे अशी महाराष्ट्रानें व परप्रांतीयांनींहि अपेक्षा धरली. खरोखर अंगावरून कोळी झटकून टाकावा अशी ही इतरांचीं अपेक्षा केळकरांनीं झटकायला हवी होती. केळकर हे टिळकांची कीर्ति आपणास मिळावी अशी महत्त्वाकांक्षा कधींच बाळगीत नव्हते. टिळकांचे अलौकिक गुण आपल्या ठिकाणीं नाहींत हें ते जाणून होते. पण ते स्वभावानें गरीब, विनयशील व लोकांचें मन न मोडणारे होते. केसरीच्या संपादकानें लोकांची अपेक्षा पुरविली पाहिजे अशी एक कर्तव्याची जाणीव त्यांना झाली व महाराष्ट्रानें त्यांना दिलेलें राजकीय पुढारीपण त्यांनीं घेतलें. कांहीं दिवस महाराष्ट्रानें केळकरांचें म्हणणें ऐकलें व फार मानलें म्हणून त्यांना आत्मविश्वासहि उत्पन्न झाला. पण गांधींचें अफाट व्यक्तिमत्व त्यांना उमगलेंच नाहीं. प्रथम तार्किक युक्तिवादानें गांधींच्या विचारांतली चूक लोकांच्या नजरेस आणूं असें केळकरांना वाटलें. पण गांधींचे उघड उघड चूक व अतार्किक दिसणारे विचार व आचार लोक आंधळेपणानें स्वीकारीत आहेत व आपलें सरळ व सयुक्तिक बोलणेंहि लोक ऐकत नाहींत हें जेव्हां केळकरांना दिसूं लागलें तेव्हां या घटनेचीं ऐतिहासिक कारणें न पहातां केळकर चिडूं लागले व कॉंग्रेसपासून आणि लोकमतापासून दूर दूर जात चालले.

* * * *

एका दृष्टीनें पुढें भुलाभाईंनीं जें यश मिळविलें तें खरोखर मुळचें केळकरांचें यश होतें व केळकर नम्रपणें कॉंग्रेसमध्यें राहिले असते तर त्यांना तें कोणी नाकारलें नसतें. कॉंग्रेसला पार्लमेंटरी राजकारणाकडे खेचण्याचे कामीं मोतीलाल नेहरूंना खरें यश आलें नाहीं. तें पुढें भुलाभाईंना आलें. काळ बदलत गेला हें तर खरेंच. पण मोतीलालजींच्या प्रभावी आणि दांडगाई वृत्तीमुळें कॉंग्रेसमध्यें कौन्सिलच्या प्रश्नावर एकजूट झाली नाहीं. उलट फूट झाली. भुलाभाई मनमिळावू, सौम्य, चिकाटीचे, सर्वांसमोर सर्वांच्या कलानें जाणारे, गांधींची थोरवी जाणणारे, पण व्यवहार दृष्टीचे असे असल्यानें गांधींच्या डोळयादेखत, त्यांच्या इच्छेविरुद्ध पण त्यांच्या आशीर्वादानें

भुलाभाईंनीं कौन्सिलप्रवेश मंजूर करून घेतला. पुढें कॉंग्रेसनें मंत्रिमंडळें घेतलीं; आतां आपण अहिंसेचा त्याग केला असेंहि कॉंग्रेस पुढारी उघडपणें बोलूं लागले आहेत. केळकर कॉंग्रेसला चिकटून राहिले असते तर हें सर्व आपलें यश आहे असें ते म्हणूं शकले असते. केळकर हे हाडाचे राष्ट्रीय व कॉंग्रेसवादी होते. सावरकरांचा अलीकडील जातीयवाद व पूर्वीचा दहशतवाद त्यांना कधींच मानवला नाहीं. सत्याग्रह, कायदेभंग यांसारख्या चळवळींना त्यांचा नेमस्तासारखा तात्त्विक विरोध कधींच नव्हता. पण भावनेनें वेडावून गांधींच्या मागें लक्षावधि लोक धावतात व माझे तार्किक बोल ऐकून घेत नाहींत म्हणून केळकर चिडले व नंतर त्यांनीं कॉंग्रेसच्या सर्वच गोष्टींना विरोध करून ते हिंदुसभेंतहि गेले. अर्थात् त्यांचें पुढेंहि कोणाशींच पूर्णपणें पटलं नाहीं हें स्वाभाविकच झालें.

*　　*　　*　　*

मराठी भाषेवर केळकरांचें प्रभुत्व फार मोठें होतें. त्यांनीं खूपचखूप लिहिलें आहे. राजकीय, सामाजिक, आर्थिक धार्मिक वगैरे सर्व विषयांवर त्यांचे ग्रंथ आहेत. पण अशा कोणत्याहि विषयाचा तात्त्विक तळ पाहण्याचा एकतानतेचा खटाटोप त्यांनीं केला नाहीं यामुळें हें 'शास्त्रीय' वाङ्मय फारसें शास्त्रीय झालेलें नाहीं. त्यांच्या कादंबऱ्या व लघुकथा मामुली आहेत. त्यांचीं नाटकें मात्र बरींच चांगलीं असून 'तोतयाचें बंड' हें नाटक एका काळीं महाराष्ट्रभर गाजलें. केळकरांचें सर्वोत्कृष्ट लेखन म्हणजे त्यांचें निबंध लेखन व केसरींतील अग्रलेख. कोणत्याहि विषयाची सर्वांगीण चर्चा करून भारदस्त, संयमयुक्त व कलायुक्त असे शेकडोंशें अग्रलेख केळकरांनीं फार चांगलें लिहिले आहेत. केळकरांनीं भारदस्तपणाची मर्यादा कधींच सोडली नाहीं. ज्यावर टीका करावी त्यालाहि ती टीका वाचनीय वाटावी हें केळक-रांच्या टीकेचें वैशिष्ट्य असे. उपमादृष्टांतांनीं साधा विषयहि ते चटकदार व डौलदार करीत. आज केळकरांची सुंदर, संयमी लेखणी अजिबात लोपली आहे. त्यांनीं जें अत्यंत कडक म्हणून लिहिलें तें आज वाचकांना मिळ-मिळीत वाटतें. हा रुचिपालट कीं घसरगुंडी याचा विचार साहित्यिकांनीं

करायला हवा. आजची रुचि कांहींहि असो. पत्रकाराला केळकरांची लेखणी हीच आदर्श होय.

*  *  *  *

राजकारणांत केळकर कसेहि वागले असोत, त्यांची व्यावहारिक दृष्टि अखेर विजयी झाली आहे. ते निष्ठावंत स्वराज्यवादी होते. स्वराज्याच्या प्रचारांत आयुष्यांतलीं बहुमोल वर्षें त्यांनीं वेचलीं. तें स्वराज्य मिळालेलें त्यांनीं पाहिलें हें त्यांचें भाग्य होय. 'मी दैववान आहें व म्हणून दैववादी आहें' असें ते म्हणत. पण ते खरोखर यत्नवादीच होते. पाठीचा कनाठा आठ आठ तास ताठ ठेवून वाचण्याचा व लेखकांना मजकूर सांगण्याचा उद्योग त्यांनीं आमरण सोडला नाहीं. समाजसुधारणेचा हव्यासहि त्यांना आमरण होता. साने गुरूजींच्या मंदिरप्रवेश चळवळीस गेल्याच वर्षी त्यांनीं जाहीर सभेंत बोलून पाठिंबा दिला. स्वभावानें ते आनंदी असत. त्यांना सांसारिक दुःखहि थोडेसें भोगावें लागलें, तें त्यांनीं शांतपणें सोसलें. सार्वजनिक जीवनांतली असह्यता लेखनवाचनांत विसरण्याचा त्यांनीं प्रयत्न केला व त्यांत त्यांनीं यशहि मिळविलें. केसरी–मराठा संस्था हें आज त्यांचेंच स्मारक आहे. पण केसरी–मराठा ग्रंथालय हें त्यांचें फार मोठें स्मारक आहे. त्यांचा घरचा ग्रंथसंग्रहहि चांगला असून वाचनाचा व लेखनाचा हव्यास त्यांना केवळ दुर्दम होता. असा हा आदर्श पत्रकार व मराठी भाषेचा कंठमणि आपल्यांतून गेला तरी महाराष्ट्राच्या चाळीस वर्षांच्या इतिहासांत त्यांचें नांव अमर असून महाराष्ट्रास त्यांची कधींहि विस्मृति पडणार नाहीं.

# कै. तात्यासाहेब केळकर

## ( दैनिक नवाकाळ १५ ऑक्टोबर १९४७ )

ता. १३ रोजीं उत्तररात्रीस पुण्याला आपल्या रहात्या घरीं श्री. नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर हे कांहींशा आकस्मिक रीतीनें निधन पावले हें कळविण्यास आम्हास अत्यंत खेद होत आहे. त्यांच्या वयाला नुकतींच ७५ वर्षें पूर्ण झालीं होतीं, या दृष्टीनें पहातां त्यांचें निधन अगदींच अकालीं न म्हणतां आलें तरी सामान्यतः त्यांची प्रकृति इतक्या वयांतही दिसायला धडधाकड व निकोप असल्यामुळें व त्यांचें देहावसान अशा रीतीनें होईल असें वाटत नव्हतें, यामुळें त्यांचा मृत्यु आकस्मिक ठरणारा असून ही आकस्मिकताच निधन–शोकाचें उत्कटत्व वाढविणारी आहे.

कै. तात्यासाहेब हे विद्याभ्यास संपल्यावर १८९६ सालीं म्हणजे वयाच्या २४ व्या वर्षीं लो. टिळकांच्या सान्निध्यांत एक सहकारी या नात्यानें आले व तेव्हांपासून टिळकांच्या नानाविध चळवळीच्या तालमींत राजकीय कर्तबगारीचें शिक्षण घेऊन टिळकांच्या मागें १९२० सालानंतर टिळकांच्या पुढारीपणाची धुरा त्यांच्या अंगावर पडली व ती त्यांनीं कशी वाहिली हें सर्वांच्या परिचयाचें असल्यानें त्यासंबंधांत अधिक ऊहापोह करण्याची जरूरी नाहीं. कै. केळकर हे कै. लो. टिळकांच्या पश्चात् महात्मा गांधींच्या चळवळींत कांहीं काळ सामील झाले तरी तें राजकारण त्यांना मानवणारें नसल्यामुळें सुरुवातीस स्वराज्य पक्षांत ते सामील झाले व त्या पक्षाचेंहि कायदेमंडळातील अडवणुकीचें धोरण त्यांना न परवडून त्यांनीं प्रतिसहकार पक्ष काढला. प्रतिसहकार पक्ष त्यावेळीं त्यांनीं जर काढला नसता तर कदाचित् स्वराज्य पक्षाच्या अमदानींत ते काँग्रेसच्या अध्यक्ष पदापर्यंतहि पोहोंचले असते. पण विशिष्ट मतांचा पीळ जो त्यांच्या मनाला बसला होता तोच त्यांच्या बाबतींत जास्त प्रभावी ठरला आणि याच पिळदारपणामुळें त्यांचे कांहीं इष्टमित्र सरकारी बड्या जागांवर रुजू झालेले दिसले तरी कै. केळकरांनीं अधिकाराच्या जागा कधीं पत्करल्या नाहींत हें ध्यानीं घेण्या-

सारखें आहे. प्रतिसहकार पक्ष त्यांना यशस्वी करतां आला नाहीं तरी तिसऱ्या गोलमेजाचें आमंत्रण त्यांना मिळालें आणि त्यानंतर देशांतील राजकीय परिस्थिति त्यांच्यासारख्यांचा बोज न ठेवण्याइतकी तापलेली अशी झाल्यामुळें राजकारणापासून त्यांनीं जवळ जवळ निवृत्तीच पत्करली. त्यांची राजकीय मतें कोणाला पसंत पडलीं किंवा न पडलीं तरी त्यांना प्रिय असणारीं राजकीय मतें हीं कै. टिळकांचींच मतें होत अशी निष्ठा बाळगून त्यांनीं शेवटपर्यंत त्यांची कास सोडली नाही व त्यासाठीं अप्रियता पत्करण्यास ते तयार झाले हें लक्षांत घेण्यासारखें आहे. १९३२ सालीं त्यांच्या वयाचीं साठ वर्षें पुरी झालीं म्हणून महाराष्ट्रभर जो त्यांच्या षष्ठ्यब्दपूर्तीचा अतिशय थाटामाटानें समारंभ झाला त्यानंतर एक तऱ्हेची कृतार्थता लाभल्याप्रमाणें ते साधारणतः धकाधकीच्या मामल्याबाहेर रहाण्याचा यत्न करूं लागले. अलीकडे कित्येक वर्षें तर ते प्रसंगोपात मुलाखतीच्या अगर लेखांच्या द्वारें आपलें राजकीय मनोगत प्रकट करण्यापलीकडे फारसें कांहीं करीत नव्हते असें म्हटल्यास चुकीचें ठरण्याचें भय नाहीं. लोकमान्यांचे एक प्रमुख शिष्य व पूर्वीं एकदां राजकारणांत भाग घेतलेले म्हणून एखाद्या विशेष प्रसंगीं आपलेंहि मत लोकांना समजावें असें त्यांना व त्यांचें मत लोकांना कळल्यास उपयोग होईल असें इतरांना वाटण्याजोगी योग्यता त्यांच्या ठिकाणीं निस्संशय होती.

प्रत्यक्ष राजकारणाचें क्षेत्र सुटलें यामुळें कै. तात्यासाहेब स्वस्थ असे कधींच राहिले नाहींत; प्रासंगिक सभासंमेलनांच्या अध्यक्षांचें काम व अखंड लेखन असा त्यांचा उद्योग अगदीं अखेरच्या घटकेपर्यंत चालू होता. त्यापैकीं त्यांचें लेखन हें मराठी भाषेच्या इतिहासांत चिरस्थायी होऊन रहाणारें आहे. विद्याविनोद हें त्यांच्या स्वभावाचें एक मर्म होतें. दोन वर्षांपूर्वीं पुण्यास झालेल्या नाना फडणीस व्याख्यान–मालेला त्यांनीं सतत नऊ दिवस संध्याकाळचे तीन–चार तास मोठ्या आस्थेनें व उल्हासानें खर्चीं घालण्याचा क्रम ठेवला होता ही एकच गोष्ट त्यांच्या विद्याविनोदाची उत्तम साक्ष पटविणारी आहे. कॉलेजांत असतांनाच त्यांचा हा स्वभाव विशेष

ह्ष्टोत्पत्तीस येऊं लागला होता. त्यांची ' सुभाषित आणि विनोद ' ही लेख-माला व त्याचप्रमाणें त्यांनीं केलेलीं बंगाली इंग्रजी नाटकांचीं भाषांतरें यांचा जन्म कॉलेजच्या अभ्यासांतून झाला होता. पुढें केसरी-मराठ्याशीं संबंध जडल्यावर त्यांनीं इंग्रजी मराठी अशा दोन्ही भाषांमध्यें जरी पुष्कळ लिहिलें असलें तरी त्यांना मराठीचाच जिव्हाळा जास्त होता व आपल्या लेखणीनें त्यांनीं मराठी साहित्यामध्यें जी विविध स्वरूपाची भर टाकली तिच्यांतला पुष्कळसा भाग बहुमोलाचा व म्हणूनच चिरकाल टिकणारा असा ठरेल. साहित्याचे किंवा इतर व्यवहाराचे असे बहुधा फारच थोडे विषय असतील कीं त्यांना तात्यासाहेबांनीं चोखाळलें नाहीं; परन्तु या अनेकविध लेखनाच्या धूमधडाक्यांत त्यांच्या लेखणीमार्फत अतिप्रसंगहि घडले आहेत. साहजीकच यामुळें त्यांच्या लेखनाचीं कांहीं फळें त्यांच्या देखत नष्ट झालीं. अशा प्रकारें चिर-नश्वराची झडती घेऊनहि प्रत्येकाला त्यांनीं गेलीं ५० वर्षें सतत विचारदान चालविलें होतें व त्यांतून कांहीं अंश पुढील पिढीला कित्याप्रमाणें मार्गदर्शक होईल हें कबूल करावें लागेल. त्यांच्या दीर्घायुष्याचें अखंड वाङ्मयसेवा हेंच एक निरपवाद तात्पर्य आहे.

वाङ्मयसेवेच्या कार्याबरोबर त्यांनीं पुण्यांतील अनेक संस्थांना सल्ला-मसलतगार या नात्यानें चालविलेली मदत या प्रसंगीं उल्लेखनीय वाटते. त्यांची हौस, त्यांचा उरक, त्यांचा उत्साह, त्यांची सर्व क्षेत्रांतून वावरण्याची आकांक्षा, त्यांची रसिकता वगैरे त्यांचे गुण त्यांना अशा निरनिराळ्या संस्थांतून सोसाव्या लागणाऱ्या क्लेशांची मातब्बरी वाटूं देत नसत. आपल्या विशिष्ट वर्गांतील लोकप्रिय अशा श्रेष्ठ योग्यतेची जाणीव बाळगून ते वेगवेगळ्या संस्थांच्या कारभारांत भाग घेत असत. साधारणपणें कुणालाहि निष्कारण अन्याय सोसण्याची पाळी येऊं नये, अशा रीतीनें शक्यतोंवर वागण्याचा यत्न करीत. किती संस्थांच्या कारभारी मंडळांत ते एकाचकाळीं होते याची कल्पना त्यांनीं एकदां दिलेल्या संस्थांच्या यादीवरून पुष्कळांना आली असेल. इतक्या संस्थांच्या उद्योगांत भाग घेऊनहि त्यांना लेखन-वाचन कसें जमतें हा एक त्यांच्या बाबतींत

खरोखरींच कौतुकाचा विषय होता. असा एक टिळकांच्या तालमींतला, बहुत वर्षेंपर्यंत हिंदी राजकारणांतील टिळकांचा अव्वल दर्जा महाराष्ट्रापुरता संभाळलेला, सार्वजनिक सेवेच्या हौसेचा व मराठी भाषेची असामान्य सेवा करणारा पुरुष कालवश झाल्यामुळें महाराष्ट्राला सोसावा लागणाऱ्या हानीचें निश्चित मोजमाप सध्यां तरी करणें अशक्य आहे. मात्र महाराष्ट्रांतील मोठा पुरुष गेला यांत मुळींच संशय नाहीं.

---

# साहित्यसम्राट श्री. न. चिं. केळकर यांचें शोचनीय निधन

( दैनिक प्रभात, मुंबई १५ ऑक्टोबर १९४७ )

श्री. नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांस पुणें येथें काल मंगळवारीं हृदयाचे विकारानें अचानक देवाज्ञा झाली हें कळविण्यास अतिशय वाईट वाटतें. त्यांच्या निधनामुळें महाराष्ट्रांतील एक मोठा पुढारी, नाणावलेला संपादक, असामान्य वाङ्मयसेवक, समाजसुधारक व तर्कशुद्ध नि विनोदमिश्रित पण परिणामकारक भाषण करणारा एक नामवंत वक्ता नाहींसा झाला आहे. त्यांनीं निर्माण केलेली वाङ्मयसंपत्ति व बजावलेली लोकसेवा इतकी मोठी आहे कीं मराठी भाषा जोंपर्यंत बोलली जात आहे तोंपर्यंत त्यांचा कोणालाहि विसर पडणें शक्य नाहीं.

आठदहा दिवसांपूर्वींच मुंबईच्या नभोवाणी केंद्रावर ‘ माझे सहकारी व मित्र ’ या विषयावर त्यांचें एक आकर्षक व माहितीपूर्ण असें भाषण वाचून दाखविण्यांत आलें. हजारों श्रोत्यांनीं हें भाषण ऐकिलें असेल. भाषणाचा विषय हा केवळ महाराष्ट्राचा नव्हे तर अखिल देशाच्या इतिहासासारखा असल्यामुळें तें ऐकणारांना कै. तात्यासाहेब केळकर हे स्वराज्याचें राजकारण

निष्ठेनें करणाऱ्या गेल्या दोन पिढ्यांमधील महत्त्वाचा दुवा कसे होते व राजकारणांत त्यांचें स्थान किती मोठें होतें याची सहज कल्पना आली असेल. सदरील भाषणांत त्यांनीं स्वतःच आपल्या चरित्राचे तीन कालखंड कल्पिले होतेः—एक १९०८ ते १९२० पर्यंतचा म्हणजे सत्ताधारणाचा; दुसरा १९२० ते १९३७ पर्यंतचा म्हणजे कसोटीचा नि तिसरा १९३७ ते १९४७ पर्यंतचा म्हणजे विश्रांतिसुखाचा. या कालखंडाचें कै. तात्यासाहेबांनीं स्वतःच केलेलें नामाभिधान सर्वांसच पटेल असें नाहीं. पुष्कळांना असें वाटेल कीं, १९०८ ते १९२० हाच त्यांच्या जीवनांतील खरा कसोटीचा काळ होता. त्यानंतरचा कालखंड स्वतःचे मतासाठीं झगडण्यांत गेला व अखेरचा विश्रांतिसुखाचा असला तरी खऱ्या कर्मयोग्याला साजेल अशा वृत्तीनें त्यांनीं मराठी साहित्यांत या मुदतींत आपल्या लिखाणानें मधूनमधून जी मौलिक भर घातली त्यामुळें तो 'आतां उरलों उपकारापुरता' अशा स्वरूपाचाच अधिक होता. ते काल वारले नि परवांच त्यांनीं एक मराठी लेख तोंडानें सांगितला या एका गोष्टीवरून वरील विधानाची सत्यता कोणासही पटेल.

त्यांच्या आवडीचे विषय जसे अनेक तसेंच त्यांचें वाचनहि दांडगें होतें. कोणत्याहि प्रश्नाच्या उभय बाजू पाहणें हा त्यांच्या स्वभावाचा विशेष होता. ते स्वतःला लोकमान्यभक्त म्हणविण्यात भूषण मानीत—पण अंध भगतगिरी त्यांनी कधींच केली नाहीं. बुद्धीच्या निकषावर प्रत्येक विचार व मत घासून पाहावयाचें व जें या कसोटीला उतरेल तेंच स्वीकारावयाचें असा त्यांचा शिरस्ता होता. त्यांच्या सामाजिक व राजकीय मतांचा गाभा नीट तपासून पाहिला तर त्यांची मनोवृत्ति सदैव सुवर्णमध्य साधण्याकडे असे असे आढळून येईल. या सुवर्णमध्य गांठण्याच्या त्यांच्या संवयीमुळें त्यांस प्रतिपक्षाकडूनच काय, पण मित्रांकडूनहि अनेकवार अनिवार टीका सहन करावी लागली. त्यांना सरकार जहाल समजे, ज्यांना मवाळ म्हणावें असे लोक त्यांचेपासून चार पावलें दूर रहात; पण त्यांच्याच पक्षांतील कित्येक टीकाकारांची मजल त्यांस मवाळ म्हणण्यापर्यंत जाऊन पोहोंचे. १९०७ सालीं

ते इतके अप्रिय झाले कीं केसरी व मराठा या उभय पत्रांच्या संपादकत्वाचा राजीनामा देऊन टाकावा कीं काय असें त्यांस वाटूं लागल्याचें त्यांनीं स्वतःच लिहून ठेविलें आहे. लोकमान्य टिळकांची मंडालेहून मुक्तता होण्यापूर्वी राष्ट्रीय पक्षाने कॉंग्रेसमध्यें सामील व्हावें कीं नाहीं हा प्रश्न महाराष्ट्रांत मोठ्या हिरीरीनें चर्चिला जात होता. सदरील प्रसंगीं कै. तात्यासाहेबांनीं कॉंग्रेसमध्यें शिरावें असेंच मत प्रतिपादिलें व त्याबद्दल त्यांस कठोर टीकाही सहन करावी लागली. हें त्यांचें मत पुढें लोकमान्यांनीं स्वतःच उचलून धरलें व ते आपल्या अनुयायांसह कॉंग्रेसमध्यें शिरले हा प्रश्न निराळा. पण तसें होण्यापूर्वी कै. तात्यासाहेबांना आपल्या तडजोडीच्या वृत्तीबद्दल शिक्षा सहन करावी लागली ही गोष्ट विसरतां येत नाहीं. मुळशी सत्याग्रहाचे प्रसंगींही त्यांनीं तडजोडीची व सुवर्णमध्य साधण्याची वृत्ति दर्शविल्यामुळें त्यांजवर टीकेचा कांहीं कमी भडिमार झाला नाहीं. पण अखेर सत्याग्रह पडलाच, टाटानीं धरणही बांधलें नि ज्यांचीं गांवें बुडालीं त्यांना नुकसानभरपाई घेण्यांतच समाधान मानावें लागलें.

एक उत्कृष्ट संपादक व लेखक म्हणून कै. तात्यासाहेबांची जेवढी ख्याति, तेवढीच एक उत्कृष्ट संघटनशील व टापटिपीचा चिटणीस म्हणून त्यांची ख्याति होती. त्यांनीं अखिल भारताचे पुढारी लोकमान्य टिळक यांचे चिटणीस म्हणून तर अमोल कामगिरी बजाविलीच; पण त्याशिवाय लोकमान्य टिळक व बाबू अरविंद घोष यांनीं स्थापिलेल्या राष्ट्रीय पक्षाचे चिटणीस म्हणून त्यांनीं जी कामगिरी केली तिचा बोलबाला विशेष झाला.

लोकमान्य टिळकांवर राजद्रोहाचा खटला होऊन त्यांची मंडालेला रवानगी झाली तेव्हांपासूनचा काळ हा कै. तात्यासाहेबांच्या जीवनांतला कसोटीचा काळ होता असें म्हणावेंसें वाटतें. यावेळीं ‘ केसरी ’ व ‘ मराठा ’ या उभय पत्रांचें संपादकत्व त्यांजकडे होतें. जरा कांहीं खुट्ट झालें कीं लगेच वृत्तपत्रांवर सरकारी दडपशाहीचा बडगा पडे. लोकमान्यांवरील खटल्याबाबत यावेळीं कै. तात्यासाहेबांनीं एक पुस्तक लिहिलें असतां मुंबई सरकारचा त्यांचेवर रोष झाला व तात्काळ सदरील पुस्तक आक्षिप्त ठरविलें गेलें.

'मराठा' पत्रांत सरकारवर खडसून टीका करणारा लेख लिहितांच त्यांजवर खटला भरला गेला व त्यांत बेमुदत कैद व रु. १२०० चा दंड ठोठावण्यांत आला. दोन आठवड्यांत त्यांची सुटका झाली; पण वृत्तपत्र चालविण्याचें काम कठीण होऊन बसलें. प्रचलित घडामोडींवर सडेतोडपणें कांहींच न लिहावें तर वृत्तपत्रव्यवसायाचें पावित्र्य न संभाळल्याचें पाप, लिहावें तर दडपशाहीच्या सत्रांत वृत्तपत्राला बळी पडण्याची भीति, अशी नाजूक स्थिति निर्माण झाली होती. नाशीक येथें कलेक्टर जॅक्सन यांचा खून झाल्यानंतर तर नोकरशाहीनें सगळेंच ताळतंत्र सोडलें. एकादा वावगा शब्द निघाला तर लगेच मुस्कटदाबी व्हावयाची. 'मराठा' व 'केसरी' या पत्राचे वर्गणीदार होणें हाही तत्कालीन सरकारला गुन्हा वाटूं लागला होता. अशा प्रतिकूल परिस्थितींतही सर्व आघात सहन करून, कै. तात्यासाहेब केळकरांनीं 'केसरी–संस्थे' ची नौका कुशल कर्णधाराप्रमाणें सुखरूप स्थळीं नेली व लोकमान्य टिळकांकडूनच काय, पण अखिल महाराष्ट्राकडून धन्योद्गार संपादन केले.

त्यांनीं 'केसरी' चें द्विसाप्ताहिकांत रूपांतर केलें; पण दैनिकांत रूपांतर करण्याचा हव्यास कधींच बाळगला नाहीं याबद्दल कित्येक लोक त्यांस दोष देतात. पण त्यांनीं अनेकवार जाहीरपणें सांगितल्याप्रमाणें 'केसरी' पत्र हें सर्वस्वी ग्रामीण रयतेच्या कल्याणासाठीं असल्यामुळें त्याचें स्वरूप सदैव तसेंच रहावें व त्याची वर्गणी गरीबगुरीब वाचकांच्या आहाराबाहेरची नसावी असा त्यांचा कटाक्ष होता व त्याप्रमाणें शेवटच्या घटकेपर्यंत 'केसरी' चें दैनिकांत रूपांतर करण्याची कल्पना त्यांचे मनांत मूळ धरूं शकली नाहीं.

होमरूल–लीगची चळवळ, या चळवळीचे प्रचारासाठीं व प्रसारासाठीं लिहिलेलें वाङ्मय व 'ए केस् फॉर होमरूल' यांजसारखीं लिहिलेलीं पुस्तकें व दिलेलीं व्याख्यानें–हीं कै. तात्यासाहेबांच्या खऱ्या कामगिरीचें योग्य दर्शन घडवितात. त्यांनीं लिहिलेल्या टिळक चरित्रांत कदाचित् दोष नसतील असें नाहीं; पण हें चरित्र वाचीत असतां कशाची आठवण विशेष येत असेल तर ती सॉक्रेटिस नि प्लेटो व जॉनसन नि बॉसवेल यांजमधील आदरणीय

नात्याची व त्यांनीं निर्माण केलेल्या अनुपम वाङ्मयाची. लो. टिळक व गॅरिबॉल्डी यांच्या चरित्रांखेरीज नाटकें, कादंबऱ्या, लघुकथा, हास्यविनोद इत्यादि वाङ्मयप्रकार लिहिण्यांतही त्यांनीं असामान्य बुद्धिमता दाखविली व एक अग्रगण्य लेखक व ग्रंथकार म्हणून कीर्ति संपादन केली. त्यांचें वाङ्मय हेंच त्यांचें सर्वांत मोठें स्मारक होय.

१९२० सालीं गांधी–युग सुरू झाल्यापासून काँग्रेस पुढाऱ्यांशीं त्यांचे अनेकवार खटके उडाले. आरंभीं ठरीव मुदतीपर्यंत त्यांनीं व्यक्तिगत मतभेद बाजूस सारून असहकारितेच्या चळवळींत हार्दिक भाग घेतला व तिचा पुरस्कारहि केला. पण त्यांचे पाय नेहमींच जमिनीवर असल्यामुळें पुढेंपुढें त्यांस आपले मतभेद केवळ विधायक व व्यवहार्य कार्यक्रम अमलांत यावा म्हणून व्यक्त करावे लागले व त्यासाठीं प्रखर टीकाहि सहन करावी लागली. कौन्सिल–प्रवेश, बहिष्कार इत्यादि सर्व प्रश्नांबाबतचीं महाराष्ट्राचीं मतें काँग्रेसनें पुढें आत्मसात केलीं व तीं आत्मसात् केल्यामुळेंच देशाला स्वातंत्र्याची सुप्रभात यथावकाश दिसण्यास भरीव मदत झाली. पण हे मतभेद व्यक्त करीत असतां कै. तात्यासाहेब व त्यांचे स्नेही, सहकारी व अनुयायी यांस जी अप्रियता सहन करावी लागली तीच त्यांची निरपेक्ष लोकसेवा होय असें म्हटल्याशिवाय मात्र राहावत नाहीं.

कै. तात्यासाहेबांनीं महात्माजींचे कार्यक्रम, मतें व तत्त्वज्ञान यांस अनेकवार तात्त्विक व सात्त्विक विरोध दर्शविला असेल. त्यांनीं कांहीं ढोंगी गांधी–अनुयायांचे बुरखेही सडेतोड टीकेनें फाडून टाकिले असतील, पण हें सारें करतांना त्यांनीं आपल्या उच्च हेतूंची कधींच पायमल्ली होऊं दिली नाहीं किंवा आपला प्रामाणिकपणाहि कधीं सोडला नाहीं. गांधीजींसारख्या महात्म्यालाही ढोंगी व अप्रामाणिक शिष्यांच्या पाठिंब्यापेक्षां प्रामाणिकपणें केलेली कै. तात्यासाहेबांसारख्यांची टीका अधिक रुचली असली पाहिजे यात शंका वाटत नाहीं. कै. तात्यासाहेबांना महाराष्ट्राचें म्हणून जें विशिष्ट राजकारण वाटलें तें त्यांनीं आपल्या लिखाणांत व वक्तृत्वांत ठासून प्रगट केलें व ज्या दिवशीं महाराष्ट्राच्या नेतृत्वाची धुरा संभाळण्याइतकी शारीरिक ताकद आपले

अंगीं उरली नाहीं असें त्यांस आढळून आलें त्या दिवशीं ते निवृत्त झाले. पण निवृत्त झाल्यावरहि ज्या मतांचा ठसा पूर्ण विचाराअंतीं त्यांचे मनावर उमटलेला होता तीं मतें जाहीरपणें प्रकट करण्यास ते कधींच बिचकले नाहींत.

असा एक अत्यंत थोर, बुद्धिमान व विद्वान् संपादक, टीकाकार, साहित्य-सेवक, ग्रंथकार व कार्यकर्ता आज आमच्यामधून निघून गेला हें महाराष्ट्राचें फार मोठें नुकसान आहे नि तें भरून निघणें शक्य नाहीं. त्यांच्या निधनानें महाराष्ट्रच काय, पण सबंध देश हळहळेल. त्यांच्या कुटुंबीयांचें सांत्वन कोणत्या शब्दांनीं करावें तें समजत नाहीं. अखिल महाराष्ट्र त्यांच्या दुःखांत सहभागी आहे एवढेंच आम्ही येथें नमूद करून ठेवितों.

परमेश्वर मृताचे आत्म्यास शांति देवो.

---

# साहित्यसम्राट व श्रेष्ठ पत्रकार

## ( नवशक्ति १५ ऑक्टोबर १९४७ )

साहित्यसम्राट श्री. न. चिं. उर्फ तात्यासाहेब केळकर यांच्या निधनाची दुःखद वार्ता ऐकून कोणीहि महाराष्ट्रीय हळहळल्यावांचून राहिला नसेल. अव्वल दर्जाचे साहित्यिक व श्रेष्ठ पत्रकार या नात्यानें त्यांनीं मिळविलेला लौकिक महाराष्ट्रांत त्यांची स्मृति चिरंतन राखील यांत शंका नाहीं. अगदीं अखेरच्या घटकेपर्यंत त्यांनीं आपलें साहित्यलेखन चालू ठेवलें होतें. मृत्यूच्या आदल्या रात्रींच एका मासिकासाठीं लेख लिहिण्यास त्यांनीं घेतला होता. लोकमान्य टिळकांच्या जीवनाचा व त्यांच्या कार्यांचा यथोचित परिचय करून देणारे त्यांचे चरित्र ग्रंथ, वार्धक्यावस्थेंत लिहिलेलें सहाशें सातशें पृष्ठांचें आत्मचरित्र, ज्ञानेश्वरीवरील सुरस विवेचन हे व इतर अनेक ग्रंथ लिहून कै. तात्यासाहेबांनीं मराठी साहित्यांत अमोलिक भर घातली

आहे. इंग्रजी भाषेंतूनहि त्यांनीं कांहीं ग्रंथरचना केली आहे. या त्यांच्या थोर साहित्यसेवेचा गौरव म्हणूनच त्यांच्या चहात्यांनीं त्यांना 'साहित्यसम्राट' हा किताब बहाल केला.

अव्वल दर्जाचे साहित्यिक म्हणून कै. तात्यासाहेब यांचा जितका गौरव करतां येईल त्याहिपेक्षां अधिक गौरव जुन्या पिढींतील श्रेष्ठ दर्जाचे पत्रकार म्हणून करतां येईल. १८९७ ते १९१९ पर्यंत 'मराठा' पत्राचे व १८९७ ते १९०७ आणि १९१० ते १९३१ पर्यंत 'केसरी' पत्राचे संपादक म्हणून जवळजवळ ४२ वर्षें त्यांनीं वृतपत्रद्वारें जनसेवा केली आहे. त्यांचीं मतें कांहींही असलीं तरी त्यांच्या लेखनपद्धतीनें व भाषाशैलीनें महाराष्ट्रावर छाप पाडली होती हें निश्चित. विलायतचीं बातमीपत्रें लिहून त्यांनीं आपल्या वर्णनशैलीचाहि परिचय करून दिला आहे.

साहित्य व वृत्तसेवेबरोबरच कै. तात्यासाहेबांनीं केलेली समाजसेवाहि बरीच मोठी आहे. पुणें नगरपालिकेचें ते दोनवेळां अध्यक्ष होते व ५० हून अधिक सामाजिक व शैक्षणिक संस्थांशीं त्यांचा निकटचा संबंध होता.

राजकारणांत मात्र नेमस्त वृत्तीमुळें व त्यागाच्या अभावामुळें तात्यासाहेबांची छाप पडूं शकली नाहीं. तरीहि कांहीं काळ ते महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते व कॉंग्रेस वर्किंग कमिटीवर त्यांची निवड झाली होती. लोकमान्यांचा उजवा हात म्हणून जरी एके काळीं चमकलेले असले तरी गांधी–युगांत त्यांचें राजकारण संपूर्ण हतप्रभ झालें. असो.

तात्यासाहेबांच्या वयाला ७५ वर्षें झाली होती तरी नियमित राहाणीनें त्यांची प्रकृति इतकी घडधाकट होती कीं, इतक्या लवकर त्यांच्यावर काळाची झडप येईल असें कोणासहि वाटलें नव्हतें. नुकतेंच नभोवाणीवर त्यांचें भाषण वाचून दाखविण्यांत आलें होतें. त्यांत त्यांनीं आपले अनेक अनुभव कथन केले होतें. "प्रत्येक मनुष्याला जसें स्वतंत्र व्यक्तिमत्व असतें तसेंच स्वतःच्या बुद्धीस व संस्कृतीस अनुसरून त्यानें स्वतंत्र मत बनविलेलें असतें व तो प्रामाणिक असेल तर कोणत्याहि स्थितींत तो तें मत बदलण्यास

तयार होणार नाहीं. हें कोणत्याहि क्षेत्रांत काम करणारांनीं ध्यानांत बाळगणें आवश्यक आहे."

कै. तात्यासाहेब यांचें नभोवाणीवर जें भाषण वाचून दाखविण्यांत आलें त्यांतील हें वाक्य त्यांच्या स्वतःच्या मतांविषयींच्या अभिमानाची व त्याला चिकटून राहाण्याच्या नीतिधैर्यांची साक्ष पटवितें. तात्यासाहेबांच्या जीवनाला त्याग व धडाडीची जोड मिळाली असती तर महाराष्ट्रांत आज त्यांनीं जो लौकिक माग ठेवला आहे त्यापेक्षां अधिक तेजस्वी लौकिक राहिला असता यांत शंका नाहीं.

---

# महाराष्ट्राचा अष्टपैलू हिरा हरपला !

( दैनिक लोकशक्ति पुणें, १५ ऑक्टोबर १९४७ )

"आज मी अत्यंत समाधानाच्या मनःस्थितींत आहें. मन शांत आहे—हात जोडले आहेत—'हांके'ची वाट पाहत आहें !" असे तृप्ततेचे उद्गार १९३९ सालींच श्री. न. चिं. केळकर यांनीं काढले होते. पण दैवानें त्यांना सुदृढ शरीरप्रकृति व समृद्ध कुटुंब-सौख्य दिलेलें असल्यानें आठ वर्षें त्यांना ती 'हांक' ऐकावी लागली नाहीं. गेल्या रविवारींच एका सभेचें अध्यक्षस्थान त्यांनीं मंडित केलें होतें आणि सोमवारीं एक लेखहि त्यांनीं लिहिला. पण काल मंगळवारीं पहाटे एकाएकीं त्यांची हृदयक्रिया बंद पडून ते स्वर्गवासी झाल्याची दुःखद वार्ता सर्वत्र पसरली. 'अनायासेन मरणम् विना दैन्येन जीवनम्' या प्रापंचिक यशाचा पुरेपूर लाभ श्री. तात्यासाहेब केळकरांना मिळाला. गेल्या ऑगस्टमध्यें त्यांना पंचाहत्तरावें वर्ष पूर्ण झालें, तेव्हां ते वार्ताहरांजवळ म्हणाले होते, देशाला स्वातंत्र्य मिळालेलें पाहण्याचें भाग्य मला लाभलें ही केवढी आनंदाची गोष्ट होय ! गेलीं पंधरा वर्षें ते सार्वजनिक संस्थांतून व कार्यांतून निवृत्त झाले असले, तरी त्या

काळांतहि त्यांनीं इतकें बहुविध, व्यासंगपूर्ण व आकर्षक लेखन केलें आहे कीं, विशीच्या उंबरठ्यावरील युवकालाहि लाज वाटावी. लेखनाचा अखंड उत्साह, मनःप्रवृत्तीची सदैव टवटवी आणि शरीरप्रकृतीचा सुदृढपणा हे श्री. केळकरांचे गुण खरोखर अलौकिक होते. एवढें दीर्घायुष्य भोगल्यानंतर, इतक्या संतुष्ट वृत्तीनें, अखेरच्या क्षणापर्यंत कार्यांत निमग्न राहून, इहलोकाचा निरोप घेणारे भाग्यवंत हिंदुस्थानांत तरी थोडेच !

## पन्नास वर्षांची समाज–सेवा

" माझें आयुष्य आतां संपत आलें आहे. म्हणून सार्वजनिक आयुष्यांत जो मला कधींहि सोडून जाणार नाहीं असा सहकारी मित्र व कार्यकर्ता मला हवा आहे " अशी इच्छा लो. टिळकांनीं १८९६ सालीं व्यक्त केली. ती पूर्ण करण्यासाठीं म्हणून श्री. केळकर पुण्यास जे आले ते कालपर्यंत शरीराची ताकत, बुद्धीची तरतरी व सार्वजनिक कार्याची हौस कायम ठेवून येथें राहिले. या पन्नास वर्षांच्या प्रदीर्घ कालांत त्यांचे कोणाशीं मतभेद झाले असतील, त्यांना निराशा गिळावी लागली असेल, अपमानही सहन करावे लागले असतील; पण त्यांच्या शत्रूंनींहि मान्य करावेत व वंद्य मानावेत अशा थोर गुणांची संपदा त्यांच्या ठायीं होती हें निर्विवाद. या काळांतील निम्मा भाग, म्हणजे लो. टिळकांच्या साहचर्यांत घालविलेलीं १९२० पर्यंतचीं पंचवीस वर्षें हा त्यांच्या जीवनांतील शुक्लपक्षच होय. त्यानंतरच्या पंचवीस वर्षांत बहुजन–समाजाच्या राजकारणाचा जो झंझावात सुटला आणि विद्वत्तेपेक्षां व वक्तृत्वापेक्षां त्यागाला व कष्टाला जें प्राधान्य व महत्त्व प्राप्त झालें, त्यामुळें श्री. केळकरांच्या आयुष्यांत कृष्णपक्ष चालू झाला हें खरें असलें, तरी अखेरपर्यंत मित्रांनां व शत्रूंनाही ही गोष्ट मान्यच होती कीं, " राजकारणांत केळकरांना पहिला नंबर देईल तो मूर्ख आणि साहित्यकारणांत त्यांना दुसरा नंबर देईल तो मूर्ख. "

## श्रेष्ठ दर्जाचा साहित्यिक

बहुरंगी साहित्य किंवा अष्टपैलू विद्वत्ता या गुणांनीं श्री. केळकरांचें नांव महाराष्ट्राच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं कायमचें लिहिलें जाईल. न्या. रानडे

यांच्यानंतर त्यांच्याइतका अष्टपैलु लेखक क्वचितच झाला असेल. त्यांच्या सखोल व विशाल बुद्धिमत्तेची तुलना सर रमेशचंद्र दत्त यांच्याशीं केली होती, पण श्री. दत्त यांच्यापेक्षां श्री. केळकरांनीं राजकारणांत मोठा वाटा उचलला होता. पेशवाईत नाना फडणिसांची कुशाग्र बुद्धि आंग्ल राजवटींत श्री. केळकरांचे रूपानें अवतरली असें कांहीं जणांना वाटे. नानांची राज्य-संरक्षक वृत्ति श्री. केळकरांच्या अंगीं असती तर त्यांच्या बुद्धिवैभवाचा उपयोग अधिक झाला असता.

## ‘केसरी’ ची सेवा

लो. टिळकांच्या राजकीय ग्रहमालेंत श्री. शिवरामपंत परांजपे, श्री. कृष्णाजीपंत खाडिलकर, श्री. गंगाधरराव देशपांडे, श्री. सीतारामपंत दामले यांच्याप्रमाणेंच श्री. नरसोपंत केळकरहि ओढले गेले, आणि आपल्या कष्टाळूपणानें, आज्ञाधारकतेनें व व्यवहारचातुर्यानें लोकमान्यांचे निकटवर्ती बनले, त्यांच्या पत्राचे व संस्थेचे संगोपक झाले. लोकमान्य विलायतेस स्वराज्याची शिष्टाई करण्यासाठीं निघाले, तेव्हां अवघ्या तीन आठवड्यांत श्री. केळकरांनीं ‘The Case For Indian Home Rule’ हें माहितीपूर्ण इंग्रजी पुस्तक लिहून दिलें आणि इंग्लंडांतहि त्यांना हरतऱ्हेनें साहाय्य केलें. ‘मराठा’ या इंग्रजी पत्राचे संपादक म्हणून श्री. केळकर पुण्यास आले; पण दैवयोगानें ‘केसरी’चीच सेवा त्यांच्या हातून इतकी घडली कीं, लोकमान्यांच्या खालोखाल केळकरांनाच ‘केसरीकर्ते’ ही पदवी लाभावी! अखिल हिंदुस्थानांतील दहा प्रभावी वृत्तपत्रांत नांव यावें इतका श्रेष्ठ दर्जा ‘केसरी’ला प्राप्त करून देण्यांत त्यांचे श्रम पुष्कळ अंशी कारणीभूत झाले आहेत, आणि खुद्द ‘केसरी’ संस्था तर त्यांनीं इतकी सुव्यवस्थित केली कीं, तिला तोड हिंदुस्थानांत एकादी दुसरीच सांपडेल.

## राजकारणांतील स्थान

लो. टिळकांच्या नेतृत्वाखालीं श्री. केळकरांनीं जशी इंग्लंडांत कामगिरी केली, तशीच हिंदुस्थानांत होमरूल लीगच्या चळवळींतहि केली. लोक-

मान्यांच्या पश्चात् म. गांधींनीं जें मन्वंतर केलें, त्याचें मर्म ओळखून श्री. खाडिलकर–देशपांडेप्रभृती नव्या प्रवाहाशीं समरस झाले. जनतेच्या स्वावलंबनानें व संघटनेनें अन्यायाचा प्रतिकार करणाऱ्या लोकमान्य टिळकांच्या राजकारणाचा खरा क्रियावान् वारस गांधीय राजकारण हेंच होय याची खूणगांठ श्री. खाडिलकर–देशपांडेप्रभृतींनीं आपल्या मनाशीं बांधली व ते गांधीजींच्या मार्गानें जाऊं लागले. श्री. केळकरांनींहि आपल्या मार्गाकडे वळावें म्हणून गांधीजींनीं त्यांना किती जवळ केलें, किती मान दिला हें श्री. केळकरांच्या 'आत्मचरित्रां'तील पत्रव्यवहारावरूनहि दिसून येणारें आहे. अहमदाबादेला सत्याग्रहाश्रम काढावयाचा असो किंवा अलीबंधूंच्या अटकेनंतर बोलाविलेली वर्किंग कमिटीची बैठक असो, गांधीजींनीं केळकरांना अगत्यानें बोलाविलें, त्यांचा सल्ला मागितला, त्यांना पदाधिकारहि दिला. पण श्री. केळकरांची राजकीय प्रतिभा व समयज्ञता अपुरी पडली असें पुढील इतिहासावरून दिसतें. गांधीजींच्या असहकारितेच्या गंगाप्रवाहांत ते एक वर्ष उभे राहिले–पण नंतर दूर सरले. स्वराज्यपक्षांत त्यांनीं दास-नेहरूंशीं सहकार्य केलें, पण दास-नेहरू गांधीमार्गावर गेले तरी हे तेथेंच राहिले, प्रतिसहकार-पक्ष, लोकशाही स्वराज्यपक्ष वगैरे नांवाखालीं आपलें नैराश्येचें व निष्क्रियतेचें राजकारण चालवीत राहिले. गोलमेज परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनाकरितां ते गेले, पण तिसऱ्या महत्त्वाच्या अधिवेशनास गैरहजर राहिले. मात्र एवढें खरें कीं, ते कोणत्याहि मार्गानें गेले तरी, त्यांची चौफेर विद्वत्ता व निरलस समाजसेवा या गुणांमुळें ते पुणें नगरपालिकेपासून दिल्ली विधीमंडळापर्यंत पुनः पुनः निवडून आले, इतका त्यांचा जनमनावर दाब व दबदबा होता.

## संस्थानी प्रजेचा कैवार

ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं सामना देण्याइतका लढाऊपणा श्री. केळकरांच्या अंगीं नसला तरी त्यांची स्वतंत्र बुद्धि व स्वाभिमानी वृत्ति संस्थानी राजकारणांत चमकल्याशिवाय राहिली नाहीं. ते स्वतः मिरजचे रहिवाशी–

मोडलिंब येथें जन्मलेले. त्यामुळें त्यांना संस्थानी कारभाराची पूर्ण कल्पना असे. दक्षिणी संस्थानप्रजापरिषदेचे ते प्राणच होते. भोर येथें कायदेभंग करण्यांत ते पुढें होते. दैवलीला अशी विचित्र कीं, त्याच भोर संस्थानाचे 'सन्मार्गदर्शक' म्हणून गेल्या महिन्यापर्यंत त्यांनीं प्रशंसनीय कामगिरी केली! अनेक संस्थानिक त्यांचे घरीं जाऊन त्यांची सल्लामसलत घेत. ही सल्लामसलत श्री. केळकर निर्भिडपणें आपल्या बुद्धीप्रमाणें देत, कोणत्याही आमिषाला ते बळी पडत नसत. १९२३ सालीं दिल्ली येथें भरलेल्या अखिल भारतीय संस्थानीं परिषदेचे ते अध्यक्ष होते.

## साहित्यांत सर्वत्र संचार

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा लढा किंवा संस्थानी स्वराज्याचा लढा या दोन्ही रणभूमीपेक्षां साहित्याच्या कार्यक्षेत्रांत श्री. केळकरांनीं शाश्वत स्वरूपाची कामगिरी केली व तिच्यामुळें पुढील पिढ्या त्यांचें नांव आदरानें व कृतज्ञतेनें घेतील. तर्कयुक्त प्रतिपादन, अलंकारयुक्त भाषारचना आणि व्यासंगयुक्त विचार या त्रिगुणांचे बाबतीत त्यांचें वाङ्मय मराठींत तरी अतुल्य आहे. प्रबंध, चरित्र, काव्य, कादंबरी, लघुकथा–साहित्याची अशी एकहि शाखा नाहीं कीं जिला त्यांनीं स्पर्शिलें नाहीं आणि स्पर्शून संपन्न केलें नाहीं. १९२१ सालीं बडोदे येथील साहित्य–संमेलनाचे अध्यक्षपदावरून त्यांनीं केलेलें भाषण घ्या किंवा गोविंदाग्रजांच्या 'वाग्वैजयंती' ची प्रस्तावना घ्या. त्यांच्या लेखनाचा सारा थाटमाट आढळल्याशिवाय रहात नाहीं. लवाजम्याविना सम्राट बाहेर पडावयाचाच नाहीं! सौ. सरोजिनीबाईचें साधें वाक्यहि जसें वक्तृत्वपूर्णच, तसें श्री. केळकरांचें लहानसें अभिप्रायवजा लेखनहि वाङ्मयीन गुणांनीं नटलेलें. दहा मिनिटांचें भाषण असलें तरी, त्यांतील मुद्दे, अलंकार किंबहुना समर्पक शब्दयोजना यांचें चिंतनटिपण केल्याविना श्री. केळकर बोलावयास उभे राहत नसत. कांहीं लिहिलें नाहीं किंवा वाचलें नाहीं असे सुने दिवस त्यांच्या आयुष्यांत अत्यल्प. स्वतंत्र पीठ किंवा परंपरा त्यांनी निर्माण केली नसली, तरी श्री. केळकरांनीं साहित्याच्या विशाल

डोंगरावर आपल्या नांवाचें सुंदर व अक्षय असें कैलास–लेणें खोदून ठेवलें आहे हें निश्चित.

## कठोर न्यायबुद्धि

साहित्याचा स्वाद, प्रतिभेचा प्रसन्नपणा, रसिकतेचा गंध केवळ लेखनालाच नव्हे, तर त्यांच्या सर्व जीवनालाच लागलेला होता. सौजन्य व औचित्य हे, जयविजयाप्रमाणें त्यांच्या दाराशीं अष्टौप्रहर उभे असत. न्यायप्रियता ही तर त्यांच्या स्वभावाची अधिष्ठात्री देवता. सोलापूरच्या प्रांतिक परिषदेंत लो. टिळकांनाहि घंटा वाजवून खालीं बसविण्यास हीच त्यांची न्यायबुद्धि कारण झाली. याच न्यायबुद्धीनें प्रेरित होऊन त्यांनीं नुकतेच एका मुलाखतींत तिरंगी ध्वजाला अनुकूल असे उद्‌गार काढले. " आज हिंदुसभा राज्यावर आली असती तरी तिला कॉंग्रेसपेक्षां दुसरें धोरण स्वीकारतां आलें नसतें " असे प्रांजल उद्गारहि ते यामुळेंच अलीकडे खाजगी संवादांत काढीत. हिंदुसभेचे एक संस्थापक, संगोपक व अध्यक्ष असूनहि त्यांच्या बुद्धीला कॉंग्रेसचें जें जें पटे तें तें श्री. केळकर स्पष्टपणें बोलून दाखवीत आणि म्हणून त्यांचेवर त्यांचे कांहीं अंध अनुयायी नाराज होत. पण आपल्या न्यायबुद्धीला पटेल तें बोलून दाखविण्यास तें कधीं माघार घेत नसत. सनातनी परंपरेच्या चक्रांत ते अडकलेले असले तरी 'शारदा कायद्या' सारख्या सुधारकी बिलांना किंवा हरिजनांच्या मंदिर–प्रवेशासारख्या चळवळीला ते पाठिंबाच देत. त्यांची आनृण्यबुद्धी इतकी थोर कीं, कोणीहि मागणी केली नसतां त्यांनी केसरी संस्थेतून तीन लाखांचा निधि सांचवून तो लो. टिळकांचें ऋण फेडण्यासाठीं 'श्रीशाय जनतात्मने' अर्पण केला.

## विशाल वटवृक्ष

मतभेद काळाच्या लाटेनें धुऊन जातील, पण कर्तृत्व कायम राहील. श्री. केळकरांचें सौजन्य व पांडित्य एखाद्या वटवृक्षाइतकें विशाल होतें. त्यामुळें त्यांच्याकडे आचार्य अत्रे जात व प्राध्यापक फडकेहि जात. श्री. ग. त्र्यं.

माडखोलकर त्यांना वंदन करीत व श्री. न. र. फाटकही त्यांना अभिवादन करीत. संस्थानिकांप्रमाणें संस्थानी प्रजा, सनातन्यांप्रमाणें पुरोगामी आणि नेमस्तांप्रमाणें क्रांतिकारकहि त्यांची भेट घेत व त्यांना मान देत. असा हा अष्टपैलू हिरा आज हरपला म्हणून महाराष्ट्रांतील सर्व पक्षांमधील सहृदय लोकांना हळहळ वाटल्याविना रहाणार नाहीं. आम्ही त्यांच्या आत्म्याला सादर वंदन करतों.

---

# हिमालयाचें शिखर कोसळलें !

( दैनिक त्रिकाळ पुणें, १५ ऑक्टोबर १९४७ )

मान्यवर दे. भ. तात्यासाहेब केळकर यांच्या अनपेक्षित निधनाचें शोचनीय वृत्त आजच्या अंकांत अन्यत्र देण्यांत आलें आहे. तात्यासाहेबांची संकोची वृत्ति व विनोदी वृत्ति यांचें विलक्षण मीलन त्यांच्या जीवितयात्रेंतल्या या अखेरच्या घटनेंत झालेलें आहे. आपल्यासाठीं दुसऱ्याला त्रास झालेला श्री. केळकर यांना आवडत नसे. दुसरे आपलेपणानें त्यांच्यासाठीं हवें तें करावयाला सिद्ध आहेत; पण केळकरच संकोचीतपणानें त्यांना तें करूं देत नाहींत असे प्रसंग वारंवार घडलेले आहेत. केळकर आजारी आहेत—बरेच आजारी आहेत—असें कळतें तर त्यांच्या प्रकृतीची पूसतपास करण्यासाठीं आणि त्यांच्या प्रकृतीचें वृत्त महाराष्ट्राला कळविण्यासाठीं आम्ही वृत्तपत्रकारांनीं हवी ती धांवपळ केली असती ! संकोची स्वभावाच्या तात्यासाहेबांनीं आम्हांला या धांवपळीचा त्रास सोसण्याची मनाई केली ! अहोरात्र जागून अखेरच्या क्षणापर्यंतच्या वार्ता पुरविणाऱ्या आम्हां वृत्तपत्रकारांना तात्यासाहेबांच्या विनोदी वृत्तीनें अगदीं चीत करून टाकलें ! तक्रार सांगावयाला तात्यासाहेब समोर नाहींत ही गोष्ट क्षणभर विसरून आम्ही म्हणतों "तात्यासाहेब, तुम्ही आपल्या विनोदानें आम्हांला उत्तम बनविलेंत ! पण, हा विनोद तुमच्या सौजन्याला न साजेल इतका कठोर झाला, नव्हे का ?"

## टाइपरायटरची घंटा

वयाला ७५ वर्षें पूर्ण होऊन तात्यासाहेबांनीं नुकतेंच ७६ व्या वर्षांत पदार्पण केलें होतें. १९३२ सालीं त्यांना ६० वर्षें पूर्ण झालीं त्या वेळीं जो जाहीर सत्कार झाला त्यांत त्यांनीं आपलें गेलेलें आयुष्य व उर्वरित आयुष्य यांची तुलना सुचविण्यासाठीं टाइपरायटरच्या घंटेचा सूचक दाखला दिला होता. त्या दाखल्याचा विचार केला तर, त्यानंतर १५ वर्षें आपण जगूं असें केळकरांना वाटत नसावें, हें उघड होतें! निर्व्यसनी व नियमित राहणी, मन सदुद्योगांत सतत गुंतवून ठेवण्याची संवय आणि मूळची सुदृढ प्रकृति यांमुळें केळकरांना अखेरपर्यंत आरोग्य लाभलें! त्यांना अकालीं मृत्यू आला असें म्हणतां येत नसलें तरी, त्यांच्या मृत्यूमुळें वाटणारें दुःख हें तीव्र व सार्वत्रिक स्वरूपाचें आहे, यांत मुळींच संशय नाहीं!

## हिमालयाचें शिखर कोसळलें

लोकहितवादी, रानडे, विष्णुबुवा ब्रह्मचारी, वासुदेव बळवंत फडके, ज्योतिबा फुले, डॉ. भांडारकर, टिळक, आगरकर ही महाराष्ट्रीय नेत्यांची पिढी व परंपरा हिमालयाच्या अत्युच्च शिखरांप्रमाणें होती! गोखले, केळकर, मुंजे, अणे, खाडिलकर ही पिढी त्यांच्या मनानें उंचीत कमी असेल; पण, ही जात हिमालयशिखरांची जात आहे, हें कांहीं अमान्य करून चालणार नाहीं! हिमालय-शिखरांतील एकादें शिखर कोसळलें तर निसर्गाला जेवढा धक्का बसेल तेवढा धक्का महाराष्ट्रीय जीवनाला केळकरांच्या मृत्यूमुळें बसत आहे हें विधान कोणतीहि अतिशयोक्ति न करतां आम्ही करीत आहों! अतिशयोक्ति हा अलंकार असला तरी अशा शोकप्रसंगीं तो वापरूं नये हें कळण्याइतकें केळकर-वाङ्मयाचें परिशीलन आम्हीं केलें असल्यामुळें अगदीं वास्तववादी विधान म्हणूनच हें विधान आम्ही करीत आहों!

## पराक्रमी राजकारण

खूपसें लिहावें अशी उर्मी मनांत उसळूं लागल्यामुळें आणि टिळकांना त्या सुमारास अशाच सहकाऱ्याची गरज असल्यामुळें केळकर केसरी संस्थेला

येऊन मिळाले. राजकारण ही त्यांच्या मनाची ऊर्मी नसल्यामुळें, टिळक होते तोंपर्यंत केसरीची धुरा व तदनुषंगिक राजकारण या दोन्ही गोष्टी केळकरानीं उत्तम प्रकारें संभाळल्या. टिळक मंडाले निवासांतून परत आल्यावर त्यांनीं 'केळकर होते म्हणून आज आम्हांला उभें रहावयाला जागा उरली आहे, असे उद्‌गार काढून केळकरांना प्रशस्तीपत्र दिलें, तें अगदीं यथार्थ होतें. टिळकांच्या नंतरहि केळकरांनीं, १९३० सालापर्यंत तरी, राजकारण लढाऊ वृत्तीनें केलें ही गोष्ट थोरले नेहरू व केळकर यांच्या दरम्यान झालेल्या झटापटीचें स्मरण ज्यांच्या मनांत जागृत आहे त्यांना सहज पटेल.

व्याप वाढविणारा पराक्रमी पुरुष आणि त्या व्यापाला आंवर घालणारा हिशेबी पुरुष अशी जोडी राजकारण यशस्वी होण्याला अवश्य असते.

केळकर टिळकांइतक्या पराक्रमीपणानें वागूं शकले नाहींत, हें मान्य केलें पाहिजे. स्वतः केळकरच ही गोष्ट प्रांजलपणानें मान्य करीत असत. पण केळकर पराक्रम करीत होते, त्या काळांत त्यांच्या सहकाऱ्यापैकीं कित्येकजण 'अस्तनींतल्या निखाऱ्या'सारखे वागत होते; आणि त्यामुळें, केळकरांचा राजकारणी पराक्रम जितका प्रभावशाली ठरावयास पाहिजे होता, तितका तो ठरूं शकला नाहीं. ही गोष्ट बोलून दाखविल्यामुळें कित्येक दिवाभीत आपले पंख फडफडवितील हें ओळखूनहि ती सत्य गोष्ट बोलून दाखविणें अवश्य झालें आहे.

## वैचारिक सचोटी

आणि पराक्रमी राजकारणाच्या बाबतींत केळकरांना कमी लेखणाऱ्या लोकांनाहि ते स्वतः प्रामाणिक असतील तर एक गोष्ट मान्य करावीच लागेल.

गांधीजींशीं असलेले मतभेद बोलून दाखवावयाचे नाहींत एवढें ठरवून, ठोंब्याप्रमाणें किंवा बहुसंख्याप्रमाणें केळकर वागले असते तर, राजकारणांतील अशी कोणतीहि स्पृहणीय गोष्ट नव्हती कीं, जी केळकरांना सहज लाभली नसती. पण बुद्धीशीं प्रतारणा न करण्याचा वैचारिक सचोटीचा गुण केळकरांच्या अंगीं वसत असल्यामुळें त्यांनीं वैयक्तिक प्रतिष्ठा व लाभ हे विचार गौण मानले. गांधी-

जींच्या कांहीं वैयक्तिक गुणांबद्दल केळकर किती आदर बाळगूं शकत असत हें गांधीजींना सहा वर्षांची शिक्षा झाली त्या प्रसंगीं त्यांनीं लिहिलेल्या इंग्रजी लेखावरून स्पष्ट होत आहे. पण, वैयक्तिक आदर वेगळा, आणि तात्त्विक एकवाक्यता वेगळी, हें केळकर पुरतेपणीं ओळखीत असल्यामुळेंच, प्रायः पायाशीं लोळत येणाऱ्या मानसन्मानांना दूर सारून केळकरांनीं बुद्धीशीं इमानदारी राखली !

तपश्चर्येकरून जें लाभावयाचें तें हस्तप्राप्य असतांना हे ऋषी फिरून तपश्चर्या कां करीत आहेत, असा आश्चर्यगर्भ प्रश्न उपस्थित करणाऱ्या एका संस्कृत नाटककारानें, अशा तपस्व्यांना उद्देशून यत्कांक्षंति तपोभिरन्यमुनयः तस्मिन् तपस्यंत्यमी हा चरण लिहिला आहे. मानसन्मान झुगारून देऊन बुद्धीशीं प्रतारणा न करणाऱ्या केळकरांना हा चरण लावण्यांत आम्हीं कांहीं गैर करीत आहों, असें आम्हांला वाटत नाहीं.

## वाङ्मयसेवा

वाङ्मयसेवा ही केळकरांच्या बुद्धीची मूळची भूक होती; आणि या क्षेत्रांतील त्यांची सेवा कित्येक पिढया मान्य होत राहील, अशा श्रेष्ठ दर्जाची आहे. मराठी भाषेला नागरी वळण लावण्याचें कार्य आधुनिक काळांत ज्या लेखकांनीं केलें, त्या लेखकांच्या मालिकेंत केळकरांचा क्रमांक फार वरचा आहे. आणि उद्यांच्या पिढ्या ज्या वेळीं मराठी भाषा आत्मसात् करूं पाहतील त्यावेळीं त्यांना जे कित्ते गिरवावे लागतील, त्यांत केळकरी कित्ता बहुमोल ठरत राहील ही गोष्ट वादातीत आहे. केळकर वाङ्मय-प्रांतांत चमकूं लागले, आणि ते 'तात्यासाहेब' या पदवीनें ओळखले जाऊं लागले तेव्हांपासूनच्या काळांत श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, वामन मल्हार जोशी वगैरे अनेक तत्या महाराष्ट्र वाङ्मयाच्या क्षेत्रांत पदवी पावून गेले. या सगळ्यांच्या बरोबर चाल ठेवून, अगदीं नव्यातला नवा वाङ्मयप्रकार हाताळण्याची आणि नव्यांतल्या नव्या सारस्वत सेवकाचें कौतुक करण्याची कर्तबगारी केळकर यांच्या ठिकाणी होती. आणि यामुळेंच, आजच्या तरुण पिढीला

आजोबासारखे शोभणारे केळकर अगदीं शेवटपर्यंत अल्लड वाङ्य-सेवकांनाहि आपलेसे वाटत राहिले.

## दुर्मिळ होत चाललेलीं माणसें

इतकी विविध प्रकारची वाङ्मयसेवा, राजकारण प्रतिकूल झालें असतांहि त्यांत शक्यतों टिकून राहण्याची धडपड, ज्ञानलालसा, सततोद्योग, सदभिरुचि आणि या सर्वांहूनहि श्रेष्ठ म्हणजे माणुसकी—इतक्या अनेक व अनेकविध गुणांनीं युक्त असणारीं माणसें दुर्मिळ होत आहेत. रानडे—टिळक यांच्या पिढींतली माणसें या तोलाचीं होतीं. त्या तोलाचा एक पुरुष आपल्यांतून आज नाहींसा होत आहे यामुळें आपल्याला आज जितकें दुःख वाटेल, त्याहून अधिक दुःख कालांतरानें वाटेल अशी आमची समजूत आहे!

---

# श्री. तात्यासाहेब केळकर यांचा मृत्यु

(दैनिक तरुण भारत १५ ऑक्टोबर १९४७)

## अर्धशतकाची अखेर

श्री. नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांना ता. १४ ऑक्टोबर १९४७ रोजीं पहांटे पुणें येथें वयाच्या पंचाहत्तराव्या वर्षीं हृदयविकारानें देवाज्ञा झाल्याची वार्ता ऐकून केवळ महाराष्ट्रच नव्हे तर अखिल हिंदुस्थान शोकाकुल होऊन जाईल. कारण, राजकारणाच्या क्षेत्रांतील धकाधकीच्या मामल्यांतून जरी अलिकडे ते निवृत्त झालेले हो तरी वाचन, चिंतन, लेखन आणि भाषण हे वार्द्धक्यांतील मुनिवृत्तीलाहि शोभणारे त्यांचे बौद्धिक व्यवसाय सतत चालूच होते; व 'सह्याद्री' च्या गेल्याच अंकांत डॉ. ॲनी बेझंट यांच्या जन्मशताब्दिनिमित्त त्यांनीं त्यांना श्रद्धांजलिहि अर्पण केली होती. ज्यांचें व्यासंगी, बुद्धिप्रधान, अष्टपैलू,

विद्वज्जीवन तात्यासाहेबांना अनेक दृष्टींनीं आदर्श वाटत असे, ते न्या. रानडे नेहमी म्हणत असत कीं, “ कर्त्या पुरुषाला रिकिबींत पाय असतांना घोड्याच्या पाठीवर मरण येणें यासारखा दुसरा अभिलषणीय मृत्यु नाहीं ! ” न्या. रानडे आणि लो. टिळक यांच्या मानानें केळकरांना आयुर्मान थोडें अधिक लाभलें, हें खरें. पण त्या दीर्घायुष्याचा उपयोग अनेक संस्थांना स्थैर्य आणण्यासाठीं आणि साहित्याचा अनेक शाखांना समृद्ध करण्यासाठीं करून, अर्धशतकाच्या अविरत लोकसेवेनंतर तात्यासाहेबांनीं एका परीनें रिकिबींत पाय असतांनाच खरोखरी देह ठेवला. आणि तोहि दिल्लीच्या लाल किल्ल्यावर स्वतंत्र भारताचा अशोकचक्रांकित राष्ट्रध्वज फडकलेला दिसत असतां ! तीस वर्षांपूर्वी मराठशाहीचें शतसांवत्सरिक श्राद्ध ज्या हातांनीं केलें, त्याच हातांनीं भारताच्या उदयोन्मुख स्वातंत्र्यसूर्याला अर्घ्य देत देत देहावसान व्हावें, यापरता स्पृहणीय, सफल मृत्यु तो कोणता ?

## ध्येयसाफल्याचें समाधान

पण, तात्यासाहेबांच्या मृत्यूला सफल म्हणावयाचें तें केवळ ज्या स्वराज्यप्राप्तीच्या कार्याला त्यांनीं, त्या सुमारास सातारला नुकत्याच सुरू केलेल्या वकिलीच्या किफायतशीर धंद्यावर पाणी सोडून, ऐन पंचविशीच्या भरांत १८९६ च्या मार्चमध्यें, ‘ केसरी–मराठा ’ संस्थेतील लो. टिळक यांचें प्रमुख सहकारी या नात्यानें, स्वतःला वाहून घेतलें, त्याची पूर्तता झालेली प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहण्याचें भाग्य त्यांना लाभलें म्हणून नव्हे; तर महाराष्ट्र संस्कृतीचें पुनरुज्जीवन हें जे एकच एक ध्येय डोळ्यांपुढें ठेवून त्यांनीं शारदेची अर्धशतक अखंड उपासना आमरण केली, ते ध्येयहि मूर्तावस्थेला येण्याची प्रसादचिन्हें अखेर अखेर त्यांच्या दृष्टीस पडली या कारणामुळें ! महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना झाल्याशिवाय महाराष्ट्राची अस्मिता, संस्कृति आणि नियति यांचा पूर्ण परिपोष होणार नाहीं, अशी त्यांची श्रद्धा होती; व या श्रद्धेमुळेंच आपल्या एकसष्टाव्या वाढदिवशीं त्यांनीं दहा हजारांची देणगी त्या विद्यापीठाच्या संकल्पित योजनेला देऊन त्याच्या पायाभरणीला

एका परीनें प्रारंभ करून दिला. वस्तुतः महाराष्ट्राचें एकीकरण होऊन स्वायत्त संयुक्त मराठी राष्ट्र निर्माण झाल्याशिवाय नुसत्या महाराष्ट्र विद्यापीठाच्या स्थापनेनें महाराष्ट्राच्या अस्मितेच्या सर्वांगीण विकासाचा प्रश्न सुटणें शक्य नाहीं, हें आंध्र विद्यापीठाच्या उदाहरणानें आतां सिद्ध होऊन चुकलें आहे. पण तात्यासाहेबांची प्रकृति ही साहित्यिकांची होती; त्यांचा पिंड हा वाङ्मयोपासकाचा होता. त्यामुळें, त्यांच्या मुठींत महाराष्ट्रांतील काँग्रेसच्या राज्यकारभाराचीं सूत्रें असतांना, त्या क्षेत्रापुरतें कां होईना भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वानुसार, महाराष्ट्राचें एकीकरण होण्याऐवजीं, उलट नागपूर वऱ्हाड, मुंबई आणि महाराष्ट्र असे त्याचे चार तुकडे पडून, राजकीय आणि सांस्कृतिक दृष्ट्या महाराष्ट्र खिळखिळा होऊन गेला. पण दैवाचा उरफाटा खेळ असा कीं, अशा रीतींनें महाराष्ट्राची विभागणी ज्याच्या हातून घडून आली, त्याच या तत्कालीन महाराष्ट्र नेत्यानें महाराष्ट्र विद्यापीठाच्या योजनेचें बीजारोपण केलें. आणि त्या विद्यापीठाच्या निर्मितीसंबंधीचें बिल मुंबई कायदेमंडळाच्या टेबलावर दाखल झालेलें असतांनाच त्यांच्या आयुष्याची परिसमाप्ति झाली. न्या. रानडे, लो. टिळक आणि ना. गोखले या त्यांच्या पूर्वींच्या महाराष्ट्रांतील लोकाग्रणींना राष्ट्रोन्नतीची प्रायः आपली कोणतीच कल्पना सफल झालेली पहावयाला न मिळतां अतृप्त आकांक्षांच्या तगमगींतच देह ठेवणें भाग पडलें. पण तात्यासाहेबांनीं हिंदुस्थान खंडित होऊन का होईना स्वतंत्र झालेला पाहिला आणि महाराष्ट्र खंडित राहूनहि का होईना त्याच्या विद्यापीठाच्या स्थापनेचा संकल्प सुटल्याचेंहि समाधान अनुभवलें, हें भाग्य काय सामान्य आहे ?

## शस्त्र, शास्त्र आणि शैली

आणि या ध्येयसाफल्याच्या दृष्टीनेंच केळकरांच्या जीवितकार्याकडे पाहिलें पाहिजे. १८९६ सालीं 'केसरी–मराठा' संस्थेंत प्रवेश केल्यानंतर टिळकांचें सहकारी म्हणून त्यांचा प्रवेश, 'बलादिव नियोजितः' या न्यायानें, राजकारणांत झाला; व टिळकांच्या मृत्युनंतर महाराष्ट्राच्या राजकीय नेतृत्वाची धुराहि त्यांचे उत्तराधिकारी म्हणून केळकरांना आपल्या शिरावर घ्यावी

लागली. पण त्यामुळें राजकीय कर्तृत्वाच्या बाबतींत त्यांची तुलना टिळकां-बरोबर केली जावी, हा केवळ अन्याय होय. मानवी जीवनांत योगायोग म्हणून एक दैवाचा हातचा राखून ठेवलेला डाव असतो. तो डाव केव्हां उत्कर्षाला तर केव्हां अपघातालाहि कारण होतो, हें लक्षांत ठेवूनच व्यक्तींच्या जीवनावर किंवा कर्तबगारीवर होणाऱ्या त्या योगायोगाच्या प्रतिक्रियेचें मापन करावयाला नको काय? हिमालयांत उगम पावलेला सिंधु नद हा पंजाबांतील पंचनद्यांची खडणी घेऊन दिग्विजयाच्या दर्पानें सिंध प्रांताच्या रेताडांत येऊन थडकतांच त्या वाळवंटाला कालांतरानें नंदनवनाची समृद्धि लाभली. उलट अरवलीच्या कुशींतून उफाळलेली लुनी नदी कच्छच्या रणांत वहात येतच त्या वाळवंटांत तिचा ओघ जिरून मरून गेला! लो. टिळक नेहमीं म्हणत कीं, 'केसरी'चें संपादकत्व अंगावर पडल्यामुळें मी इच्छेविरुद्ध राजकारणांत खेचला गेलों. नाहीं तर मी जन्मभर प्रोफेसर म्हणून संशोधनकार्यांत आनंदानें आयुष्य घालविलें असतें!" पण टिळक हें जरी अनिच्छेनें राजकारणांत पडले, तरी ते इतके प्रभावी आणि यशस्वी ठरले कीं, हिंदी राष्ट्रीय चळवळींतील पहिला क्रांतिकारी नेता आणि स्वातंत्र्याच्या चळवळीं-तील पहिला झुंजार सेनानी म्हणून युगानयुगें त्यांच्या कीर्तीचे पोवाडे स्वतंत्र भारतांतील लोकांचे चौघडे सदैव गात रहातील. टिळकांप्रमाणेंच तात्या-साहेबहि नेहमीं म्हणत कीं, "वाङ्मयानंद हाच मला सर्वांत प्रीय आहे; व १९१० सालीं 'केसरी'चा संपादक झाल्यानंतर मी माझी लेखनाची सगळी हौस मनसोक्त फेडून घेतली!" टिळकांच्या दृष्टीनें वर्तमानपत्र हें स्वातंत्र्याच्या लढ्यांतले केवळ एक साधन, फक्त एक शस्त्र होतें. त्यामुळें त्यांचें 'केसरी'चे संपादकत्व हें स्वातंत्र्यसंग्रामातलें सैनापत्य ठरलें. उलट, केळकरांनीं वर्तमानपत्र हा व्यवसाय मानला, शैली मानली, शास्त्र मानलें. त्यामुळें त्यांच्या संपादकीय राजवटींत 'केसरी'च्या साहित्यसुषमेचा सौरभ जरी सर्व महाराष्ट्रभर दरवळला आणि त्याच्या लोकप्रियतेला जरी लालित्याच्या लावण्याची नव्हाळी लाभली, तरी टिळकांच्या हातांत असतांना जो 'केसरी' शत्रूच्या रक्ताचे डोह भरणारा भार्गवरामाचा रुधिरपिपासु परशु होऊन

कै. तात्यासाहेब केळकर-विविध दर्शन



बसला होता, तो केळकरांचे हातांत जातांच शारदेच्या करकमलांतलें तें एक ललित प्रहरण होऊन गेलें! पण याबद्दल टिळकांच्या तुलनेनें केळकरांना नांवे ठेवणें अन्यायाचें होणार नाहीं काय? स्वतः तात्यासाहेबांनीं वारंवार असें स्पष्ट बोलून दाखविलें आहे कीं, त्यांचें ब्रीदवाक्य विद्वान् होणें हेंच होतें, राजकारणी नेता हें नव्हे! तेव्हां, त्यांच्या जीवितकार्याचा विचार करतांना त्यांच्या व्यासंगी, चिकित्सक आणि रसज्ञ प्रतिभेचे, विधायक म्हणा वा विध्वंसक म्हणा, गुण महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाला किती प्रकारांनीं पोषक झाले, हें पाहूनच त्यांचा गौरव कृतज्ञतेनें करावयाला नको काय?

## मराठी वाङ्मयांतील युगपुरुष

या दृष्टीनें त्यांच्या जीवनकार्याकडे पाहिलें असतां, कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्यानंतर कै. तात्यासाहेब केळकर यांच्या इतका प्रभावशाली लेखक महाराष्ट्रांत दुसरा झालाच नाहीं. ही गोष्ट कोणालाहि कबूल करावी लागेल. त्यांची बहुश्रुतता, न्यायबुद्धि अनेक क्षेत्रांत काम करण्याचीं हौस आणि प्रतिभेची एकंदर चतुरस्रता, या त्यांच्या गुणांमुळें न्या. रानडे यांच्याशीं त्यांची तुलना करण्याचा मोह अनेकांना पडतो; व कै. अच्युतराव कोल्हटकर यांनीं तशी त्यांची तुलना केलीहि आहे. पण, रानडे आणि केळकर यांच्यातील महत्वाचा मूलभूत फरक हा कीं, रानड्यांची प्रकृति सर्वथैव राजकीय होती, तर केळकर हे जन्मजात रसिक आणि साहित्यिक होते. रानड्यांनीं आपल्या नोकरींतील अधिकारापासून तों पेशव्यांच्या रोजनिशीच्या संशोधनापर्यंत स्वतःच्या कर्तृत्वाच्या आणि बुद्धीच्या हर एक पैलूचा उपयोग आपल्या परतंत्र मायदेशाची सांस्कृतिक महती आणि स्वातंत्र्यक्षमता सिद्ध करण्यासाठीं केला. केळकरांच्या मार्मिक शब्दांत सांगावयाचे म्हणजे त्यांनीं नोकरींतून राजकारण उभें केलें. उलट केळकरांनीं राजकारणांतून साहित्याचा फुलोरा उभारला! प्रलयोदधींत बुडालेले वेद आणि शंखासुरानें बळकावलेली पृथ्वी यांचा ज्याप्रमाणें मत्स्यरूप धारण केलेल्या महाविष्णूनें उद्धार केला, त्याप्रमाणें पारतंत्र्याच्या प्रलयांत लुप्त झालेली भारतीय संस्कृति आणि

भारताची नियति यांचें अभ्युत्थान 'सर्वज्ञ माधवा'नें केलें. उलट केळकरांच्या प्रतिभेचें आणि कर्तृत्वाचें स्वरूप सर्वस्वी वाङ्मयीन आहे. टिळकांच्या मृत्युनंतर दहा वर्षें महाराष्ट्राचें राजकारण त्यांनीं चालविलें आणि विशेषतः गांधीजींच्या असहयोगाला करडा विरोध केला, ही गोष्ट खरी. पण, हें त्यांचें राजकारण आणि हा त्यांचा विरोध या दोहोंचाहि आत्मा त्यांनीं साहित्यांत काय किंवा जीवनांत काय प्रमाण मानलेला औचित्यविवेक हाच होता, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. राजकीय डावपेंच किंवा राजनैतिक ध्येयवाद यांच्यापेक्षां औचित्याच्या व्यवहारबुद्धीलाच त्यांनीं नेहमीं प्राधान्य दिल्यामुळें त्यांचें राजकीय नेतृत्व हें पंगु आणि फिकें ठरलें. पण, राजकारणांत जी न्यूनता किंवा दुबळीक ठरली, तोच वाङ्मयांत आणि वृत्तव्यवसायांतहि लोकोत्तर गुण आणि श्रेयस्कर प्रभाव ठरला, हें कोणीहि मान्य करील. आपल्या स्वैरगामी लेखणीच्या संचारानें साहित्याच्या सर्व शाखांत भालेराई गाजविणारे फांकडे शिलेदार महाराष्ट्रांत आजवर अनेक होऊन गेले आहेत. पण आपल्या संयत, सुविनीत, समयज्ञ, सौंदर्यशाली प्रतिभेच्या प्रकर्षानें साहित्याचीं सर्व अंगोपांगें सुशोभित, सुदृढ आणि समृद्ध करणारे साहित्यसम्राट् मात्र तात्यासाहेब हे एकटे एकच होऊन गेले, असें म्हणावयाला यत्किंचितहि हरकत वाटत नाहीं. साहित्यांत रसोत्कर्षापेक्षां औचित्य हें जसें त्यांनीं युक्त आणि विहित मानलें होतें, तसाच जीवनांत ध्येयवादापेक्षां बुद्धिवाद हा त्यांनीं इष्ट आणि अभिमत मानला होता; व त्यामुळें त्यांचें वाङ्मय हें स्फूर्तिप्रदतेच्या बाबतींत जरी कदाचित् कमी भरलें, तरी उद्बोधनाच्या, मनुष्याचें मन आणि बुद्धि यांना विचारप्रवण करण्याच्या गुणांत भारी ठरेल. किंबहुना, त्यांच्या जागरूक, चिकित्सक आणि सूक्ष्मदर्शी प्रतिभेनें गेल्या अर्ध शतकांत महाराष्ट्राच्या जीवनांतील सर्व प्रेरणांची, प्रवृत्तींची, प्रारंभांची आणि प्रयत्नांची कळकळीनें आणि कसोशीनें छाननी करून त्याची बुद्धियोगाची परंपरा जागृत ठेवली, हें त्यांचें कार्य वैचारिक प्रगतीच्या दृष्टीनें केवळ अनन्य होय.

## वृत्तव्यवसायाचें गुरुपीठ

म्हणूनच आजचें मराठी वाङ्मय आणि वृत्तव्यवसाय यांच्यावर केळकरांच्या साहित्यक्षेत्रांवरील या कर्तृत्वाची छाप स्पष्ट उमटलेली दिसते. किंबहुना, महाराष्ट्राची आजची लेखनशैली हा तात्यासाहेबांच्या १९१० पासून १९३७ सालापर्यंतच्या वाङ्मयतपस्येचा परिपाक आहे, असें म्हटलें तरी शोभेल. त्यांच्या समकालीनांपैकीं आपटे, राजवाडे, कोल्हटकर, खाडिलकर, केतकर, गडकरी, वा. म. जोशी प्रभृति कांहीं प्रतिभाशाली लेखक हे विशिष्ट वाङ्मय गुणांच्या बाबतींत त्यांच्यापेक्षां निःसंशय सरस ठरतील; व वृत्तपत्रकारांतहि आगरकर, टिळक, शि. म. परांजपे, खाडिलकर, अच्युतराव कोल्हटकर, गोपाळराव ओगले प्रभृतींची कर्तबगारी कांहीं बाबतींत त्यांच्याशी तुल्य अशीच म्हणावी लागेल. पण, साहित्यिक आणि संपादक या दोन्हीहि भूमिकांचे सारे गुणविशेष समुच्चयानें लक्षांत घेतले असतांनाच केवळ नव्हे, तर त्या गुणांच्या प्रकर्षाचें क्षेत्र, व्याप्ति आणि काल हा ध्यानांत घेतला असतांनाहि केळकर हे आपल्या समकालीनापेक्षां सर्वातिशायी आणि श्रेष्ठ ठरतात, असेंच कोणीहि म्हणेल. १९१० सालीं केळकरांनीं 'केसरी'चें संपादकत्व हातीं घेतल्यापासून तो १९३७ सालीं तें सोडीपर्यंत 'केसरी' हें मराठी वृत्तव्यवसायाच्या सर्व शाखोपशाखांचें गुरुपीठ होऊन बसलें होतें; व अनेक होतकरू लेखकांना आपल्या प्रत्यक्ष सान्निध्यांत तयार करून आणि अनेकांना टिळक महाविद्यालयांतील वृत्तव्यवसायाच्या वर्गांत शिक्षण देऊन त्यांनीं शेंकडों लेखक आणि संपादक गेल्या चाळीस वर्षांत निर्माण केले. अखिल महाराष्ट्रांत सर्वदूर पसरलेल्या त्यांच्या या शिष्यवर्गांत जसे गुरुकृपेला पात्र होऊन सर्व विद्या हस्तगत केलेले अर्जुन सांपडतील, तसेच गुरुच्या कृपाकटाक्षाचा लाभ न घडतांहि केवळ स्फूर्तिबलानें सर्वविद्यासंपन्न झालेले एकलव्यहि आढळतील! गंगेसारख्या महानदीचा प्रचंड ओघ ज्या विशाल भूप्रदेशांतून वर्षानुवर्ष वहात जातो, तो सारा प्रदेश ती आपल्या सलिलसंपदेनें समृद्ध करिते. मग तिच्या प्रत्यक्ष तीरावर चिरेबंदी घाट बांधल्यामुळें झाडें मूळ धरोत वा न

घरोत ! तात्यासाहेबांनीं १८९६ पासून १९४७ पर्यंत सतत अर्ध शतक केलेलें महाराष्ट्र साहित्याच्या आणि संस्कृतीच्या संवर्धनाचें कार्य या प्रकारचें आहे; व म्हणूनच भावी पिढया त्यांचा गौरव विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील मराठी वाङ्मयाचा युगपुरुष म्हणून करतील यांत संशय नाहीं. त्या या परिणतप्रज्ञ युगपुरुषाच्या निधनामुळें आज मराठी वाङ्मय आणि वृत्तव्यवसाय यांचें गुरुपीठ शून्य झाल्यासारखें वाटून अखिल महाराष्ट्रांतील जनता शोकविव्हल व्हावी, यांत नवल काय ?

---

# साहित्य सम्राटांचें निर्याण !

( ज्ञानप्रकाश, पुणें. ता. १५-१०-१९४८ )

मान्यवर नरसिंह चिंतामण केळकर हे परवां रात्रीं नित्याप्रमाणें झोपल्यानंतर त्या रात्रींच त्यांची हृदयक्रिया अचानक बंद पडून त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. तात्यासाहेब केळकर ह्यांची शरीरयष्टि मुळांतच मोठी मजबूत होती. आणि त्यांचें बरेंचसें जीवन धकाधकीच्या मामल्यांत त्यांना घालवावें लागलें तरी त्यांनीं आपली शरीरप्रकृति उत्तम प्रकारें सांभाळली होती. आणि नित्याच्या सर्व व्यवसायांतून त्यांनीं स्वतःस मोकळें करून घेतलें होतें, तरी ते निरनिराळ्या सार्वजनिक कार्यांत इतके निमग्न असत कीं त्यांच्या शरीराला अगर मनाला विश्रांति अशी फारच थोडी लाभली. तरी देखील ह्या वयांतहि त्यांची प्रकृति पूर्णपणें निकोप होती. दुखणंबाणें त्यांना सहसा कधीं येत नसे व अलिकडे नुकतीच त्यांच्या वयाला पाऊणशें वर्षें झालीं तरी आणखी एक पंधरा वर्षें तरी ते महाराष्ट्राला मार्गदर्शन करण्यास सुदृढ स्थितींत उपलब्ध होतील असें त्यांच्याकडे पहाणारास सहज वाटावें. त्यांना आलेलें मरण त्यांच्या स्वतःच्या दृष्टीनें सुखदायक असेंच होतें. पण आम्हां

महाराष्ट्रीयांना त्यांच्यावर काळानें आतांच अचानक झडप घातली याबद्दल फार हळहळ वाटेल.

वयाच्या २२ व्या वर्षी ते एल. एल. बी. परीक्षा उत्तीर्ण झाले आणि त्यानंतर दोनच वर्षांनीं 'केसरी–मराठा' संस्थेत ते दाखल झाले. लोकमान्य टिळकांच्या या दोन मुखपत्रांचे संपादक होऊन त्यांनीं एकदां जो लेखन-व्यवसाय पत्करिला तो त्यांनीं अखेरपर्यंत चालविला, आणि खरोखरीच ते महाराष्ट्र साहित्याचे सम्राट बनले. मराठी भाषेवरील त्यांचें अलौकिक प्रभुत्व रूपक, उत्प्रेक्षा इत्यादींच्या साह्यानें कोणताहि विषय सर्वांना सुगम करण्याची त्यांची विलक्षण हातोटी, त्यांची चतुरस्र बुद्धि इत्यादि त्याच्या गुणांचें वर्णन करण्याची आवश्यकताच नाहीं. पण वृत्तपत्रांच्या संपादनांत ते पडल्यापासून त्यांच्या राजकीय लेखनांतून त्यांच्या स्वभावांतील थोर गुणांचा प्रत्यय येऊं लागला, व हे त्यांचे गुण अखेरपर्यंत वाढतच गेले. एका पक्षाची तरफदारी करणाऱ्या वृत्तपत्रांचें संपादकत्व त्यांच्याकडे होतें. तथापि कोणत्याहि बाजूची वकिली करीत असतां चांगला वकील ज्याप्रमाणें दुसरी बाजू नीट समजावून घेतो, त्या बाजूनें काय म्हणतां येण्याजोगें आहे हें विचारांत घेतो आणि त्यांतील योग्य तें मान्य करून नंतर आपली बाजू मांडतो, त्याप्रमाणेंच ते सदैव आपल्या लेखांत करीत असत. त्यांचा आरंभींचा वृत्तव्यवसायाचा काल मोठ्या धामधुमीचा होता. जनतेचीं मनें या नाहीं त्या पूर्वग्रहानें दूषित असण्याचा संभव. त्यावेळीं दुसऱ्या बाजूचा मुळींच विचार न करतां आपली एकच बाजू केवळ आग्रहानें व अभिनिवेशानें ते मांडीत राहिले असते तरीहि त्यांचें लिखाण लोकप्रियच झालें असतें. तथापि सर्व बाजूंचा विचार करून विचक्षणापूर्वक एकाद्या विषयाची मांडणी करण्याची जी त्यांच्या मनाची जात्याच बैठक होती व जी त्यांनी बुद्धिपुरस्सर पुढें वाढविली तिच्यामुळें त्यांच्या ह्या पहिल्या लिखाणांत देखील एक प्रकारचा मनमोकळेपणा व न्याय्य टीका करण्याची तत्परता दिसून येई. केवळ पक्षविषयक राजकारण करणारांना केव्हां केव्हां त्यांची ही वकिली फार कच्चे-पणाची वाटे. परंतु वृत्तपत्रीय लेखनांचें मूल्य ज्यांना खरें कळतें त्यांना तात्या-

साहेबांनीं अवलंबिलेली पद्धतीच अखेरीस परिणामकारक होत असते हें पटेल.

दुसऱ्याच्या नियंत्रणाखाली त्यांनीं प्रथम जें लिखाण केलें त्यांत प्रतीत झालेले हे गुण ते स्वतंत्रपणें वृत्तपत्रांचे चालक बनल्यानंतर अधिकाअधिकच प्रत्ययास येत चालले. त्यांची टीका नेहमीं सत्यान्वेषण करणारी होती. पण सत्याचा एकदां ठाव गाठल्यानंतर ते जी टीका करीत ती अत्यंत प्रखर आणि तीक्ष्ण अशी असे. टिळकांचा अस्त झाल्यानंतर हिंदी राजकारणांत महात्मा गांधींचा उदय झाला. पण ह्या दोन्ही काळांत तात्यासाहेब केळकरांनीं आपले विचारस्वातंत्र्य कायम राखलें. टिळकांच्याबद्दल त्यांच्या मनांत अर्थात् परम आदर होता. पण विभूतिपूजा ह्या गुणाचा लवलेशहि त्यांच्या ठिकाणीं नव्हता. त्याचप्रमाणें टिळकांचें सर्व तत्त्वज्ञान गांधीजींच्या तत्त्वज्ञानापुढें विरून जाण्याची वेळ आली तेव्हांहि टिळकांचा अनुयायी ह्या नात्यानें त्यांनी गांधीजींवर केव्हांच टीकास्त्र सोडलें नाहीं. गांधीजींच्या तत्त्व-प्रणालिकेचाहि समतोलपणें विचार करण्याची त्यांची तयारी होती. परंतु पूर्ण विचारांतीं जेव्हां हा नवा मार्ग अहितकर आहे अशी त्यांची खात्री झाली तेव्हां त्यांनीं या नव्या तत्त्वज्ञानाचें आपल्या मतें असलेलें वैय्यर्थ्य उघड दाखवून देण्यास यत्किंचितहि माघार घेतली नाहीं. असें करणें त्यावेळीं मोठ्या धोक्याचें होतें. आपणाला मिळालेली लोकप्रियता टिकविणें, समाजा-वरील आपलें नेतृत्व कायम ठेवणें, ह्या गोष्टी नवीन तत्त्वज्ञानाचें स्वागत करून सहज साधण्याजोग्या होत्या. महाराष्ट्रांत त्याप्रमाणें अनेकांनीं केलेंहि होतें. केळकरांना अटकाव करण्यासहि टिळकांसारखा त्यावेळीं कोणी हयात नव्हता. तेहि जर ह्या प्रवाहांत पडते तर त्यांच्याबरोबर सर्व महाराष्ट्रीय समाज ह्या प्रवाहांत सहजच सामील झाला असता. पण जें आपल्या बुद्धीला पटत नाहीं त्याला उघड विरोध करणें हें वृत्तपत्रकार ह्या नात्यानें आपलें कर्तव्य आहे असें मानून गांधीवादाचा फोलपणा सर्व महाराष्ट्रीयांना पटविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला.

पुष्कळांचें राजकीय धोरण त्यांच्या वैयक्तिक मतापेक्षां इतर अनेक गोष्टींवर अवलंबून असतें. पुष्कळांच्या मनांत अनेक महत्त्वाकांक्षा असतात आणि

ह्या महात्त्वाकांक्षांना पोषक असें धोरण स्वीकारण्याचा मोह अनेकांना होतो. पण तात्यासाहेब केळकर हे मुळीं महत्त्वाकांक्षीच नव्हते. त्यांच्या अंगीं असलेल्या अनेक लोकोत्तर गुणांमुळें राजकारणांत काय किंवा दुसऱ्या कार्यक्षेत्रांत काय त्यांना मोठेंच महत्त्व प्राप्त झालें होतें. पण असें महत्त्वाचें स्थान काबीज करण्याचा अभिलाष त्यांच्या मनाला कधीं शिवला नाहीं. विभूतिपूजेपासून ते जसे अलिप्त होते तसेंच असूया, मत्सर इत्यादि दुर्गुणांस ते अगदीं पारखे होते. प्राप्त परिस्थितींत जें कांहीं करणें योग्य तें करीत रहावें असाच त्यांचा नेहमींचा वर्तनक्रम असे, आणि वैचारिक सचोटी राखणें हें जें कोणत्याहि वृत्तपत्रलेखकाचें आद्य कर्तव्य त्यापासून ते कधींहि च्युत झाले नाहींत. निर्भीडपणा ह्या गुणांचा उच्चांक गांठून सर्व राजकीय लेखकांपुढें त्यांनीं अमर असें उदाहरण घालून ठेवलें आहे. केसरी–मराठा संस्थेला संपन्नावस्था प्राप्त झाली असतांना तिची सर्व किफायत ह्या संस्थेलाच लाभावी, तींतून कोणाहि व्यक्तींचा खाजगी फायदा होऊं नये, अशी जी लोकमान्य टिळकांची मनीषा होती, ती तात्यासाहेब केळकरांनीं पूर्णतेस नेली, आणि त्याहि दृष्टीनें त्यांनी वृत्तपत्रसृष्टींत अत्यंत अनुकरणीय असें उदाहरण घालून दिलें. हिंदुस्थानांतील सार्वजनिक आयुष्यक्रमाला योग्य आणि निरामय असें वळण लावण्यास ज्या अनेक महाभागांचें आयुष्य खर्ची पडलें त्यांत तात्यासाहेब केळकरांना मोठें मानाचें असें स्थान आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांति देवो !

---

# तात्यासाहेब केळकर

( दैनिक सकाळ, पुणें. १५-९-४७ )

साहित्यसम्राट श्री. तात्यासाहेब केळकर यांच्या मृत्यूमुळें चालू राजकारणावर आघात–प्रत्याघात कांहीं होणार नसले तरी देशाच्या जीवनातील महाराष्ट्रीय नेतेपणाचा शेवटचा दुवा तुटला असून, आतां यापुढें

नवे दुवे सांधले जाऊन या प्रांताची बुद्धिमत्ता, चिकाटी, स्वार्थत्याग आणि राष्ट्रीय उत्कर्षाला पोषक असे गुण पुन्हां एकदां देशाचें जीवन पुढें खेचून न्यावयाला उपयोगी केव्हां आणि कसे पडूं लागतील हा प्रश्न आहे. गेलीं दहा बारा वर्षे श्री. तात्यासाहेब केळकर राजकीय धकाधकीतून निवृत्तच होते. मधुनमधून प्रासंगिक घडामोडीवर मतप्रदर्शन करणें किंवा पसंत नापसंत त्याप्रमाणें राजकीय घोषणा आणि कार्यक्रमाचा पुरस्कार अगर निषेध करणें यापलीकडे चालू घडामोडींत ते फारसा भाग घेत नसत. परन्तु देशाच्या राजकीय स्वातंत्र्यसंपादनार्थ लोकमान्य टिळकांनी देशभर केलेली अभूतपूर्व जागृति, त्यासाठीं भोगलेले कष्ट आणि संपादलेलें अखिल भारतीय पुढारीपण, स्मृतिरूपानें तात्यासाहेबांच्या ठिकाणीं अवशिष्ट म्हणून जनतेला पहावयास मिळे. तीनशें वर्षांपूर्वी परचक्रामुळें हा देश असाच हैराण आणि विस्कळीत झाला असतां हिंदवी राज्याची धुरा मराठ्यांनी उचलली. पुढें ती इंग्रजांच्या स्वाधीन करणें भाग पडलें तरी हें नवें परचक्र मोडून काढण्यासाठीं याच लोकांनी प्रथम कमरा बांधल्या. ते इंग्रजी राज्य नाहिसे होण्याच्या सुमारांस हिंदी स्वातंत्र्याचे तीनशे वर्षे अखंड चालत आलेले महाराष्ट्राकडील नेतेपणसुद्धां याच वेळीं लुप्त झाले अशी अत्यंत दुःखाची जाणीव तात्यासाहेबांच्या मृत्यूने महाराष्ट्रीय मनाला भिनेल यांत शंका नाहीं.

हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याविरुद्ध असंतोषाचा जनक म्हणून लोकमान्य टिळकांचें वर्णन सर व्हॅलेन्टाईन चिरोलने केले आहे, त्या लोकमान्य टिळकांचा जिवंतपणी उजवा हात म्हणून आणि मेल्यानंतर त्यांचे एकमेव राजकीय वारस म्हणून श्री. तात्यासाहेबांनी केलेली कामगिरी जनतेपुढें आहे. लोकमान्यांच्या मृत्यूच्यावेळी आतां देशाचें काय होणार, असा प्रश्न महाराष्ट्रीय जनतेपुढे होता, तर आतां २७ वर्षांनंतर लोकमान्यांचा हा वारसा दिवंगत झाला असतां देशाच्या राजकारणांत महाराष्ट्राचे काय होणार, असा आणखी आपलेपणाचा विचार मनांत उत्पन्न होतो. लोकमान्यांचे मागे त्यांचा व्याप आणि धडाडीला तात्यासाहेब कितपत पुरे पडले कीं पडले नाहींत, हा प्रश्न या ठिकाणी अप्रस्तुत आहे. असहकार, सहकार, प्रतिहकार, हिंसाअहिंसा,

सनदशीर आणि बेसनदशीर असले घोषशब्द गेल्या पिढीत कितीही महत्वाचे असले तरी आतां ते इतिहासजमा झाले असून, त्यावरून एखाद्या व्यक्तीचे त्या काळांतील महत्वमापन आज कोणी करणार नाहीं. पंजाबमध्ये लोकांच्या कत्तली चालल्या असताना, लखनौ करारांत काय होते आणि तो करणार बरोबर किंवा चूक किती, हा विचार आज कोणाच्या डोक्यांतसुद्धां येणार नाहीं. त्याचप्रमाणे गेल्या पन्नास वर्षांत देशांतील पक्ष आणि उपपक्ष, त्यांचे नेते आणि उपनेते यांच्या गुणावगुणांचें मोजमाप तत्कालीन सभा, संमेलने आणि ठरावांवरून करता येणार नाहीं. एखाद्या अंधाऱ्या गुहेत ठेचकळत, धडपडत, आजुबाजूच्या खडकांच्या मर्यादा सांभाळून वाट चालणाऱ्यांत डोळस कोण आणि आंधळा कोण हें ठरविणे देखील अयुक्त, त्याचप्रमाणे इंग्रजांनी घालून दिलेली चाकोरी फोडून, स्वतंत्र वळणावर या देशांतील राजकारण जिथें टिळक, गांधी आणि पितापुत्र नेहरू नेऊं शकले नाहींत, तिथे तात्यासाहेब केळकरांना दोष कसा येतो ? जातीय मतदार संघ असेपर्यंत आमच्या नागरिकत्वालाच धोका आहे आणि म्हणून आम्ही असेंब्लीत जाणार नाहीं, अशा भूमिकेवर त्यावेळचें कौन्सिलबहिष्कारवादी रहाते तर इंग्रज उभारीत असलेल्या जातीय राजकारणाच्या खडकाला कदाचित् मोडता घालता आला असता. परन्तु केवळ हिंदु म्हणून निवडून यावयाचें आणि मग मुसलमानांशीं इंग्रज संधि देतील तेव्हां समझोता करण्यासाठीं उभें रहावयाचे, अशा परप्रत्ययनेय राजकारणामुळें राष्ट्रीय जनतेचा जातीय कोंडमारा झाला. मुस्लीम लीगविरुद्ध मुसलमानांना जवळ घेऊन इंग्रजी घटनात्मक चक्रव्यूह मोडून काढणें शक्य झाले असते. असे मूलभूत दोष आज दिसत असतांना राउंडटेबलला जाण्या न जाण्यांत चूक अगर बरे कोणी काम केले, असल्या वादाना स्थानच ठरत नाहीं.

तात्पर्य, श्री. तात्यासाहेब केळकरांनीं आपल्या कल्पनेप्रमाणें लोकमान्य टिळकांचें राजकारण तगवून धरण्याचा प्रयत्न केला आणि तें तगलें असतें तर आजच्यापेक्षां त्याची फलश्रुति कांहीं वेगळी झाली असती असें म्हणण्यास जागा नाहीं. परन्तु श्री. तात्यासाहेबांनी कोणत्या परिस्थितींत आपल्या

आयुष्यास सुरवात केली आणि आज पाऊणशें वर्षांनंतर कोणत्या परिस्थितींत डोळे मिटले, त्या दोन टोकांची तुलना केली तर पन्नास वर्षांनी आपण कुठें आलो याची कल्पना येईल. 'स्वराज्य' साप्ताहिकांत 'पाऊणशें वर्षांपूर्वीचें जीवन' या लेखमालेत २५ ऑगस्ट रोजी म्हणजे सहा आठवड्यांपूर्वी तात्यासाहेबांनीं नुकतीच दिलेली मुलाखत आली आहे. त्यांत ते म्हणतात. "माझ्या लहानपणीं राजकारण हा शब्दहि ऐकूं येत नव्हता. फार काय, इंग्रजी अधिकाऱ्यांचे साधे दोष उच्चारणें म्हणजे तें राजद्रोही धाडसाचें काम, असे सुशिक्षितांनाहि वाटे. इंग्रजी अंमलाखाली एकप्रकारचें म्हणजे हीन प्रकारचें सुख होतें. कोणीकडून तरी संसारयात्रा साधली म्हणजे झालें, असे वाटणारे शेंकडा नव्याण्णव लोक त्यावेळी होते...वर्तमानपत्रें तेव्हां नव्हती. मी स्वतः बी. ए. होईपर्यंत वर्तमानपत्र घेऊन वाचले असे आठवत नाहीं. कोणत्याहि ग्रंथालयांत ग्रंथसंपत्ति एका लहानशा कपाटाखालीकडे जात नसे."

अशा या प्रभातपूर्वीच्या गाढ झोपेंत असलेल्या देशाला जागे करण्यासाठीं एलएल. बी झाल्यानंतर तात्यासाहेबांनी लेखणी उचलली. 'केसरी'चे उप आणि मुख्य संपादक म्हणून पस्तीस वर्षें ती अखंड चालविली. खेरीज नाटकें, चरित्रे, ऐतिहासिक वाङ्मय, तत्त्वज्ञान आणि विनोद अशा विविध क्षेत्रांत त्यांनी लिखाण केले. त्या सर्वांचा मूळ हेतु त्यांच्याच शब्दांत देण्यासारखा आहे. २० ऑक्टोबर, १९०१ म्हणजे शेहेचाळीस वर्षांपूर्वी म्हणजे स्वतःच्या राजकीय आणि वाङ्मयीन आयुष्याच्या अगदीं सुरवातीस अिटालियन देशभक्त गॅरीबॉल्डी याचें चरित्र तात्यासाहेबांनीं लिहिलें असून पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत ते म्हणतात, "स्वराष्ट्र कितीहि जीर्णदशेस आले असले तरी त्याचा उद्धार पुढे मागे होणारच आहे, हे ध्यानांत वागवण प्रत्येक मनुष्याचे कर्तव्य आहे. मात्र "नीचैर्गच्छत्युपरिचदशाचक्र नेमिक्रमेण" या नियमाप्रमाणे चढउतार आपोआप ईश्वरी संकेताप्रमाणे होत असतात, मग आपणाकडे त्याचे काय आहे, अशातऱ्हेचा केवळ दैववादाचा अनुवाद न करतां ज्याने त्याने मनांत असे वागले पाहिजे कीं,

नियतिचक्र फिरविण्यास झाले तरी थोडीबहुत शक्ती लागतेच. ती शक्ति प्रचलित करणे हे अंशतः कोणासहि शक्य आहे. ही शक्ती **आपण** अंशमानाने तरी व्हावे, अशी आकांक्षा प्रत्येक मनुष्याच्या हृदयांत असली पाहिजे. राष्ट्रोत्कर्षाच्या निरनिराळया पायऱ्या म्हणजे निरनिराळया काळीं त्या राष्ट्रांत उत्पन्न होणाऱ्या असामान्य व्यक्ती याच होत व अशा पायऱ्यांपैकी **आपण** एक व्हावे ही महत्वाकांक्षा ज्या देशांतील लोकांच्या मनांत प्रादुर्भूत होईल त्याच देशाला नियतिचक्राची अनुकूल अशी कलाटणी मिळून उत्तम दशा पुढेमागे येईल. ”

वरील उताऱ्यांत ‘ आपण ’ हा शद्ब जाड्या टाइपांत छापला आहे. नियतिचक्राला कलाटणी देणे, शक्ति प्रचलित करणे, त्यात आपण भाग घेणे इत्यादि आशावादाचे पुढे काय झाले ? घराची एकदा अखेरची साफसुफाई करून उरलेसुरले ठाकठीक जाग्यावर ठेवून मनुष्य लांबच्या प्रवासाला निघावा त्याप्रमाणे सगळे लिखाण संपल्यावर पत्रव्यवहार चाळून तो एकदां लावण्यासाठीं तात्यासाहेब बसले. सात आठ हजार पत्रे पाहून निवडून त्यातील महत्वाचा भाग छापणे हे कामच होते. ते त्यांच्या चिरंजीवांनी केले. गॅरिबॉल्डीनंतर बरोबर चाळीस वर्षांनी म्हणजे १९४१ मध्यें ‘ **गतगोष्टींची पुरवणी** ’ म्हणून प्रसिद्ध केलेल्या या पत्रव्यवहाराच्या प्रस्तावनेत ते म्हणतात “ माझ्यासारख्या एका सामान्य मनुष्याच्या जीवनक्रमाला महाराष्ट्राच्या समकालीन इतिहासांत कितीसे स्थान असणार ? तथापि कोणत्याहि समाजाचा इतिहास म्हणून तयार होतो तों अशा अनेक बिंदुमात्र, कणमात्र कागदपत्रांतूनच तयार होतो, मग ते कागदपत्र कोणत्याहि स्वरूपाचे अगर प्रसंगाचे असोत. ”

सारांश, वरील दोन उताऱ्यांत चाळीस वर्षांचें अंतर–आयुष्याचा आरंभ आणि शेवट समाविष्ट झालेला आहे. नियतिचक्र फिरविण्याचा पहिला आशावाद जाऊन त्याठिकाणीं महाराष्ट्राच्या समकालीन इतिहासांत आपले स्थान कितीसें असणार अशी शंका श्री. तात्यासाहेबांच्या मनाला चाटून गेली यांत त्यांच्या प्रकृतीपेक्षां देशांतील परिस्थितीचे प्रतिबिंब आहे, आजचे

एकंदर जीवनच इतकें आमूलाग्र बदललेलें आहे कीं, त्याला पुरे पडण्याला एकस्यादुकस्या महात्म्याजवळ महात्म्य राहिलेले दिसत नाहीं. थोर पुरुष देखील सामान्य माणसासारखे वागतात आणि चुकतात काय, अशी शंका मनाला येऊं लागते. ठिगळ लावावे तिथे पुन्हां फाटतच रहावे, देशाचा उद्धार तर राहोच पण उद्याची परिस्थिती काय होणार, याची कल्पना शहाण्याच्या शब्दांतहि दिसत नाहीं, अशा स्थितींत बिंदुबिंदुपासून कणकण शोधून इतिहास बनवितां आला तर पहावा अशी विनम्र वृत्ती लोकांच्या मनांत उत्पन्न होऊन तिची छाया तात्यासाहेबांच्या उतारवयांत दिसूं लागली असेल तर नवल नाहीं. समकालीन महत्वाकांक्षी सुशिक्षित भराभर सरकारी नोकऱ्यांत पुढें होत असतां तिकडे पाठ फिरवून हालअपेष्टा सोसून जवळजवळ ५० वर्षे लोकजागृतीचें काम तात्यासाहेबांनी केलें. त्यांच्या अभावी गेल्या अर्धशतकाच्या महाराष्ट्रीय जीवनांत केवढी मोठी उणीव दिसू लागली असती ! असा थोर पुरुष दिवंगत झाला असतां अगदीं प्रथम म्हटल्याप्रमाणें आतां आपले भवितव्य काय, असा विचार लोकांच्या डोळयापुढे उभा रहात असेल तर तें अगदीं सहाजिक होय.

---

# तात्यासाहेब केळकरांचें शोचनीय निधन

**( दैनिक काळ, पुणें. १५ ऑक्टोबर १९४७ )**

दे. नरसिंह चिंतामण उर्फ तात्यासाहेब केळकर यांस मंगळवार दि. १४ ऑक्टोबर रोजीं पहांटे देवाज्ञा झाली हें वृत्त लिहिण्यास आम्हांस अत्यंत दुःख होत आहे. सोमवारीं रात्रीं ९ वाजतां त्यांना किंचित् बरें वाटेनासें झालें. डॉ. ढमढेरे यांनीं त्यांस औषधोपचार केला. त्यामुळें त्यांस थोडें बरेंही वाटलें. परंतु तें बरें वाटणें फसवें ठरलें व पहांटेच त्यांचें

अगदीं अकस्मात् देहावसान झालें. सकाळीं ही खेदाची वार्ता शहरांत तोंडो-तोंडीं पसरली. तिजवर लोकांचा विश्वास बसण्यासारखा नव्हता. गेल्या रविवारींच श्री. धोंडूमामा साठे यांच्या सत्कारसभेस ते अध्यक्ष होते. त्यावेळीं त्यांनीं सांगलीच्या एंजिनीयरिंग कॉलेजाच्या यशस्वितेची जबाबदारी महाराष्ट्रावर व विशेषतः इंजीनियर वर्गावर आहे असें ठांसून सांगितलें होतें. त्या समारंभानंतर इतक्या लवकर तात्यासाहेब जातील असें कोणाच्या स्वप्नींही आलें नसेल! परंतु विधिघटना मानवाबरोबर लहरीपणानें कशी खेळं खेळेत याचा अनुभव तात्यासाहेबांच्या बाबतींत आला व तात्यासाहेब जणूं जिवंतच मृत आहेत का काय असा क्षणिक आभास तिनें निर्माण केला. इतकें तात्यासाहेबांचें देहावसान आकस्मिक व 'अनायासाचें' झालें. १९३२ सालीं त्यांचा ६० वा वाढ दिवस समारंभ झाला तेव्हांच भाषण करतांना त्यांनीं आपल्या जीवनाला टाईपरायटरच्या सूचक घंटेची उपमा लावली होती. ती घंटा झाल्यावरही १५ वर्षें त्यांस निरोगी व क्रियावान् आयुर्दाय लाभला व महाराष्ट्रास ते स्वतः लाभले ही निःसंशय भाग्याची गोष्ट होय.

श्री. केळकर यांच्या निधनानें पुण्याचीच नव्हे, महाराष्ट्राचीच नव्हे, तर अखिल भारताची अत्यंत मोठी हानि झाली आहे. लोकमान्यांच्याबरोबर राजकारणांत त्यांचीं १८९६ पासून १९२० पर्यंत चोवीस वर्षें गेलीं. त्यांच्या पश्चात् टिळकांच्या राजकारणाची परंपरा त्यानींच चालू ठेवली. अशा रीतीनें सुमारें पन्नास वर्षें राजकीय क्षेत्रांत सतत काम करीत राहणारा श्री. केळकरां-सारखा चतुरस्त्र पुढारी फारच विरळा सांपडेल.

टिळकांच्या प्रत्येक चळवळींत ते सहभागी होते. टिळकांच्या चळवळीची जीं प्रभावी साधनें तीं म्हणजे 'केसरी–मराठा' पत्रें हीं त्यांनींच टिळकांच्या मताप्रमाणें चालवून राजकीय कार्य भारतभर प्रसृत करण्यास टिळकांस पूर्ण स्वातंत्र्य उपभोगूं दिलें असें म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. १९२० नंतर म्हणजे टिळकांच्या निधनानंतर तर महाराष्ट्राचें राजकीय नेतृत्व साहजिकपणेंच त्यांच्याकडे आलें व तें त्यांनीं तनुमनधनानें किंबहुना आपल्या शक्ती-बाहेरही जाऊन पार पाडलें असे भावी इतिहासकारास नमूद करावें लागेल.

१९२० नंतर गांधीजींचें असहकारयुग सुरू झालें व त्याच्या तुफानी वावटळांत टिळकांच्या प्रतियोगी सहकारितेच्या तत्त्वज्ञानाची नौका दोलायमान होत असतांही त्यांनीं ती मोठ्या कौशल्यानें व निष्ठेनें सांभाळिली. त्यांचा स्वभाव जात्याच सरळ व तडजोडीच्या प्रवृत्तीचा असल्यानें त्यांनीं आपली वैचारिक निष्ठा न सोडतां चळवळीशीं जितकें सामीप्य व सारूप्य निर्माण करतां आलें तितकें करून पाहिलें. यांत त्यांची देशहिताची आत्यंतिक निष्ठाच प्रेरक होती. पण अखेर केळकरांना जें साधलें नाहीं तें परिस्थितीनेंच गांधीजींवर मात करून त्यांस करण्यास भाग पाडलें. असहकारितेच्या व अहिंसेच्या आहारी गेलेल्या कॉंग्रेसला टिळकांच्या तत्त्वज्ञानावर आणण्यांत परिस्थितीच्या खालोखाल श्री. केळकर यांचें श्रेय इतर कोणाहीपेक्षां अधिक आहे. या सर्व वैचारिक तत्त्व-निष्ठेच्या पायीं तात्यासाहेब केळकरांना जितकी अप्रियता स्वीकारावी लागली तितकी दुसऱ्या कोणालाहि स्वीकारावी लागली नाहीं. या कामीं त्यांनीं जितका स्वार्थत्याग सोसला तितका दुसऱ्या कोणीही सोसला नाहीं. जर श्री. केळकर यांनीं स्वत्व व आपली वैचारिक निष्ठा सोडली असती, तर ते राष्ट्रीयसभेच्या राजकारणाशीं समरस झाले असते. जर त्यांनीं कांहीं वर्षें गांधींच्या तत्त्वज्ञानास प्रयोगाकरितां साहाय्य केलें तसें कायम केलें असतें, तर त्यांस राष्ट्रीय सभेत वाटेल तो उच्च मान खात्रीनें लाभला असता; व आज ते केंद्रीय सरकारांत किंवा एखाद्या प्रांताच्या गव्हर्नराच्या जागीं विराजमान झालेले दिसले असते. परंतु त्यांनीं आपलें तत्त्वज्ञान व वैचारिक निष्ठा केव्हांही सोडली नाहीं, कोणत्याही वैयक्तिक महत्त्वाकांक्षेस ते बळी पडले नाहींत, व त्यांनीं कधीं कोणाचा द्वेष केला नाहीं, यांतच केळकरांचें व्यक्तिमत्व दिसून येतें. जें तत्त्वज्ञान त्यांनीं जन्मभर प्रतिपादिलें, त्याला मध्यंतरी जबरदस्त विरोध झाला असतांही अखेर तेंच खरें ठरलें हें त्यांना स्वतःच्या डोळ्यांनीं पाहण्याचें भाग्य लाभलें व देशही स्वतंत्र झालेला त्यांस पाहतां आला. त्यांच्या आयुष्यातील तो क्षण खरोखरच भाग्याचा होय !

त्यांच्या प्रामाणिक व तर्कशुद्ध मतप्रणालीमुळें त्यांस एक प्रकारची विशिष्ट तत्त्वनिष्ठेची व भारतीय व्याप्तीची कीर्ति लाभली होती. विरोधी पक्षाचे

पुढारीही त्यांस मान देत, व त्यांची सल्लामसलत घेत असत. आज महाराष्ट्रांत त्यांच्या मागें त्यांच्याइतकी भारतीय कीर्ति मिळविलेला पुढारी नाहीं ही त्यांच्या अंगभूत थोरवीची मुख्य खूण होय. खरोखर नाना फडणीस गेल्यावर पेशवाईचें जें नुकसान झालें त्या तोलाचें नुकसान श्री. केळकर यांच्या मृत्यूनें हिंदुस्थानचें झालें आहे. 'भले बुद्धिचे सागर नाना' हें वर्णन श्री. केळकर यांस तंतोतंत लागू पडतें. त्यांच्या अष्टपैलू व विचारी बुद्धिचातुर्याचा आणि राजकीय कौशल्याचा कॉंग्रेसनें आपल्या नवीन राज्यघटनात्मक विधायक कार्याकडे उपयोग करून घेतला असता तर तें शहाणपणाचें ठरलें असतें. 'मराठा' पत्राचें संपादक, होमरूल लीग, कॉंग्रेस स्वराज्य पक्ष, प्रतियोगी सहकारिता पक्ष, मध्यवर्ती असेंब्ली, गोलमेज परिषद इत्यादि क्षेत्रांत त्यांनीं जी कामगिरी केलीं ती चिरस्मणीय अशीच गणली जाईल.

पण राजकीय कामगिरी एवढी एकच त्यांची कामगिरी आहे असें नाहीं. ते हिंदुधर्माचे व संस्कृतीचे कट्टे अभिमानी होते. जेव्हां जेव्हां सरकार व कॉंग्रेस यांच्याकडून हिंदुत्वावर घाला घातला जाई तेव्हां तेव्हां ते हिंदुत्वाचा स्वाभिमानानें पुरस्कार करीत. हिंदुमहासभेच्या अग्रणीपैकीं ते एक प्रमुख होते. लाला लजपतराय, पं. मालवीय यांच्याबरोबर त्यांनीं कित्येक वर्षें हिंदुसभेच्या कार्यांत सहभागित्व केलें. कानपूर व जबलपूर येथील हिंदुमहासभेच्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. त्यावेळीं त्यांनीं जी विचारप्रवर्तक व मार्गदर्शक भाषणें केलीं तीं अजूनही उपयुक्तच आहेत. यावरून त्यांची दूरदृष्टि प्रचीतीस येते.

महाराष्ट्रांतील सार्वजनिक जीवनाचें असें कोणतेंही क्षेत्र नाहीं कीं, ज्यांत त्यांनी काम करून आपल्या लोकसेवेची व बुद्धिमत्तेची छाप पाडली नाहीं. स्थानिक संस्थेपासून तों थेट मध्यवर्ती असेंब्लीपर्यंत त्यांच्या निःस्वार्थी कर्तृत्वाची प्रभा फांकली. वाङ्मयक्षेत्रांत तर त्यांनीं इतकी विविध स्वरूपाची व मोलची कामगिरी केली आहे कीं, तिला दुसरी तोडच नाहीं. 'साहित्याचार्य' व 'साहित्य सम्राट' या पदव्या त्यांस लोकमतानें आपण होऊन दिलेल्या आहेत. टिळकांची 'लोकमान्य' ही पदवी जितकी यथार्थ तितक्याच याही यथार्थ

होत यांत तिलप्राय संदेह नाहीं. टिळक चरित्र, मराठे व इंग्रज, जीवनयात्रा, तोतयाचें बंड इत्यादि त्यांची अनेकविध पुस्तकें मराठी भाषेत अजरामर होऊन राहतील. तत्त्वज्ञान असो, चलनविषयक प्रश्न असो किंवा शास्त्रीय संशोधन असो, आपल्या कुशाग्र व व्यापक बुद्धीनें त्यांचें ते आकलन करीत, व आपल्या ललित लेखणीनें तो तो विषय असा रंगवीत कीं तशी चातुरी फारच थोड्यांच्या नशिबीं येते. मराठी लेखनापुरतें बोलावयाचें तर तें सरस्वतीकंठाभरण होतें असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. न्यायमूर्ति रानडे यांच्या मागून त्यांच्यासारखा द्रष्टा पुरुष कोण असा प्रश्न केल्यास 'केळकर' हेंच उत्तर कोणाही विचारी मनुष्याच्या तोंडी सहज येईल.

त्यांचीं कार्यक्षेत्रें आणखीही सांगण्यासारखीं आहेत. सहकारी पतपेढ्या, विमाकंपन्या, साखर कारखानें, शिक्षणसंस्था याही बाबतींत त्यांनीं कार्यास आपल्या परीनें चालना दिलेली आहे. अगदीं अलीकडे पुणें विद्यापीठ स्थापण्याच्या बाबतींत त्यांनीं विशेष लक्ष घातलें होतें. त्यांचें बिल कायदे-मंडळासमोर येण्याच्या मार्गावर असून तें त्यांच्या नजरेखालून गेलें होतें असें समजतें.

असो. श्री. केळकरांच्या विविध कार्यक्षेत्रांचें समग्र पर्यालोचन करणे आज अशक्यप्रायच आहे. इतिहास तें योग्य रीतीनें करूं शकेल. इतकी कार्यें यशस्वीपणें करणारा पुरुष तसाच विविध गुणांनी मंडित असल्याशिवाय तें शक्य नसतें. श्री. केळकरांच्या अंगीं बहुविध गुण होते. किंबहुना केळकर म्हणजे अनेक गुणांचा पुतळाच होय. दुर्गुणाशिवाय पामर मानव असणें शक्य नाहीं असें म्हटलें तर त्यांच्या गुणांचा अतिरेक हाच फार तर त्यांचा दुर्गुण म्हणावा लागेल. टिळकांविषयींच्या एका व्याख्यानांत त्यांनीं टिळकांच्या गुणाची एक माला गुंफिली आहे. त्यापद्धतीचे अनुकरण करून श्री. केळकर म्हणजे सत्प्रवृत्तीचें माहेरघर, लोकसेवेचें आगर, सुविचाराची खाण, व्यवहारज्ञानाची बाजारपेठ, वृत्तपत्रीय संपादन व लेखन यांच्या कौशल्याचा महासागर, समतोलपणाचा मुकुटमणि, मुत्सद्दीगिरीचा मेरुपर्वत, राजकीय तपश्र्येचे तपोवन असें त्यांचें कितीतरी यथार्थ वर्णन करतां येईल. परंतु

तें कितीही केलें तरी तें अपुरेंच वाटेल. श्री. केळकर यांच्यासारखा महर्षि आज आपणांमधून गेला. ते जिवंतपणी स्वतःस दैववान् समजत. सुदैव म्हणून त्यांस केसरी–मराठा पत्राचें संपादकत्व लाभलें. ' अनायासेन मरणम् ' येण्याचें सुदैवही त्यांस शेवटीं लाभलें. त्यांचें सुदैव फळास आलें असलें तरी त्यांच्या मृत्यूमुळें महाराष्ट्राची भारतीय स्वातंत्र्याच्या भावी काळांत कल्पना करतां येत नाहीं इतकी मोठी हानि झाली आहे. त्यांच्या मृत्यूमुळें आज महाराष्ट्र पोरका झाला आहे. ती हानि सहसा लवकर भरून येण्याची संभाव्यता दिसत नाहीं; म्हणून त्यांच्या मृत्यूबद्दल महाराष्ट्रास अत्यंत हळहळ वाटणें साहजिक आहे. ते इतके लोकप्रिय होते कीं प्रायः प्रत्येक महाराष्ट्रीय कुटुंबाला आपल्या घरांतील आजोबा आपणांस सोडून देवाच्या घरीं गेले असेंच वाटत राहील. त्यांचे उभयता चिरंजीव श्री. केळकर यांची अखंड प्रवाही कार्यसरिता आपल्या कार्यानें सतत वाहती ठेवतील अशी आशा व्यक्त करून, त्यांच्या दुःखांत अखिल भारत सहभागी आहे असें त्यांचें सांत्वन करून व खेदजड अंतःकरणानें तात्यासाहेबांच्या पवित्र व पूज्य मूर्तीस वंदन करून हा लेख संपवितों.

---

# महाराष्ट्राचे ' नरसिंह ' कै. केळकर

(समर्थ, सातारा, २० ऑक्टोबर १९४७)

## महाराष्ट्राचा कोहिनूर निखळला !

[ मंगळवार दि. १४ ला पहाटे धुरंधर लोकाग्रणी आणि साहित्य-सम्राट श्री. तात्यासाहेब केळकर यांना देवाज्ञा झाली. गेलीं पन्नास वर्षें हिंदुस्थान आणि विशेषतः महाराष्ट्र यांच्या सार्वजनिक जीवनांत महत्पद प्राप्त करून घेतलेले तात्यासाहेब हे कर्तृत्वान विचारवंत पुढारी, सूक्ष्म बुद्धीचे मुत्सद्दी, विद्वान् राजनीतिज्ञ, दिलदार जनसेवक, सव्यसाची लेखक, अनेक संस्थांचे निर्माते आणि मार्गदर्शक नि सर्व पक्षोपपक्षांकडून मान्यता मिळ-

विलेले सुवर्णमध्यवादी सल्लागार म्हणून सर्वांच्या आदराचें स्थान ठरले होते. त्यांच्या कर्तृत्वाचा पहिला प्रारंभ सातान्यास झाला आणि सातान्यासंबंधीची आपलेपणाची भावना त्यांनीं अखेरपर्यंत ठेवली. त्यांच्या निधनानें महाराष्ट्राची फार मोठी हानी झाली आहे. ]

मंगळवारी दि. १४ ला पहाटे श्री. तात्यासाहेब केळकर स्वर्गवासी झाले. तात्यासाहेबांच्या जीवनाच्या विविध छटा, त्यांच्या बुद्धीचे पैलू त्यांच्या कर्तृत्वाचीं यशोमंदिरें, आणि त्यांच्या राष्ट्रसेवेची अलोट तपस्या ज्या विशेषणांतून संपूर्णपणें व्यक्त होऊं शकेल अशी शब्दमालिका सांपडणें कठीण आहे. केळकरांचें जीवन म्हणजे भारताचा आणि त्यांतही महाराष्ट्राचा चाळीस वर्षांचा सर्वांगीण इतिहास होय असें म्हटलें तर त्यांच्या व्यापक कर्तृत्वाची कांहींशी कल्पना येण्यासारखी आहे. या राष्ट्राला स्वातंत्र्य मंत्राची दीक्षा देणाऱ्या लोकमान्यांचे सहकारी म्हणून तात्यासाहेबांनीं सार्वजनिक कार्यक्षेत्रांत प्रवेश केला. हिंदुस्थानी जनतेचे अनभिषिक्त सम्राट म्हणून त्रिखंडांत गाजलेल्या महापुरुषाचा सहकारी होण्याचें भाग्य तात्यासाहेबांना लाभलें आणि त्यांनींच एकदां म्हटल्याप्रमाणें देवानें दिलेली ही संधी स्वतःच्या कर्तृत्वानें त्यांनी पुरती राबवून घेतली, भाग्याला पात्रतेची जोड देवून दैवानें दिलेलें दान सार्थकी लावलें. ' अखेरच्या दिवसांत मित्रत्वाच्या नात्यानें काम करून मदत करणारा स्नेही टिळकांना हवा होता. आणि ही आपली गरज टिळकांनी आपल्या एका ऋणानुबंधी गृहस्थांना कळविली. त्या गृहस्थांनी टिळकांना केळकरांचें नांव सुचविलें हा योगायोग —पण टिळकांची अपेक्षा पुरी करून टिळकांच्याकडून " आतां तुम्ही माझ्या जागीं क्रमानें आलां आहां, तुमची कार्यकुशलता, तुमचा अनुभव, तुमचा चांगुलपणा या गुणांमुळें तुम्ही सर्व अडचणींतून निभावून जाल अशी मला खात्री वाटते ' असें प्रशस्तीपत्र तात्यासाहेबांनी मिळविलें ही त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष होय. १८९६ साली केळकर टिळकांना येऊन मिळाले आणि मंडालेस तुरुंगांत असतांना १९०९ साली वरील आशयाचें पत्र टिळकांनीं केळकरांना लिहिलें. या तेरा वर्षांच्या अवधींत केळकरांनी केसरी आणि मराठा हीं दोन्ही पत्रें सांभाळलीं, टिळकांच्या राजकारणाचें सारथ्य

६६७६ ६६७०

केलें, १८९७ सालीं टिळकांना शिक्षा झालेली असतांना दोन्ही वृत्तपत्रें अनेक आपत्तीचे डोंगर कोसळले असतांनाहि कौशल्यानें चालविली आणि टिळकांच्या गैरहजेरींत त्यांच्या अनेक व्यापांचा भार तोलून लोक-जागृतीची ज्योत तेवत ठेवली. १९१४ साली टिळक मंडालेहून आले. केळकरांनी एखाद्या जागरूक प्रधानाप्रमाणे लोकमान्यांच्या लोकराज्याची व्यवस्था ठेवलेली होती. शिवाजी महाराज आग्र्यास कैदेंत असतांना त्यांच्या सहकाऱ्यांनीं स्वराज्याचा बंदोबस्त जसा उत्तम राखला होता त्याप्रमाणें केळकरांनीं काम केलेलें पाहून टिळक त्यांना म्हणाले, "मी खरोखर तुम्हांला सांगतों कीं जो जो मला भेटला त्याने तुम्ही केसरी फार चांगला चालविला असेंच सांगितलें." १९१४ सालापासून हिंदी राजकीय चळवळीला विलक्षण भरती आली. लोकमान्यांनी तुफानी प्रचारानें सारा देश हलवून सोडला. १९१६ सालीं होमरूल लीग स्थापन झाली. तिचे चिटणीस म्हणून लोकमान्यांनीं केळकरांनाच निवडले! १९१८ साली लोकमान्यांबरोबर होमरूल लीगच्या शिष्टमंडळाचे चिटणीस म्हणून केळकर विलायतेस गेले आणि केवळ होमरूल लीगचेच नव्हेत तर लोकमान्यांचे राजकीय कार्यवाह म्हणून केळकर सर्वत्र ओळखले जाऊं लागले.

## टिळक पक्षाचे वारसदार

१ ऑगस्ट १९२० ला लोकमान्य निवर्तले आणि क्रमानें त्यांच्या जागीं श्री. तात्यासाहेब केळकर आले. केसरी मराठा हीं वृत्तपत्रें, टिळकांनीं निर्माण केलेलें व्यासपीठ, टिळकांनीं जोडलेलीं माणसें आणि टिळकांनीं आंखून दिलेली राजकीय विचारसरणी यांचा वारसा तात्यासाहेबांच्याकडे आला. तात्यासाहेबांनी अखेरपर्यंत टिळकांनीं स्वाधीन केलेल्या या ठेव्याशीं इमान राखलें. त्यासाठीं झालेली मानखंडणा आणि छळणा सहन केली, लोकप्रियता आणि अप्रियता यांच्या चढ उताराचा अनुभव घेऊनहि आपल्या तत्त्वांशीं प्रामाणिकपणा ठेवला. गांधीवादाचा महापूर आलेला असतांना आपल्या बुद्धीला स्मरून केळकरांनी त्या पुरांत वहून जाण्याचा मोह धरला नाहीं.

उलट वादाशीं निधडया छातीनें दोन हात केले. सत्य, अहिंसा, चरखा, खादी, उपास, हृदयपालट हीं महात्माजींची अध्यात्माच्या भूमिकेवर शोभणारीं तत्त्वें राजकारणांत आलेलीं पाहून त्यांनीं त्यावर निर्भयपणानें टीका केली आणि लोकक्षोभाची क्षिती केली नाहीं. गांधीवादाशीं असलेले मतभेद त्यांनीं जाहीर केले आणि आपल्या तत्त्वज्ञानास अनुसरून राजकारण करण्यासाठीं पं. मोतीलाल नेहरू, विठ्ठलभाई पटेल, सी. आर. दास इत्यादि सहकाऱ्यांना बरोबर घेऊन त्यांनी कॉंग्रेसमध्यें स्वराज्य पक्ष काढला. गांधीजींनीं पुरस्कारलेला कौन्सिल बहिष्कार त्यांना मान्य नव्हता. १९२३ सालच्या निवडणूकीस ते उभे राहिले आणि पहिले आले. गांधीजीशीं समोरासमोर युद्ध करण्यास उभे राहिलेल्या केळकरांच्या प्रामाणिक मतभेदांना स्वतः गांधीजीनीहि मान दिला. कारण केळकरांचे मत–भेद द्वेषावर आधारलेले नव्हते. त्यांच्या राजकीय तत्त्वज्ञानाची बैठकच वेगळी होती. स्वराज्य पक्षानें कौन्सिल प्रवेशाचें राजकारण यशस्वी करून दाखविल्यावर गांधीजी म्हणाले "कौन्सिलांत गेलेले लोक राष्ट्राच्या बुद्धीचे निवडक नमुने आहेत असें अखेर म्हणावेंच लागतें. ते कसलेले योद्धे आहेत. पं. मालवीय व नेहरू, तसेंच दास व केळकर यांचा स्वार्थत्याग स्वयंप्रकाशी आहे हें कोण नाकबूल करील? मतभेद हे जगाच्या अंतापर्यंत चालतच राहतील". गांधीजी आणि केळकर हे प्रतिस्पर्धी दिलदार खरे! गांधीजींच्या राजकीय तंत्रावर आणि तत्त्वज्ञानावर सतत टीका करीत असूनहि कॉंग्रेसचा एक सदस्य आणि देशसेवक या नात्यानें त्यांनी गांधीजींच्या आणि कॉंग्रेसच्या आदेशानुसार १९३० च्या सत्याग्रहांत भाग घेतला. पण येथें त्यांनीं मिठाचा कायदा तोडला आणि महाराष्ट्रांत कायदेभंगाच्या चळवळीला कल्पनातीत जोर आला. आपले मतभेद जाहीर करूनहि कर्तव्य म्हणून मोकळ्या मनानें सत्याग्रहांत भाग घेणारे केळकर ब्रिटिशांविरुद्ध लढतांना गांधीजींची आणि कॉंग्रेसची बाजू घेत होते.

स्वराज्य पक्षानें प्रारंभीचा उत्साह पुढें टिकविला नाहीं. महाराष्ट्राखेरीज इतर प्रांतांचे नेते लवकरच गांधीजींच्या मागें गेले. त्यामुळें कौन्सिल प्रवेशा-

पुढें न सरकणारें राजकारणाचें गाडें ढकलण्यासाठीं केळकर जयकरांनी महाराष्ट्राचा प्रतिसहकारवादी पक्ष काढला. १९२६ सालीं या पक्षाच्या वतीनें केळकर पुन्हां पहिल्या क्रमांकानें निवडून आले. पण १९३० साल्च्या चळवळीमुळें असहकाराची प्रचंड लाट उसळली, प्रतिसहकारवादी पक्षानें कर्तव्य म्हणून त्या चळवळीतहि भाग घेतला पण आपला आग्रह सोडला नाहीं. १९३१ ची गोलमेज परिषद फिसकटली आणि ३२ सालीं पुन्हां कायदेभंगाची मोहीम सुरू झाली. त्यांतहि केळकर पक्ष सामील झाला. पण कौन्सिल–प्रवेशाचा आपला मुद्दा सोडला नाहीं. १९३५ सालीं केळकरांचा तात्त्विक विजय झाला. १९२३ पासून त्यांनीं पुरस्कारलेल्या प्रतिसहकारवादाचें तत्त्वज्ञान १९३५ सालीं कॉंग्रेसनें स्वीकारलें आणि कौन्सिल–प्रवेशास मान्यता दिली. १९३७ साली कॉंग्रेसनें सर्व देशभर निवडणुका लढविल्या आणि मंत्रिमंडळें स्थापन करून प्रांतोप्रांतीचे अधिकार काबीज केले तेव्हां केळकरांना मनापासून आनंद झाला. त्या दिवशीं त्यांनीं लिहिलें, "विचारी विवेकशील मनुष्याला राजकारणांत आपलें धोरण यशस्वी ठरणें हा लौकिक–ऐहिक मोक्षच होय. व त्याचा आनंद महात्माजीनीच अखेर महाराष्ट्राला मिळवून दिला. हा केवढा योगायोग म्हणावयाचा !" या चौदा वर्षांच्या अवधींत केळकरांनीं खडतर राजकीय तपस्या केली, असामान्य तत्त्वनिष्ठा प्रकट केली. गांधीजीनीं आपल्या व्यक्तिमत्वाच्या बळावर सारा देश आपल्याकडे आकर्षून घेतला आणि ते एकमेवाद्वितीय नेते ठरले. या त्यांच्या नेतृत्वाचा तात्यासाहेबांनी कधीच हेवा केला नाहीं. त्यांनीं धोरणाविषयीं मतभेद व्यक्त केले, कडाडून टीका केली, आपल्या कर्तृत्वशक्तीनुसार गांधीजींना विरोध केला. पण गांधीजींनी केलेल्या अपूर्व लोकजागृतीबद्दल त्यांनीं वेळोवेळीं धन्योद्गार काढले. टिळकांच्या वेळीं आणि नंतरहि थोडे दिवस नेत्रदीपक प्रकाशांत असलेले केळकर अप्रियतेच्या अंधारांत फेकले गेले पण त्याचा त्यांनीं विषाद मानला नाहीं. त्या अंधारांतहि ते स्वयंप्रकाशानें चमकत राहिले आणि राजकारण पुन्हा आपल्या मार्गावर आल्याबरोबर त्यांनीं मोकळ्या मनानें कॉंग्रेसचें अभिनंदन केलें. टिळक पक्षाशीं राखलेलें इमान अशा तऱ्हेनें

१९३७ सालीं फळाला येतांच त्यांनीं आपल्या राष्ट्रसेवेचे एकाकी दिलेल्या झुंजीचें सार्थक झालें असें मानलें आणि त्या दिवशीं केसरी संस्थेचीं सूत्रें खालीं ठेवलीं. ते प्रत्यक्ष राजकारणांतून निवृत्त झाले.

## महाराष्ट्राचा विश्वस्त

केसरी संस्थेच्या विश्वस्त पदाचें तात्यासाहेबांनी त्यागपत्र दिले खरें, पण त्या दिवसापासून ते साऱ्या महाराष्ट्राचे विश्वस्त—वडीलधारे सल्लागार झाले. महाराष्ट्राच्या विविध संस्था आणि कार्यक्षेत्रें यांत आधीच त्यांनीं प्रत्यक्ष कार्य केलें होते. त्यांनीं सार्वजनिक कार्याचा जेव्हां १९३७ सालीं निरोप घेतला तेव्हां ५०।६० निरनिराळया संस्था आणि चळवळी यांच्या अधिकार पदाची सूत्रें त्यानीं सोडलीं. शिक्षण संस्था, बँका, कारखाने, उत्पादनकंपन्या, विमासंस्था, साहित्य संघ, इतिहास मंडळें, संशोधन संस्था इत्यादि विविध क्षेत्रांत ते काम करीत होते. त्यांतल्या कित्येक संस्था त्यांनी स्वतः स्थापिल्या होत्या, कित्येकांची त्यांनी स्वतः जोपासना केली होती, कित्येकांना नवजीवन दिले होतें. १९३७ सालानंतरहि त्यांनीं या सर्व संस्थांवर आपुलकीनें लक्ष ठेवलें, त्यांना मार्गदर्शन केलें, सार्वजनिक कार्याची त्यांना स्वभावतःच विलक्षण हौस होती. अविश्रांत काम हें त्यांच्या वर्तनाचें सूत्र होतें. गाढ व्यासंग, समतोल विचार, निरलसपणा, निर्भयता आणि निष्कलंक चारित्र्य या त्यांच्या गुणांचा त्यांनीं महाराष्ट्राचें सार्वजनिक जीवन व्यापक आणि समृद्ध करण्यासाठीं उपयोग केला. उभा जन्म त्यांनीं राजकारणाच्या आखाड्यांत काढला. साहित्य-सेवा ही त्यांची हौस होती; पण साताऱ्याच्या वेस्टर्न इंडिया विमा कंपनी-मुळें महाराष्ट्राचें पाऊल आर्थिक आघाडीवर यशस्वीरीत्या पडलेलें आहे याचा त्यांना आनंद वाटे. साताऱ्यांतील आयुर्वेद वैद्यक महाविद्यालयासारखी संस्था त्यांच्या कार्यक्षेत्राहून किती वेगळ्या प्रकारची! पण त्या संस्थेला त्यांचा आशीर्वाद होता. त्या संस्थेच्या रौप्यमहोत्सवाचे ते अध्यक्ष होते आणि तिला त्यांनीं प्रोत्साहन दिलें, मार्गदर्शन केलें. भिन्न भिन्न क्षेत्रांतले छोटेमोठे कार्यकर्ते त्यांच्याकडे सल्ला विचारावयाला जात आणि त्यांना त्यांच्याकडून

सल्ला मिळे. उदारहृदयी तात्यासाहेब महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाचे विश्वस्त म्हणून परवापर्यंत होते आणि त्याहि विश्वस्तपदांतून ते आतां मुक्त झाले आहेत. त्यांची जागा त्यांच्या तोलानें भरून काढील असा पुरुष आज तरी महाराष्ट्रांत दिसत नाहीं.

## सरस्वतीचा कंठमणि

राजकारणांत लोकप्रियता आणि लोकक्षोभ या दोहोंचाहि तात्यासाहेबांनीं अनुभव घेतला; पण साहित्याच्या क्षेत्रांत मात्र ते कीर्तिच्या शिखरावर चढले. त्यांच्या लोकप्रियतेला अखंड भरतीच आली. साहित्यसेवा हा त्यांच्या स्वभावांतला स्थायीभाव होता. ते स्वतः तसें म्हणत असत. महाराष्ट्र सारस्वताचीं सारी दालनें त्यांनीं आपल्या कलाकृतींनीं सजविली. तत्त्वज्ञान, इतिहास, निबंध, कादंबरी, काव्य, नाटक, कथा, टीकावाङ्मय, चरित्र या साहित्याच्या नवरत्नांचा त्यांनीं हार गुंफलेला आहे. या प्रत्येक विभागांत त्यांची लेखणी सारख्याच कुशलतेनें चालली आणि स्वतःचें असे युग निर्माण केलें, स्वतःची शैली निर्माण केली. त्यांच्याइतकी बहुरंगी प्रतिभा क्वचितच जगांतल्या एकाद्या भाषेच्या लेखकाला लाभली असेल! राजकारणाच्या प्रचंड धबडग्यांत त्यांनीं नाटकें लिहिलीं, दोन पत्रांचे संपादक असतांना ते कादंबऱ्या लिहित होते आणि राजकारणांत एका पक्षाचे अध्वर्यू म्हणून छातीवर आघात झेलीत असतांना त्यांनीं प्रबंध लिहिले आहेत. अष्टपैलू बुद्धी आणि श्रमाचा हव्यास असल्यावाचून हें होणें शक्य नाहीं. अखेरच्या दिवसांपर्यंत त्यांचीं नवनवोन्मेषशाली प्रतिभा मराठी सारस्वताची बाग फुलवीत होती, नवी नवी वाङ्मयपुष्पें सरस्वतीचे चरणीं अर्पण करीत होती! हातांत बंदूक असतांना ती रोखलेल्या स्थीतींतच सैनिकाला मृत्यू यावा तसा तात्यासाहेबांचा अन्त झाला. शेवटच्या क्षणीं त्यांच्या हातांत त्यांची मराठी वाङ्मयाला भूषण असलेली लेखणी होती. लोकमान्यांचा कर्मयोगहि त्यांच्या शिष्यानें अलौकिक लोकनिष्ठेनें आचरला!

त्यांचें वाङ्मय बारा हजार पृष्ठांत प्रसिद्ध झालें आणि त्यांत त्यांनीं

आणखीही कांहीं हजार पृष्ठांची भर घातली. इतर प्रचंड व्याप संभाळून त्यांनीं केलेली ही साहित्यसेवा अतुलनीय आहे.

## माणुसकीचा आदर्श

तात्यासाहेबांच्या दिलदार मनाची साक्ष त्यांच्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांनींहि मोकळ्या मनानें दिली आहे. राजकीय मतभेद ताणतां ताणतां त्यांचें व्यक्ति-द्वेषांत रूपांतर होऊन मनाची दिलदारी गमावलेलीं माणसें आपण पुष्कळ पाहतों. केळकरांचे मतभेद त्या थराला कधींच गेले नाहींत. त्यांनीं सप्टें-बरच्या सह्याद्रींत लिहिलें कीं, "आज काँग्रेसपक्षाचे शंभर आणि आम्ही पांच असेच विधिमंडळादि महत्वाच्या स्थानांमधून दिसलों तरी कोणाहि इंग्रजादि परक्याविरुद्ध आम्ही १०५ आहोंत असेंच मी मानतों." काँग्रेसचे सर्व श्रेणींतले कित्येक कार्यकर्ते त्यांचे जिवलग स्नेही होते. केळकरांच्या घरांत बादशाही थाट कधींच नव्हता. कोणीहि त्यांना भेटूं शकत असे. तास तास दारीं तिष्ठत ठेवणाऱ्या अहंकारी पुढाऱ्यांत तात्यासाहेबांची गणना त्यांचा वरीसुद्धां करणार नाहीं. मोकळ्या मनानें हसत आणि विनोद करीत बसलेले तात्यासाहेब हे सर्वांचे मित्र होते. त्यांच्या जीवनांत ते अनेक मोठ्या पुरुषांच्या सान्निध्यांत आले, त्यांची व्यक्तिचित्रें त्यांनीं लिहिलीं आहेत यांत नवल नाहीं. पण पुण्याच्या बाबू टांगेवाल्याचें व्यक्तिचित्र तितक्याच तन्मयतेनें लिहिणारे तात्यासाहेब माणुसकीचे मूर्तिमंत आदर्श होते. लोक-मान्यांच्या चिरंजीवांशीं त्यांना भांडावें लागलें. न्यायासाठीं ते भांडलेहि. पण लोकमान्यांच्या घराण्यावर त्यांनीं निष्ठा ठेवली. लोकमान्यांचे नातू श्री. जयंतराव टिळक यांच्या ठिकाणीं चमक दिसल्याबरोबर त्यांनीं जयंतरावांना उत्तेजन दिलें, प्रेमळ पित्याच्या आस्थेनें त्यांचा परामर्ष घेतला. टिळक घराण्याची विस्कटलेली घडी फिरून बसविण्यासाठीं श्री. जयंतरावांना त्यांनीं आपल्याकडून शक्य तेवढें सहाय्य केलें.

## हाडाचे राष्ट्रीय

१९२० सालापासून गांधीजींच्या नेतृत्वाशीं सामना देणारे केळकर, गांधीजींच्या वर्चस्वाखालीं असलेल्या काँग्रेसला विरोध करणारे केळकर,

काँग्रेसच्या प्रतिस्पर्धी संस्थेंत काम करणारे केळकर, काँग्रेसनें वसाहतीचें स्वराज्य हस्तगत करतांच काँग्रेसच्या अभिनंदनासाठीं मोकळ्या मनानें पुढें झाले. त्या स्वराज्याचें आगमन पाहायला आपण जगल्याबद्दल त्यांनीं धन्यता मानली. ' स्वराज्य आलें, आतां सुराज्याच्या तयारीला लागा ' असा आदेश दिला आणि आतां सर्वांनी एकत्र येऊन, मतभेद विसरून देशाचा उत्कर्ष साधावा अशी सद्भावना प्रकट केली. हाडाचा राष्ट्रीयच हें करूं शकतो.

मनाची एवढी ऊंची असलेला, महाराष्ट्राच्या पितृस्थानी असलेला एक थोर पुरुष आज नाहींसा झाला आहे पण त्यांनीं ठेवलेला आदर्श मात्र युगानुयुगें टिकणार आहे !

—बलवंत वष्ट

---

# महाराष्ट्राचा मार्गदर्शक गेला

## (महाराष्ट्र, नागपूर, ता. १९ ऑक्टोबर १९४७)

आम्हांस कळविण्यास अत्यंत दुःख होतें कीं, श्री. नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांस ता. १४ रोजीं पहाटे, वयाच्या ७५ व्या वर्षी, पुणें येथें त्यांच्या राहत्या ' पुष्करणीं ' त देवाज्ञा झाली. तात्यासाहेबांच्या मृत्यूनें महाराष्ट्राची अपरिमित हानि झाली आहे.

तात्यासाहेबांचा जन्म मिरज संस्थानांत १८७२ सालीं झाला. बाविसाव्या वर्षी ते एल. एल. बी. झाले व पुढें दोन वर्षांनीं ते केसरी–मराठा संस्थेंत दाखल होऊन लोकमान्य टिळकांना येऊन मिळाले. १८९६ च्या मार्चमध्यें त्यांनीं अशाप्रकारें आपल्या सार्वजनिक जीवनास प्रारंभ केला व तें कार्य पूर्ण एकावन वर्षें–म्हणजे अर्ध्या शतकाच्या वर त्यांनीं अविरत केलें. त्यांचें जीवन सर्वव्यापी होतें. राजकारण, समाजकारण, शिक्षणकार्य, शारदोपासना वगैरे

विविध क्षेत्रांत राष्ट्रीय उत्थापनाला त्यांनीं हातभार लावला. महाराष्ट्राच्या विविध जीवनांगांशीं गेल्या ५१ वर्षांत तात्यासाहेबांचा जो निकट संबंध आला आहे, तो बनविण्यांत त्यांची कुशलता, कल्पकता आणि बुद्धिमत्ता जी खर्ची पडली आहे ती लक्षांत घेतां, या काळाचा महाराष्ट्राचा इतिहास तात्यासाहेबांच्या जीवनांत सांठवलेला आहे, असें म्हणणें मुळीच अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

तात्यासाहेबांचे जीवन साफल्याच्या दृष्टीनें पाहतां पूर्णत्वाचें झालें असें म्हणावयास हरकत नाहीं. लोकमान्यांचे महाराष्ट्रांतील राजकीय वारसदार हें त्यांचें राजकीय क्षेत्रांतील स्थान हिंदुस्थान स्वतंत्र झाल्याचें सद्भाग्य त्यांना पन्नास वर्षें राजकीय लढ्यांत घालविल्यावर लाभलें ही त्यांच्या राजकीय जीवनाची सार्थकता झाली. तात्यासाहेबांच्या ऐन तारुण्यांत जे सामाजिक प्रश्न अत्यंत विवाद्य म्हणून गणले गेले होते व ज्यावर महाराष्ट्रांत अत्यंत कटु असे वाद व भांडणें झालीं ते बहुतेक प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटल्याचें समाधान त्यांना लाभून त्या दृष्टीनेंहि त्यांना जीवनसाफल्याचा आनंद मिळाला आहे. स्त्री-शिक्षण, बालविवाह-बंदी, विधवा-विवाह, अस्पृश्योद्धार वगैरे सर्वच बाबतींत आतां देशानें एवढी मोठी मजल मारली आहे कीं, त्या वेळचे वाद आतां पोरकट वाटतात. त्यांतहि एक गोष्ट विशेष लक्षांत घेण्यासारखी आहे. या सर्व गोष्टी कायद्यानें कराव्यात कीं नाहींत, हा त्या काळीं फार मोठा वाद होता. पण, आतां या गोष्टीना शिक्षित, सुसंस्कृत आणि समंजस लोकमत एवढें अनुकूल झालें आहे कीं, या संबंधींचे कायदे करणें ही आतां एक मामुली गोष्ट झाली आहे; व त्यावर विशेष रणें न माजतां त्या गोष्टी वैध कार्यांतील मामुली बाबी या दृष्टीनें सहज केल्या जातात.

साहित्याच्या द्वारें तात्यासाहेबांनीं महाराष्ट्राच्या उत्थापनाचें जें कार्य केलें, तें तर अद्वितीयच आहे. आणि म्हणूनच आज अनेक वर्षें महाराष्ट्र मोठ्या आत्मीयतेनें त्यांना 'साहित्य सम्राट' म्हणून गौरवीत आला आहे. राष्ट्राच्या पुनरुत्थानांत तरवारी इतकेंच किंबहुना थोडे अधिकहि महत्व लेखणीला आहे, असें जर तात्यासाहेबांनीं निर्मिलेल्या साहित्याकडे व त्यानें

महाराष्ट्राच्या पुनरुत्थानाच्या कार्यांत बजावलेल्या कामगिरीकडे पाहून म्हटलें, तर तें चुकीचें ठरणार नाहीं.

तात्यासाहेबांचा मोठेपणा हा स्वयंसिद्ध आहे. लोकमान्य टिळकांचे राजकीय वारसदार या नात्यानें त्यांना जी प्रतिष्ठा मिळाली, त्यामुळें तात्यासाहेब मोठे झाले असें त्यांच्या विरोधकांनाहि म्हणतां येणार नाहीं. कारण त्या दृष्टीनें कोणी असें म्हणूं शकेल कीं, तात्यासाहेबांच्या राजकीय पुढारीपणाखाली लोकमान्यांच्या वेळचें महत्व राजकारणांत महाराष्ट्राला उरलें नव्हतें. पण हाच तात्यासाहेबांच्या स्वयंभू मोठेपणाचाहि पुरावा ठरतो. महाराष्ट्राच्या जीवनाच्या सर्व प्रकारच्या अंगाचीं जी विविध सेवा करून त्यांनीं निष्ठेनें व आत्मविश्वासानें मार्गदर्शन केलें, त्यांतच तात्यासाहेबांचें मोठेपण आहे. राष्ट्राचें नियतिचक्र गतिमान करण्यास जी शक्ति लागते, ती आपण अंशमानानें व्हावें, अशी आकांक्षा- प्रत्येक माणसाला असली पाहिजे. ज्या देशांतील लोकांच्या मनांत ही महत्वाकांक्षा असेल, त्याच देशाला, नियतिचक्राला अनुकूल कलाटणी मिळून, उत्तम दशा पुढें मागें येईल" असा एक सिद्धांत तात्यासाहेबांनीं आपल्या गॅरिबॉल्डीच्या चरित्रांत प्रतिपादिला आहे. ही महत्वकांक्षा तात्यासाहेबांमध्यें होती. राष्ट्रसेवेचा हा मार्ग त्यांनीं ४५ वर्षांपूर्वी ओळखला होता. म्हणूनच त्यांच्या हातून असें विविध क्षेत्रांत महाराष्ट्राला मार्गदर्शन झालें.

तात्यसाहेबांचा महाराष्ट्रांतील विविध चळवळींशीं, संस्थांशीं आणि कार्याशीं जो जो संबंध होता तो पाहिला म्हणजे, तात्यासाहेबांचा गेल्या ५० वर्षांतील आयुष्यक्रम म्हणजेच महाराष्ट्राच्या उत्कर्षाचा इतिहास होय, ही गोष्ट प्रत्येकाला पटेल. स्त्री–शिक्षण, लष्करी–शिक्षण समाज–सुधारणा, शारी- रिक–शिक्षण, औद्योगिक व आर्थिक संस्थांचीं स्थापना, व संवर्धन, वृत्तपत्रें, इतिहास–संशोधन, साहित्य–वर्धन, राजकारण, स्वातंत्र्याचा लढा, महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना, महाराष्ट्राचें एकीकरण इत्यादि सर्व प्रकारच्या कार्यांस केळकरांचा हातभार लागला आहे. त्यांनीं त्यासाठीं आपला वेळ, आपले श्रम व आपली बुद्धिमत्ता वेचली आहे. केळकरांच्या वांचून पुण्यांत पान हालत नसे, तर महाराष्ट्रांत केळकरांच्या शिवाय कोणतेंहि मोठें

व महत्वाचें कार्य झालेलें सहसा आढळणार नाहीं. या गोष्टी तात्यासाहेबांवरील जनतेचा विश्वास आणि त्यांची महाराष्ट्राच्या सर्वांगीण उत्थानाबद्दलची आत्मीयता यांच्याच निश्चित द्योतक होत.

तात्यासाहेबांच्या या सर्व गुणांमुळेंच ते महाराष्ट्राचे आवडते पुढारी होते. आणि, लोकांत त्यांच्याबद्दल एवढी आत्मीयता होती, म्हणूनच त्यांच्यावर स्तुतीप्रमाणेंच निंदेचाहि वर्षाव झाला. पण, त्या निंदेनें त्यांच्या मोठेपणास कधीं बाध आला नाहीं. रानड्यांची बुद्धिमत्ता, लोकमान्यांचा निग्रह व कर्मयोग, गोखल्यांची स्निग्धता, महात्माजींचें कार्यव्यापृत्व या सर्व गुणांचा समुच्चय तात्यासाहेबांच्या ठिकाणीं झालेला होता. कै. अच्युतराव कोल्हटकरांनीं तात्यासाहेबांची बुद्धिमत्तेच्या बाबतींत कै. रानड्यांशीं तर तुलना केलीच होती. पण निःपक्षपातीपणा, निःस्पृहत्व आणि न्यायनिर्वेदीपणा या बाबतींत परमेश्वरानें तात्यासाहेबांसारखें व्हावें असें लिहून, त्यांच्या थोर गुणांचा अपार गौरव केला होता. तात्यासाहेबांच्या मृत्यूनें महाराष्ट्र-शारदेचा कंठमणि निखळून पडलाः त्यांच्या मृत्यूनें महाराष्ट्राचा विचारवंत मार्गदर्शक नाहींसा झालाः महाराष्ट्र आपल्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय पुढाऱ्यास अंतरला; व त्याचा सव्यसाची संपादक व वृत्तपत्रकार हरपला. आजची केसरी–मराठा संस्था व टिळक पर्स फंड आणि ज्युबिली फंड हीं जशी लोकमान्य टिळकांचीं स्मारकें आहेत, तितकींच व तशींच तीं तात्यासाहेबांचींहि स्मारकें होत. रानडे, टिळक ही महाराष्ट्रांतील महापुरुषांची द्रष्टयाची व युगपुरुषांची परंपरा तात्यासाहेबांनीं पुढें चालवून महाराष्ट्राचें खरेंखुरें मोठेपण कायम टिकविलें. आजचा महाराष्ट्र हा या तीन युगपुरुषांनीं आपल्या सव्यसाचित्वानें निर्मिलेला महाराष्ट्र आहे. ही सव्यसाची युगप्रवर्तकांची परंपरा तात्यासाहेबांच्या मृत्यूनें आज तरी खंडित झाल्यासारखी दिसत आहे व म्हणूनच त्यांच्या मृत्यूनें महाराष्ट्राची दीर्घ काल भरून न येणारी अशी हानि झाली आहे.

आतां महाराष्ट्रालाहि, साऱ्या हिंदुस्थानाप्रमाणें, विधायक निर्मिती करावयाची आहे संयुक्त महाराष्ट्राचें ध्येय दृष्टीच्या टप्प्यांत आलें आहे; हें ध्येय

व हें कार्य साध्य करण्यास तात्यासाहेबांचा आदर्श मार्गदर्शक ठरल्याशिवाय राहणार नाहीं. गेल्या तीं. ७ रोजीं त्यांचें जें भाषण मुंबईच्या नभोवाणी-वरून वाचून दाखविण्यांत आलें, त्यांत त्यांनीं १९१० ते १९२० या कालखंडांतील आपला समृद्ध अनुभव जो महाराष्ट्रास निवेदन केला आहे, तोच या पुढील विधायक कार्यांस सर्वांस उपयुक्त ठरणारा आहे. म्हणून तो येथें उद्धृत करून व परमेश्वराजवळ अशा युगपुरुषांची परंपरा महाराष्ट्रांत खंडित होऊं देऊं नकोस अशी प्रार्थना करून, तात्यासाहेबांना आम्ही ही आदरांजलि अर्पण करतों :—

"शेवटीं एवढेंच सांगतों कीं, आज चाळीस पन्नास वर्षांच्या अनुभवानें मी मनाशीं एक सिद्धांत कायम केला आहे. तो असा कीं, प्रत्येक मनुष्याचें मत हें विशिष्ट असतें, जसें त्याचें रूप व त्याचें नांव. तें मत बुद्धी व संस्कृती यांनी बनलेले असते. तें तो सहसा बदलीत नाहीं. म्हणून समाजाचें-राष्ट्राचें हित करूं इच्छिणारांनीं एक गोष्ट करावी. ती अशी कीं, केवळ मताच्या वेगळेपणामुळें सामाजिक व राष्ट्रीय कार्यांत वेगळेपणा मानू नये. आपणांत व इतरांत जास्तींत जास्त समान असे जें निघेल तें ग्राह्य धरावें आणि त्याच्या आधारावर व्यक्तिनिरपेक्ष होईल तितके कार्य करावे. मनुष्याच्या मनांत आणलें तर त्याला जसें तोडतां येतें तसें जोडताही येतें. म्हणून तोडण्यापेक्षां जोडण्याचा प्रयत्न अधिक करावा. मोठ्या गोष्टींत जुळत असेल तर न जुळवणारी लहान गोष्ट बाजूला ठेवावी. घडयाळांतील चक्रें सर्व अणकुचीदार असतात. त्यांचीं टोकें एकमेकांवर घासलीं तर घड्याळाचा नाश होतो. उलट एका चाकांतील खोल जागा दुसऱ्या चाकाच्या दातांनी भरलीं तर दोन्हीही चाकें एकमेकाला सहायकारी होऊन घड्याळ चालू लागते. १९१० ते १९२० या कालखंडातील समृद्ध अशा अनुभवानें आतां सांगितली हीच गोष्ट मला सर्वांत अधिक पटली आहे."

# साहित्य सम्राटाचें स्वर्गारोहण

( उदय, अमरावती, ता. १७ ऑक्टोबर १९४७ )

लोकमान्य टिळकांचे १८९७ ते १९२० पर्यंतचे सहकारी म्हणून लोकमान्यांच्या सर्व देशी व विदेशीं चाइत्यांत जर कोणाचा विशेष लौकिक झाला असेल तर तो श्री० न. चिं ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांचाच झाला. ह्यामुळें लोकमान्यानंतर महाराष्ट्र म्हणजे तात्यासाहेब केळकर व तात्यासाहेब केळकर म्हणजे महाराष्ट्र अशी सर्वत्र समजूत होती.

महात्मा गांधींच्या राजकारणाला जरी तात्यासाहेबांचा प्रथमपासून विरोध होता तरी १९३४ पर्यंत म. गांधीचे व तात्यासाहेबांचे संबंध अत्यंत सलोख्याचेच होते. मध्यवर्ति कायदेमंडळास तात्यासाहेब उभेच राहिले असते तर तात्यासाहेबांना अविरोध निवडून जाऊ द्या असें महात्माजी म्हणत होते. महात्माजींची समेट वृत्ति व तात्यासहेबांची समेट वृत्ति ही एकाच जातीची असल्यामुळें तात्यासाहेबांविषयीं महात्माजी मित्रभावना बाळगून होते.

तात्यासाहेबांचें वय मृत्यूसमयीं पाऊणशें वर्षांचें होते. तथापि त्यांची प्रकृति इतक्यांतच मृत्यूमुखी जाण्यासारखी होती असें मानवी दृष्टीला तरी वाटत नसे; कारण बारा तारखेला सायंकाळीं श्री०तात्यासाहेब केळकर हे धोंडूमामा सत्कारास अध्यक्ष होतात व चौदाला सकाळीं त्यांच्या दुःखद मृत्यूची वार्ता सर्वत्र पसरते हा मृत्यूच्या सृष्टींतील अद्भुत चमत्कार होय. श्री०तात्यासाहेब केळकर आनंदी–वृत्तीचे व तीव्रतर ग्रहणशक्तिचे असून प्रत्येक विषयांतील सत्याकलन हा त्यांचा बुद्धीविशेष होता. वृद्धाशीं, तरुणाशी व बालाशींहि ते खेळाडू वृत्तीनें वागत. आपण वडील आहोंत व आपला लौकिकहि निरनिराळ्या क्षेत्रांत मोठा म्हणून कांहीं हातचें राखून वागावें हें मुळी त्यांच्या अंगवळणी नव्हतें.

लोकैषणेच्या बुद्धीनें अमुक एखाद्या गोष्टीचा अंगीकार करावा ह्या गोष्टीचा त्यांना तिटकारा असे. टिळकांचे गगनभेदी उड्डाण व महात्माजींची प्रेमळ व श्रद्धाळू सागराची अथांग खोली ह्यापैकीं त्यांच्याजवळ कांहींच

नसलें तरी श्रद्धेचा उपयोग कोठे केला असता काय फळ प्राप्त होईल व उड्डाण कोठे व केव्हां मारलें असतां पाऊल किती पुढें पडेल हें मात्र त्यांच्या बुद्धीला अचुक कळत असे. ह्मणून कै० टिळकांना जसे ते हवेसे वाटत तद्वतच महात्माजींनाहि ते हवेसे वाटत.

लिहिण्याची हौस ही त्यांच्यांतच जन्मजात. प्रामाणिकपणें सेवा–धर्म हिही त्यांची मूळ वृत्ति. त्यामुळेंच ते टिळकांना मिळाले व टिळक, टिळक कार्य व त्यांच्या संस्था ह्यांची त्यांनीं अत्यंत प्रामाणिकपणें व निष्ठेनें सेवा केली. लेखनाची हौस. पण व्यवसाय नव्हता. तरी ‘ केसरी–मराठा ’ ही टिळकांची पत्रें ह्यांच्या अंगावर पडतांच त्यांनी लिहिलीं व चालविलीं. इतकेंच नव्हे तर मालकाच्या पश्चात् तीं आर्थिक आपत्तींत सांपडली असता त्याकरितां सर्वस्व अर्पण करण्याचा उद्योगहि त्यांनी केला.

टिळकांच्या सान्निध्यांत आल्यापासून केळकरांच्या लेखन–व्यवसायास व वक्तृत्वासहि वाव मिळाला. विविध विषयावर विविध प्रकारचे लिखाण केळकरांनी इतकें लिहिलें कीं, वाङ्मयाच्या अमुक एक क्षेत्रांत त्यांची गति नाहीं असें म्हणतां येत नाहीं. विष्णुशास्त्री आजच्या मराठीचे शिवाजी तर केळकर हे त्या शिवप्रभुच्या मराठीचें साम्राज्य निर्माण करणारे सम्राट ठरले. मराठीला अनेक अलंकार चढविणारे व तिला राजाची पट्टराणी बनविण्याचा मान जर कोणास मिळाला असेल तर तो तात्यासाहेबांस मिळाला.

‘ केसरी ’ संस्थेपासून तात्यासाहेब निवृत्त झाले तरी त्यांनीं आपला लेखन व्यवसाय सोडला नव्हता. ‘ सह्याद्रि ’ मासिक चालविले व चालू महिन्याच्याच म्हणजे ऑक्टोबरच्या अंकांत स्वातंत्र्याचा स्फूर्तिदायक पोवाडा लिहून आपल्या लेखन व्यवसायाची उपास्य देवता चालून आली म्हणून त्यांनीं अखेरचा आनंद व्यक्त केला. त्या पोवाड्याचे धृपद असे :—

**महाराष्ट्र–भारता ऊठ अघाडीवरी धरी अवसान**
**अवदान मिळे स्वातंत्र्य–टिकविण्याकडे देह अवदान**

स्वातंत्र्य प्राप्तीची त्यांना जशी तळमळ होती तसेंच तें टिकविण्याची व ते लोकराज्य गाजविण्याचीहि त्यांच्या लेखन व्यवसायास हौस होती हें

लोकराज्याच्या पोवाड्याच्या धृपदावरून दिसते. ह्मणुनच तात्यासाहेब विध्वंसक नसत तर विधायकाचे भोक्त होते. अनेक बिनसरकारी संस्थात विश्वस्त ह्मणुन त्यांनी काम केले आहे व त्या सर्वच संस्था नांवारुपास आलेल्या आहेत. त्यांचे विरोधकसुद्धां आपल्या ईस्टेटीचे विश्वस्त तात्यासाहेबाना नेमत. तात्यासाहेबांचा निर्भीडपणा व प्रामाणिकपणा हा विरोधकांना सुद्धां पटला होता ह्यांचे हे गमक आहे.

'केसरी–मराठा' संस्थेचे टिळकांच्या पश्चात विश्वस्त झाल्यावर 'केसरी' पूर्वीच्या लोकप्रियतेवरून घसरेल व बुडेल असे प्रतिपक्षी ह्मणत. पण हायकोर्टाचा अखेरचा निकाल घेऊन ते कायम विश्वस्त झाले असताहि त्यानीं 'केसरी' १९२० पेक्षा दुप्पट केला. त्याला अर्ध–सात्पाहिक बनविले. पूर्वीचे कर्ज फेडले. टिळकावर असलेले लोकऋणहि ट्रस्ट करून फेडले. 'केसरी मराठा' संस्थेला योग्य इमारत बांधली. सर्व सेवकांना योग्य मोबदला देण्याची सोय केली. सर्वोत्कृष्ट असे वाचनालय तयार केले. आणि स्वतः त्यापासून अलिप्त झाले. एवढे यश हें तात्यासाहेबांचेच आहे. त्यांच्या सेवेत चिकाटी, व्यासंग, प्रामाणिकपणा व त्याग यांचे मिश्रण झाले होते.

'केसरी' संस्था मरेपर्यंत सोडलीच नसती तर त्यांना कोण सोडा म्हणणारा होता? पण त्यांनी ती सोडली. हा त्याचा त्याग अपूर्व आहे. त्यांचे गुरु टिळक हे असेच त्यागवानानाहि आदर्श. टिळक तुरुगांत गेले म्हणून कसेहि करून तुरुगांत जाऊन बसले पाहिजे ही अभिलाषा मात्र त्यांना कधी शिवली नाहीं. पण गोऱ्या नोकरशाहीवर व इंग्रजी हुकूमशाहीवर केसरींतून टिळकांपेक्षांहि कठोरपणे कोरडे ओढावयास यांनी कमी केलें नाहीं. टीकाकारांस कोटीने कोटी लढवून, शब्दास शब्द देऊन, कल्पनेस कल्पना देऊन इतका मार्मिक प्रहार ते करीत असत कीं प्रतिपक्षी ची ची करीतच सुटावयाचा. लेखनांत व वक्तृत्वांत जिव्हाळाहि असे. प्रसंगी ते करुणरस इतका उत्तम वठवीत कीं, वाचक वा श्रोतृवर्ग ह्यांना गहिवर येत असे व हृदय हालून जात असे.

कै. तात्यासाहेब केळकर-विविध दर्शन



# देशभक्त तात्यासाहेब केळकर यांचें देहावसान

**( कुलाबा समाचार, पेण-ठाणें ता. १८ ऑक्टोबर १९४७ )**

लोकमान्य टिळकांचे एकनिष्ठ अनुयायी व साहित्यसम्राट दे. भ. नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांचे पुणें येथें ता. १४-१०-४७ ला पहाटे हृदयक्रिया बंद पडून एकाएकीं देहावसान झालें हें वृत्त नमूद करण्यास आम्हांस अत्यंत दुःख होतें. कै. तात्यासाहेबांचा जीवनपट इतक्या विविध रंगांनीं खुललेला होता कीं, त्यांचा विचार करूं लागल्यास महाराष्ट्रांतच काय पण अखिल हिंदुस्थानांत त्यांच्या जोडीचा पुरुष सांपडणें कठीण आहे असें म्हणणें अतिशयोक्तीचें खास होणार नाहीं. बुद्धिस्वातंत्र्य, सात्त्विकपणा व निःस्वार्थी राजकारण यांचा कै. तात्यासाहेब केळकर हे मूर्तिमंत आदर्शच होते.

तात्यासाहेबांचा जन्म मिरज संस्थानांतील मोडनिंब येथें दि. २४-८—१८७२ या दिवशीं झाला. वयाच्या २२ व्या वर्षी एलएल. बी. ची परीक्षा पास झाल्यानंतर १-२ वर्षे सातारा येथें वकिली करून १८९६ सालीं त्यांनीं आपणांस राष्ट्रकार्यास वाहून घेतलें. या वर्षी केसरी-मराठा संस्थेंत प्रविष्ट झाल्यापासून सतत ४० वर्षें त्यांचा या संस्थेशीं कायम संबंध जडला. १८९७ सालापासून १९३२ सालापर्यंत, मधला ४-५ वर्षांचा काळ सोडल्यास, ते सतत ' केसरी ' चे संपादक होते. या काळांत त्यांनीं ' केसरी ' पत्राचा भारदस्तपणा पुष्कळच वाढविला व त्यांत अनेक सुधारणाहि केल्या. तात्यासाहेबांची लेखणी इतकी प्रभावी ठरली कीं अखिल महाराष्ट्रावर त्यांनीं आपल्या राजकीय मतप्रणालीचा कायमचा ठसा उठविला व ' केसरीं ' तून व्यक्त होणारे विचार हेच महाराष्ट्राचे एकमुखी विचार अशी परिस्थिती झाली. त्यांच्या लिखाणांत विद्वत्ता, मार्मिक विवेचन व विनोद हे प्रकर्षानें दिसून येत असत. प्रतिपक्षावर आघात करतांनाहि कै. तात्यासाहेबांची लेखणी

तो इतक्या सफाईनें करीत असे कीं त्यामुळें प्रतिपक्षी घायाळ न होतां डाव मात्र त्याच्यावर बरोबर उलटत असे. १९२० सालीं गांधीयुगास सुरुवात झाली. तेव्हांपासून कॉंग्रेसशी कांहीं बाबतींत कै. तात्यासाहेबांचा विरोध आला. अशा वेळींहि त्यांनीं आपली तत्त्वनिष्ठा न सोडतां आपल्या बुद्धिस्वातंत्र्याची चमक दाखविली व त्यामुळें तर त्यांनीं अखिल भारतीय कीर्ति संपादन केली. अशा रीतीनें वृत्तपत्र संपादक या नात्यानें त्यांनीं समाजाला योग्य मार्गदर्शन करण्याची आपली जबाबदारी उत्कृष्टपणें पार पाडली.

लो. टिळकांचे निधनानंतर हिंदुस्थानांतील राजकारण गांधीवाद्यांच्या हातीं गेलें. १९२० सालीं कलकत्ता येथें झालेल्या कॉंग्रेसच्या जादा अधिवेशनांत महाराष्ट्रानें असहकारितेच्या ठरावास कॉंग्रेसनिष्ठेमुळेंच मान्यता दिली होती. परंतु पुढें थोड्याच काळांत वसई, पेण येथें भरलेल्या परिषदांतून महाराष्ट्राचा सदर ठरावास विरोध स्पष्टपणें दिसूं लागला. या संघर्षांतूनच जो स्वराज्य पक्ष निर्माण झाला त्यांत कै. तात्यासाहेबांनीं बराच पुढाकार घेतलेला होता. 'एक वर्षांत स्वराज्य' ह्या गांधी–घोषणेची निष्फळता व बारडोलीचा फुसका बार यामुळें असहकारितेची अयशस्विता उठावदारपणें जनतेला दिसूं लागली. पुढें १९२६ सालीं झालेल्या मध्यवर्ति विधिमंडळाच्या निवडणुकींत प्रतिसहकार पक्षातर्फे कै. तात्यासाहेब हे इतर पक्षांच्या विरोधास यशस्वीपणें तोंड देऊन पहिल्या क्रमांकानें निवडून आले व महाराष्ट्रानें आपला त्यांचेवरील विश्वास व्यक्त केला. मध्यवर्ति विविधमंडळांतील जनहिताचें कार्य निरलसपणें करून १९३०सालीं कायदेभंगाची जी चळवळ सुरू झाली तींत कै. तात्यासाहेबांनीं उडी घेतली इतकेंच नव्हे, तर महाराष्ट्रांतील मीठ सत्याग्रहाची योजना सापेक्षानें आंखून ती कार्यवाहींत आणली व "कर्मयोगांत क्रमप्राप्त ठरेल त्या तुरुंगवासाला" आपण भिणार नाहीं ही आपली उक्ती खरी करून दाखविली.

याच वेळीं १९३० सालीं महाराष्ट्र सत्याग्रह मंडळातर्फे मिठाचा कायदेभंग करण्याकरितां कुलाबा जिल्हा केंद्र पेण येथें उघडण्यांत येऊन त्याची

सर्व व्यवस्था श्री. गोसावी वकील व रामभाऊ मंडलीक यांच्या सर्वाधिकारी कमिटीकडे सोपविण्यांत आली. मिठाच्या कायदेभंगाकरितां श्री. रामभाऊ मंडलीक यांनीं कै. तात्यासाहेबांस निमंत्रण पाठविलें. त्याचा त्यांनीं स्वीकार केला व पेणेस येऊन त्यांचे दि. १९-४-३० ला रात्रीं हनुमान व्यायाम शाळेचे पटांगणावर दे. भ. रामभाऊ मंडलीक यांच्या अध्यक्षतेखालीं हजारो श्रोत्यांसमोर कायदेभंगाला उत्तेजनकारक भाषण झालें. दुसरे दिवशीं रामभाऊ मंडलीक व गजाननराव केतकर यांना अटक करण्यांत आली. नंतर दुपारीं प्रचंड मिरवणूक निघून ती कापूरबागेंत गेल्यावर कै. तात्यासाहेबांचे हस्तें हजारों लोकांसमक्ष झेंडावंदन झालें व त्यांनीं मिठाचा सत्याग्रह केला. तो प्रसंग पेणकर कधींहि विसरणार नाहींत. पेणहून गेल्यानंतर पुण्यासहि शिवाजी मंदिरांत त्यांनीं मिठाचा सत्याग्रह केला व टिळक मंदिरांत आक्षिप्त वाङ्मय वाचनाचाहि सत्याग्रह केला. पुन्हां १९३२ सालीं कायदेभंगाची चळवळ सुरू झाली तेव्हां मात्र कै. तात्यासाहेबांनीं या चळवळींत बुद्धीपुरस्सर भाग घेतला नाहीं व ही कायदेभंगाची चळवळ आतां थांबवावी असा आग्रह धरला. हा त्यांचा आग्रह किती बरोबर होता हें १९३३ सालीं त्यावेळचे काँग्रेसचे हंगामी सर्वाधिकारी लो. ना. बापूजी अणे यांनीं पुणें येथें जी मोठी परिषद भरविली यावरून दिसून येतें. या परिषदेंत सामुदायिक कायदेभंग थांबवून व्यक्तिशः करावा असेंच ठरविण्यांत आलें. अशा रीतीनें अत्यंत धीरोदात्त वृत्तीनें प्रसंगीं एकाकी असतांनाहि त्यांनीं शेवटच्या घटकेपर्यंत लो. टिळकांचें राजकारण यशस्वी करण्यास लो. स्व. पक्ष व हिंदुसभेच्या द्वारा अविश्रांत श्रम केले. हें करीत असतांना त्यांना जें प्रायश्चित्त भोगावें लागलें त्याचीहि त्यांनीं पर्वा केली नाहीं.

साहित्य, इतिहास, तत्त्वज्ञान इत्यादि क्षेत्रांतून कै. तात्यासाहेबांच्या लेखणीनें स्वैरसंचार केला आहे. उद्योगधंदे, शिक्षण, विमाव्यवसाय इत्यादि राष्ट्रपोषक कार्यांशींहि त्यांचा घनिष्ट संबंध होता. ते क्रियावान् समाजसुधारक होते. गेल्या ५० वर्षांत महाराष्ट्राच्या जीवनांतील प्रत्येक क्षेत्रांत कै. तात्यासाहेबांचें कर्तृत्व दिसून येतें. अशा तऱ्हेचा अष्टपैलू हिरा हरपल्यामुळें

महाराष्ट्राचें अपरिमित नुकसान झालें आहे यांत संशय नाहीं. राजकारणांतील ज्या एकनिष्ठ तपस्येनें कै. तात्यासाहेब केळकर यांनीं लो. टिळकांचें ऋण फेडलें त्याच तपस्येनें कै. तात्यासाहेबांचें ऋण फेडण्याची जबाबदारी महाराष्ट्रावर आहे व ती तो पार पाडील असा आम्हांस भरंवसा वाटतो.

---

# साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकर

## ( 'बलवंत' रत्नागिरी, ता. २२ ऑक्टोबर १९४७ )

देशभक्त नरसिंह चिंतामण अथवा तात्यासाहेब केळकर यांच्या आकस्मिक निधनाच्या वार्तेनें सारा महाराष्ट्र शोकमग्न झाला आहे. ता. १४ ऑक्टोबर रोजीं पहाटे पांच सहाचे दरम्यान ते झोंपेंत असतां, यमदूतांनीं चोरपावलांनीं येऊन त्यांचे प्राण हरण करून नेले. तात्यासाहेब नित्याप्रमाणें सर्व व्यवसाय करीत असतां, आपलें आवडतें लेखनकार्य अखंडित चालवीत असतां, त्यांचें हिंडणें फिरणें, व्याख्यानें देणें, मुलाखती देणें, हे सर्व व्यवसाय वयाच्या ७६ व्या वर्षीं सुद्धां अप्रतिबंधरीतीनें चालले असतां, ऐन भरांत आलेला डाव टाकून नामांकित खेळगडी निघून गेला, तर त्याच्या खेळगड्यांचा जो विरस होईल, तोंच आज महाराष्ट्राचाही झाला आहे.

खरें पाहिलें तर श्री. तात्यासाहेब केळकर यांना दीर्घायुष्य लाभलें. त्यांचे आयुष्यांतील सर्व उद्योग पुरे झाले होते. राजकारणाच्या धकाधकीच्या खेळांतूनच नव्हे, तर इतर अनुषंगिक कार्यांतून ते निवृत्त झाले होते, 'मन शांत आहे, हात जोडले आहेत, आणि ( ईश्वराच्या ) हांकेची वाट पहात आहें' असे पूर्णकाम झालेल्या विरागी तपस्वी मनुष्याप्रमाणें अत्यंत समाधानाचे उद्‌गार त्यांनीं आपल्या आत्मचरित्राच्या प्रस्तावनेतच काढिले होते. हें सर्व खरें, तरीही घरांतील प्रपंचांत प्रत्यक्ष भाग न घेणारा प्रेमळ पितामह केवळ आपल्या ममतेच्या दृष्टीनें व आपलेपणाच्या शब्दांनीं सर्वांना प्रिय झालेला असतो, तसेच तात्यासाहेब हे अखिल महाराष्ट्राला प्रिय झाले

होते. हातांत प्रत्यक्ष शस्त्र न धरतां युक्तीच्या चार गोष्टी सांगणारा हितवादी सल्लागार हा कार्यकर्त्या मनुष्याला मोठाच आधार वाटत असतो. प्रेमळ पितामह, हितवादी सल्लागार, गोष्टी सांगून रंजविणारा मित्र, अशा अनेक नात्यांनीं तात्या महाराष्ट्राच्या कार्यकर्त्या पिढीला पूज्य वाटत असत. ते अचानक, अनपेक्षित रीतीनें निघून गेल्यामुळें, महाराष्ट्राला बसलेला दुःखाचा धक्का अधिकच दुःसह झाला आहे.

* * *

तात्यासाहेबांचा जन्म सोलापूर जिल्ह्यांत मोडनिंब गांवीं झाला. त्यांचें शिक्षण कांहीं कोल्हापुरांत व कांहीं पुण्यांत झालें. कायद्याचें शिक्षण मुंबईंत झालें. त्यांचा मूळ जिल्हा रत्नागिरी, व मूळ वडिलार्जित घरवाडी वगैरे मु. वानिवडें येथें देवगड तालुक्यांत होती. १९०६।७ सालापर्यंत त्यांचा कोंकणाशीं कांहींही संबंध आला नव्हता. विद्यार्थिदशेंतील त्यांचे सहाध्यायी कै. बाबासाहेब नानल यांच्या आग्रहानें १९०७ साली संगमेश्वर तालुका राजकीय सभेचे अध्यक्ष म्हणून ते इकडे आले. हा रत्नागिरी जिल्ह्याशीं त्यांचा पहिला परिचय म्हणण्यास हरकत नाहीं. १९२० साली रत्नागिरी जिल्हा सभेचे ते अध्यक्ष म्हणून आले होते. त्यानंतर कोंकणाशीं–विशेषतः रत्नागिरी जिल्ह्याशीं त्यांचा परिचय इतका वाढला व आपुलकी एवढी उत्पन्न झाली कीं, मी कोंकणचा आहें असें ते अभिमानानें म्हणत. वाघोटण येथील वैद्य मराठे यांनीं खरेदी केलेल्या रुग्णोपचार मंदिरांत ते कांहीं वर्षें नियमानें रहात, व पुढें तर देवगडनजीक जामसंडें गांवीं त्यांनीं उन्हाळ्यांत येऊन राहण्याकरितां घरवाडीही खरेदी केली होती. पुणें येथें सदाशिव पेठेतील आपल्या घराच्या आसपास त्यांनीं केळी, पोंफळी, फणस, अळू इत्यादि झाडें व भाजीपाला लावून आपल्या घरापुरता कोंकणाचा आभास उत्पन्न केला होता, इतकें कोंकणावर त्यांचें प्रेम होतें! तथापि त्यांचें कार्यक्षेत्र व कुटुंबपरिवार पुण्याला असल्यामुळें कोंकणांत कायम येऊन राहणें त्यांना शक्य झालें नाहीं.

* * *

तात्यासाहेब विद्यार्थीदशेंत असल्यापासूनच अत्यंत, मार्मिक रसिक, व साहित्य संगीत प्रेमी होते. नाटकें पहाणें, गायन ऐकणें या त्यांच्या आवडींतूनच नाटकें रचण्याच्या स्फूर्तींचा उगम झाला. वृत्तपत्रीय व्यवसाय करण्याचा त्यांचा प्रारंभीं संकल्प नव्हता, हें खरें असलें तरी वृत्तपत्र संपादकाला लागणारी विद्वत्ता, बहुश्रुतता, मार्मिकता, चौकसपणा, चतुरस्रपणा हे गुण त्यांच्या ठिकाणीं कांहीं निसर्गदत्त व कांहीं अभ्यासानें साध्य केलेले असल्यामुळें १८९६ सालीं लोकमान्यांचें आवाहन येतांच ते आनंदानें 'केसरी–मराठा' पत्रांच्या संपादक शाखेंत समाविष्ट झाले. टिळकांशीं व केसरीशीं संबंध ठेवणें हें आयुष्यांत हालअपेष्टा व दारिद्र्य यांच्याशीं संबंध जोडण्यासारखें होतें, हें माहींत असूनही त्यांनीं हें दिव्य पत्करलें. आयुष्याची पहिलीं पंचवीस वर्षें–टिळकांच्या मृत्यूपर्यंत–तात्यासाहेबांचें जीवन आर्थिक परिस्थितीशीं झगडण्यांतच गेलें. पण दुसऱ्या बाजूनें असामान्य लोकप्रियता, प्रसिद्धी व पुढारी होण्याची अमोल संधि–जी त्यांच्या सहाध्यायांपैकीं इतरांना मिळूं शकली नाहीं–ती त्यांना मिळाली.

* * *

तात्यासाहेब हे प्रकृतीनें सौम्य, तार्किक व न्यायप्रिय होते. त्यांचा ओढा क्रांतिवादी राजकारणाकडे नसून उत्क्रांतिवादी सनदशीर राजकारणाकडे होता. प्रतिपक्षावर हल्ला करण्याची टिळकांची त्वेषयुक्त वीरश्रीची पद्धत त्यांना आवडत नसे. न्यायमूर्ति रानडे व नामदार गोखले यांच्याविषयीं तत्कालीन टिळक पक्षीयांना वाटत नसे असा नितांत आदर केळकरांना वाटे. टिळकांच्या उग्र चळवळीच्या काळांत तात्यासाहेबांनीं बहुतेक लिखाण टिळकांचें इंग्रजी साप्ताहिक 'मराठा' यांतच केलें. अर्थात् टिळकांनींच त्या काळांत (१९०८ पर्यंत) स्वतः लेख लिहून जनतेचें मार्गदर्शन केलें. १९०८ ते १४ पर्यंत टिळकांच्या गैरहजेरींत सरकारी दडपशाहीला बळी न पडतां प्रेसअॅक्टाचा वरवंटा चुकवून केसरी जगविणें व चालविणें हें कठीण काम कोठ्या कौशल्यानें व नेटानें तात्यासाहेबांनीं केलें.

१९१४ मध्यें लोकमान्य टिळक कारावासांतून मुक्त होऊन परत आल्या-

नंतर अचेतन झालेल्या हिंदुस्थानच्या देहांत हळूंहळूं चैतन्य संचारलें. आणि अल्पावधींतच टिळकांच्या अलौकिक धडाडीनें सारा देश हालून गेला. टिळकांची लोकप्रियता कळसाला पोचली. प्रांतिक पुढारीपणांतून ते देशाच्या पुढारीपणावर आरूढ झाले. अर्थात् त्यांच्या सर्व सहाय्यकांनाही त्या त्या मानानें महत्व प्राप्त झालें. १९१६ ते २० या काळांत तात्यासाहेबांनीं 'स्वराज्याची कैफियत' हे इंग्रजी पुस्तक व 'मराठे व इंग्रज' हें नामांकित मराठी पुस्तक लिहिले. १९१९ सालीं मॉंटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा आल्या, व तदनुसार १९२०-२१ मध्यें नवीन निवडणुकी होण्याचें ठरलें. लोकमान्य टिळक जगते तर मुंबई प्रांताच्या सरकारांत तात्यासाहेब केळकरांचा मंत्री म्हणून प्रवेश झालेला दिसला असता.

लोकमान्य १९२० सालीं दिवंगत झाल्यावर महाराष्ट्राचे पोरकें झालेलें पुढारीपण 'केसरी'च्या संपादकत्वाबरोबरच श्री. तात्यासाहेबांकडे आलें. देशांतील राजकारणाच्या क्षितिजावर महात्मा गांधी या नवीन तेजस्वी ताऱ्याचा उदय झाला. सदनशीर राजकारण, कौन्सिल निवडणुकी यांचे मोर्चे ढांसळून पडले. शाळा कॉलेज व कोर्टें कौन्सिलें यावरील बहिष्कार, परदेशी कापडाची होळी, राष्ट्रीय विद्यालयांची स्थापना, इत्यादि सदनशीर राजकारणाशीं सर्वस्वी विसंगत अशीं चळवळीचीं अंगे-उपांगे सार्वजनिक जीवनांत प्रचंड आंदोलने घडवून आणूं लागलीं. तात्यासाहेबांच्या प्रकृतीला ही प्रचंड चळवळ नवीन होती, न मानवणारी व न झेपणारी होती आणि म्हणून प्रथम कॉंग्रेसमध्यें विरोध करून, बहुमताला मान देऊन ते चळवळींत सामील झाले तरीही ते गांधींजींच्या एकंदर चळवळीशीं तद्रूप अगर समरस कधींच झाले नाहींत.

* * * *

१९२१ ते १९३० पर्यंत महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचीं सूत्रें त्यांच्याच हातीं होतीं. देशाचें क्रांतिप्रवण राजकारण अधिकाधिक उग्र होत होतें. युवकांच्या चळवळी, स्वातंत्र्याचीं मागणी, सत्याग्रहाची चळवळ, फिरून तुरुंगवास व हालअपेष्टा या सर्व गोष्टी तात्विक रीतीनें तात्यासाहेब

समजूं शकत होते व त्यांना पाठिंबाही देत होते. परंतु त्यांचा निसर्ग-स्वभावच सौम्य, शांत, थंड असल्यामुळें या नवीन प्रवाहांतून ते चटकन् बाजूला झाले व १९३१-३२ नंतर सर्वस्वी अलिप्त झाले.

* * * *

महाराष्ट्रीय जनतेनें केळकरांकडे टिळकांच्याच भावनेनें १९२० नंतर एकदोन वर्षें पाहिलें, हा लोकांचाही दोष नव्हे व केळकरांचाही दोष नव्हे. चळवळीची उठावणीं करावी, जनतेचे रान उठवावें, केसरींतून प्रचंड लोकजागृतीचे लेख लिहावे, असा टिळकांचा क्रम असे. कधीं टिळकांची चळवळ अगोदर होई, नंतर लेख केसरींत येई, तर कधीं चळवळीचें स्वरूप आधीं सांगणारा लेख प्रसिद्ध होई व नंतर तशी चळवळ सुरू होई. नवीन चळवळ सुरूं करणें हे तात्यासाहेबांचें कार्य नसल्यामुळें, देशांत गांधीजींसारख्या इतर पुढाऱ्यांनीं सुरूं केलेल्या चळवळीचें स्पष्टीकरण करणें, तिला पाठिंबा देणें, लोकमत त्या चळवळीस अनुकूल करून संघटित करणें, हेंच त्यांना करावें लागलें. व क्रांतिवादी चळवळ त्यांना मानवत नसल्यामुळें देशाच्या उदयोन्मुख शक्तीचे यथार्थ समीक्षण त्यांच्या-कडून होऊं शकलें नाहीं.

* * * * *

पण जो गुण आपल्यामध्यें नाहीं तो आहे असें भासविण्याइतका अहंकार अगर मुर्दाडपणा तात्यासाहेबांच्या ठिकाणीं नव्हता. मला तुम्हीं टिळकांच्या ठिकाणीं समजा, असा दुरूनही आग्रह त्यांनीं शब्दानें अगर वर्तनानें दर्शविला नाहीं. आपल्या बुद्धीचा पल्ला व मर्यादा दोन्हीं ओळखून आपल्या मनाला पटेल एवढाच सल्ला ते देत असत. पण लोकांनीं टिळकांच्या ठिकाणीं त्यांना मानून ( आणि हें अपरिहार्य होतें ) त्यांच्याकडून केलेल्या अपेक्षा सत्यसृष्टींत न उतरल्यामुळें त्यांच्यावर भलभलतें दोषारोप केले. १९२४ ते १९३७ या काळांत तात्यासाहेबांच्या मनाची फार ओढाताण झाली. पुढारीपण धरवतही नाहीं व सोडवतही नाहीं अशी अत्यंत कठीण स्थिति त्यांना सहन करावी लागली. अर्थात् टिळकांच्या मृत्युसमयीं

केळकर लोकप्रियतेच्या व मान्यतेच्या शिखरावर होते, ते तेथें राहूं शकले नाहींत. जनतेच्या कडक टीकेचाही अनुभव त्यांना घ्यावा लागला.

* * *

असें असतांहीं केळकर आज निघून गेल्यानंतर सबंध महाराष्ट्र पक्षभेद, मतभेद व पूर्वीचीं भांडणें विसरून त्यांच्यासाठीं रडला, हळहळला यांतील रहस्य काय ? राजकारणाच्या धूमधडाक्यांत, टिळकांच्या निधनोत्तर काळांत, तात्यासाहेबांनीं लोकांचे हल्ले करून घेतले व लोकांवर हल्ले चढविले. १९२० सालापर्यंत मृदु, मधुर, प्रसन्न चालणारी त्यांची लेखणी बोंचक लिहून मधून मधून दुखवूंही लागली. तरीही तात्यांनीं अंतःकरणाचा गोडवा सोडला नाहीं, मनाचा प्रेमळपणा पारखा होऊं दिला नाहीं. तरुणांचे विचार पटत नसतांही त्यांना ते जवळ करीत. आस्थेनें विचारपूस करीत, मदत करीत. महात्मा गांधींवर प्रसंगविशेषीं त्यांनीं कटु वाटणारे हल्ले केले तथापि एकंदरींत 'केसरी' चा दर्जा अत्युच्च राखला.; वृत्तपत्रांत अग्रेसरत्व जसें टिळकांच्या अलौकिक नेतृत्वामुळें केसरीला लाभलें तसें तें केळकरांच्या कुशल लेखनामुळेंही मिळालें हें लक्षांत ठेविलें पाहिजे. 'उदारमतवादी न्यायप्रिय सद्गृहस्थ' असें तात्यासाहेबांचें यथार्थ वर्णन करतां येईल.

* * *

या न्यायप्रियतेमुळें व खऱ्या देशप्रेमामुळेंच त्यांनीं १९३७ सालीं कॉंग्रेस-मंत्रिमंडळ अधिकारारूढ झालें तेव्हां नवीन पंतप्रधान नामदार बाळासाहेब खेर यांचें प्रेमभरानें अभिनंदन करून 'त्वं बाल एवासि नवंच राज्यम्।' या भवभूति कवीच्या शब्दांनीं त्यांना राज्यकारभार कुशलतेनें हांकण्याची प्रेमळ सूचना दिली. या वर्षी ता. १५ ऑगस्टला झालेल्या स्वातंत्र्योत्सवाचे प्रसंगीं हा स्वातंत्र्योत्सव पाहण्यास मी जगलों, हें माझें केवढें भाग्य !' असे धन्यतेचे उद्गार त्यांच्या तोंडून निघाले ! कॉंग्रेस हीच देशाची प्रतिनिधिभूत राजकीय संस्था हें सत्य त्यांनीं कधींही नाकारलें नाहीं. आणि या गुणग्राहकते-मुळें व न्यायप्रियतेमुळेंच मतभेदांच्या वावटळींतूनही केळकरांच्या मोठे-पणाचा व त्यांच्या विषयींच्या आदराचा वृक्ष मूळ धरून राहिला.

* * *

महाराष्ट्रसरस्वतीची केळकरांनीं केलेली सेवा तर अद्वितीय आहे. मराठी भाषेच्या देहाला अनेक सुंदर ग्रंथरूपी अलंकारांची जोड देऊन त्यांनीं महाराष्ट्र शारदेची अजरामर सेवा केली आहे. जेथें जेथें व जोंपर्यंत महाराष्ट्रभाषा वाचली जाईल, तेथें तेथें व तेथपर्यंत केळकरांचे अमर शब्द मराठी वाचकांना आनंद देत राहतील.

* * *

राजकारणांत अत्यंत प्रामाणिकपणानें व निरिच्छपणानें वागल्यामुळें, केळकरांनीं कोणताही स्वार्थ साधला नाहीं. अनेक स्वार्थसाधु लोकांनीं आपल्या मोठेपणाचा व प्रसिद्धीचा उपयोग सरकारी गोटांत शिरून एकादी मोठी जागा किंवा दिवाणगिरी पटकावण्याकडे केलेला पाहण्यांत येतो. केळकर या मोहापासून सर्वस्वी अलिप्त राहिले. अखंड वाचन, अखंड लेखन, विचारचिंतन, व मार्गदर्शन हीं कामें एकाद्या वानप्रस्थ योग्याप्रमाणें त्यांनीं अहर्निश चालू ठेविलीं होतीं. त्यांनीं गांधींजींना विरोध केला, पण त्यांची मानसिक भूमिका न्यायप्रिय व सत्यप्रिय होती, म्हणून राजकारण वगळलें तर ते गांधीजींना जवळचेच आहेत पण राजकारण हें अत्यंत निराळ्या व्यक्तींनाही जोडतें व समानशील व्यक्तींनाही तोडतें. तशी त्यांची राजकारणामुळें गांधींजींबरोबर फाटाफूट झाली.

* * *

टिळकांच्या प्रभावळींतील एक अत्यंत तेजस्वी तारा म्हणून केळकर चमकले; त्यांनीं आपल्या बुद्धिमत्तेनें, विनोदानें, सभ्यपणानें, भारदस्तपणानें मराठी लेखनपद्धतींत एक प्रकारचा चटकदारपणा निर्माण केला. व प्रो. बनहट्टी, माडखोलकर, माटे वगैरे पुढील पिढीच्या लेखकांवर आपल्या शैलीची छाप बसविली. प्रस्तुत लेखकही केळकरांना साहित्य दृष्ट्या गुरुस्थानीं मानतो, व केळकरांनीं घालून दिलेला कित्ता मराठी वृत्तपत्रकार गिरवितील तर मराठी वाचकवर्गाची अभिरुचिही अधिक शुद्ध व निरपवाद होईल. केळकरांनीं केलेली देशसेवा व वाङ्मयसेवा यांना महाराष्ट्राच्या इतिहासांत मानाचें स्थान आहे; व तें भावी पिढ्यांना कार्याची स्फूर्ति देत राहील. महाराष्ट्राच्या या साहित्यसम्राटाला आम्ही ही वाङ्मय श्रद्धांजलि भक्तिभावानें अर्पण करितों.

# महाराष्ट्राचे महापुरुष

## ( वैनतेय, सावंतवाडी. ता. ९ नोव्हेंबर १९४७ )

गुरुवर्य तात्यासाहेब केळकर यांचें ता. १४ ऑक्टोबर रोजीं झालेलें निर्याण इतकें अनपेक्षित होतें कीं, त्यामुळें साऱ्या देशाला धक्का बसला. मग गेलीं पंचवीस वर्षें त्यांच्या वात्सल्ययुक्त प्रेमाच्या शीतल छायेचा लाभ घडलेल्या माझ्यासारख्यानें त्यांच्या निधन वार्तेची तार हातीं पडतांच हतबुद्ध होऊन जावें यांत नवल काय ? ता. १२ रोजीं संध्याकाळीं धोंडूमामा साठ्यांचा सत्कार–समारंभ तात्यासाहेबांच्या अध्यक्षतेखालीं झाला. ता. १३ रोजीं रात्रीं झोपेंपर्यंत त्यांनीं लेखन केलें व नंतर झोंपले ते पुन्हां उठलेच नाहींत. पहाटे साडेचार वाजतां त्यांनीं आपल्या हातानें अंगावर पांघरूण ओढल्याचें घरच्या मंडळीनें पाहिलें होतें आणि सकाळीं चहासाठीं उठवायला जातात तर तात्यासाहेबांचा पार्थिव देह तेवढा उरला आहे ! इतकें 'विनायासेन मरणम्' लाभण्याचें भाग्य फारच थोडयांच्या वाट्यांस येतें. याचें मुख्य कारण त्यांची अत्यंत समाधानवृत्ति हें होय. पंधरा वर्षांपूर्वीं त्यांचा षष्ठ्यब्दपूर्तिसमारंभ महाराष्ट्रानें असामान्य उत्साहानें साजरा केला. त्या प्रसंगीं या समारंभाला टाईपरायटरच्या घंटेची उपमा देऊन त्यांनीं लौकिक कार्याचा पसारा आवरण्यास सुरवात केली. आठ वर्षांपूर्वीं आत्मचरित्राच्या प्रस्तावनेंत 'मन शांत आहे, हात जोडले आहेत, हांकेची वाट पहात आहे.' असे उद्गार काढले. अशा प्रकारें ऐहिक संसारांतून त्यांनीं आपलें मन निवृत्त करीत आणले होते आणि त्याचबरोबर खऱ्या कर्मयोग्याला साजेशा रीतीनें वाङ्मयसेवेचें आणि समाजसेवेचें कार्य अविरत चालूंच ठेवलें होतें. सोमवारीं रात्रीं चिरनिद्रा घेण्यासाठीं बिछान्यावर पडण्यापूर्वीं त्यांनीं केलेलें अखेरचें लेखनही त्यांच्या शांत मनःस्थितीवर प्रकाश पाडणारें होतें. या अखेरच्या अभंगाचा मथितार्थ असा कीं, 'मी मृत्यूस भीत नाहीं, उलट त्याचें स्वागतच करतों. पंचमहाभूतांचें बनलेले हें शरीर त्यांच्या स्वाधीन करणें हाच त्याचें अनणी

होण्याचा उत्तम मार्ग होय' तात्यासाहेब शांत चित्तानें सर्वांना सोडून गेले पण साऱ्यांचीं अंतःकरणें भावविकल झालीं. तात्यासाहेब समाजाचे, देशाचे आणि अखेर पंचमहाभूतांचेही अनृणी झाले, पण मागें राहिलेल्या आम्हां सर्वांवर त्यांच्या ऋणाचा केवढा तरी बोजा आहे.

कै. तात्यासाहेबांनी गेल्या अर्धशतकांत महाराष्ट्राचें जीवन कितीतरी समृद्ध केलें आहे. विविध क्षेत्रांतील त्यांची महनीय कामगिरी लक्षांत घेणाऱ्याच्या तोंडून, 'तेन मण्डितः संसारः' असे प्रसंसोद्‌गार निघाल्यावांचून राहणार नाहींत. 'श्री. केळकर म्हणजे सत्प्रवृत्तीचा ठेवा; प्रसन्नतेची प्रतिमा, व्यवहारज्ञानाची वैकुंठ पेठ, गोडवेपणाचें अच्छोद सरोवर, मधुरवाणीचा संगौघ, राजकीय चातुर्याची पेटी, उद्यमशीलतेचा महामेरु, समयज्ञत्तेची मूर्ति, लोकसेवेचा नंदादीप, मनःसमतेचे माहेर, सहिष्णुतेचे आगर, खेळकर व विनोदी संभाषणाचें उद्यान, विवेकशीलतेचा सागर' हें पंचवीस वर्षें त्यांच्या सान्निध्यांत असलेले श्री. दि. वा. दिवेकर यांनीं केलेले त्यांचें वर्णन किंवा देशांतले थोर पुढारी आणि त्यांचें सहकारी यांनीं त्यांच्याविषयीं काढलेले उद्‌गार यांत अर्थवादाचा अल्पसाही भाग नाहीं. यथार्थ वर्णन करायला शब्दभांडार तोकडें वाटावें अशीच तात्यासाहेबांची थोरवी होती. सर्वगामी बुद्धीमुळें कै. न्यायमूर्ति रानडे यांना 'सर्वज्ञः स हि माधवः' असें म्हणत. कै. तात्यासाहेबांच्या बुद्धीमत्तेचा सर्वंकषपणा त्यांच्याहून अधिक आणि कार्यविस्तार तर कितीतरी पटींनीं जास्त अशी वस्तुस्थिति आहे. साहित्य, इतिहास, राजकारण, अर्थशास्त्र, संगीत, काव्य इत्यादि विविध क्षेत्रांत तात्यासाहेबांनीं संचार केला असून त्या त्या क्षेत्रांत कमीं अधिक प्रमाणांत मौलिक भर टाकली आहे.

तात्यासाहेब एवढे थोर असूनही आबालवृद्धांना ते निकटच वाटत. त्यांच्याविषयीं लिहितांना बोलतांना अनेकांनीं त्यांना विशाल वटवृक्षाची उपमा दिली आहे. या वटवृक्षाच्या शीतल छायेंत अनेकांना विसाव्याचे क्षण लाभले आहेत आणि त्यामुळेंच तात्यासाहेबांच्या निधनामुळें त्यांच्या औरस अपत्यांनाच नव्हे तर हजारों लोकांना आज पोरकें झाल्यासारखें वाटत आहे.

श्री. खांडेकर यांनीं त्यांची निधनवार्ता कळतांच 'आज महाराष्ट्राचें पितृ-छत्र हरपलें' हे काढलेले उद्गार किती यथार्थ आहेत, याची कल्पना त्यांच्या सान्निध्यांत येण्याचें भाग्य ज्यांना लाभलें त्यांनाच येऊं शकेल.

प्रासंगिक राजकारण आणि तदनुषंगिक मतभेद हे तात्कालिक स्वरूपाचे असतात. माणसांची अशी किंमत याहून शाश्वत स्वरूपाच्या मूल्यांवरून ठरवावयाची असते. बुद्धिप्रामाण्य, मनाचा समतोलपणा, प्रति-पक्षाचेंही गुणग्रहण, सहिष्णुतावृत्ती इत्यादि गुणांनीं कै. तात्यासाहेबांनीं नाग-रिकत्वाचा थोर आदर्श निर्माण केला असून दृढव्यासंग, उद्यमशीलता आणि आमरण अभ्यासूवृत्ति यांच्या योगानें ईश्वरदत्त गुणांचा उत्कृष्ट परिपोष करून प्रयत्नानें 'नराचा नारायण' कसा होऊं शकतो हें आपल्या उदाहर-णानें उदयोन्मुख पिढीला दाखवून दिलें आहे. महाराष्ट्राच्या या महापुरुषाला आमचे शतशः प्रणाम असोत !

मे. द. शिरोडकर

---

# कै. नरसिंह चिंतामण
## तथा
# तात्यासाहेब केळकर

—( महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणें )

कविवर्य 'बी' (BEE) ह्यांना निवापाञ्जली देऊन 'पत्रिका' विराम घेते न घेते तोंच साहित्यसम्राट् तात्यासाहेब केळकर यांच्या निधनाची शोकवार्ता देण्याचा दुर्धर प्रसंग तिच्यावर ओढवला आहे. दिनांक १४ ऑक्टोबर मंगळवार उजाडण्याच्या सुमारास हा साहित्यसूर्य अस्तंगत झाला. राजकारण आणि साहित्यकारण, इतकेंच नव्हे तर समाजजीवनाच्या हरएक कार्यकारणांत तात्यासाहेब आपल्या कर्तृत्वगुणांनी तळपत होते. महाराष्ट्राला महत्पदावर ठेवण्यासाठीं ज्या धुरंधर बुद्धिसागरांनी आमरण

ठाण मांडलें होतें त्यांत तात्यासाहेबांच्या योग्यतेचा धुरीण ह्या काळांत कोणी अन्य नसल्यामुळे त्यांच्या प्रयाणानें महाराष्ट्राची अपरिमित हानि झाली आहे.

बडोदें येथें १९२१ मध्ये भरलेल्या दहाव्या म. सा. संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणांत वाङ्मय:पासून होणाऱ्या आनंदाची ' सविकल्प समाधि ' म्हणून त्यांनी केलेली मीमांसा अत्यंत संस्मरणीय ठरली, उद्बोधक ठरली. कोटिभास्कर कै. श्री. कृ. कोल्हटकर ह्यांच्या अध्यक्षतेखाली पुणें येथे भरलेल्या म. सा. संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. त्या वेळीं हे " दोन तात्या " व्यासपीठावर अग्रभागीं विराजमान झालेले पाहण्याचा सोहळा पुष्कळांना भाग्यविशेष वाटला असेल. " एखाद्या परंपरेचे, एखाद्या पीठाचे आद्य प्रवर्तक होण्याला जें अलौकिकत्व लागतें तें माझ्यांत नाही, तें कोल्हटकरांत आहे " अशा अर्थाच्या शब्दांनी त्यांनी कै. कोल्हटकरांचा त्या वेळीं जो गौरव केला तो त्यांच्या मनौदार्याचा, विनयशीलतेचा आणि अकृत्रिम मित्रप्रेमाचा निदर्शक होता.

खुद्द **परिषदेचा** प्रपंच नेटका व्हावा ह्यासाठीं त्यांनी अनेक भूमिकांनी तिची सेवा बजावली आहे. ते १९१२, १९१५ व १९१७ ह्या सालीं कार्यकारी मंडळाचे सदस्य होते. उपाध्यक्षपद १९२२ पासून १९३७ अखेर त्यांनी पांच वेळां सांभाळलें. आणि १९३७ तें १९४२ या काळांत ते परिषदेचे अध्यक्षच होते. १९४१ सालीं माधवराव पटवर्धन स्मारक मंदिराच्या कोनशिला–स्थापनेचा समारंभ त्यांच्याच हस्तें झाला होता. त्यांच्या कामगिरीबद्दल परिषदेच्या इतिहासांत असा उल्लेख आहे कीं—

" सुप्रसिद्ध साहित्यधुरीण श्री. तात्यासाहेब केळकर हे पांचसहा वर्षें म. सा. परिषदेचे अध्यक्ष निवडून आले. हीं वर्षें परिषदेस मोठ्या भरभराटीचीं गेलीं आणि परिषदेच्या स्थापनेपासून तिच्याशीं संबद्ध असलेल्या केळकरांसारख्या लोकाग्रणीस संतोषदायक झाली. तात्यासाहेबांची साहित्यिक मंडळांतील लोकप्रियता, त्यांची निरलसता आणि विद्वत्ता आणि कार्यपोषक स्वभाव यांच्या योगें परिषदेच्या कार्यकर्त्यांस त्यांचा केवढा आधार वाटत असेल याची सहज कल्पना येईल. त्यांच्या नुसत्या नांवावरहि ही कार्यकर्ती मंडळी

अनेक उपक्रम हातीं घेऊन तडीस नेण्यास कंबर बांधीत. परिषदेच्या कार्यकर्त्यांच्या हाकेला तात्यासाहेबांनी ‘ओ’ दिली नाही असें घडलेंच नाही.”

हा आधार आज नाहीसा झाला असें, परिषदेप्रमाणें, शोकमूढ झालेला महाराष्ट्र—कोणत्याहि क्षेत्रांतला महाराष्ट्रीय—म्हणेल आणि हळहळतांना वरील उक्तीचाच अनुवाद करील.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांति देवो.

—संपादक

---

# टिळकांचे स्वयंप्रज्ञ शिष्योत्तम

## ( केसरी, पुणें. ता. १५ ऑक्टोबर १९४७ )

“ जनता त्रिगुणात्मक आहे ” हें महातत्त्व आणि ‘ अनाचारो हि मालिन्यं अत्याचारस्तु मूर्खता ’ हें महासूत्र लक्षांत ठेवून टिळक सर्वव्यापक व सर्वकल्प असा पाया रचीत. यामुळें उभयपक्षी उलटसुलट असे आरोप त्यांच्यावर येत. पण हें नेहमी लक्षांत ठेवावें कीं, असे आरोप घेणारा मनुष्यच मध्यबिंदूला चिकटून आहे, याचाच तो उत्कृष्ट पुरावा होय.” (न. चिं. केळकर, रत्नागिरी येथील भाषण.)

“ टिळकांपासून मी जर कांही शिकलों असेन तर त्यांची सारासार विचारपद्धति.” ( रत्नाकरमधील मुलाखत १९३२ )

महाराष्ट्रांचे पितामह पुढारी, संपादकाग्रणी, चतुरस्त्र राजकारणी, बहुविध अभ्यासी आणि साहित्यसम्राट श्री. नरसिंह चिंतामण केळकर यांच्या आकस्मिक निधनवार्तेमुळे केसरी संस्थेला, तिच्याशीं संबद्ध असलेल्या टिळकपंथाला आणि बृहन्महाराष्ट्रांतील त्यांच्या अनेक भक्तांना नि चाहत्यांना धक्का बसला असेल. या प्रसंगीं आमची मनःस्थिति काय झाली आहे तें वाचकांनी कल्प-

नेनें जाणावें; कारण तें शब्दानें पुरतेपणी सांगतां येण्यासारखें नाहीं. केसरी संस्थेचे संस्थापक लोकमान्य टिळक हे तात्त्विक दृष्ट्या खरे; पण टिळकांच्या जीवनामध्यें केसरीला संस्था हें स्वरूप प्रत्यक्ष नव्हतें; संकल्पित होतें. म्हणून या महाराष्ट्र-जीवनाशी निगडित झालेल्या आणि खोल पाळेंमुळे रुजलेल्या मूर्त स्वरूपांतील केसरी-मराठा संस्थेचे खरे विधाते कै. तात्यासाहेब केळकर हेच मानले पाहिजेत. या संस्थेचे आजचें लोभनीय स्वरूप हें केळकरांनीं तीस वर्षें या संस्थेंतून जी सर्वांगीण लोकसेवा नि वाङ्मयसेवा केली तिचें फळ होय. या संस्थेला आपल्यावरील छत्र गेलें असेंच आज वाटत आहे. राजकारण, समाजकारण, इतिहास, तत्त्वज्ञान, वाङ्मय, भाषाशास्त्र, साहित्य इ. जीवनाच्या अनेकविध अंगांमध्यें व्यासंग करून स्वतःची कांहीं तरी नवीं लेणीं किंवा मांडणी यांची भर घालण्याइतकी त्यांची असामान्य चतुरस्रता आणि निरलस उद्योगशीलता होती. टिळकांना त्यांच्यासारखे सहकारी लाभले हें त्यांचें भाग्य आणि केळकरांना टिळकांचें सान्निध्य लाभलें हें त्यांचें भाग्य; यांपैकीं कोणतें मोठें हें सांगणें कठीण. "अन्योन्यशोभाजननाद्बभूव । साधारणो भूषणभूष्यभावः" असेंच त्यांच्या आणि लो. टिळकांच्या संबंधाविषयीं म्हणतां येईल.

## महाराष्ट्राची संदर्भ गाथा

टिळक-भारताला केळकरांच्या जीवनाचें खिलपर्व जोडल्याविना तें पुरें होणार नाहीं. आणि केळकर-चरित्रग्रंथ हा टिळक जीवनाची पूर्वपीठिका मांडल्याविना अपुरा पडेल. त्यांनी बहुविध लेखन-वाचन-मार्गदर्शन व्यवसाय अगदी दि. १३ ला सायंकाळपर्यंत चालविला. महाराष्ट्राच्या आजच्या जाणत्या पिढीच्या मनोभूमिकेची मूर्ति टिळकांनीं घडविली आणि केळकरांनी कोरून सर्वांगपूर्ण केली असें सामान्यतः म्हणतां येईल.

केळकरांचा पार्थिव देह जरी आपल्यामध्ये आतां दिसणार नाही तरी यापुढें अनेक वर्षें वारंवार महाराष्ट्रांतील लोकांना केळकरांच्या निरंतर राहणाऱ्या बहुविध वाङ्मयाकडे मार्गदर्शनासाठीं वळावें लागणारच आहे. कारण

त्यांच्या राजकीय नि सार्वजनिक जीवनांत इतके नानाविध प्रसंग येऊन गेले आहेत कीं, लो. टिळकांच्या वाङ्मयाप्रमाणेंच त्यांचें वाङ्मयहि महाराष्ट्राची संदर्भ गाथा म्हणून ठरणारें आहे. १९३२ मध्यें त्यांचा ६१ वाढदिवस होऊन त्यांच्यासंबंधी "केळकर वाढदिवस मंडळा"नें सातआठशें पा. ांचा ग्रंथ त्यावेळीं प्रसिद्ध केला. पण त्यानंतरच्या गेल्या पंधरा वर्षांतलें त्यांचें लिखाणहि इतकें विस्तृत आहे कीं पुनः तेवढा ग्रंथ काढला तरी अपुरा पडेल.

## सारासार विचाराचें जीवनसूत्र

टिळक व केळकर यांच्या व्यक्तित्वामध्यें भिन्नताहि होती; पण ती एकमेक ओळखून राहिले आणि जन्माचे निगडित झाले. टिळकांविषयीं लिहिण्या-बोलण्यांत केळकरांना जो अभिमान, आत्मीयता, व आकर्षण वाटे तें इतर कोणत्याहि विषयासंबंधीं क्वचितच वाटलें असेल; आणि त्यांच्याविषयीं बोल-तांना क्वचित् ते आपपर भाव विसरून स्वतः आपल्यासंबंधीच बोलतात कीं काय असें वाटे! असाच एक टिळकासंबंधीचा त्यांच्या भाषणांतील एक उतारा या लेखावर दिला आहे. तो खरोखर टिळकांपेक्षाहि केळकरांच्या जीवनसूत्राचा अधिक निदर्शक ठरेल. तसेंच टिळकांपासून काय घेतलें त्याचा उल्लेख केलेलें त्यांचें एक वाक्य या लेखावर दिलेलें आहे. सारासार विचार-पद्धति ही टिळकांपासून त्यांनी घेतली असें म्हणण्यापेक्षा त्यांच्यांत होती तीच टिळक-सहवासानें उजळली हेंच खरें. महाराष्ट्रांतहि विवेकशीलता राखणें हें टिळक–केळकरांनी दिलेलें केसरी संस्थेचें कार्य आता दोघेहि नसतां ज्यांना चालवावयाचें आहे त्यांना त्या अद्वितीय जोडीची स्मृति आणि पुण्याई यांचाच यापुढे अमूर्त आधार आहे.

# महाराष्ट्राचा विचारवंत नेता गेला !

लेखक :–श्री. दा. वि. गोखले, बी. ए., एल्एल्. बी- पुणें

## मृत्यूशीं हस्तांदोलन

मंगळवारीं सकाळीं तात्यासाहेब गेले हें ऐकून मला तर आश्चर्याचा धक्काच बसला; पण प्रत्यक्षपणें त्यांच्या घरीं गेल्यावर भीष्माचार्यां-प्रमाणें जणुं काय इच्छामरण आपण पत्करलें असें दर्शविणारी त्यांची तेजस्वी व नेहमीप्रमाणें किंचित् हास्य दर्शविणारी मुद्रा व पंचत्वांत मिसळलेला आत्मा पाहिला तेव्हा अंतःकरण दुःखानें भरून गेलें व त्याचे कढ डोळ्यां-वाटे येऊं लागले ! खरोखरीच तात्यासाहेब केळकर यांनीच वर्णन केलेल्या पक्षांप्रमाणे जीवनाची सायंकाळ होतांच ते मूळ निजधामास निघून गेले. नेहमीच ते विनोदाने म्हणत कीं " जीवनाच्या ' टाइपरायटर ' नें आयु-ष्याची ओळ संपत आल्याची घंटी वाजविली आहे व आपण गाठोडें बांधून हाक येतांच परमधामास जाण्यास तयार आहों. " पण रविवार ता. १२ ला श्री. धोंडूमामा साठे यांच्या सत्कार–समारंभाच्या वेळीं ज्यांनी त्यांचें सुंदर भाषण ऐकलें त्यांना ही हाक एवढ्या लवकर, त्यानंतर अवघ्या छत्तीस तासांनंतर येईल अशी शंका सुद्धां आली नव्हती.

त्या सभेच्या वेळीं ते आपण होऊन मी ज्या खुर्चीवर बसलों होतों तेथें मुद्दाम आले व कांहीं एका खासगी गोष्टीसंबंधीं त्यांनी माहिती विचा-रली. मी ती त्यांना सांगितली व त्यामुळें त्यांच्या चेहऱ्यावर समाधान उम-टलें हीच त्यांची व माझी शेवटची भेट व हेंच शेवटचें भाषण ! त्यांचा तो समाधानी चेहरा माझ्या मनःपटलावर ताजा कोरलेला आहेच. ही स्मृति माझ्या जन्मभर मला पुरेल. मरावें केव्हां व कसें हें कोणाच्याच स्वाधीन नसतें; पण तात्यासाहेबांच्या बाबतींत निराळेच घडलें खरें. श्री. तात्यासाहेब केळकर यांचे जीवित कधीहि कसलेंहि दैन्य न भोगतां गेले. संतति, संपत्ति आणि सांसारिक सुख त्यांना भरपूर मिळालें. नियमित राहणी, मनःसमाधान

आणि वृत्तीची प्रसन्नता यामुळे त्यांची शारीरिक प्रकृतीहि उत्तम होती. अशा स्थितींत विनासायास मरण येणें ही भाग्याची गोष्ट होय. ज्या देशाच्या सेवेंत त्यांनी आपले सगळे आयुष्य व्यतीत केले त्या देशाला स्वराज्य व स्वातंत्र्य लाभल्याचे पाहून आपल्यास धन्यता वाटते असें त्यांनी नुकतेच 'सह्याद्री 'मध्यें समाधानाचे उद्गार काढले होतें. अशा स्थितीत मृत्यूशीं हस्तांदोलन करून त्याच्याबरोबर परलोकाचा मार्ग काढणें ही मोठीच पुण्याई होय. श्री- केळकर हें या दृष्टीनें पुण्यवान् व भाग्यवान होते.

## लोकमान्यांचा उजवा हात

श्री. तात्यासाहेब केळकरांसारख्या अष्टपैलू राजकीय मुत्सद्दी पुढाऱ्याच्या कामगिरीचें चित्र महाराष्ट्रापुढे असल्यानें त्याचें वर्णन काय व किती करावें ? लोकमान्य टिळक मंडालेहून परत आल्यानंतर त्यांनीं अव्यक्त, विस्कळीत आणि अनिर्णीत अशा राजकीय आकांक्षांना व्यवहारी चौकटींत आणून व्यक्त, निश्चित व बांधेसूद स्वरूप देण्याचा प्रयत्न १९१५ पासून सुरू केला. जनतेंत उत्पन्न झालेल्या राजकीय असंतोषाला व गुलामगिरीबद्दल वाटणाऱ्या तिरस्काराला नव्या संघटित चळवळीचें स्वरूप देऊन त्यांनीं स्वराज्यसंघामार्फत जनतेंत नवी उठावणी केली. श्री. तात्यासाहेब केळकर यांची मनःप्रकृति, बुद्धीची भरदार घाव आणि व्यवहारचातुर्य या तऱ्हेच्या राजकारणाला अत्यंत योग्य असल्यानें १९१५ ते १९२० या पांच वर्षांत त्यांनीं आपल्या कार्यकर्तृत्वाच्या यशाची परिसीमा गाठली. त्यांनीं लिहिलेली 'स्वराज्याची कैफियत ' भारतमंत्र्याकडे धाडलेली मागणी–पत्रिका त्यांचे त्यावेळचे केसरींतील लेख आणि स्वराज्यसंघाची त्यांनीं केलेली विस्तृत उभारणी ह्या गोष्टी त्यांच्या यशाची साक्ष देतात. चळवळ कशी सुरू करावी तिची धार कशी वाढवावी, तिला लढाऊपणा कसा आणावा आणि ती यशस्वी करण्याकरितां जनतेंत संघटना कशी करावी याचे पाठ लोकमान्यांनी त्या वेळीं देशाला दिले. श्री. तात्यासाहेब केळकर हे लोकमान्यांचे उजवे हात होते. त्यावेळीं स्वराज्य–संघाचे कर्णधार म्हणून काम करीत असल्यानें

तात्यासाहेबांच्या अंगीं असलेल्या सर्व सद्‌गुणांचा प्रकर्ष झाला होता. भारताच्या स्वातंत्र्याच्या अन्तीम लढयाची पूर्वतयारी किंबहुना त्याचा पूर्वरंग म्हणून या पांच वर्षांच्या महदुद्योगाला मोठें महत्त्व आहे. त्यांत तात्यासाहेबांचें स्थान अग्रस्वरूपानें झळकत आहे. त्यांनी त्या वेळीं केलेलें पाया भरण्याचें कार्य फार महत्त्वाचें होतें. म्हणून भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्याचा इतिहास लिहिला जाईल त्यांत त्यांचें नांव चिरस्मरणीय राहील. स्वराज्य–संघाच्या कार्यांत श्री. तात्यासाहेब यांचा एक सहकारी–चिटणीस व लोकमान्यांच्या सैनिकांतला एक पाईक म्हणून हा भाग्यकाल पाहण्यास मिळाला म्हणून मी स्वतःला धन्य समजतों व त्याकरितां श्री. केळकर यांना कृतज्ञतेच्या जाणिवेची अंजली अर्पण करतों.

## मार्गदर्शक नेता

लोकमान्यांच्या निधनानंतर त्यांचा राजकीय वारसा श्री. तात्यासाहेब केळकर यांच्याकडे आला तो सहजासहजी व फुकटंफाकटी आला नाही. स्वराज्य संघाच्या भरघोस कामगिरीच्या पुण्याईचा तो परिपाक होता. यापुढील बारा वर्षांत म्हणजे १९२०–१९३२ पर्यंत महाराष्ट्राच्या टिळक पक्षीय राजकारणाची धुरा त्यांनी मोठ्या कुशलतेनें वाहिली. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या चळवळीचा इतिहास देऊन त्यांत कोणत्या पक्षाने अगर पुढाऱ्याने कोणती कामगिरी केली हें तोलून मापून पाहण्याचे हें स्थळ नव्हे; पण एक गोष्ट मात्र निःसंकोचपणें सांगितली पाहिजे ती ही कीं, श्री. तात्यासाहेब हे आपल्या सद्सद्विवेकबुद्धीला प्रामाणिक राहिले. लढाई केव्हा करावी व कशी करावी याचें मराठ्याला उपजत ज्ञान असतें असें म्हणतात. तसाच तो तत्त्वान्वेषी असला तरी त्याचा पिंड व्यवहारी आहे. यामुळेच गनिमी काव्याचें युद्ध करण्यांत श्रीशिवाजी महाराजांना अगर त्यांच्या मागून मराठ्यांना कधीहि लाज वाटली नाही. असहकारितेच्या युगांत किंवा स्वराज्य-पक्षाच्या राजकारणांत किंवा त्यानंतरच्या प्रतिसहकार पक्षाच्या उद्योगांत श्री. तात्यासाहेब केळकरांनी वरील व्यवहारबुद्धीची कास सोडली नाही.

असहयोग हा त्यांच्या बुद्धिकक्षेत उत्तम बसत होता; पण कौन्सिलवर अगर त्यासारख्या दैनंदिन लढयाचा मोका उत्पन्न करणाऱ्या उद्योगावर बहिष्कार टाकणें हें त्यांना पसंत पडणें शक्य नव्हतें. म्हणूनच १९२०–१९२१ च्या चळवळींत काँग्रेसच्या वर्किंग कमिटीचे सभासद म्हणून ते समरस झाले असले तरी कौन्सिलवरील बहिष्काराला त्यांचा विरोध कायम होता व त्याचेंच परिणत स्वरूप म्हणजे स्वराज्य पक्षाची संस्थापना व त्यानें मिळविलेले यश होय. या बाबतींतील श्री. तात्यासाहेब केळकर यांची विचारसरणी अचूक, तर्कशुद्ध व प्रतिपक्षाची गळचेपी करणारी होती. कारण त्यांचा मूळ स्वभाव लढाऊ होता. देशांतील राजकारणाला कोणी कितीहि विधायक स्वरूपाचा बुरखा घातला तरी ज्यांत चढाई व लढाई नाहीं अगर प्रतिपक्षावर वार होत नाहीं, तें राजकारण सद्गुणवर्धनाचे असेल कदाचित्, पण त्यांत शत्रूंच्या पराभवाचा राम असत नाहीं. श्रीं. केळकरांनीं या काळांत कौन्सिल-प्रवेशाचा व अधिकार स्वीकाराचा जो उपक्रम केला त्याचेच फळ सध्याची काँग्रेस मंत्रिमंडळें होत. त्यांच्या श्रेयाच्या वाटयाचे ब्रम्हदेवत्व श्री. केळकरांच्याकडे जातें याचें स्मरण ठेवले पाहिजे.

## अचूक विचारसरणी

महाराष्ट्राच्या व भारताच्या राजकारणांत कसेकसे चढउतार होत गेले अगर त्या राजकाणांत उत्पन्न झालेल्या भोवऱ्यांत व वावटळींत काय काय झालें याचा अलीकडचा इतिहास ताजा आहे. या राजकारणी उद्योगांत यशापयशाच्या मानावरून कोणाचीहि योग्यायोग्यता ठरविणें न्याय्य नाही. कोणत्याहि दृष्टीनें पाहिले तरी एक गोष्ट निश्चिपणे श्री. तात्यासाहेब केळकरांच्या संबंधी मान्य केली गेली आहे की त्यांनी आपली तत्त्वनिष्ठा अनेक झंझावाती उत्पातांत शाबूद राखली. महाराष्ट्र हा बुद्धिवादी आहे आणि महाराष्ट्राची बुद्धी मारून तिला विजातीय विचारांच्या दावणींत बांधण्याचे जे प्रयत्न चालले होते त्यांना शक्य तितका शह देण्याचा प्रयत्न त्यांनी केला व तो सद्बुद्धीने केला, राष्ट्रहिताकरिता केला आणि स्वातंत्र्याच्या मार्गावरील भलतेच उत्पन्न झालेले खड्डे बुजविण्याकरिता तरी खास

केला. हें करतांना चार टोले द्यावे घ्यावे लागतातच. त्यांनी प्रतिपक्षाला सपाटून रट्टे दिले अर्थात् त्यांनाहि कांही कमी खावे लागले नाहींत; पण त्यांत त्यांनीं चीड किंवा चिरड फारशी ठेवली नाही. म्हणूनच आज त्यांना त्यांच्या प्रतिपक्षीयांतहि मोठा मान आहे. जुन्या व नव्या पिढींतहि लोकमान्य टिळकांच्या खालोखाल ज्यांचे नांव भारताच्या सर्व प्रांतांत माहीत आहे व ज्यांच्या नांवाशीं महाराष्ट्राच्या मोठेपणाची सांगड घातली जाते ते नांव म्हणजे श्री. तात्यासाहेब केळकरांचें होय. त्यांचें छत्र नाहीसें झालें म्हणजे एका दृष्टीने महाराष्ट्र पोरकाच झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. आज सर्व महाराष्ट्र त्यांच्या मृत्यूनें हळहळत आहे याचे खरें कारण हेंच होय.

## छत्र गेलें !

'केसरी व मराठा' या संस्थेचें त्यांच्या मृत्यूनें झालेलें नुकसान वर्णन करून सांगता येण्यासारखें नाही. 'केसरी' व 'केळकर' यांच्या नांवांच्या साहचर्यांतच केसरीची प्रगति, प्रतिष्ठा व वैभव होतें. 'केसरी' चा साहित्यिक व वृत्तपत्रीय दर्जा त्यांच्या अनेक गुणसमुच्चयाने वाढला. व्यक्तिशः मी तर १९१५ सालीं त्यांचा साहाय्यक चिटणीस म्हणून केसरी–मराठा संस्थेंत दाखल झालों व प्रथम 'मराठा' व नंतर 'केसरी' या पत्रांत उपसंपादक व संपादक म्हणून काम केलें. १९३२ पर्यंत माझ्याइतकें त्यांचें साहचर्य इतरांस क्वचितच लाभलें असेल. श्री. तात्यासाहेबांच्या गुणसमुच्चयाचा, त्यांच्या थोर व उदार अंतःकरणाचा आणि उदात्त व सभ्य चरित्राचा केवढा मोठा आधार केसरीला व केसरी संस्थेंतील लोकांना होता याचे काय वर्णन करावें ? आज हा आधार तुटला, भारताच्या राजकीय पुढाऱ्यांपैकी एक तेजस्वी कार्यकारी पुढारी निखळला; केसरी–मराठा संस्थेवरील छत्र गेलें ! महाराष्ट्र पोरका झाला ! परमेश्वराच्या सिंहासनापाशीं जाऊन श्री. तात्यासाहेब केळकर हे बेकी, मत्सर, परस्पर हेवेदावे यांच्या शापाने ग्रस्त झालेल्या महाराष्ट्राला सुबुद्धि व भारताच्या स्वातंत्र्याच्या नव्या वैभवासाठीं महाराष्ट्राला आपला योग्य वाटा उचलण्याची ताकद दे अशी प्रार्थना करण्यासाठीच खास गेले ! कृतज्ञ महाराष्ट्र त्यांना विसरणार नाही.

केसरी ता. १५–१०–४७

# महाराष्ट्राचा महर्षि गेला !

## ले.—श्री. ज. श्री. टिळक

श्री. तात्यासाहेब केळकर यांच्या आकस्मिक निधनाची वार्ता ऐकून महाराष्ट्रांतील प्रत्येकाच्या मनास मोठाच धक्का बसला असेल. कालपरवां तात्यासाहेब आमच्यांत वावरत होते. वयाच्या उत्तरार्धांतहि तरुण मनाच्या उमेदीनें व उत्साहानें सर्व कार्यांत समरसतेनें ते भाग घेत होते. त्यांच्या आधाराखालीं आम्ही सर्व लहानथोर मंडळी कामें करीत होतों. आम्हा सर्वांची काळजी तात्यासाहेब वहात ! आम्हीं निष्काळजी होतों. आज हा आधार नाहींसा झाला. तात्यासाहेब आमच्यांतून गेले व महाराष्ट्र पोरका झाला.

### तपस्वी जीवन

वटवृक्षासारखें तापसी जीवन ते जगले. त्या शीतल छायेखालीं कोणीहि यावें, सर्वांना आसरा मिळे, शांति लाभे. समाधान सापडे. लोकसेवेचा त्यांचा हव्यास एवढा मोठा होता कीं, त्यांचें घर म्हणजे मुक्तमंदिरच असे. कोणीहि यावे आपली अडचण सांगावी, मनमोकळेपणें बोलावें, सल्ला घ्यावा व जावें, ना चिठ्ठी ना आडकाठी. आपल्या सौजन्यानें, प्रेमळपणानें, व खेळाडू वृत्तीनें तेव्हांच आलेल्या मनुष्यास आपलेसें करून घेत, आपली सहानुभूति देत व त्याचा लोभ संपादीत. त्यांच्या मनाची ठेवण इतकी उदात्त होती व इतकी विशाल होती कीं त्यांची सदिच्छा त्यांच्या शत्रूंनाहि तारून नेत असे. कित्येक वेळां त्यांच्या या उदात्त व न्यायप्रिय वृत्तीची झळ शत्रूला झुकतें माप मिळाल्यानें त्यांच्या सहकाऱ्यांनाहि लागे. सतत उद्योग हे तर त्यांच्या आयुष्याचें सार होतें. आयुष्याच्या उत्तरार्धांतहि ते कधीं स्वस्थ बसलेले आढळले नाहींत. 'मी आतां सेवानिवृत्त झालों आहे' असें तोंडानें म्हणत असतांहि ते आपल्यामागें हौसेनें म्हणून इतकीं कामें लावून घेत कीं त्यांना सेवानिवृत्त कसें म्हणावें असा पाहाणाऱ्यास प्रश्न पडे. महाराष्ट्रांतील सर्व चळवळींचीं सूत्रें त्यामुळेंच केळकरांपर्यंत जाऊन पोहोंचत.

सर्व चळवळींचे ते आधार होत व सर्वांच्या अडचणींचे ते सल्लागार बनत. त्यांच्या या उद्यमशीलतेंतच त्यांच्या यशाचें मर्म साठवलें होतें.

## अधिकाराचा कांटेरी मुकुट

लोकमान्यांप्रमाणें त्यांनाहि आपल्या आयुष्यांत प्रतिकूल परिस्थितीशीं झगडावें लागलें. लोकमान्यांच्या वारसदारीचा कांटेरी मुकुट त्यांनीं आपल्या मस्तकावर धारण केला. पण त्या दिवसापासून अनेक संकटांशीं त्यांना चौफेर झुंजावें लागलें. अंतर्गत भांडणाचा मनस्ताप त्यांना सहन करावा लागला. तसेंच बाहेरील टिळक तत्त्वज्ञानावरील होणाऱ्या आघातांनाहि तोंड द्यावें लागलें. परन्तु या सर्व अडचणींतून आपल्या कर्तृत्वाच्या, बुद्धीसामर्थ्याच्या व सत्प्रवृत्तीच्या जोरावर ते निभाऊन गेले. बाहेरच्या संकटापेक्षांहि अन्तर्गत भांडणें झगडतांना त्यांच्या मृदु मनाची फारच ओढाताण झाली. एका बाजूस गुरू घराण्याबद्दलची भक्ति व दुसऱ्या बाजूस शिरावर पडलेली जबाबदारी या रस्सीखेचीमध्यें त्यांच्या मनाची काय स्थिती होत असे ह्याची त्यांच्या सान्निध्यांत आलेल्यांना कल्पना आहे. ज्याना या महावृक्षाचा आसरा घेतां आला नाहीं ते दुर्दैवी असेंच अखेर म्हणावें लागलें.

## लोकमान्यांना अनृणी केलें

लोकमान्यांच्या पश्चात् त्यांच्या तत्त्वज्ञानाला ग्रासूं पाहणारा ग्रह क्षितिजावर उमटला. सर्व ग्रह फिरले त्याबरोबर घराचे वासेहि फिरले. परन्तु स्वतंत्र बुद्धीचे केळकर एकाकीं या संकटांशीं झगडले. टिळक–तत्त्वज्ञानाची ही ठेव आलेल्या महापुरांतूनहि परतीरीं पोचविली. लोकमान्यांप्रमाणें केळकरहि उभे जन्म लढले व जें टिळक-तत्त्वज्ञान रुजावें व वाढावें यासाठीं केळकरांनीं अविश्रांत श्रम घेतले तें शेवटीं यशस्वी झालेलें त्यांनीं पाहिलें! याचा आनंद त्यांना सर्वांत अधिक झाला. ३७ सालीं कॉंग्रेसनें आपलें असहकारितेचें धोरण कृतीनें सोडलें तेव्हां केळकर लिहितात, "विचारी मनुष्याला राजकारणांत आपलें धोरण यशस्वी ठरणें हा लौकिक–ऐहिक मोक्षच होय." या सर्व झगड्यांतहि क्षुद्र अभिनिवेशी वृत्तीनें त्यांच्या मनास केव्हांच स्पर्श

केला नाहीं; कारण त्यांना यशाची चिंता केंव्हांच नव्हती. त्यांची विचारसरणी बुद्धीवर आधारलेली, टिळकतत्त्वज्ञानाची भरभक्कम बैठक असलेली होती; व त्यास दूरदृष्टि, इतिहास व अनुभव यांची साथ होती. त्यांचे जीवन बहुगुणी होतें. जीवनाच्या सर्व शाखांत त्यांची प्रज्ञा सारख्याच लीलेनें विहार करीत असे. ते धुरंधर मुत्सद्दी, कार्यप्रवृत्त समाजसेवक, साहित्यिकांचे सम्राट होतें. या सर्वांपेक्षांहि ते खऱ्या अर्थानें कर्मयोगी होते. व म्हणून ते आत्मसंतुष्ट होते. वयाच्या उत्तरार्धांत "आज माझी मनःस्थिति शांत आहे. हात जोडले आहेत. 'हांके' ची वाट पहात आहे" असे उद्गार त्यांच्या तोंडून निघूं शकले. तात्यासाहेबांचें जीवनचरित्र हा एक भव्य व उदात्त गंगौघ होता. त्यांची निर्मलता, गांभीर्य व भव्यता पाहून सहजच हात जोडले जातात, मस्तक विनम्र होतें. आपल्या कर्तृत्वानें केळकरांनी लोकमान्यांना अनृणी केलें. आतां केळकरांना अनृणी करण्याची जबाबदारी महाराष्ट्रावर आहे.

---

# महाराष्ट्राचें महाभूषण गेलें!

### लेखकः—श्री. ज. स. करंदीकर

**नाभिषेको न संस्कारो नरसिंहस्य वै कृतः।**
**विक्रमार्जितराज्यस्य स्वयमेव नरेंद्रता॥**

अगदीं निकटवती आसेष्टांनाहि ज्याची कल्पना आली नाहीं, किंबहुना स्वतः ज्याची त्यालाहि कल्पना आली नाही, अशा आकस्मिक मृत्यूच्या आघाताची महाराष्ट्राला व इतर प्रांतांना कल्पना कशी येईल? अगाऊ कल्पना येणें तर शक्य नव्हतेंच, पण आतां ही वज्राघातासारखी हृदयभेदी घोरवार्ता ऐकून देखील क्षणभर जिव्यावर विश्वास बसणार नाहीं अशी घोर वार्ता जगाला कळविण्याचा दुःखद प्रसंग आज आमच्यावर

झाला आहे. वाचकहो, केसरी–मराठा संस्थेच्या ट्रस्टचे आद्यआधारस्तंभ श्रीयुत नरसिंह चिंतामण केळकर यांच्यावर निर्घृण काळानें काल मंगळवार दि. १४ ला सूर्योदयाच्या सुमारास आकस्मिक घाला घालून त्यांस या जगांतून ओढून नेलें! हें वर्तमान वाचल्यावर देखील आपण क्षणभर बुचकळ्यांतच पडाल, कारण ता. १४ दिनांकाच्या मंगळवारच्या केसरीच्या अंकांतच रविवार दि. १२ ला सार्वजनिक सभेतर्फे जो श्री. धोंडूमामा साठे यांचा सत्कार–समारंभ झाला, त्या सभेचें अध्यक्षस्थान त्यांनीं मंडित केलें होतें आणि त्या सभेंत त्यांचें जें कळकळीचें भाषण झालें, त्या भाषणाचा सारांश आपण नुकताच वाचला असेल. लगेच त्याच्या पाठोपाठ त्यांच्या मृत्यूचें वर्तमान यावें, यापेक्षा विचित्र विधिघटना ती कोणती असणार? पण कोणाच्या मनाला या आकस्मिकतेमुळे केवढाहि जबरदस्त धक्का बसो, कोणाला काळाच्या निर्घृणतेबद्दल केवढाहि संताप येवो, सगळा महाराष्ट्र, किंबहुना महाराष्ट्राविषयीं आदर बाळगणारा हिंदुस्थानचा भूभाग, या धरणीकंपासारख्या धक्क्याने कितीहि विषादमग्न होवो, 'महाराष्ट्राचें महाभूषण' असे तात्यासाहेब केळकर इहलोकची जीवनयात्रा संपवून परलोकच्या यात्रेला गेले, ही घटना वज्रलेप झाली असून ती आतां कोणाच्याहि दुःखानें वा आक्रोशानें बदलूं शकणार नाही.

तात्यासाहेब केळकर यांच्या वयाला ७७ वें वर्ष चालूं असल्यानें अलीकडे त्यांची प्रकृति कांहींशी थकल्यासारखी दिसत असे, तरीपण त्यांच्या मनाचा उत्साह दांडगा असल्यांनें महत्वाच्या सार्वजनिक कार्यांच्या व सभेच्या वेळीं ते अगत्यानें उपस्थित रहात आणि आपला पोक्त सल्ला निर्भीडपणें देत. दि. १२ ला टिळकमंदिरांत श्री. धोंडुमामा साठे यांच्या सत्कार-समारंभाची सभा ही त्यांच्या अध्यक्षत्वाखालची अखेरचीच सभा ठरली! धोंडुमामांच्या विषयींचा आदर आणि सांगली नजीक नवीनच निघालेल्या इंजिनियरिंग कॉलेजला सुस्थिति प्राप्त व्हावी यासंबंधी त्यांस वाटणारी कळकळ, यामुळेंच ते त्या दिवशींच्या सभेस आले आणि तीन तास चाललेल्या या सभेचें अध्यक्षपद मंडित करून त्यांनी त्या कॉलेजास द्रव्य–सहाय्य करण्या-

नेंच महाराष्ट्राची अब्रू मापली जाणार आहे असें त्यांनी मोठ्या कळवळ्यानें सांगितलें. त्यानंतर मधला सोमवारचा एकच दिवस. त्या दिवशीं ते कोठें बाहेर पडले नाहींत. मात्र त्यांनीं अर्धवट राहिलेले एकदोन लेख पूर्ण करून दिले.

## यमाचा चोरटा घाला

असा हा कार्यक्रम चालूं असतांनाच त्यांना किंवा घरच्या कोणा मंडळींनाहि काळपुरुष समीप येऊं लागल्याची चाहुल लागली नाहीं. आणि ती चाहूल लागणार तरी कशी ? जाणूनबुजूनच तो काळपुरुष आकस्मिक घाला घालण्याकरितां चोरापेक्षांहि अधिक निःशब्द पावलानें येत होता. तथापि सोमवारीं रात्रौ तात्यासाहेबांना अस्वस्थता वाटूं लागून चोरट्या घाल्याचा संशय येऊं लागला. त्यांनी त्या चोरट्या हल्ल्याचा कानोसा घेण्यासाठीं आपल्या स्नेही डॉक्टरास पाचारण केलें. डॉक्टर आल्यानें घरच्या मंडळींत संचिततेचें वातावरण पसरलें. परन्तु डॉक्टरांच्या सांगण्यावरून कांहीं विशेष भीतीचें कारण नाहीं असें समजून मंडळींच्या चिंतेचा पारा उतरूं लागला. तात्यासाहेबांना मात्र अस्वस्थता वाटत असल्यानें झोप येईना. पहाटेच्या वेळीं त्यांस झोप येईल असें वाटून त्यांनीं जवळच्या मंडळींस ‘ मी आतां झोपतो, तुम्ही जा ’ असें सांगितलें आणि ते जे पांघरूण घेऊन निजले ते काळ- निंद्रेतच विलीन झाले ! थोड्या वेळानंतर त्यांची झोप झाली काय, हें पाहावयास येतात तो तेथें काय ? केळकरांच्या आत्म्यानें जड देहांची कायमचीच रजा घेतली असल्याचें त्यांच्या नजरेस पडलें आणि सर्वत्र हाहाःकार सुरूं झाला.

## तात्यासाहेबांच्या विविध भूमिका

श्री. न. चिं. केळकर ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांच्या जीवन-चरित्राचा गेल्या ५४ वर्षांतील सार्वजनिक चळवळीशीं अत्यंत निकट संबंध आहे. लो. टिळक जिवंत असून कारागृहाच्या बाहेर असतांना, टिळकांच्या कार्याची धुरा आपल्या अंगावर घेऊन त्याची उठावणी करणारे धुरीण म्हणून, टिळक

कारावासांत असतांना त्यांच्या कार्याची जोपासना करणारे कुशल बुद्धीयोगी माणूस टिळकांच्या मृत्यूनंतरच्या नव्या युगांत महाराष्ट्राच्या पूर्वपरंपरेचे विश्वस्त म्हणून, कॉंग्रेसशीं सहमत असेपर्यंत त्या कार्यांत आपल्या वांट्याचे काम चोख बजावणारे निःस्वार्थी, स्वतःच्या पोळीवर तूप ओढून घेण्याचा विचारहि कधीं मनांत न आणणारे पुढारी म्हणून, कॉंग्रेसशीं मतभेद झाल्यावर स्वराज्यपक्ष, प्रतिसहकारपक्ष, लोकशाही स्वराज्यपक्ष, हिंदुसभापक्ष इत्यादि विविध पक्षांच्या त्या वेळच्या कार्यक्रमांत पुढाकार घेणारे नेते आणि कॉंग्रेसला तिच्या चुकांच्या भावी घोर परिणामाचा आगाऊ इशारा देणारे भविष्यवादी म्हणून आणि अखेरीस कॉंग्रेस आपल्या लोकशाही स्वराज्य पक्षाच्या तत्त्वावरच आली आणि सरकारहि देशव्यापी चळवळीनें जेरीस आलें. आणि अशा रीतीनें पन्नास वर्षांपूर्वी बीजारोपण केलेल्या स्वराज्याची चळवळ फलद्रूप होऊं लागलेली पाहून कृतार्थतेचा निश्वास सोडणारे आणि अशा परिस्थितींत विश्रांति घेण्याचा स्वाभाविक हक्क प्राप्त झाला असतांनाहि स्वातंत्र्याच्या चळवळीला येणारा फळांचा घोस आंबट, खारट, तुरट आहे एवढेंच नव्हे तर त्यांत कांहीं विषारी कीड निर्माण होऊन ती फलभोक्त्यांना प्राणघातक होत असल्याचें पाहून ती कीड मारण्यासाठीं तिच्यावर उपाययोजना करण्याविषयीं अखेरपर्यंत तळमळणारे पुढारी म्हणून, अशा विविध भूमिकांच्या द्वारा भारतभूमीस तात्यासाहेब केळकर यांचा दृढ परिचय झालेला आहे.

अशा विविध भूमिका स्वीकारून साडेचार तपें देशकार्य करणारा पुढारी सध्याच्या संक्रमणाच्या आणीबाणीच्या वेळीं एकाएकीं हरपला हें महाराष्ट्राचें परम दुर्भाग्य होय. स्वतः तात्यासाहेबांच्या दृष्टीनें त्यांचा मृत्यु अगदीं क्लेशरहित झाल्यानें ‘**अनायासेन मरणं विना दैन्येन जीवनं**’ ही म्हण त्यांना अक्षरशः लागूं पडली हें महद्भाग्यच होय. अगदीं अखेरच्या दिवसापर्यंत आपला आवडता लेखनव्यवसाय चालू ठेवून शेवटीं परावलंबनाचें दुःख तिळमात्रहि सोसावें न लागतां तात्यासाहेबांनी आपली जीवनयात्रा संपविली. यांत त्यांनी अखेरी मारून एकप्रकारें संसाररूपी तापत्रयीवर

मातच केली यांत बिलकुल शंका नाहीं. पण आपल्या या अशा आकस्मिक निधनानें आपल्या आवडत्या महाराष्ट्रावर केवढा आपत्तीचा डोंगर आपण ढकलीत आहों, याची त्यांस कल्पनाहि आली नसेल.

## बोलके नव्हेत तर कर्ते पुढारी

बहुतेक पुढारी आपपल्या विषयापुरते आणि तदनुषंगिक एकाद–दुसऱ्या विषयामध्येच तेवढे तज्ज्ञ असतात. तात्यासाहेब केळकरांचा खाक्या कांहीं लोकविलक्षणच होता. त्यांचा मुख्य व्यवसाय राजकारण हा असला तरी इतर किती तरी विषयांत ते तरबेज होते. वेदान्तासारखा रुक्ष आणि उरस्फोड करणारा कठिण विषय, काव्यशास्त्रविनोदासारखा रुचकर आणि सुखसंवेदनपर विषय, आत्मचरित्रासारखा केवळ स्वानुभवपर विषय, थोर पुरुषाच्या चरित्रासारखा लाक्षणिक परकाया–प्रवेशात्मक विद्येनेच अवगत होणारा अवघड विषय, राजकारणासारखा परपक्षांशीं वाग्युद्ध चालवावयाचा धकाधकीचा मामला, समाजकारणासारखा परदुःख निवारणाचा साधुवृत्तीचा आविष्कार इत्यादि परस्परविरुद्ध विषयांतून सर्व विषयांवर ते सारख्याच सफाईने लिहीत व बोलत असत. शिवाय ते नुसते बोलके पुढारी नव्हते. ज्या ज्या विषयाची त्यांना आत्मीयता वाटे त्या त्या विषयांतील कार्यभागांत ते स्वतः कार्यभार उचलण्यास तत्पर असत, त्यामुळें किती संस्थांशी अध्यक्ष, उपाध्यक्ष, डायरेक्टर, कार्यवाह अथवा सल्लागार म्हणून त्यांचा संबंध आला होता याची बिनचूक गणति करणेंहि दुरापास्त होय.

एकदां १९३७ सालीं त्यांनीं केसरी–मराठा संस्थेच्या विश्वस्त–पदाचा राजिनामा दिला त्या वेळीं त्यांनी अनेक संस्थांशीं असलेला आपला संबंध सोडला असल्याचें जाहीर करून त्या संस्थांची यादी प्रसिद्ध केली होती. त्या यादींत सुमारें चाळीस संस्थांचीं नांवें होतीं आणि ती यादीहि पूर्ण असल्याची ग्वाही ते स्वतःहि देऊं शकले नाहीत. परन्तु त्यापेक्षां आश्चर्याची गोष्ट ही कीं, अशा रीतीनें अनेक संस्थांचा संबंध तोडल्यानंतर आणि यापुढें मी कोणत्याहि संस्थेचा कार्यभार स्वतःवर घेऊं इच्छित नाहीं असें प्रगट

केल्यानंतरहि लोकाग्रहास्तव ते अनेक संस्थांचे अधिकारपदस्थ झाले. एकदोन संस्थानांतल्याहि कारभाराचा बोजा सल्लागार या नात्यानें त्यांनीं घेतला आणि पूर्वीं ज्या संस्थांचा संबंध तोडल्याचें त्यांनीं जाहीर केलें होतें त्या संस्थांचा संबंधहि नाममात्रच तोडला असल्यानें पूर्वींप्रमाणेंच त्या त्या संस्थांनाहि त्यांच्या नेतृत्वाचा लाभ अखेरपर्यंत मिळत राहिलाच.

## राजकारणात्मक मृत्युपत्र

तात्यासाहेब केळकरांचें शेवटचें विशेष महत्त्वाचें राजकीय भाषण म्हणजे गेल्या ता. १ ऑगस्टला पुण्यांत जी बृहन्महाराष्ट्राची सर्वपक्षीय सभा भरली होती त्या सभेच्या स्वागताध्यक्षाचें भाषण होय. तात्यासाहेब केळकरांचें तें राजकारणविषयक मृत्युपत्रच ठरलें असें आतां दुःखानें म्हणावें लागतें. त्या भाषणांत केळकरांनी गेल्या २७ वर्षांतील राजकारणाच्या हेलकाव्याचा आढावा घेऊन आजमितीला राजकारणाचा लंबक कोणत्या स्थितींत आहे व तो कोणत्या बिंदूवर स्थिर व्हावयास पाहिजे हें मोठ्या मार्मिकतेनें दाखवून दिलें होतें. त्या सिंहावलोकनपर भाषणांत त्यांनी कॉंग्रेस, हिंदुमहासभा, लोकशाही स्वराज्यपक्ष इत्यादि विविध भिन्नमतांच्या तत्त्वज्ञानांतून सद्यःस्थितीला उपकारक असा कोणकोणता भाग घेऊन सद्यःस्थितीला जुळेल व उत्तम मार्गदर्शक होईल असें नवें तत्त्वज्ञान कोणतें स्वीकारावें याचें दिग्दर्शन केलें होतें. त्यावरून त्यांची राजकारणांतली दृष्टि किती व्यापक, मार्मिक व दूरदर्शी आहे त्याचें प्रत्यंतर येतें.

## जात्याच समन्वयवादी

तात्यासाहेब केळकरांचा अनेक प्रकारच्या संस्थांशीं निकट संबंध होता या विषयीं अनेकांना एकपट आश्चर्य वाटेल तर त्यांतल्या कित्येक संस्था परस्परांशीं चढाओढ करणाऱ्या असूनहि त्यांच्याशीं त्यांचे समानतेचे व निःपक्षपाताचे संबंध असत, हें ऐकून तें आश्चर्य अनेकपट वाढेल. डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि शिक्षण प्रसारक मंडळी या दोन्ही संस्थांच्या बोर्डावर ते एकाच वेळीं काम करीत या उदाहरणावरून त्यांच्या निःपक्षपाती

भूमिकेची साक्ष पटेल. त्यांचा स्वभावच जात्या समन्वयवादी होता. या कामांत त्यांनी कै. दादासाहेब करंदीकर यांना एक प्रकारें गुरु केलें होतें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही. ही समन्वयवाद्याची तात्त्विक भूमिका दिसतांना दोन्हीकडून प्रशंसापत्रें मिळविण्याची एक खाशी युक्ति होय, अशीच कित्येकांची समजूत असते. परंतु ही भूमिका व्यवहारांत अत्यंत तापदायक होते. दोहोंकडून भलेपणा मिळण्याच्या ऐवजीं. मृदंगाप्रमाणें दोहोंकडून मार सोसण्याचाच प्रसंग अनेक वेळां येतो व त्यांतील अडचणी, 'जावे त्याच्या वंशा तेव्हां कळे,' अशा स्वरूपाच्या असतात. असें असूनहि तात्यासाहेब केळकरांनीं आपली समेटाची वृत्ती अखेरपर्यंत केव्हांहि सोडली नाहीं. आपल्या आद्यतत्त्वाला आणि चालू व्यवहाराला बाध न येईल अशी तडजोड करावयास ते केव्हांहि तयार असत. त्यामुळें एककल्ली अतिरेकी माणसाकडून 'लवचिक समेटवादी' म्हणून त्यांची कित्येक वेळा थट्टाहि होई. पण त्यांचा लवचिकपणा तपशिलापुरताच असे. आपल्या स्वाभिमानाला अथवा देशहिताच्या मार्गाला धक्का पोचेल अशा प्रकारची कोणतीहि तडजोड करण्याला ते मान्यता देत नसत. त्या वेळीं त्यांची तत्त्वनिष्ठा खरी कसोटीला लागे आणि समेटवादी म्हणून त्यांचा उपहास करणाऱ्यांचा स्वार्थी एककल्लीपणा तात्यासाहेबांच्या निस्वार्थी तत्त्वनिष्ठेच्या तेजांत हतप्रभ होऊन कोठल्या कोठें मावळून दृष्टीआड होई. यामुळें तात्यासाहेब केळकरांचा खरा मोठेपणा त्यांच्या निःस्वार्थबुद्धींत आहे, कोणत्याहि राजकारणाचा डाव ते स्वतःचा मोठेपणा मिरवण्यासाठीं अथवा क्षुद्र आर्थिक लाभ साधण्यासाठीं खेळत नाहींत, अशी मर्मज्ञ परिक्षकांची खात्री पटे.

## त्यांनी यशस्वी केलेल्या तीन अकल्पित कल्पना

मामुली राजकारणाचा खेळ ठराविक पद्धतीनें खेळण्यांत कौशल्य तें काय, असें वाटून श्री. केळकर हे प्रत्येक चळवळींत कांहीं तरी नाविन्य शोधीत आणि एखादी अकल्पित कल्पना हातीं घेऊन ती यशस्वी करून दाखवीत. १९१६ सालची लो. टिळकांना ज्युबिलीच्या प्रसंगीं एक लाख

रुपयांची थैली देण्याची कल्पना केळकरांच्याच सुपीक मेंदूतून निघाली, त्यांच्या अश्रांत परिश्रमानेंच ती सिद्धीस गेली आणि जनतेची त्यांच्या शब्दावर एवढी श्रद्धा होती कीं, केळकरांनीं ही कल्पना जाहीर करतांच त्यांच्याकडे पावसाच्या सरीवर सरी याव्यात त्याप्रमाणें देणग्यांचा वर्षाव होऊं लागला. ते दिवस हल्लींच्यासारखे द्रव्याच्या सुबत्ततेचे व काळ्या बाजारांत मिळविलेला पैसा प्रायश्चित्तानें पचवावा, म्हणून देणग्यांचे वर्षाव करण्याचे नव्हते. असें असून तात्यासाहेबांची ती कल्पना इतकी यशस्वी झाली कीं, त्यांच्या प्रतिपक्षाच्या डोळ्यांत त्यांचें तें यश सलूं लागलें.

लो. टिळक चिरोल खटला हरले, हें कळतांच तात्यासाहेबांनी ३ लक्ष रुपये जमवून टिळकांच्या शिरावरचा खटल्याच्या खर्चाचा बोजा उतरवावा असें ठरविलें. या वेळेस प्रतिपक्षाकडूव पहिल्यापेक्षां अधिक विरोध झाला-तरी देखील अल्पावधींन अडीच लक्ष रुपये जमवून लो. टिळकांकडे ते पाठविण्यांत आले. हें यश पूर्वींच्यापेक्षा अधिक भरदार होतें. त्यानंतर टिळकांच्या पश्चात् केसरीचीं व्यवस्था अत्यंत काटकसरीनें चालवून आणि केसरी पत्राची वजनदारीं वाढवून केळकरांनी केसरीच्या उत्पन्नांतून सुमारें तीन लक्ष रुपयांची बचत करून ती रक्कम चिरोल-फंडाची एक प्रकारची अप्रत्यक्ष फेड म्हणून राष्ट्रकार्याकरितां ट्रस्ट करून वेगळी ठेवली व त्या ट्रस्टमधून मध्यप्रांत-वऱ्हाड, मध्य महाराष्ट्र आणि कर्नाटक या तीन प्रांतांत मिळून दरसाल अंदाजे १०-१२ हजार रुपये देशकार्य करण्याच्या कामीं खर्च करतां येतील अशी तरतूद केली. या योजनेंत केळकर यांची निःस्वार्थबुद्धि, कृतज्ञता, त्यागी वृत्ति आणि सार्वजनिक फंडांतून दूरवर विचार करून द्रव्यनिधीचा झरा सतत वहात राहील असें करण्याची कार्यकुशलता या सर्वच गुणांचा प्रत्यय आला.

## एकपक्षीय अजात-शत्रुत्व

अशा रीतीनें निरलसपणें विविध राष्ट्रकार्य करणारे श्री. केळकर हे जात्याच अजातशत्रु होते. मात्र अजातशत्रु या शब्दाचा अर्थ त्यांच्या

कै. तात्यासाहेब केळकर-विविध दर्शन



बाबतींत असाच समजला पाहिजे कीं, त्यांनीं कोणाचेंहि शत्रुत्व केलें नाहीं. आजन्मांत त्यांनी एकाहि अपशब्दानें दुसऱ्याचें मन दुखविलें नाहीं; आपण होऊन दुसऱ्याचें कवडीभरहि नुकसान केलें नाहीं, दुसऱ्याचा स्वार्थ बुडवून आपलें घोडें दामटलें नाहीं, ज्या त्या कामांत आपणच डुड्ढाचार्यपणा मिरवून दुसऱ्याला पुढें येण्यास संधि मिळूं न देण्याचा आडमुठेपणा केला नाहीं, कोणाचेंहि बरें पाहावत नाहीं असला नतद्रष्टपणा केला नाहीं; उलटपक्षीं सर्वांना पुढें येण्यास संधि दिली, राष्ट्रकार्यासाठीं स्वतः घस सोसली, समेटासाठीं कोरा चेक लिहून देण्याचीहि तयारी दर्शविली, प्रतिपक्षाच्याहि कार्याची खऱ्या हितकर बाबतींत प्रशंसा केली, प्रतिपक्षाला आपला कार्यक्रम यशस्वी करून दाखविण्याला भरपूर संधि मिळावी म्हणून आपला हेतु बाजूला सारून त्याची वाट मोकळी करून दिली, सर्व कांहीं केलें. परंतु त्यांच्या जन्मकाळच्या ग्रहांचा गुण म्हणा अगर कांहींहि म्हणा, पण त्यांना खऱ्या अर्थानें 'अजातशत्रुत्व' लाभलें नाहीं. प्रत्यक्ष राष्ट्रघात करणाऱ्या शत्रूंनाहि जी निंदा ऐकावी लागत नाहीं, इतकी अपशब्दात्मक निंदा त्यांना ऐकावी लागली, त्यांनी सद्हेतूनें केलेल्या कोणत्याहि एखाद्या साध्या सूचनेचाहि विपर्यास केला जाऊं लागला, किंबहुना तात्यासाहेब केळकर यांच्या हेतूचा विपर्यास करणें हेंच एक कित्येकांचें, त्यांच्या मनानें, राष्ट्रकार्य होऊन बसलें !

परंतु याहि बाबतींत त्यांच्या सहनशीलतेची कसोटीच लागली. जोंपर्यंत राष्ट्रकार्याला प्रत्यक्ष हानि न पोचता केवळ आपलीच मानखंडना केली जात आहे तोंपर्यंत आपण त्या निंदेकडे दुर्लक्ष करावयाचें व त्या वावदूकांना आपला तामसी आनंद यथेच्छ भोगूं द्यावयाचा असा तात्यासाहेबांचा निर्धार होता व त्यापासून ते कधीहि ढळले नाहींत. परंतु जेथें नुसत्या आपल्या हेतूच्या विपर्यासाचा प्रश्न नसून राष्ट्रकार्यावर निखारे पसरण्याचा उपद्व्याप होत आहे असें दिसेल त्या ठिकाणीं मात्र ते धर्मराजाची सहनशीलता झुगारून देऊन त्याच्या कनिष्ठ बंधूचा अवतार धारण करीत आणि एकदां वाग्युद्ध सुरूच झाल्यावर तात्यासाहेबांसारखा सव्यसाची योद्धा प्रतिपक्षाला

'दे माय धरणी ठाय' असें करून सोडी यांत नवल तें काय ? परंतु याहि बाबतींत त्यांनी कधींहि आजन्म शत्रुत्व मनांत बाळगलें नाहीं. ज्यांनी ज्यांनी त्यांना अनेक वेळां दुखविलें असेल ते जेव्हां आपला विरोध विसरून तात्यासाहेबांकडे कोणत्या तरी बाबतींत सहकार्य मिळविण्यासाठीं येत, त्यावेळीं तात्यासाहेबहि, पूर्वीची आठवण एका शब्दानेहि न देतां, प्रस्तुत प्रश्नाकडेच नजर देऊन आपल्या हातून जितकें सहकार्य होईल तेवढे करण्यास तयार असत.

अशा रीतीने श्री. न. चिं. केळकर यांनी साडेचार तपेंपर्यंत महाराष्ट्राचें राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शैक्षणिक क्षेत्र, वाङ्मय क्षेत्र इत्यादि विविध अंगांनी देशसेवा केली. गोलमेज परिषदेंत त्यांची कामगिरी महत्त्वाची ठरली. विलायतेंत असतां अल्पावधींतच त्यांनी 'इंडिया' पत्राची सुव्यवस्था लावून दिली. पुणें शहर म्युनिसिपालिटीचे ते अनेक वर्षें अध्यक्ष होते; कॉमनवेल्थ विमा कंपनी ही त्यांच्या अर्थकारणाची भरभक्कम साक्ष आहे. टिळक स्मारक मंदिर व टिळक पर्स फंड हीं त्यांच्या टिळक-निष्ठेचीं स्मारकें होत. रे इंडस्ट्रियल म्युझिअम ही संस्था त्यांच्याच प्रोत्साहनाने नांवारूपास आली. वाङ्मय हें तर त्यांचें आवडतें क्षेत्रच होतें. त्यांतली त्यांची कामगिरी अद्वितीय आहे. वाङ्मयांत असें एकहि दालन नाही कीं ज्या दालनांत त्यांचा एखादा तरी ग्रंथ गुणाधिक्यानें चमकत नाही.

आधुनिक अर्थानें अध्ययन व अध्यापन यांचे त्यास जणूं काय व्यसनच जडलें होतें. केसरीची व मराठ्याची ४४ वर्षें सेवा करून ते नाममात्र निवृत्त झाले. त्या पत्रांतून त्यांचें लेखनकार्य चालूच असे. 'सह्याद्रि' हें तर त्यांचें स्वतःचेंच अपत्य असल्यांने त्याला दर महिन्याला एखाददुसरा गोड घांस भरवावयाला ते कधीहि विसरले नाहींत. मृत्युपूर्वीचा त्यांचा शेवटचा लेख सह्याद्रि मासिकाकरितांच लिहिला जात होता. नवीन ग्रंथ वाचणें, त्यांतून नव्या कल्पना घेऊन त्या आपल्या वाङ्मयांत बसविणें, जुन्या गीता-ज्ञानेश्वरी यांसारख्या ग्रंथांतून आपल्या दृष्टीनें रहस्य काढून तें आधुनिक वाचकांना पटेल अशा सोप्या भाषेंत मांडणें, राजकारणाची तोंडओळख

खेडवळांनाहि करून देण्यासाठी गोष्टींच्या रूपानें राजकारणाचे सिद्धान्त समजून देणें इत्यादि विविध व अपूर्व लेखनप्रकार त्यांच्या वाङ्मयांत आढळून येतात.

## व्यक्ति नव्हे शिक्षण-संस्था

अशा प्रकारें श्री. तात्यासाहेब केळकर ही एक व्यक्ति नसून ज्या संस्थेंत आधुनिक समाजाचा सर्वांगीण विचार केला जातो अशी ती एक शिक्षण संस्थाच होती, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. या शिक्षणसंस्थेंत दाखल होऊन आपापल्या बुद्धीच्या आवांक्याप्रमाणें शिक्षण घेण्यास कोणासच प्रतिबंध नसे. त्यांच्या घरीं जाण्यायेण्यास आणि त्यांच्याशी कोणत्याहि विषयाची चर्चा करण्यास कोणास प्रतिबंध नसे. बरें, तेवढेहि श्रम नको असतील तर तात्यासाहेबांना आपल्या ठिकाणीं, कोणत्या तरी समारंभाच्या निमित्तानें बोलावून त्यांचें उपदेशामृत ऐकण्याचें मनांत आणल्यास तोहि मार्ग सर्वांना सुलभ होता. संस्था लहान असो, मोठी असो, कार्यकर्ते प्रसिद्ध असोत अगर अप्रसिद्ध असोत, विषय गहन असो किंवा उथळ असो, तात्यासाहेबांचे विचार ऐकण्याची इच्छा ज्यांना ज्यांना असेल त्यांना त्यांना त्या निमित्तानें त्यांना पाचरण करून त्यांचे विचार काढून घेण्याची संधि केव्हांहि साधतां येणें शक्य असे.

## महाराष्ट्राची लवकर भरून न येणारी हानि

त्यांची राहणी साधी, वृत्ति निरलस, स्वभाव मनमिळाऊ व परोपकारी आणि सदोदित सत्कार्यांत गढून जाण्याची मनःप्रवृत्ति यामुळें तात्यासाहेबांच्या घरीं कोणासच केव्हांहि परकेपणा वाटत नसे. अशा प्रकारें राष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीची काळजी वाहून जन्मभर राष्ट्रकार्य करण्यांत गढून गेलेला राष्ट्रधुरीण, आपल्या अष्टपैलूपणाच्या प्रकाशाने वाङ्मयाचीं सर्व दालनें सुशोभित करणारा खंदा लेखक, विधायक कार्यक्रमाच्या अनेक योजना आंखून राष्ट्रीय कार्यांत अनेक कार्यकर्त्यांना नवीनवी दिशा दाखविणारा मार्गदर्शक, लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रकार्याची धुरा त्यांच्या पश्चात पंचवीस वर्षें स्वतः परिश्रमपूर्वक

वाहून महाराष्ट्राचा मोठेपणा स्वाभिमानपूर्वक सांभाळणारा टिळकांचा वारस आणि महाराष्ट्राच्या परंपरेतल्या व्यावहारिक राजकारणाचे गुण जन्मापासून अंगीं बाणलेला महाराष्ट्राचा सुपुत्र आज काळानें महाराष्ट्र-समाजांतून ओढून नेला यामुळें महाराष्ट्राची जी हानी झाली आहे तिची यथार्थ कल्पना आजच कोण करूं शकेल? तात्यासाहेब केळकरांच्या निधनानें महाराष्ट्राचें महाभूषण गळून पडलें. त्यामुळें महाराष्ट्राची जी महाहानि झाली आहे ती लवकर भरून येण्यासारखी नाही.

---

# अञ्जुली

**( धनुर्धारी-ता. १८ ऑक्टोबर १९४७ )**

क. तात्यासाहेब केळकर! तात्यासाहेबांच्या नांवाचा असा उल्लेख करतांना अंतःकरणाच्या वेदना इतक्या तीव्र होत आहेत कीं, सर्व बधिर होऊन जातें. रक्तामांसाच्या, नजीकच्या आप्तांच्या मृत्यूच्या वार्ता मी कांहींशा उदासीनपणानेंच ऐकल्या. पुढाऱ्यांच्या, लहानमोठ्या सार्वजनिक कार्यकर्त्यांच्या निधन प्रसंगींहि मला एवढा बधिरपणा आला नाहीं. पण कै. तात्यासाहेब—अंतःकरणांत केवढा कोलाहल माजतो—स्मृतींची एवढी गर्दी उसळते कीं, त्यांना शब्दरूपानें कागदावर उतरविण्याचा प्रयत्नच करवत नाहीं. मंगळवारीं सुमारें एक वाजतां मीं बातमी ऐकली, आणि आज गुरुवार सकाळपर्यंत, माझ्या सर्व कृति, आणि विचारहि कांहीं निश्चित रूप घेऊं शकत नाहींत. मीं फारच थोडें लिहितों, पण जेव्हां लिहितों तेव्हां त्याला संथ पण निश्चित गति असते. या वेळीं तसा मनाचा विश्वासच वाटत नाहीं. या अडीच दिवसांत तीस वेळां प्रयत्न करून कांहीं लिहिण्याचा हा माझ्या आयुष्यांतील पहिलाच प्रसंग आहे. वर्तमानपत्रीं जीवनांत गेल्या

५५७

२६। २७ वर्षांत मी मृत्युलेख अनेक लिहिले. ज्यांना पाहिलें नव्हतें अशां-बद्दलहि शब्दांची कृत्रिम कसरत केली, असल्यानसल्या आठवणी सांगितल्या, पण तात्यासाहेब आणि कैलासवासी—भावना बधिर होतात, त्या शब्दरूपच घेऊं शकत नाहींत. असा गेल्या ४०।४२ तासांचा अवधि गेला. आणि आतां बधिरपणाची संगति लावण्याचा मी प्रयत्न करूं शकत आहें.

* * *

तात्यासाहेबांचा मला प्रत्यक्ष परिचय जरी १९१९।२० सालचा असला तरी त्यांच्या साहित्याची मोहिनी मला ११।१२ सालापासूनच पडलेली होती. अवघ्या १२।१३ वर्षांच्या त्या वयांत साहित्य आणि साहित्यिक असल्या थोर कल्पनांचें जाळें मेंदूंत निर्माण झालें नव्हतें. पण त्या वेळींहि केळकरांचें लेखन मला आवडत असे, त्याची एक प्रकारची मोहिनीच माझ्यावर असे. त्यावेळीं माझे पूज्य बंधू कै. ती. माधवराव हे माझ्याकडून दररोज नित्य नियमानें कांहीं तरी लिहवून घेत. अक्षर चांगलें सुधारावें, भाषाहि पचनीं पडावी यासाठीं लहान मोठी पुस्तकें ते माझ्याकडून लिहवून घेत. सुमारें २।३ हजार छापील पृष्ठें अशा प्रकारें मीं त्यावेळीं नकललीं आहेत. दर आठवड्याचे केसरींतील अग्रलेख, स्फुटांपैकी कांहीं भागहि लिहवून घेतला जाई. केसरीच्या कांहीं अग्रलेखांचीं कात्रणें कै. बंधूंनीं ठेवलेली होतीं त्यांतीलहि कांहीं भाग ते लिहवून घेत. नकलनवीसाला बुद्धि चालवण्याचें कांहींच कारण नसतें. पण आमच्या या नकला–प्रकारांत आणखी एक विशेष होता; तो म्हणजे दिवसा लिहिलेल्या नकलेचा सारांश रात्रीं सांगणें; आणि त्यावर मग बंधूंनीं कांहीं माहिती देणें. भाषा आणि माहिती या दोन्ही दृष्टींनें कै. तात्यासाहेबांचें लिखाण मला या आमच्या कार्यक्रमामुळें आवडूं लागलें, एक प्रकारची मोहिनीच त्या साहित्याची माझ्यावर पडली. आणि अद्यापहि मेंदूचा शीण नाहींसा करून त्याला उत्तेजित करण्यासाठीं मी तात्यासाहेबांचें लिखाण मुद्दाम वाचतों.

* * *

कै. तात्यासाहेब यांचेबद्दल अशी माझ्या मनाची आगाऊच भूमिका तयार असल्यानें १९।२० सालीं त्यांचा प्रत्यक्ष सहवास मिळूं शकला हें मला अत्यंत भाग्याचें वाटतें. 'लोकसंग्रहा'च्या निमित्तानें हा सहवास लाभला. आणि माझ्या आयुष्यांतील तें पर्व संपल्यानंतरहि निरनिराळ्या प्रसंगानें पुढें अनेक वेळां सहवास घडला. आणि त्यामुळें तात्यासाहेबांचा मी निव्वळ भक्तच बनलों. माझ्याकडे कोणाचाहि फोटो नाहीं. फक्त तात्यासाहेबांचाच एक आहे. माझ्या वाङ्मयीन जीवनाचा तो आधार आहे. माझ्या लेखनांत जर कांहीं गुण असेल तर तो साहित्यसम्राटांच्या लेखनाच्या प्रकाशानें आलेखिलेला आहे. जीवनाकडे आणि त्यांतील अनेकविध परस्परविरोधी प्रश्नांकडे निर्भयपणें पाहून, त्या त्या प्रश्नांचा सर्व बाजूंनीं विचार करून, त्या प्रश्नाचें निश्चित मूल्य ठरवून तें सर्वांना सहजीं समजेल अशा उदाहरणांनीं सांगणें हा तात्यासाहेबांच्या साहित्याचा विशेष आहे.

आजचें साहित्य आणि प्राचीन साहित्य यांच्या स्वरूपांत फारच फरक पडलेला आहे. पूर्वकालांत जीवनाला जें स्थैर्य होतें तें आज राहिलेलें नाहीं. ही अस्थिरता येण्याला जीं अनेक कारणें आहेत त्यांत १९ व्या विसाव्या शतकांतील औद्योगिक, रासायनिक इत्यादि क्षेत्रांतील विविध शोधांनीं आणि त्यामुळेंच निर्माण झालेल्या राजकीय, सामाजिक, आर्थिक प्रश्नांनीं फारच हातभार लावलेला आहे. या शोधांचें स्वरूप आणि त्याचे जीवनावर होणारे इष्टानिष्ट परिणाम यांचें नीट आकलन झालें नाहीं तर कोणाही साहित्यिकाला आपल्या लेखनांत जीवनाचें प्रतिबिंब दाखविणें अशक्य आहे. आजच्या साहित्यिकांत ही दृष्टी असलेले लेखक फारच थोडे आहेत. आणि त्यांच्या ह्या अपुरेपणाचा परिणाम त्यांच्या साहित्यावर झालेला आढळून येतो. बहुंशी साहित्यिकांची सृष्टी अस्पष्ट, अधुरी आणि अगतिक व अश्रद्ध वाटते याचें कारण वरील कारणांत सांपडतें, ललितवाङ्मयापुरताच असा प्रकार नाहीं, तर हाच अनुभव राजकीय, सामाजिक, औद्योगिक, आर्थिक वा अन्य विषयावरील लेखनांतहि आढळून येतो. वरील अभावाचें आणखी एक स्वरूप सर्व लेखनांत आढळून येतें तें म्हणजे एकांगीपणा, अंधश्रद्धा आणि

त्याचे अनुषंगानें हेकटपणा. तात्यासाहेबांच्या वाङ्मयांत हे दोष अभावानेंच तळपतात. तात्यासाहेबांच्या प्रज्ञेला कोणत्याहि विषयांतील मूळ विचार आणि तत्त्व आकलन करण्याची एवढी प्रचंड शक्ति होती कीं, त्यांच्या लेखनांत ह्याचा प्रत्यय पदोपदीं येतो. आणि विशेष हें कीं या गोष्टी समजावून सांगतांना ते त्या अगदीं घरगुती सोप्या भाषेंत, आणि कोणाहि सामान्य माणसाच्या जीवनांत घडणाऱ्या प्रसंगांची उपमा–उदाहरणें देऊन सांगत असत. जुम्मा मशिदीच्या प्रचंड आवाराची कल्पना यावी म्हणून सहस्र-भोजनाला पुरेल एवढा विस्तार असें ते सांगतील, किंवा बर्फाच्छादित गिरि-शिखरांचें चित्र वाचकांसमोर उभे राहण्यासाठीं वांगीभातावर विखुरलेल्या खोबऱ्याच्या किसाचें उदाहरण देतील; आणि एखादा राजकीय गुंतागुंतीचा प्रसंग सामान्य घरगुती–कुटुंबांत निर्माण होणाऱ्या साध्या प्रश्नाचा दृष्टान्त देऊन उलगडून दाखवितील. तात्यासाहेबांचें लिखाण आपणास समजलें नाहीं असें सांगणारा वाचक शोधूनहि आढळणार नाहीं. त्यांचीं मतें न पटणारा वाचकहि त्या मतांबद्दल गूढांत असा कधींच राहिला नाहीं, राहणार नाहीं. त्यांच्या बाबतींतील मतभेदाचें आणि ते राजकारणांतच अधिक आहेत–विवेचन करण्याचें हें स्थळ नव्हे व प्रसंगहि नव्हे. तरीहि एवढें सांगितल्या-वांचून राहावत नाहीं की, तात्यासाहेबांच्या राजकीय मतांची अल्पहि बूज पुढाऱ्यांनीं केली असती तर आग्रहीपणा सोडून आजचा अल्पसंतुष्टपणा अवलंबतांना त्यांच्या मनाची होत असलेली कुचंबणा निश्चित कमी झाली असती.

तात्यासाहेबांनीं बहुतेक सर्व विषयांवर लेखन केलें. त्यांत एका स्वतंत्र प्रज्ञेचा सर्वत्रच आविष्कार होतो. आणि व्याख्यानांचे वेळीं तर हा अनुभव फारच येत असे. मला असें कित्येक प्रसंग आठवतात कीं, एखाद्या विषयांतील अधिकारी वक्त्याचें भाषण त्यांच्या अध्यक्षतेखालीं असावें, मुख्य वक्त्यानें आपला विषय आत्मीयतेनें विषद केलेला असावा. पण श्रोत्यांच्या चेहऱ्याकडे पाहिल्यास त्यांत असमाधानाची आणि अपूर्णतेची झांकच दिसावी. नंतर अध्यक्षीय समारोपांत तात्यासाहेबांनीं तोच विषय आपल्या

वैशिष्ट्यपूर्ण सोप्या भाषेंत आणि घरगुती दृष्टान्तांनीं थोडक्यांत समजावून द्यावा–श्रोते अगदीं समाधानानें आनंद व्यक्त करीत. त्यांचे दृष्टान्त किती प्रसंगपूर्ण पण साधे असत यासाठीं एकच उदाहरण पुरें आहे. लोकमान्य इंग्लंडहून परत आल्यावर त्यांना आणि तात्यासाहेबांना पुणेकरांतर्फे रे मार्केटांत मानपत्र देण्यांत आलें. त्या सभेंत मानपत्र स्वीकारतांना, लोकमान्यांचे बरोबरीनें आपला सन्मान करून घेतांना होणाऱ्या मनाच्या स्थितीचें वर्णन आणि लोकांच्या भावनेंतील भाव त्यांनीं मंडईच्या भाषेंत सांगितला–ते म्हणाले होते 'हा मानपत्राचा माल तुमी लई सस्ता लावलाय!' मंडईतील प्रसंग यापेक्षां अधिक जिव्हाळ्याच्या शब्दांत सांगतां येईल काय?

आणखी एक असाच व्याख्यान प्रसंग आठवतो. मोरोपंतांचे काव्यावर शिवाजीमंदिरांत व्याख्यान तात्यासाहेबांच्या अध्यक्षतेखालीं होतें. मोरोपंतांचे काव्य व्याख्यात्यांनी इतक्या रुक्षपणानें चर्चिलें कीं, आधींच अल्प असलेला श्रोतृवर्गहि पांगला. आणि जो थोडा अध्यक्षांचे समारोपाला राहिला तो समारोपाच्या रसभरित भाषणानें अगदीं आकंठ तृप्त झाला. मोरोपंती उपमा-दृष्टान्तांची छाननी, वैशिष्ट्य अनेकांनी अनेक सुभाषितें त्यांच्या काव्यांतून ग्रथित करून सांगिलेलीं आहे. पण त्या संग्रहदृष्टींत विविधता फारच थोडी; आणि वैदग्ध्य–दृष्टीहि कमीच. तात्यासाहेबांनीं मोरोपंती काव्यांतील कितीतरी नवीन स्थळें यावेळीं वाचकांपुढं मांडलीं. त्यांतील एक आतां आठवतें: दंडकारण्यावर मोरोपंतांनीं एक सुंदर उपमा दिलेली त्यांनीं सांगितली, ती–'लंकेनें ओढली जशी वेणी!' हिंदुस्थानचा नकाशा दृष्टीसमोर आणून ही उपमा पाहा, किती आनंद वाटतो.

असे अनेक प्रसंग व आठवणी सांगतां येतील. आणि तात्यासाहेबांचें असामान्यत्व आपल्या दृष्टींपुढें उभें करून समाधान मानतां येईल. पण कितीहि लिहिलें, सांगितलें तरी एक रुखरुख कायमच राहील कीं, तात्यासाहेब एवढे तर होतेच, पण आणखीहि कांहीं होते तें आपणास समजलें नाहीं, समजून घेण्याचा आपला प्रयत्न यशस्वी झाला नाहीं. तो त्यांच्या वाङ्मय सागराच्या मंथनानें साधेल का? तसा प्रयत्न मात्र प्रत्येकानें केला

पाहिजे, आणि तात्यासाहेबांचें ऋण फेडण्याचा मार्ग या सागरस्नानाच्या पुण्याईनेंच लाभेल. आज तात्यासाहेबांच्या आकस्मिक निधनानें बधिर झालेल्या भावनांना जागृत करण्याचा प्रयत्न फलदायी होत नाहीं. यापेक्षां अधिक लिहवतच नाहीं.

— गो. वा. पाध्ये

---

# महाराष्ट्राच्या भीष्माचार्यांचें अवसान

( विविध वृत्त, मुंबई. ता. १९ ऑक्टोबर १९४७ )

हिंदुस्थानचे एक थोर सुपुत्र आणि महाराष्ट्र शारदेचे कंठमणि श्री. नरसिंह चिंतामण केळकर यांनीं गेल्या मंगळवारीं पहांटेला आपली जीवन यात्रा संपविली. केळकरांच्या निधनाची ही वार्ता ऐकून महाराष्ट्रांतील प्रत्येक घर हळहळलें आणि प्राणोत्क्रमणासाठीं उत्तरायणाची वाट पहात शरपंजरीं पडलेल्या भीष्माचार्यांचें अवसान झाल्याचें वृत्त समजतांच त्यावेळच्या भारतवासीयांची जी मनःस्थिति झाली असेल, तशीच शोकाकुल मनःस्थिति केळकरांच्या या निधनवार्तेनें समस्त महाराष्ट्रीयांची झाली असें मी म्हटलें तर त्यांत किंचितही अतिशयोक्ति होईल असें मला वाटत नाहीं. कारण टिळकांच्या मृत्युनंतर भीष्माचार्यांप्रमाणेंच महाराष्ट्राच्या वडीलकीचा वारसा केळकरांकडे आला आणि भीष्माचार्यांप्रमाणेंच त्यांनीं तो अखेरपर्यंत प्रतिष्ठेनें पाळलाही. कौरवांची बुद्धिहीनता, संख्याबलाचा त्यांचा उन्मत्तपणा आणि तीव्र बंधुद्वेष यांच्यामुळें भीष्माचार्य जसे कौरवांपुढें निष्प्रभ झाले, तशीच अवस्था उत्तर आयुष्यांत महाराष्ट्रांत तात्यासाहेबांची झाली. पण भीष्माचार्यांप्रमाणेंच सत्याचा जय झालेला त्यांनाही अखेर पाहावयास सांपडला आणि शांतिपर्वाचें तत्त्वज्ञान मागें ठेवून ज्याप्रमाणें भीष्माचार्यांनीं आपली जीवनयात्रा कृतकृत्य होऊन संपविली त्याचप्रमाणें केळकरांनीं देखील महाराष्ट्राच्या बुद्धिजीवि वैशिष्ट्याचें अमोल वाङ्मय महाराष्ट्रासाठीं मागें ठेवून

आपल्या नश्वर देहाचा त्याग केला. म्हणूनच भीष्माचार्य निधन पावले त्या वेळीं आपला खरा हितकर्ता व ज्ञानवृद्ध कुलपुरुष आपल्याला कायमचा अंतरल्याचें दुःख जसें भारतवासीयांना झालें तसेंच दुःख महाराष्ट्रांतील सर्व आबालवृद्धांना केळकरांच्या निधनानें आज व्हावें हें साहजिकच आहे. महाराष्ट्रांतील एक आदरणीय ज्ञानमार्गी, बुद्धिवादी, थोर पुरुष केळकरांच्या निधनानें आज नाहींसा झाला आहे आणि महाराष्ट्राची बुद्धिनिष्ठ लढाऊ परंपरा उज्ज्वल ठेवणारा एक झुंजार आज महाराष्ट्राला कायमचा पारखा झाला आहे.

## महाराष्ट्रीयत्वाचें प्रतीक

पण केळकरांच्या निधनामुळें महाराष्ट्राला हळहळ वाटण्याचें कारण केवळ महाराष्ट्राची राजकीय परंपरा त्यांनीं कायम ठेवली होती अथवा त्यांच्या निधनामुळें ती आतां तुटून पडत आहे हेंच कांहीं नाहीं. वीरप्रसु महाराष्ट्र-भूमि असे झुंजार यापुढेंही निर्माण करील आणि ही परंपरा अबाधित राहण्याला कालही आतां अनुकूल आहे; तेव्हां ही हानि कांहीं फारशी जाणवण्याजोगी नाहीं. पण केळकरांनीं आपल्या सर्व आयुष्यभर अनेकविध व्यवसायांचा व्याप उभा करून महाराष्ट्राच्या राजकीय, साहित्यिक, वैचारिक आणि सांस्कृतिक जीवनांत जी वैयक्तिक दृष्ट्या भर घातली आणि त्या त्या सर्व ठिकाणीं आपल्या महाराष्ट्रीयत्वाचा जो खोल ठसा उमटविला तो ठसा उमटविणारा पुरुष अथवा वेगळ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे अस्सल महाराष्ट्रीयत्वाचें गेलीं चाळीस वर्षें उभ्या हिंदुस्थानपुढें उभें असलेलें तें जिवंत चालतें बोलतें प्रतीक आतां नष्ट झालें आहे आणि ही कल्पना मात्र निःसंशय अंतःकरण व्यथित करणारी आहे! केळकरांच्या निधनाचें दुःख महाराष्ट्राला विशेष तीव्रतेनें जाणवत आहे त्याचें कारण हेंच आहे. केळकरांच्या या प्रतीकात्मक जीवनाचें आज निःपक्षपातीपणानें आणि स्थूल मानानें अवलोकन केलें तर राजकारण, समाजकारण, साहित्य आणि पत्रपांडित्य या सार्वजनिक जीवनाच्या चार प्रमुख क्षेत्रांत त्यांनी

केलेली कामगिरी महाराष्ट्राच्या बुद्धिनिष्ठ लढाऊ आणि तर्ककर्कश विचार-सरणीला भूषणभूत होण्याजोगीच होती असें दिसून येतें. उभा देश गांधीवादाच्या आहारीं जाऊन गांधींच्या आध्यात्मिक आणि अतिमानुषी राजकारणाचें ढोल बडवीत स्वतःची आत्मवंचना करून घेत असतां केळकरांनीं महाराष्ट्रांत या विवेकभ्रष्ट राजकारणाविरुद्ध बंडाचा झेंडा उभारून महाराष्ट्राची पावनखिंड अखेरपर्यंत लढवीत ठेवली. गांधी-वादाच्या झंझावाताने रुद्रावतार धारण करून देशांत तुफान उडवून दिलें असतां आणि या तुफानी भोंवऱ्यांत सांपडून महाराष्ट्रांतील कांहीं प्रतिष्ठित कार्यकर्ते देखील प्रवाहपतित झाले असतां त्या तुफानी दर्यांत दोन खारटपणाच्या गटंगळ्या खावूनही केळकरांनीं महाराष्ट्राच्या खडकावर एखाद्या दीपस्तंभाप्रमाणें अचल राहून इषाऱ्याची आपली मशाल पाजळत ठेवली. या झंझावातांत सांपडून भारताची नौका आज दुभंग झाली असली तरी तो दोष नौकेच्या कर्णधारांचा होय; दीपस्तंभाचा नव्हे. केळकरांच्या कार्याची थोरवी झंझावातांत निश्चलपणें उभें राहाण्याच्या या खंबीरपणांतच होती. आणि इतरांच्या अविचारचें प्रात्यक्षिक आज समोर दिसत असलें तरी ह्या थोरवीला त्यामुळें किंचितहि कमीपणा येत नाहीं. कलुषा कबजीच्या राजद्रोही कारस्थानांत महाराष्ट्राची वाताहात उडून मोंगल फौजांनीं महाराष्ट्र घेरला असतां वनवास पत्करूनही मराठेशाही जिवंत ठेवणाऱ्या राजारामछत्रपतींची ही परंपरा होती आणि त्या उज्वल परंपरेचे वैशिष्टय भारताच्या राजकारणांत केळकरांनींच प्रकट केलें.

## साहित्यसम्राट

राजकारणांप्रमाणेंच समाजकारण, साहित्य आणि पत्रपांडित्य या सार्व-जनिक जीवनाच्या क्षेत्रांत देखील केळकरांनीं आपली कामगिरी कोणाही कर्तबगार व्यक्तीला गौरवास्पद वाटेल अशा रीतीनें बजावली आहे. त्यांचा चतुरस्रपणा, त्यांचा बहुश्रुतपणा, त्यांची विवादकुशलता, त्यांची विद्वत्ता आणि त्यांच्या लेखणीतील रसाळपणा यांच्या योगानें त्यांनीं मराठी पत्रव्यवसायाला एक नवी प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आणि त्याची उप-

युक्तता अनेक पटीनी वाढविली. सामाजिक प्रगतीला आणि समाजसुधारणेला; त्यामुळेंच केवढी तरी मदत झाली. तथापि या व्यवसायांत व कार्यांतही त्यांनी जनतेच्या भावनाना कौल न लावतां नव्या सुधारणांची इष्टानिष्टता तिच्या नजरेसमोर साकल्यानें मांडून या सुधारणांचें पाऊल खंबीरपणें पण निश्चितपणें पुढें पडण्यास मदत केली. भावनाशील प्रचारांतील एककल्लीपणा, आत्यंतिकपणा अथवा दुराग्रह याचें तात्यासाहेबांच्या लेखणीला अपथ्य होते आणि त्यामुळेच त्यांनीं ज्या ज्या गोष्टींचा पुरस्कार केला त्या त्या गोष्टींचा जनतेनें केलेला स्वीकार टिकाऊ ठरला. या दोन्ही ठिकाणी महाराष्ट्राच्या बुद्धिप्रामाण्यवादी मनोवृत्तीचाच आविष्कार केळकरांकडून झाला असे म्हणण्यांत मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं. तथापि राजकारण, पत्रव्यवसाय व समाजकारण या त्यांच्या कार्यक्षेत्राव्यतिरिक्त केळकरांचें नांव व त्यांची स्मृति महाराष्ट्रांत चिरकाल आणि अमर राहील असे त्यांचे खरें व भरींव कार्य साहित्यक्षेत्रांतच झालें. मराठी साहित्यांतील असें एकहि दालन शिल्लक राहिलें नाहीं कीं जिथें प्रवेश केल्यानंतर या नरसिंहाला 'स्वयमेव मृगेंद्रता' लाभली नाहीं. तत्त्वज्ञान, निबंध, नाट्य, कथा, काव्य आणि विनोद हे साहित्यांतील प्रांत केळकरांच्या लालित्यमय लेखणीनें समृद्ध व सुपीक केले. निधनापूर्वी कांहीं काळ केळकरांनीं एका मासिकासाठीं एक लेख लिहावयास घेतला होता. ज्या मासिकासाठीं त्यांनीं हा लेख लिहावयास घेतला होता, त्या मासिकाचें नांव आणि त्यांच्या अखेरच्या लेखाचा त्या नांवाशीं जडलेला संबंध हा योगायोग मला मोठा सूचक वाटतो. कारण हा लेख केळकरांनीं पुण्याच्या वाङ्मय-शोभेसाठीं लिहावयास घेतला होता. लेखनाच्या ज्या अनिवार हौसेनें केळकरांनीं केळकरांनीं प्रथम सार्वजनिक जीवनांत प्रवेश करून आपल्या वाङ्मयसेवेला प्रारंभ केला, ती त्यांची वाङ्मयसेवा मराठीची वाङ्मय-शोभा ठरली. अर्थात केळकरांच्या लेखनाच्या समाप्तीचा संबंध वाङ्मयशोभा या नांवाशीं येऊन ती समाप्ति अशा अर्थपूर्ण संकेतानें व्हावी, हा योगायोग खरोखरच उल्लेखनीय नाहीं काय?

# त्रिवेणी संगम

आधुनिक महाराष्ट्राच्या वाङ्मयप्रभूंनीं आपल्या लेखणीच्या वैशिष्ट्याचीं अनेक लेणीं मराठी सारस्वतांत खोदलीं आणि मराठी मनोवृत्तीचे अनेक नमुने त्यांत कोरले. पारतंत्र्यानें विव्हळ झालेल्या मराठी मनाची तीव्र तळमळ आणि उसळ्या घेणारें तेज शिवरामपंत परांजप्यांच्या वाङ्मयांत आपल्याला पहावयास सांपडतें. चमत्कृति, कल्पनाविलास आणि बुद्धीचापल्य यासाठीं श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचें नांव प्रथम आठवतें. खाडिलकरांच्या साहित्यांत मराठी कडवेपणा प्रत्ययाला येतो; वामनराव जोशांच्या वाङ्मयांत मराठीच्या तत्त्वजिज्ञासुवृत्तीचें दर्शन होतें. पण महाराष्ट्राची रसिकता, उच्च अभिरुचि आणि सुसंस्कृतपणा यांचा मनोहर संगम झालेला जर कुठें पाहावयास सांपडत असेल, तर तो एकट्या केळकरांच्याच वाङ्मयांत होय ही गोष्ट कोणालाही कबूल करणें भाग आहे. या कारणामुळेंच त्यांना मराठी साहित्यांत आपलें साम्राज्य निर्माण करतां आलें आणि साम्राज्यविनाशाच्या व मूर्तिभंजनाच्या या युगांत देखील तें आतांपर्यंत अखंड आणि अबाधित राहूं शकलें. केळकरांचें जीवन हें अशा प्रकारें व्यतीत झालें आहे. महाराष्ट्राची त्यांनीं केलेली सेवा सर्वांगीण आणि सर्वस्पर्शी आहे. असा सेवातत्पर, प्रामाणिक, उद्यमशील, अष्टावधानी आणि अष्टपैलू कार्यकर्ता महाराष्ट्राला लाभला हें महाराष्ट्राचें भाग्य होतें; म्हणूनच केळकरांच्या या अवसानप्रसंगीं कोणत्याही क्षुद्र मतभेदांना, मनोविकारांना थारा न देतां, झालें गेलें तें सर्व ब्रह्मार्पण, या भावनेनें मी त्यांच्या स्मृतीला सादर वंदन करतों.

# चित्रमय जगत्.

( नोव्हेंबर १९४७ )

[ केळकर आतां आपल्यांतून गेले याबद्दल महाराष्ट्राला अत्यंत दुःख होतें. घरांतील वडील माणूस जावा इतकें दुःख त्यांच्या मृत्यूमुळें महाराष्ट्राला झालें आहे. अडीअडचणीला केळकरांचें छत्र हें उपयोगी पडत असे. तें छत्र आज गेलें. त्यामुळें केळकरांचें स्मरण पदोपदीं झाल्यावांचून रहाणार नाहीं. ]

ता. १४ ऑक्टोबर १९४७ रोजीं मंगळवारीं सकाळीं श्री. तात्यासाहेब केळकर यांचें देहावसान झालें हें वृत्त नमूद करतांना आम्हांस अत्यंत वाईट वाटत आहे. २४ ऑगस्ट १८७२ रोजीं तात्यासाहेबांचा मोडनिंब येथें जन्म झाला. विश्वविद्यालयीन शिक्षण पुरें झाल्यावर त्यांनीं थोडेफार दिवस वकिली केली आणि नंतर लो. टिळकांच्या बोलावण्यावरून ते 'केसरी' कचेरींत प्रविष्ट झाले. त्यांचें सारें जीवन 'केसरीं' त गेलें. 'केसरीं' त त्यांचें प्रौढ जीवन सुरू झालें, वाढलें व समाप्त झालें. त्या जीवनाबरोबर त्यांची लेखणी व त्यांची कीर्ति वाढ पावली. इतक्या एकनिष्ठेनें एकाच संस्थेंत राहिलेल्यांची उदाहरणें फार क्वचित सांपडतील. लोकमान्य टिळकांचें सान्निध्य, 'केसरी' पत्राचें साहचर्य आणि महाराष्ट्राची परंपरा ही केळकरांना लाभली व त्यांच्या अंगच्या गुणांचा विकास होत गेला. सार्वजनिक जीवनांत व्यक्तिचा विकास होत गेला तरी व्यक्तिच्या गुणदोषांची ठेव ही जमेस धरून भागत नाहीं. टिळक, केसरी व महाराष्ट्र यांचें अधिष्ठान लाभलेल्या कमी व्यक्ति महाराष्ट्रांत नव्हत्या. त्या सर्वच व्यक्ति केळकर झाल्या नाहींत. तेव्हां केळकरांत असे गुण होते कीं, ज्या गुणांच्या जोरावर केळकरांनीं आपलें व्यक्तिमत्त्व प्रकट केलें.

केळकर हे प्रवाहपतित गृहस्थ असते, तर ते कधींही मान्यता पावले नसते. जीवनांत संघर्ष आहे व तो संघर्ष केल्याशिवाय जीवन हें पूर्ण विकसित होत नाहीं. केळकर हे महत्त्वाकांक्षी होते; पण वाटेल ती किंमत देऊन आपलि महत्त्वाकांक्षा फलद्रूप करावी अशी त्यांची महत्त्वाकांक्षा नव्हती.

स्वतःचे तत्त्वज्ञान व स्वतःची ठेवण हीं अबाधित राखून त्यांना मोठ व्हावयाचें होतें. परिस्थितिप्रमाणें बदलणारांना उच्च पदाची प्राप्ती होते. पण त्यांत मनाची बोंचणी कायम रहाते. केळकरांना एवढें तरी समाधान खास होतें कीं, आपण स्वतःची प्रतारणा केली नाहीं.

१९२० सालीं जर ते गांधींचे व कॉंग्रेसचे अनुयायी झाले असते, तर कॉंग्रेसमधील अष्टोपभोग त्यांना लाभले असते. ते कॉंग्रेसचेच अध्यक्ष झाले असते. या ऐश्वर्याचा त्याग करण्यास कमी निष्ठा लागत नाहीं. राजकारणांत त्यागाचें खतपाणी घातलें म्हणजे सामान्यतः व्यक्तिचा जीवनवृक्ष फळा-फुलानीं बहरतो. देशाकरतां त्याग तर करायचा, पण भोगाचाही त्याग करायचा, ही गोष्ट सामान्य नाहीं. केळकरानीं आपल्या जीवनाची तार कॉंग्रेसच्या जीवनाशीं जोडून दिली असती, तर त्यांना कोणतेंहि पद दुष्प्राप्य नव्हतें.

केळकरांना गांधींचें तत्त्वज्ञान व गांधीचें जीवन आकलन झालें नाहीं हें दुर्दैव आहे. त्या तत्त्वज्ञानांतील गुणांपेक्षां त्यांना दोषच अधिक दिसत. वास्तविकपणें साहित्तिकाच्या दृष्टीला जीवनांत जे भव्य, उदात्त व शाश्वत आहे तें दिसावें. सामान्य व्यक्तीला ती भव्यता दिसली नाहीं तर आश्चर्य नाहीं. पण केळकरांनाही त्या तत्त्वज्ञानाचें दर्शन झालें नाहीं हें देशाचें दुर्भाग्य आहे. रविंद्रनाथ टागोरासारखा तत्त्वज्ञानी साहित्यिक हा सुरवातीला गांधींना विरोधच करीत होता; पण पुढें त्यांची वृत्ति बदलली. पण केळकरांसारख्या साहित्यिकाच्या बाबतींत आमची अपेक्षा खोटी ठरली. राजकीय दृष्ट्या गांधींचें पुढारींपण त्यांना मान्य झालें नसतें तर त्यांत वाईट वाटण्याजोगें कांहीं नव्हतें. पण तात्त्विक दृष्ट्याही गांधी त्यांना पटले नाहींत याचें मात्र वाईट वाटतें. केळकरांचे जीवन हें समन्वयविशिष्ट होतें. केळकरांच्या जीवनाचें वैशिष्ट्य काय असा जर मला कोणी प्रश्न केला तर 'समन्वय' हेंच सांगतां येईल. अशा वृत्तीच्या केळकरांना गांधी व कॉंग्रेस आकर्षण करूं शकली नाहीं, हा परस्परांचा दोष नाहीं असें कोण म्हणेल?

टिळक व आगरकरांच्या भांडणावरून केळकर म्हणत कीं, या दोघांची शक्ति एकत्र झाली असती, तर महाराष्ट्र केवढा प्रबळ झाला असता? केळकरांच्याबद्दल हेंच म्हणतां येणार नाहीं का? महाराष्ट्र व काँग्रेस या वादांत केळकरानीं केसरी व टिळकांची पुण्याई इरेस घातली नसती तर केवढी तरी शक्ति वांचली असती. आज महाराष्ट्रांत निर्माण झालेली कटुता टाळण्याचें केवढें प्रचंड कार्य केळकरांनीं केलें असतें!

म. गांधींच्या तत्वज्ञानाशीं सहमत नसणारे काँग्रेसमध्यें काय कमी लोक आहेत, त्यांना गांधींच्या सत्य–अहिंसेपेक्षां सत्याग्रहाची मातब्बरी अधिक वाटते. ज्या कौन्सिल–वादाचें एवढें महाभारत करण्यांत येतें, तो वाद पहिल्या तीनच वर्षांत गतप्राण झाला; तेव्हां तात्त्विक किंवा व्यावहारिक दृष्ट्या काँग्रेसमधें अशा कोणत्या घाणीचा बुजबुजाट झाला आहे कीं, इतरांनीं नाकाला फडकीं लावून दूर सरावें?

पण केळकर व त्यांचे सहकारी एक चुकीचा समज करून घेऊन काँग्रेसशीं लढत राहिले. लो. टिळकांचें राजकारण मारण्याकरितां गांधी व काँग्रेस उद्युक्त झाली आहे असा समज त्यांनीं जो करून घेतला, त्यामुळें ते काँग्रेसपासून फटकून राहिले. त्याचा परिणाम काय झाला? देशानें स्वातंत्र्यापर्यंत मजल मारली आणि जे विरोधक होते ते जागच्या जागीं राहिले.

केळकरांच्या स्वभावांत ध्येयवादाला स्थान नव्हतें. काँग्रेसच्या ध्येयवादाचें एक वेळ राहो; पण हिंदुसभेच्या ध्येयवादाशीं तरी ते कुठें तद्रूप झाले? सावरकरांचा कडवा हिंदुत्ववाद केळकरांच्यात नसल्यामुळें त्याहि संस्थेच्या द्वारां त्यांना क्रांती करता आली नाहीं. याचें कारण एकच आहे. केळकर हे ध्येयवादापेक्षां व्यवहारवादी अधिक होते. त्यांना आकाशांत भराऱ्या मारतां येत नव्हत्या. प्रत्यक्षांत जें काय करतां येईल तें करण्याकडे त्यांची प्रवृत्ती असे या वृत्तींत श्रद्धेला स्थान कमी असतें. उच्च ध्येयाकरतां मनुष्य श्रद्धावान् बनतो. पण जो आपल्या मर्यादा ओळखून वागतो व रहातो, त्याला श्रद्धेची जरूरी कशाला लागते? केळकरांना आपल्या मर्यादांची पुरेपूर जाणीव असल्यामुळें ते कधींहि निराश किंवा खिन्न झाले नाहींत त्यामुळेंच त्यांच्या

महत्वाकांक्षेला मुरड पडली व ते आत्मसंतुष्ट राहिले. त्यांच्या दृष्टीनें त्यांचें जीवन हें खरोखर यशस्वी झाले. फार मोठी आकांक्षा नसली म्हणजे निरुत्साही किंवा निराश होण्याचे प्रसंग येत नाहींत. केळकरांनीं आपल्या मर्यादा ओळखल्या होत्या हेंच वैशिष्ट्य होते. त्यानीं पुढारींपणाची कधी हांव धरली नाहीं. पण पुढारीपण घेण्याचे प्रसंग आले तर त्याला पाठ फिरवली नाहीं. आपल्या मर्यादेंत राहून ते पुढारीपण करीत व तें करीत असतांना प्रामाणिकपणें वागत. ते पुढारीपणाच्या मागें जात नसत, पुढारीपण त्यांच्या मागें येत असे.

केळकरांनी टिळकांच्या आयुष्यांतील चढउतार पाहिले, अनुभवले. केळकरांच्या प्रकृतीला व वृत्तीला साजेसा असा अनुकूल काल टिळक सहा वर्षांच्या कारावासांतून सुटल्यानंतर आला. १९१४ ते १९२० पर्यंत टिळकांनीं जें राजकारण केलें, त्यांत केळकर सर्वस्वी रंगले. त्यांच्या राजकीय जीवनांत तोच काल अत्यंत अनुकूल होता. होमरूलची चळवळ, विलायतें-तील शिष्टाई, सरकारबरोबर सनदशीरपणें केली जाणारी लढत यांत ते जितका रस घेत, तितका त्यांना पूर्वींच्या किंवा नंतरच्या चळवळींत घेतां आला नाहीं. गोखल्यांच्याबरोबर टिळकांचे चालणारें वाग्युद्ध किंवा सुरतेची लढत त्यांना बिलकूल पसंत नसे. ते टिळकांच्या राजकीय जीवनाशीं सर्वस्वी एक-रूप होऊं शकले नाहींत. मंडालेहून टिळकांनीं केळकरांना पाठविलेल्या पत्रावरून हेंच दिसतें. याचें कारण केळकरांच्या वृत्तींत सौजन्य अधिक होतें. त्यांना कोणतिही आत्यंतिक वृत्ती मान्य नसे. टिळकांची लढाऊ वृत्ती त्यांना पसंत असे; पण गोखल्यांच्या संस्कृतीचें वेष्टन त्याला असावें असें त्यांना वाटे. 'अति सर्वत्र वर्जयेत्' हा त्यांचा जीवन-सिद्धांत होता. गोखले-टिळक वादांत कित्येक वेळां केळकरांची मोठी कुंचबणा होई. त्यांचें हृदय गोख-ल्यांकडे व शरीर टिळकांकडे अशी कांहीं काल तरी त्यांची ओढाताण होत असे.

केळकरांच्याकडे राजकीय पुढारी म्हणून पहाणें आणि त्यावरून त्यांचीं योग्यता ठरविणें चूक आहे. टिळकांच्यांत ते पुढारीपणाचे गूण होतें; पण केळकरांच्यांत नव्हते. राजकारणांतील धकाधकी, राजकारणांतील क्लेश कष्ट

झेपण्याइतकी त्यांची प्रकृती कणखर नव्हती. केळकरांचा मोठेपणा पुढारी-पणाच्या कसोटीवर ठरविण्याचा कोणी प्रयत्न करूं नये. त्यांच्या मोठेपणाला अन्य कारणें होतीं. सौजन्य, सत् प्रवृत्ती, सात्त्विकता हे त्यांच्या जीवनाचे आधार होते. त्यांत मधून मधून प्रमाद होत; पण ते लवकर स्वतःला संभाळून घेत.

पण या सर्वांपेक्षांही त्यांच्या मोठेपणाला त्यांची लेखणी कारणीभूत झाली. विद्येचें त्यांना व्यसन होतें आणि लेखनाचें वेड होते. टिळकांनीं बोलावें आणि केळकरांनी त्यांचें हृद्गत 'केसरी' द्वारा प्रकट करावें. अंतःकरणें खडबडून जागीं करण्याचा रुद्रवीणा त्यांच्या हातांत नव्हता हें खरें. शंकराचें तांडवनृत्य त्यांना करवतां येत नव्हतें किंवा कर्णभेदी डमरूचा खणखणाट त्यांच्या लेखणींत नव्हता. त्यांच्या हातांत शारदेचा वीणा होता आणि त्या वीण्यांतून ते मृदु मंजुळ स्वर काढीत होते. क्वचित् एकादा कर्कश सूर त्यांतून निघे आणि अशा सुरामुळेंच त्यांच्यावर गहजब होई; पण त्यांच्या लिखाणांतला रस, वीर, रौद्र किंवा भयानक नव्हता, शांत रसाकडेच त्यांची प्रवृत्ती होती. केळकरांच्या लिखाणांत उपमा हा हुकमी पत्ता होता. अत्यंत मार्मिक उपमा केळकरानींच द्याव्यात. जीवनांतल्या इतर अंगांत जरी ते अतिरेकी नसले तरी प्रतिपक्षावर झोंड उठवतांना त्यांचा समतोलपणा सुटे व गैरलागू, अतिरंजित अशाहि उपमा ते कधीं कधीं देत. शिवरामपंत परांजपे हे ज्याप्रमाणें वक्रोक्तींत बहाद्दर होते, तसे केळकर उपमांत बहाद्दर होते. केळकरांच्या उपमांचा संग्रह कोणी केला तर तो संग्रहणीय होईल.

केळकर हे टीकाकार होते. राजकारणांत टीका करावीच लागते. जो टीका करूं शकत नाहीं तो राजकारणांत नांदूं शकत नाहीं. राजकारणांत आल्यामुळें ते टीकाकार झाले का टीकेनें राजकारणाचा आश्रय घेतला हें सांगणें कठीण आहे. पण टीकाकार म्हणून केळकरांची योग्यता फार मोठी आहे. त्यांच्या लिखाणांत शुद्धता, सोपेपणा, डौल, गौरव वगैरे आहे. त्यांच्या लिखाणानीं जरी खळबळ उडविली नाहीं, तरी वाचणारांना आपल्याच मनांतलें हे लिहीत आहेत असें वाटे. वास्तववादी लिखाण हें त्यांचे वैशिष्ट्य होतें, आणि म्हणून ते लोकप्रिय झाले.

त्यांच्या लेखणीला कोणताहि विषय अगोचर नव्हता—नाटकें, कादंबऱ्या, लघुकथा, काव्य, टीकालेख, तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र, घटनाशास्त्र, ऐतिहासिक संशोधन, आर्थिक प्रश्न, धार्मिक प्रश्न, गीता, ज्ञानेश्वरी, लघुनिबंध, संगीत वगैरे अनेक विषयांवर ते लिहीत. आपण जें वाचलें त्याचा ते कंजुषाप्रमाणें संग्रह करीत नसत. 'सर्वांसीं शिकवावें' असा त्यांचा कल असे. अमुक एक विषय गहन आहे आणि त्यावर आपण कसें लिहावें असा विचार त्यांना शिवला नाहीं. त्यांच्या वाचनाची व लिखाणाची लांबी प्रदीर्घ होती; पण खोली मात्र फार नव्हती. सतत वाचावें व सतत लिहावें यांतच त्यांना आनंद वाटे. त्यांच्या जीवनांत यापेक्षां आनंद दुसरा नव्हता.

बडोद्याच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष असतांना साहित्याची व्याख्या त्यांनीं 'सविकल्प समाधि' अशी केली होती. तें समाधिसुख तात्यासाहेब लुटत असत. पण त्यांच्या लिखाणांतून हें समाधिसुख निदान अलीकडे फारसें लुटता येत नसे.

केळकरांना साहित्यसम्राट म्हणण्यांत येतें. साहित्यिकाला लागणारा रसिकपणा, सहृदयता, वात्सल्य व कारुण्य हें त्यांच्यांत होतें. पण त्यांच्या जीवनांत नसणाऱ्या ध्येयवादाची बाधा त्यांच्या लिखाणाला झाल्याशिवाय राहिली नाहीं. ज्या साहित्यिकाची परिणती तत्त्वज्ञानांत होत नाहीं, त्याच्या जीवनांत अपुरेपणाच रहातो. साहित्यिकाचा विकास होत होत तो अशा एका प्रदेशांत जातो कीं, जेथें रागद्वेष नष्ट होतात, प्रेम हा जीवनाचा धर्म होतो, समभावानें वृत्ति प्रस्फुरित होते, अंतःकरणें पाझरूं लागतात; आणि या शान्त विश्वापलीकडील ध्वनि ऐकण्याकरितां कान आतुर होतात. सामान्य माणसाच्या दृष्टीला बुद्धीला न दिसणारीं व न उलगडणारी कोडीं जेव्हां तो उलगडून सांगूं लागतो तेव्हांच त्या लिखाणाला काळाचें बंधन रहात नाहीं. सविकल्प समाधींतून निर्विकल्प समाधींत तत्त्वज्ञसाहित्यिक प्रगती करीत असतो व परिपूर्ण होत असतो.

तात्यासाहेब साहित्यसम्राट होते हें खरें आहे, पण ते आपल्या काळांतले वा आपल्या प्रांताचे सम्राट होते. त्यांच्या लिखाणाची पृष्ठसंख्या फार मोठी

आहे. ती त्या सम्राटाची संपत्ति आहे. अनेकजण अनेक विक्रम करतात. कोणी तुरुंगात जाऊन, कोणी क्रीडाक्षेत्रांत उच्चांक गांठून, कोणी हिमालयावर स्वारी करून उच्चांक गाठतात. केळकरांनी लिखाणाचा उच्चांक गाठला आहे. त्यांच्याइतकी एकटाकीं व एक हाती लेखनसंपत्ती आधुनिक काळांत कोणीच कमावली नाहीं. निरलसता हा त्यांचा प्रधान गुण होता. ते झटपट व इतके अमूप लिहीत कीं, असा लेखक अलीकडे तरी दाखवतां येणार नाहीं.

राजकारण व साहित्य हे केळकरांच्या जीवनाचे पैलू होते. पण केळकरांनीं विधायक कार्य काय केलें हा प्रश्न कोणी विचारतील. 'केसरी' संस्थेला आजचें वैभव, आजचें ऐश्वर्य व आजचें स्थैर्य कोणा एका व्यक्तिमुळें प्राप्त झालें असेल तर तें केळकरांच्यामुळें झालें हें कोणीहि कबूल करील. ह्या स्थैर्या-करितां त्यांना कमी क्लेश व कष्ट पडले नाहींत. इतर बाबतींत कोणाची कांहीं मतें असलीं तरी 'केसरी' संस्थेच्या भव्यतेला केळकर कारणीभूत झाले याबद्दल कुणाचें दुमत होणार नाहीं. त्यांनीं विष्णुशास्त्री चिपळूणकरां-प्रमाणें, न्यायमूर्ति रानड्यांप्रमाणें किंवा गोखल्याप्रमाणें नवीन संस्था स्थापिल्या नाहींत हें खरे आहे. पण त्यांनीं एकच संस्था हातीं घेतलीं, वाढवली व तिचा विस्तार केला. या प्रचंड वृक्षाखालीं कितीतरी संस्था नांदतात अगर नांदू शकतात. केळकरांच्या जीवनाचें जिवंत स्मारक म्हणजे 'केसरी' संस्था आहे. त्या संस्थेचें लालनपालन व संगोपन त्यांनी एखाद्या प्रेमळ मातेप्रमाणें डोळ्यांत तेल घालून केलें.

केळकरांना आपण 'केसरी'चे धनी आहों असें कधींच वाटलें नाहीं. ते सर्वांशीं बरोबरीच्या व प्रेमाच्या नात्यानें वागण्याचा प्रयत्न करीत. अधिका-राची जाणीव त्यांना कधीच नव्हती.

केळकरांनी जरी कोठल्या संस्था स्थापन केल्या नाहींत, तरी स्थापन झालेल्या संस्थाना त्यांनी नांवारूपाला आणलें. पुण्यांतील व बाहेरील अनेक संस्थाचे ते अध्यक्ष किंवा सभासद असत. त्यांच्या सल्लयाचा, त्यांच्या नावाचा त्यांनी अनेक संस्थांना फायदा करून दिला ही त्यांची विधायक कामगिरीच होती. न्यायमूर्ति रानडयांच्या नंतर इतक्या संस्थांशीं संबंध असणारा पुरुष

केळकरांच्याशिवाय दुसरा दाखवितां येणें कठीण आहे. कोठलाही समारंभ असो, केळकरांना अध्यक्ष व्हा म्हटलें व त्यांनीं नाकारलें असें होत नसे. नाहीं म्हणणें हें त्यांच्या संकोची स्वभावाला शक्यच नसे. इतका लोकसंग्रह हेंच त्यांच्या लोकप्रियतेचें बीज होतें.

वृत्तपत्रकार म्हणून त्यांचा अधिकार व योग्यता ही स्वयंसिद्ध आहे. साहित्यिक व वृत्तपत्रकार असा समन्वय त्यांच्यांत झाला होता. त्यांना साहित्यसम्राट म्हणण्याऐवजीं वृत्तपत्रसम्राट म्हटलें तर अधिक योग्य होईल. किती तरी वृत्तपत्रकारांना केळकरांपासून स्फूर्ति मिळाली आहे !

केळकर हे हळवे होते, भावना प्रधान होते, त्यांच्यावर कोणी टीका केली तर ती त्यांना अस्वस्थ करी. पण इतक्या टीकेचे घाव सहन करण्याला कमी चिवटपणा लागत नाहीं. १९२० ते १९३५ सालांत केळकरांनी जितकी टीका लोकांवर केली, तितकी लोकांनीहि केळकरांवर केली. अर्थात ही टीका व्यक्तिवर नसे, मतावर असे. ह्या टीकेमुळें कोणी कोणाचें परिवर्तन करूं शकला नाहीं.

सौजन्य, उपकारबुद्धी, सभ्यता, समन्वय, जगा व जगवा हें सूत्र, व्यवहार वास्तववाद हें त्यांच्या जीवनाचें यथातथ्य वर्णन होईल. पण या सर्व गुणाबरोबरच ते भाग्यशाली होते हें विसरून चालणार नाहीं. कोणी कांहींही म्हटलें तरी जीवनांत भाग्याला प्रमुख स्थान आहे हें सत्य आहे. केळकरांचे कौटुंबिक जीवन आदर्श होतें. कांहीं खिन्नतेचे व दुःखाचे प्रसंग त्यांच्यावर आले नाहींत असे नाहीं. पण त्यांच्या जीवनाचा हेवा वाटावा इतके ते सुखी होते. एकदां केळकर म्हणाले, 'मी कुठल्याच गोष्टींची चिंता करीत नाहीं म्हणून सुखीं आहे.' पण चिंता करा म्हटल्यानें करतां येत नाहीं. चिंतेच्या डोंगराखालींच कित्येकांची जीवनें चिरडून नष्ट होतात. त्यांचीं प्रकृतीहि अखेरपर्यन्त उत्तम होती. एकदांच त्यांना 'नागीण' नांवाची व्यथा जडली होती. पण वय उताराला लागलें म्हणजे खाण्यापिण्यांत पथ्य, अपथ्य आणि निसर्गोपचार जो करावा लागतो तो करण्याचा प्रसंग त्यांच्यावर कधींच

आला नाहीं. चार चौघां सारखा त्यांचा आहारविहार असे. त्यांना विद्ये-शिवाय व्यसनच नव्हतें.

सार्वजनिक जीवनांत १९३० सालपर्यंत त्यांना पिछेहाट ठाऊक नव्हती. कॉंग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य, कॉंग्रेसचे सेक्रेटरी, असेम्ब्लीचे मेंबर, राउंड टेबल परिषदेचे सभासद, हिंदुसभेचे अध्यक्षपद अशीं अनेक मानाचीं स्थानें त्यांना प्राप्त झालीं. याहीपेक्षां त्यांची चढत्या श्रेणीनें प्रगति झाली असती. ते महाराष्ट्रीय होते म्हणून मागें पडले हें म्हणणें असत्य आहे. डॉ. आंबेडकर, शंकरराव देव, काकासाहेब गाडगीळ, मावळंकर, बाळासाहेब खेर, भाऊसाहेब सोमण, हीं काय महाराष्ट्रीय मंडळी नांहीं? श्यामाप्रसाद हे हिंदुसभेचे असूनही त्यांना मंत्रि मंडळांत घेतलें जातें. तेव्हां प्रांतवाचक वाद हा जातीयवादाइतकाच त्याज्य आहे. तो कोणी काढूं नये. तो शुष्क वादच होईल.

केळकरांच्या जीवनांत भाग्यानें त्यांच्यावर वरदहस्त ठेवला ही गोष्ट नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. टिळकांचे साहचर्य एखाद्या तरुण वकिलाला मिळणें ही काय कमी भाग्याची गोष्ट आहे? अर्थात भाग्याच्या जोडीला कर्तृत्व लागतें. तें नसलें तर भाग्य काय करणार!

केळकरांचे थोडक्यांत वर्णन असें करतां येईल. ते शूर होते; पण पराक्रमी नव्हते; ते धीट होते, पण धैर्यशाली नव्हते; ते सुखवस्तु होते, पण श्रीमंत नव्हते; ते विद्वान होते, पण संशोधक नव्हते. ते व्यवहारवादी होते पण ध्येयवादी नव्हते; ते सज्जन होते पण भोळसट नव्हते; ते भावनामय होते, पण विवेकशून्य नव्हते. ते महत्वाकांक्षी होते, पण लाचार नव्हते.

केळकर आतां आपल्यांतून गेले. याबद्दल महाराष्ट्राला अत्यंत दुःख होतें. घरातला वडील माणूस जावा इतकें दुःख त्यांच्या मृत्यूमुळें महाराष्ट्राला झालें आहे. अडी अडचणीला केळकरांचे छत्र हें उपयोगी पडत असे. तें छत्र आज गेलें. केळकरांचें स्मरण पदोपदीं झाल्यावांचून रहाणार नाहीं. माणूस हा सर्वगुणसंपन्न नसतो. त्याच्यांत कांहीं गुण व कांहीं दोष असतात. निर्दोषता ही परमेश्वरांतच संभवते. माणूस हा गुण दोषांच्या मिश्रणामुळें माणूस आहे. नाहीं तर तो देव किंवा राक्षस झाला असता.

श्री. केळकरांच्या मृत्यूमुळें त्यांच्या कुटुंबांतील मंडळीवर, ‘केसरी’ संस्थेवर, ऋणानुबंधी मंडळींवर आणि महाराष्ट्रावर जो दुःखद प्रसंग आला आहे तो फार मोठा आहे. केळकरांची उणीव केळकरांशिवाय कशी भरून निघणार? महाराष्ट्राची रानडे चिपळूणकरांपासून निर्माण झालेली परंपरा केळकरांच्या मृत्यूनें तुटली हें सत्य आहे. अशा व्यासंगी, चारित्र्य संपन्न, प्रेमळ, सव्यसाची पुरुषाचा मृत्यु ही महान् आपत्ती आहे. परमेश्वर त्यांना सद्गति देवो!

---

# कै. दे. भ. तात्यासाहेब केळकर

**( नवभारत मासिक, पुणें. नोव्हेंबर १९४७ )**

**आचार्य: शं. द. जावडेकर.**

गेल्या महिन्याच्या १४ तारखेस पुणें मुक्कामीं महाराष्ट्राचे एक राजकीय पुढारी आणि लोकमान्य टिळकांचे अनुयायी दे. भ. तात्यासाहेब केळकर यांचें आपल्या घरीं अगदीं अचानक व अनपेक्षितपणें पहांटे ५ वाजतां कोणासही न कळतां एकाएकीं देहावसान झालें. ही बातमी ऐकून सर्व महाराष्ट्राचें अंतःकरण शोकानें विव्हल व्हावें, इतका त्यांचा महाराष्ट्राशीं दीर्घकाल अत्यंत स्नेहाचा परिचय घडलेला होता. लो. टिळकांच्या हयातींत आणि त्यांच्या निधनानंतर तात्यासाहेबांनीं ‘केसरी’ची सेवा प्रत्यक्ष अशी सुमारें ४० वर्षें केली. त्यानंतर अलीकडे १०–१२ वर्षें ते केसरीच्या सेवेंतून निवृत्त होऊन इतर वाङ्मयकार्यांत निमग्न झाले होते. तरीही प्रचलित राष्ट्रीय राजकारणांत कोणतेंही महत्त्वाचें आंदोलन झालें कीं ते आपलें स्वतःचें मत निर्भीडपणें प्रकट करीत आणि महाराष्ट्रांतील जनता व सुशिक्षित वर्ग प्रत्येक नव्या घडामोडीसंबंधी त्यांचा अभिप्राय ऐकून घेण्यास उत्सुक व

तत्पर असे. आज या महाराष्ट्रीय जनतेला व या सुशिक्षित वर्गाला तात्यासाहेबांच्या निधनामुळें चुकल्याचुकल्यासारखें वाटूं लागलें आहे. तात्यासाहेबांचें वय मरणसमयीं ७५ वर्षांचें होतें. त्यांच्या बुद्धीची तरतरी कायम असली तरी सार्वजनिक व विशेषतः राजकीय नेतृत्त्व करण्याची उमेद त्यांना आतां उरलेली नव्हती. ४०-५० वर्षें राष्ट्रसेवेला अर्पण करून आतां उरलेला काळ राजकारण निवृत्तींत आणि आपणांस अत्यंत प्रिय असणाऱ्या वाङ्मयरसाचा आस्वाद घेण्यांत घालवावा अशीच त्यांची वृत्ति बनलेली होती. तथापि राजकारण असो, समाजकारण असो, साहित्यसंमेलन अथवा नाट्यसंमेलन असो, वाङ्मय-व्यवसाय असोत, किंवा धर्मशास्त्र-वेदांत-तत्त्वज्ञान यांसारखे विषय असोत, प्रत्येकासंबंधीं तात्यासाहेबांचे काय मत आहे तें समजून घेऊन त्याची साधकबाधक चर्चा करण्याचा छंदच जणूं कांहीं गेली २५-३० वर्षें महाराष्ट्राला लागला होता. त्या महाराष्ट्राला आज तात्यासाहेबांचे निधन शोकप्रद व क्लेशप्रद वाटावे हें अगदीं साहजिक आहे.

**राजकीय कामगिरी व नेतृत्वः**—इ. स. १८९५ च्या सुमारास तात्यासाहेब केळकर साताऱ्याहून वकिलीचा धंदा सोडून लो. टिळक यांच्याकडे संपादक म्हणून आले. या वेळेपासून लोकमान्यांच्या हयातीपर्यंत त्यांनीं त्याचे अनुयायी म्हणून राजकीय कार्य आणि केसरी मराठ्याचें संपादन केलें. १८९८ सालीं लो. टिळकांना १॥ वर्षें बंदीवास घडला. त्या काळांत तात्यासाहेबांनीं केसरीची उत्तम प्रकारें जोपासना केली. यानंतर लो. टिळक सुटून आल्यापासून पुन्हा १९०८ सालीं तुरुंगांत जाईपर्यंतच्या काळांत दे. भ. काकासाहेब खाडिलकर आणि तात्यासाहेब केळकर या दोघांनीं अनुक्रमें केसरी व मराठा या पत्रांच्या संपादन कार्यांत मोठा भार उचलला. तात्यासाहेब केळकर आणि काकासाहेब खाडिलकर हे लोकमान्यांचे डावे-उजवे हात होते असें त्यावेळीं मानण्यांत येई. लोकमान्यांना आपल्या राजकारणांत या दोघांचाही उपयोग आहे असे वाटत असे. मंडालेच्या तुरुंगांत असतांनाही या दोघांनीं सहकार्यानें व सलोख्यानें केसरी-मराठा संस्थेचे कार्य चालवावें, अशीच त्यांची उत्कंठा असल्याचें त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या पत्रव्यवहारावरून

दिसून येतें. पण लोकमान्यांच्या प्रत्यक्ष नेतृत्वाच्या अभावीं हें जोड–नेतृत्व टिकणें शक्य नव्हतें व टिकलें नाहीं. यानंतर केसरी–मराठ्याची सर्व जबाबदारी आपल्या एकट्याच्या खांद्यावर घेऊन ती तात्यासाहेबांनीं लो. टिळक सुटून परत येईपर्यंत एकट्यांनींच वाहिली. या त्यांच्या कामगिरीबद्दल लोकमान्यांनी त्यांनी धन्यवाद दिले; आणि पुन्हां ते व काकासाहेब खाडिलकर या दोघांना आपल्या राजकारणाच्या रथास जुंपून नव्या परिस्थितींत नव्या धोरणानें कार्य सुरुं केलें. लोकमान्यांच्या गैरहजेरींत राष्ट्रीय पक्षाची सरकारनें दाणादाण करून सोडली होती. ही परिस्थिती लक्षांत घेऊन टिळकांनी आपल्या राजकारणास सौम्यस्वरूप दिलें. आणि बॅ. बॅप्तिस्ता, डॉ. बेझंटप्रभृतींना पुढें करून स्वराज्याचा लढा फिरून सुरुं केला. राष्ट्रसभा हस्तगत केली आणि राष्ट्रीय पक्षाच्या उग्र तेजाला भिऊन प्रागतिकांनी राष्ट्रसभेचा निरोप घेण्यास सुरवात केली. टिळकांचें यावेळचें धोरण वरून सौम्य दिसलें तरी त्यांच्या अंतःकरणांतील क्रांतीचा अग्नी प्रज्वलित होता. सरकारशीं युद्धसहकार करा अशा प्रचार करण्यासाठीं त्यांनी काढलेली मोहिम सरकारला धोक्याची वाटूं लागली, आणि युद्धसहकार मिळविण्यासाठीं मुंबई सरकारनें भरविलेली पुढारी परिषद टिळकांनीं हजर राहून उधळून लावली. टिळकांचें सरकारला मिळणारें सहकार्य अशा प्रकारें प्रखर व तेजस्वी असल्यामुळें 'आम्हाला तुमचें सहकार्य नको' असें सांगण्याची पाळी सरकारवर आली. या काळांत तात्यासाहेब केळकर यांची सेवा लोकमान्यांना फार उपयुक्त झाली. स्वराज्य शिष्टाईसाठीं टिळक विलायतेस गेले, तेथेंही तात्यासाहेबांचा त्यांना फार उपयोग झाला. पण ही सर्व शिष्टाई विफल झाली. परत आल्यानंतर ज्या मॉंटेग्यू सुधारणा हातांत पडल्या, त्यांचे मूल्यमापन करतांना लोकमान्यांनीं "उजाडलें पण सूर्य कोठें आहे?" या मथळयाचा अग्रलेख लिहून आपलें मत व्यक्त केलें. पुढें त्यानीं कॉंग्रेसमध्यें "कॉंग्रेस डेमोक्रॅटिक पक्ष" या नांवाचा पक्ष स्थापन केला आणि कॉंग्रेसविषयीं अढळ निष्ठा व लोकशाहीवर दृढ विश्वास असें त्यांचें धोरण

ठरवून दिलें. या पक्षाच्या धोरणासंबंधीं स्पष्टीकरण करतांना ते लिहितात, "राष्ट्रीयसभा हातांत पडलेल्याचा उपयोग करा म्हणून सांगत आहे. पण जें हातांत पडलें आहे तें समाधानकारक नसून निराशाजनक आहे. पार्लमेंटसभे-कडून पूर्ण स्वराज्याचे हक्क मिळेपर्यंत चळवळ करा अशी दिशा राष्ट्रीय सभेनें दाखविली आहे. या दिशेनें जात असतांना सर्व हिंदी राष्ट्राचें कल्याण व्हावें म्हणून आणि सर्व गोरगरीबांची उन्नती व्हावी म्हणून नोकरशाहीशीं कांहीं वेळां सहकारितेनें तर कांही वेळां बिनसहकारितेनें वागावें लागेल. राष्ट्रीय सभेच्या सहकारितेच्या व बिनसहकारितेच्या दोन्ही मार्गांनीं प्रसंगा-नुसार जाणारे तेच राष्ट्रीय सभेचें खरे भक्त होत...सर्व हिंदी राष्ट्राचें कल्याण कशांत आहे याची कसोटी मुक्रर करण्याचें काम राष्ट्रीय सभेनें केलें आहे" लोकमान्यांनीं राष्ट्रीय सभेनें व तिच्या भक्तांनीं प्रसंगानुसार सहकारितेनें व बिनसहकारितेनें वागण्याचें जें धोरण आंखून दिलें, त्यावर नेमस्त पक्षाकडून आक्षेप येत. त्याला उत्तर देतांना ते म्हणत, "कोणी म्हणतील कीं अशा रीतीनें तुम्ही वागल्यास हल्लींच्या कायद्याची धूळधाण करण्याचें पाप तुम्हीं आपल्या कपाळीं घ्याल. पण या मूर्खांस असें कळत नाहीं कीं, या कायद्यांतून जर पूर्ण स्वराज्याचा कायदा पुढें उत्पन्न करावयाचा आहे, तर याचें आयुष्य जितक्या लवकर संपेल तितकें आम्हांस इष्टच आहे. ज्याला पतंग व्हावयाचें आहे तो फार दिवस सुरवंटाच्या स्थितींत कसा रहाणार ! म्हणून प्रस्तुत समयानुसार नवीं हत्यारें, नवी माणसें निवडून लवकर पतंग होण्याच्या उद्योगास लागा आणि स्वरा-ज्याच्या सुंदर उपवनांतील मधुर रसाचा लवकर आस्वाद घेण्याचा निश्चय करा. पूर्वींच्या सुरवंटाच्या शरीराच्या लोभानें फसून जावूं नका, एवढेंच लोकांस आमचें आग्रहाचें सांगणें आहे." लो. टिळकांचा केसरींतील हा अखेरचा लेख होय. हा लेख ता. २० एप्रिल १९२० रोजीं प्रसिद्ध झाला आणि पुढें १ ऑगस्ट रोजीं लोकमान्यांचें देहावसान झालें !

यानंतर लोकमान्यांचें संकल्पित धोरण अंमलांत आणून संपूर्ण स्वरा-ज्याची प्राप्ती करून घेण्याचें कार्य कॉंग्रेसनिष्ठ लोकशाही पक्षाकडे आलें. हें

कार्य करित असतां कॉंग्रेसनिष्ठेस जागून तिच्या आज्ञेप्रमाणें कधीं सहकारितेनें व कधीं बिनसहकारितेनें लढा चालवावयाचा आणि स्वातंत्र्याचे शिखर गांठावयाचें. आज हें कार्य पूर्ण झालेलें आहे आणि तें पूर्ण करण्याचें श्रेय राष्ट्रसभेनें प्राप्त करून घेतलें आहे, हें कै. तात्यासाहेब यांनी पाहिलें व तें त्यांनीं आपल्या उदार आणि मार्मिक बुद्धीनें प्रांजलपणें कबूल केलें.

सप्टेंबर १९४५ च्या सह्याद्रिच्या अंकांत ते या विषयासंबंधी म्हणतात "तथापि हिंदी राजकारणाच्या धकाधकीत कॉंग्रेसनें हें असामान्य यश मिळविलें, हें मान्य केलेंच पाहिजे. फार तर हें लक्षांत घेऊन उद्यां यथाकाल कॉंग्रेसचा पाडाव करण्याकरितां इतर पक्षांनीं अधिक जोरानें कंबर कसावी आणि एकजूट करावी असें म्हणावें व त्या मार्गानें निश्चयानें कामाला लागावें. तथापि क्रिकेटच्या खेळांतला ज्यानें डाव जिंकला, त्या संघ प्रमुखाचें अभिनंदन करण्याकरतां हात पुढें करण्याला हार खाल्लेल्या प्रमुखाला वाईट वाटत नाहीं...त्याच न्यायानें व तितक्या अर्थानें कां होईना पण आज इतर सर्व पक्षांकडून अभिनंदन केलें जाण्याला कॉंग्रेसही पात्र आहे असें मला म्हणावेंसें वाटतें. (१) आज सुमारें २७ वर्षें गांधीजींना कॉंग्रेसचें पुढारीपणच नव्हे तर तिजवर गुरुशिष्याच्या नात्यानें वर्चस्व टिकवितां आलें. (२) कॉंग्रेसपक्षाच्या केंद्रस्थानीं वावरणाऱ्या बुद्धिमान देशभक्तांना आपली एकजूट राखतां आली. हिंदुस्थानातल्या फुटीर वृत्तीच्या दृष्टीनें ही गोष्ट विशेष ध्यानांत घेण्यासारखी नव्हे कां? (३) आणि चुका करीत करीत कां होईना पण कॉंग्रेसनें शर्यतीच्या मैदानांत धावून शेवटीं जयस्तभांशीं सर्वांच्या पुढें मान काढली, ही गोष्ट तिला भूषणास्पद व प्रतिपक्षांना बोधप्रद (!) ठरेल यांत शंका नाहीं. यांत कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या शहाणपणाचा किंवा गांधींच्या अनुयायांच्या भोळसट वृत्तीचा विजय असो. परन्तु राजकीय चळवळ करणारा एक नामांकित पक्ष म्हणून गांधी व गांधीप्रणीत यांनीं बाहेरच्या सर्व जगावर छाप पाडली यांत शंका नाहीं. आणि याकरितां तरी त्यांचें अभिनंदन अवश्य केलें पाहिजे. सूक्तासूक्त कोणत्याही साधनांनीं कां होईना पण पक्षसंघटनेचें कर्तृत्व कॉंग्रेस पक्षानें प्रदर्शित केलें यांत शंका नाहीं."

लो. टिळकांच्या निधनानंतर गेल्या २७ वर्षांत स्वराज्य प्राप्तीसाठीं जो राजकीय लढा या देशांतील जनतेनें, कॉंग्रेस व म. गांधी यांनीं, ब्रिटिशा-विरुद्ध दिला, त्यासंबंधी तात्यासाहेब केळकर यांनीं निर्विकार व उदार बुद्धीनें वर जो अभिप्राय प्रकट केला आहे, त्यावरून त्यांची राजकीय पक्षांशीं विरोध करीत असतांही खेळकर वृत्ती कशी असे, हें उत्कृष्टपणें दिसून येतें. लोक-मान्यांच्या हयातींत त्यांनीं अखेरपर्यंत राष्ट्रीय पक्षांशीं साथ केली, तरीही नेमस्तपक्षाबद्दल आपली औदार्यबुद्धि लोपूं दिली नाहीं. पुढें पुढें कॉंग्रेस व महात्मा गांधी यांच्या राजकारणाशीं त्यांचा इतका विरोध वाढला कीं, त्यांना ही निर्विकार बुद्धि सतत ठेवतां आली नाहीं. तथापि स्वराज्य प्राप्त झाल्या-नंतर त्यांनी आपल्या स्वाभाविक खेळकर वृत्तीस अनुसरून कॉंग्रेस पक्षाचें वरीलप्रमाणें अभिनदन केलें हें त्याचें वैशिष्टय होय. कोणत्याहीं गोष्टींतील एकांतिकपणा हा त्यांना स्वभावतःच खपत नसे. मग ही एकांतिकवृत्ति लो. टिळक किंवा म. गांधी यांसारख्या असामान्य विभूती दाखवोत किंवा त्यांचे सामान्य अनुयायी दाखवोत.

१९२० सालापासून हिंदी राजकारणांत तसेच जगाच्या इतिहासांत एक नवें युग निर्माण झालें. पहिल्या जागतिक महायुद्धापूर्वी सर्व जगभर व्यक्ति-स्वातंत्र्य, सामाजिक समता, लोकशाही आणि राष्ट्रीय स्वयंनिर्णय हीं ध्येयें फैलावूं लागलीं होतीं. तथापि त्या महायुद्धाच्या काळांत या सर्व ध्येयांत अथवा त्यांना प्राप्त झालेल्या विशिष्ट आकारांत कांहींतरी दोष आहे, याची जाणीव होऊन समाजाच्या निष्ठांत फेरबदल करण्याची आवश्यकता भासूं लागली. पहिल्या महायुद्धानंतर ज्या पक्षांचा विजय झाला, त्यानें युरोपांत एक राष्ट्रसंघ स्थापन करून वरील ध्येयें मूर्त स्वरूपांत आणण्याची घोषणा केली. पण या घोषणेंत व त्यानंतर स्थापन केलेल्या नव्या जगाच्या रचनेंत ब्रिटीश, फ्रेंच व अमेरिकन भांडवलशाही राष्ट्रांनीं आपली साम्राज्यलालसा तृप्त करण्याचा कावा साधून घेतला अशी हाकाटी सर्व जगभर पसरली. रशियांत एक अश्रुतपूर्व, अपूर्व क्रांती बोल्शेविकांनी करून तिचा फैलाव सर्व जगभर करण्याची घोषणा केली. भांडवलदार लोकशाहीची इभ्रत जगांत

उरली नाहीं. आणि सर्वच सामाजिक तत्त्वज्ञानांत नव्या निष्ठांचा स्वीकार करण्याचा काल प्राप्त झाला. हिंदुस्थानांत ज. डायरनें जालियनवाला बागेंत गोळीबार करून ब्रिटीशांच्या राज्याचें राक्षसी स्वरुप जगापुढें मांडलें, आणि अशा सैतानीं सत्तेशी झगडण्याला कायदेशीर व सनदशीर पद्धती पुऱ्या पडणार नाहींत, ही गोष्ट हिंदी जनतेच्या व तिच्या नेत्यांच्या अंतःकरणावर पूर्णपणें बिंबली गेली. यावेळीं हिंदी राजकारणाची धुरा उचलण्यास म. गांधी पुढें आले आणि त्यांनीं आपल्या सत्याग्रहाचा मार्ग हिंदीजनतेपुढें व जगापुढें मांडला. अशा रीतीनें जगांत समाजवाद व हिंदुस्थानांत सत्याग्रह अशा दोन नव्या निष्ठा यावेळीं निर्माण झाल्या. यापैकीं कोणत्याही एक अथवा दोन्हीं निष्ठांचें तात्त्विक आकलन करून हिंदी राजकारणांत त्यांना कोणतें स्थान प्राप्त होणार, याचा तात्त्विक निर्णय करणें लोकमान्यांच्या नंतर ज्यांनी हिंदीं राजकारणाची धुरा उचलण्याचें ठरविलें त्यांनीं करावयास हवा होता. पण इतक्या खोल दृष्टीनें त्यावेळच्या जुन्या पिढींतील लोकांनीं असा विचार केला नाही. महाराष्ट्रांतील बुद्धिमंतांचें नेतृत्व करून जनतेला मार्ग–दर्शन करण्याची जबाबदारी त्यावेळीं तात्यासाहेब केळकर यांच्यावर येऊन पडली होती. नव्या पिढीतील तरुणांना भारून टाकणाऱ्या वरील नव्या दोन निष्ठा महाराष्ट्रांतही यावेळेपासून प्रविष्ट झाल्या व तें अपरिहार्यच होतें. याच दोन निष्ठा पुढें वाढत जाऊन म. गांधीं व नेहरू यांच्या जयजयकाराच्या रूपानें महाराष्ट्रीय जनतेच्या अंतःकरणांत त्या बद्धमूल झाल्या आणि महाराष्ट्रांतील तरुण क्रांतीकारक अंतःकरणें व सामान्य जनता गांधी नेहरूंच्या प्रभावानें कॉंग्रेसकडे खेचलीं गेली तरी महाराष्ट्रांतील बुद्धिजीवी वर्गावर तात्यासाहेब केळकर यांच्या लालित्यपूर्ण कुशल लेखणीची मोहिनी कायम होती. पण या वर्गालाही अखेरी अखेरीस तात्यासाहेब हे साहित्य–सम्राट आहेत, एवढें म्हणूनच त्यांच्या विषयींची आपली पूज्य बुद्धि व्यक्त करावी लागत असे. थोडक्यांत सांगायचें तर या नव्या मन्वंतरांतील राजकीय प्रवाहांचें आलोडन करून महाराष्ट्रीय जनतेचें मार्गदर्शन करण्याचें कार्य तात्यासाहेबांच्या

अमदानींत केसरीला करतां आलें नाहीं. हें खरें असलें तरी ते स्वतः केसरीचें संपादन करीत असत, तोपर्यंत त्यानीं चालू राजकारणासंबंधीं केलेली मार्मिक चिकित्सा समजून घ्यावी आणि त्यांचें त्या संबंधीचें भाष्य वाचावें हा महाराष्ट्रांतील जनतेला लागलेला छंद केव्हांच सुटला नाहीं व त्यांत तिला कधींही विरस वाटला नाहीं.

**साहित्य क्षेत्रांतील नवी दृष्टिः**—तात्यासाहेब केळकर यांचा मुख्य व्यवसाय जरी केसरीचे संपादक या दृष्टीनें प्रचलित राजकारणाचें विवेचन हा असला तरी त्यांचें साहित्यक्षेत्रांतील कार्य अधिक महत्वाचें आहे असें आज बहुतेक लोक मानतात. केसरीच्या स्थापनेपासून चिपळूणकर, आगरकर, टिळक, खाडिलकर व केळकर याच संपादकांनीं त्यावर आपला वैयक्तिक ठसा उमटविलेला आहे. यांपैकीं प्रत्येकाचें व्यक्तिवैशिष्टय भिन्न आहे. तात्यासाहेबांनीं केसरीच्या संपादकीय लेखावर आपल्या बहुविध विद्वत्तेची व मार्मिक सूक्ष्म विवेचनाची छाप पाडली. त्यांत त्यांचे साहित्यगुणच विशेषत्वानें प्रकट झाले आहेत. चिपळूणकर, आगरकर व टिळक हे विशिष्ट जीवननिष्टांनीं भारलेले लेखक असून आपली जीवननिष्ठा आपल्या ओजस्वी लेखणीनें जनतेंत निर्माण करणें हें ते आपलें साध्य समजत. लेखाची विशिष्ट सजावट आणि त्यांतील युक्तिवाद हीं त्यांची साधनें होत. चिपळूणकर व आगरकर यांच्या लेखनांतील साहित्यगुणांना साध्याचें स्थान केव्हांच प्राप्त झालें नाहीं. सार्वजनिक कार्यास प्रारंभ केल्यापासून तों त्याची अखेर होईपर्यंत त्यांनीं जेजें लेखन केलें त्या लेखनांतील प्रत्येक विभागावर त्यांच्या जीवननिष्ठेची छाप उठलेली आपणांस दिसेल. अशा प्रकारच्या विशिष्ट निष्ठेचा प्रचार करणें हें केळकरांच्या लेखनाचें साध्य नव्हतें. हातीं घेतलेला लेख आणि त्यावेळीं पुरस्कारिलेला पक्ष यांची उपमादृष्टांतादि अनेक अलंकारानीं सजावट करून उठाव करणें आणि युक्तिवादाचीं शस्त्रास्त्रें सोडून प्रतिपक्षाचा मर्मच्छेद करणें, यांतच त्यांचा हातखंडा होता व त्यांतच त्यांना गोडी वाटे. प्रतिपक्षाचे युक्तिवाद समजून घेणें, त्यांचें खंडन करणें आणि त्यांच्यावर आपल्या पक्षास पोषक अशा युक्तिवादांचा मारा करणें ह

कार्य ते सहज लीलेनें आणि प्रासादिक पद्धतीनें करीत. त्यांच्या भाषाशैलींत रुक्षता नसे व नित्याच्या परिचयांतील उपमा दृष्टांतांनीं ती सजवलेली असे.

आज मराठी साहित्यक्षेत्रांत चालू असलेले बरेचसे वाद त्यांच्यांपासूनच उगम पावलेले आहेत असें म्हणण्याला फारसा प्रत्यवाय नाहीं. बडोदा यथील साहित्य संमेलनांतील त्यांचें भाषण बरेंच प्रसिद्धी पावलेलें आहे. ललित वाङ्मयांत बोधगर्भता अथवा बोध करण्याचा हेतु असलाच पाहिजे किंवा काय, किंवा नेहमींच तो दिसून येतो किंवा काय या संबंधी त्यांनीं आपल्या भाषणांत विवेचन केलें असून प्रत्येक ललित-वाङ्मयकृतीच्या पाठीमागें हेतुसंशोधनाचा गुप्त पोलीस लावून देणें योग्य नाहीं, असें आपलें मत प्रदर्शित केलें आहे. याच्याच आधारें पुढें कला आणि जीवन, कला आणि नीति यांचे परस्पर संबंध कोणते असावे किंवा कोणते असतात हे वाद उपस्थित झाले आणि त्या चर्चेमुळें मराठी टीका वाङ्मयांत महत्वाची भर पडत गेली. याच त्यांच्या भाषणांत वाङ्मयापासून मिळणाऱ्या आनंदाची मीमांसा करून काव्यानंदामुळें प्राप्त होणारी समाधी ही निर्विकल्प नसून सविकल्प असते, असा एक सिद्धांत त्यानीं मांडला. यानंतर काव्यानंदासंबंधीं अनेकानी आपापलीं मतें व उपपत्ती मांडतांना तात्यासाहेबांच्या या सिद्धांताचें समर्थन अथवा खंडन केलेलें दिसून येतें. काव्यामध्यें रसाला कोणतें स्थान आहे, अलंकाराना कोणते आहे, बोधप्रधान वाङ्मय व रसप्रधान वाङ्मय यांत कोणाला श्रेष्ठत्व आहे, इत्यादि वाङ्मय-विषयक वादांचा उगम या भाषणानंतर झालेला असून त्यांतूनच पुढें वाङ्मयाचा आस्वाद घेणाऱ्याची वृत्ति ताटस्थ्याची असते कीं, तादात्म्याची असते, म्हणजे वाचक अथवा प्रेक्षक काव्यविषयांतील निरनिराळ्या भूमिकांसंबंधीं तटस्थ राहून त्यांचें निरीक्षण करीत असतो कीं त्याच्याशीं तादात्म्य पावत असतो, असेही प्रश्न पुढें चर्चिले जाऊं लागले. अशा रीतीनें वाङ्मयानंदासंबधींच्या निरनिराळ्या तात्विक उपपत्ती आधुनिक मराठी साहित्यांत पुढें येण्यास श्री. केळकर हे बऱ्याच अंशानें कारण झाले असून यापैकीं प्रत्येक वादासंबंधीं त्यांचें मत समजून घेण्यास साहित्य क्षेत्रांतील

लेखक नेहमीं उत्सुक असत. महाराष्ट्रांतील आधुनिक साहित्यभक्तांवर तात्या-साहेबांचा बराच प्रभाव पडल्याचें दिसून येईल. या सर्व विषयांत तात्या-साहेबांच्याहून अधिक खोल दृष्टीनें तत्त्वविवेचन करणारे साहित्यिक म्हणजे कै. वामन मल्हार जोशी हेच होत. तात्यासाहेब अलंकाराना जितकें महत्व देत तितकें वामनराव जोशी देत नसत. नीति व कला यासंबंधीं त्यांचीं मतें तात्यासाहेबांच्या मतांहून अधिक निःसंदिग्ध वाटतात. तथापी गेल्या २५–३० वर्षांत मराठी साहित्यांत निर्माण झालेल्या या निर-निराळया वादांचा अद्यापि खरा शास्त्रीय निर्णय झालेला आहे किंबहुना त्या निरनिराळया वादांना खरी शास्त्रीय भूमिका अद्यापि कोणी दिलेली आहे, असही म्हणता येत नाहीं. काव्यानंदासंबंधीं तात्यासाहेब केळकर यांचें भाषण बरेंच प्रसिद्धि पावलें असलें, तरी तत्पूर्वी आगरकरांनीही एक लेखमाला पूर्वी केसरीत लिहिली होती. तेथपासूनच या विषयाच्या आधुनिक चर्चेचा उगम झाला असें म्हणावें लागतें. ललित वाङ्मयाकडे बोध दृष्टीनें न पहातां केवळ एक क्रीडा अथवा करमणूक एवढ्या दृष्टीनें पहावें, या दृष्टीचा प्रथम पुरस्कार केळकरानीं केला असें म्हणण्यास हरकत नाहीं. तसेंच काव्यातील गूढगूंजन ही एक हीन प्रवृत्ती आहे असे मानायची जी एक अलिकडे वृत्ती दिसून येते, तिचाही उगम त्यांच्यापर्यंत जाऊन पोहोचूं शकेल. काव्यांतून एखादा आत्मसाक्षात्काराचा अथवा क्रांतीचा संदेश मिळावा, या गुणापेक्षां त्याच्या योगानें करमणूक व्हावी ही दृष्टी आली म्हणजे ओज आणि रस यांच्यापेक्षां अर्थचमत्कृती, कल्पनाविलास आणि शब्दलालित्य यांना अधिक महत्त्व प्राप्त होणें साहजिकच आहे.

**बुद्धिवादी केळकर :—**तात्यासाहेब केळकर हे स्वतःला बुद्धिवादी म्हणवीत असत. पण त्यांचा बुद्धिवाद आणि आगरकरांचा बुद्धि-वाद यांत कोणत्याहीं प्रकारचें साम्य नव्हतें. आगरकरांच्या जीवनांत बुद्धिवाद ही एक जीवननीष्ठा होती. कोणत्याही विषयांत बुद्धीला पटेल तेंच सत्य मानावयाचे, बुद्धीला जें आकलन करतां येणार नाहीं, ते अज्ञेय आहे, असें उघडपणें प्रतिपादून आपल्या बुद्धीला जी सत्यें निःशंकपणें पटलीं,

त्यांच्या प्रचारासाठीं व प्रस्थापनेसाठीं सर्वस्वाचा होम करावयाचा, अशा प्रकारचीं प्रखर ध्येयनिष्ठा आगरकरांनी आजन्म उपदेशिली आणि आचरिली. या बुद्धीवादी दीक्षेसाठीं ते संन्यासी बनले होते. या संन्यासांत व सत्यनिष्ठेच्या दीक्षेंत त्यांना जीवनांतला खरा आनंद आस्वादतां येत होता. ते वीर होते व वीरपूजक होते. तात्यासाहेब केळकर यांचा बुद्धीवाद याहून भिन्न होता. टिळकांच्यासारखे किंवा गांधींच्यासारखे असामान्य लोकनायक आपल्या अंतःप्रेरणेच्या आधीन झाले असतां कित्येकवेळां एकांतिक भाषा बोलतात अथवा एकांतिक धोरण पुरस्कारितात. अशा वेळी त्यांची एकांतिकता अथवा त्यांच्या धोरणांतील अव्यवहार्यता त्यांना दाखवून देणें; सामान्य मनुष्याच्या मर्यादा ओळखून त्या धोरणास व्यवहार्यतेच्या दृष्टीनें थोडी फार मुरड घालणें, हें कार्य करणारी बुद्धी राजकारणांत आवश्यक असते. अशा प्रकारची बुद्धी तात्यासाहेबांपाशी होती. कोणत्याही असामान्य नेत्यानें लोकांपुढें मांडलेल्या लढाऊ कार्यक्रमांतील व क्रांतीकारक धोरणांतील व्यवहार्य–अव्यवहार्यतेचा विवेक करतांना लागणारी बुद्धी आणि सामान्य मनुष्यास न झेपणाऱ्या गोष्टींचें निर्भिड विवेचन करावयास लागणारें एक मानसिक धैर्य त्यांच्यामध्ये होतें. अशा विवेचक बुद्धीसच ते बुद्धीवाद असें म्हणत असत. त्यांच्या सर्व लेखनांत अशा प्रकारची विवेचक बुद्धी आढळून येते. टिळकांच्या सारखा क्रांतिकारक वीर नेता असला म्हणजे त्याला अशा सल्लागाराचा पुष्कळ उपयोग होऊं शकतो व तसा तो टिळकांच्या हयातींत टिळकांना व महाराष्ट्रांतील राष्ट्रीय पक्षाला केळकरांच्यापासून झालेला आहे; या बद्दल महाराष्ट्रानें त्यांचे ऋणीं असलें पाहिजे. गांधीयुगांत प्रथमतः वर्षभर त्यानीं केसरींतून असहकारीतापक्षास पाठींबा देऊन त्या धोरणांतील तपशिलावर टीका करण्याचें कार्य केलें, तेव्हांहीं त्यांच्या या बुद्धीवादाचा उपयोग अनेकांना झालेला आहे. टिळकांच्या मृत्यूनंतर जो नवा मनु देशांत सुरू झाला, त्याचें मुख्य लक्षण असहकारिता हेंच होतें. राष्ट्रसभेनें मॉटफर्ड–सुधारणांच्या अमदानींत कौन्सिल प्रवेश

स्वीकारला, तरी तो आंत जाऊन मंत्रिपदाशीं असहकार करण्याच्या वृत्तिनेच स्वीकारला होता. हें धोरण पूर्ण प्रांतिक स्वराज्य मिळेपर्यंत कायम होतें.

तात्यासाहेबानीं कौन्सिल प्रवेशानंतर मंत्रिमंडळाचा स्वीकार करावा या धोरणाचा जो पुरस्कार केला, त्या संबंधीं पं. मोतिलाल नेहरूंचा व त्यांचा बेबनाव झाला. तात्यासाहेबांनी प्रथम प्रतियोगी सहकारीपक्ष स्थापन केला व नंतर लोकशाही स्वराज्य पक्ष स्थापन करून ते कॉंग्रेसच्या बाहेर पडले. टिळकांच्या कॉंग्रेसनिष्ठ लोकशाहीपक्षाची परंपरा त्यानीं यावेळीं सोडून दिली. यानंतर प्रांतिक स्वराज्य प्राप्त झालें व राष्ट्रसभेनें बदललेल्या परिस्थितीस अनुसरून प्रांतिक मंत्रिमंडळांचा स्वीकार केला आणि मध्यसरकारांत विरोधाचें व घटनाभंगाचें धोरण स्वीकारलें. यावेळीं तात्यासाहेबांच्या मनांत राष्ट्रसभेशीं असलेला आपला विरोध मिटवून तिच्याशीं एकी करावी असे होते. परंतु जातीय निवाडा फेटाळून लावणें, या गौण मुद्यालाच प्रधान स्थान द्यावें आणि हिंदुसभेला राष्ट्रसभेची प्रतिस्पर्धि राजकीय संस्था बनवावी, या केवळ भावनावश राजकारणाच्या विचारधारेंत कै. तात्यासाहेब गोंविले गेले. या विचाप्रवाहांत एकदां सांपड-ल्यानंतर त्यांचें नेतृत्व बुद्धिवादी म्हणविणाऱ्या केळकरांचेकडे रहाणें अशक्य होतें. अखेरीस त्याचा अपेक्षित परीणाम घडून आला; आणि तात्यासाहेब हे अलिकडे अगदीं एकाकी बनले. त्यांचा बुद्धिवाद, ज्यांच्या हातीं त्यांनीं आपल्या राजकारणाची सूत्रें दिलीं त्यांना नियंत्रित करण्यास असमर्थ होता. अखेरीस आपला देश स्वतंत्र झाला हे पाहण्याचें भाग्य त्यांना लाभलें आणि त्या आनंदांत त्यांनीं आपला सर्व पूर्वीचा विरोध क्षणभर बाजूस ठेवून दिल-दार अंतःकरणानें गांधीप्रणीत कॉंग्रेसचें अभिनंदन केलें. ज्यानीं टिळकांच्या-बरोबर २५ वर्षें स्वराज्याचा झगडा चालविण्यांत भाग घेतला त्याणि त्यानंतर २५ वर्षें ज्यांनीं आपली बुद्धी हा लढा कसा यशस्वी होईल याचें चिंतन करण्यांत व या लढ्यासाठीं योजण्यांत येणाऱ्या निरनिराळ्या धोरणाचें व साधनांचे सूक्ष्म विवेचन करण्यांत आपली सर्व बुद्धि वेंचली त्यांना अखेरीस

या देशांतून ब्रिटिश साम्राज्य कायमचें नष्ट झालें आणि जनतेला लोकशाहीचे व स्वयंनिर्णयाचे हक्क मिळाले, हें पाहून जो आनंद व जें समाधान झालें असेल त्याची कल्पना दुसऱ्याला येणें शक्य नाहीं. अशा आनंदात व समाधानांत पूर्ण अनायासानें त्यांनीं आपली ऐहिक जीवनयात्रा वयाच्या ७५ व्या वर्षी संपविली. महाराष्ट्राला त्यांच्या विरहामुळें क्लेश होत असले तरींही त्यांनीं ज्याप्रमाणें आपल्या डोळयापुढें ठेविलेलें साध्य प्राप्त झालेलें पाहूनच आपला देह खालीं ठेवला त्याचप्रमाणें आपणही आपल्या ध्येयासाठीं खपावें आणि आपल्या अंगचे सर्व गुण त्यांच्याप्रमाणें लोकसेवेला समर्पित करावेत, अशी प्रेरणा त्यांच्या जीवनापासून आजच्या पिढीस खास घेतां येईल. रानडे टिळक आणि गोखले ह्यांना प्रत्यक्ष पाहिलेलें आणि टिळकांच्या बरोबर राजकाणांत भाग घेऊन त्यांचें कार्य आपल्या मताप्रमाणें अखेरपर्यंत करण्यासाठीं तळमळणारे तात्यासाहेब केळकर महाराष्ट्राच्या स्मृतींतून लवकर नाहींसे होणार नाहींत. महाराष्ट्रीय लोक आपल्या या त्याच्याबद्दलच्या स्मृतीस योग्य असे मूर्त स्मारक लवकरच उभारतील व तें त्यांनीं उभारावें अशी इच्छा आहे.

---

# कै. तात्यासाहेब केळकर

## हिंद मासिक, मुंबई. नोव्हेंबर १९४७

साहित्य सम्राट तात्यासाहेब केळकर यांना आकस्मिकरीतीनें ता. १४ ऑक्टोबर मंगळवारीं पहाटे देवाज्ञा झाली, ही बातमी ऐकून प्रत्येक जाणता महाराष्ट्रीय हळहळत आहे. तात्यासाहेब आजारी असल्याची बातमी कोठें आधीं नव्हती. त्याकारणानें मृत्यूची ही वार्ता ऐकण्याला लागणारी मनाची तयारी कोणाचीही नव्हती. ता. १२ रोजीं संध्याकाळीं टिळक स्मारक मंदिरांत रा. धोंडूमामा साठे यांचा सत्कार करण्यासाठीं भरलेल्या

सभेचें अध्यक्षस्थान त्यांनीं मंडित केलें होतें. सोमवारीं दुपारीं २-२॥ वाजेपर्यंत त्यांची नित्याची वामकुक्षी झाली व ते वरून खालीं आले. त्यानंतरच त्यांना बेचैन असें वाटूं लागलें. डॉक्टरला बोलाविण्यांत आलें. त्यांनीं तपासलें व त्यांना 'काळजी करण्यासारखें कांहीं नाहीं' असें सांगून व जरूर ते उपचार करून डॉक्टर निघूनही गेले. त्यानंतर तात्यासाहेबांनीं वर जाऊन एक कविता लिहिली व फाउन्टन् पेन् व चष्मा टेबलावर ठेऊनच ते खाली आले ते पुनः वर गेलेच नाहींत. रात्रीं दोन वाजेपर्यंत त्यांचीं कुटुंबीय मंडळी त्यांच्या सभोंवतीं होतीच. नंतर सर्वांना तात्यासाहेबांनी झोपी जायला सांगितलें व आपण पांघरूण घेऊन निजले ते पुनः उठलेच नाहीत. झोपेंतच त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. पहांटे पांचला माणसें तात्यांचें कसें काय आहे हें पहाण्यास गेलीं तो काय, तात्या इहलोक सोडून गेल्याचें दृश्य दिसलें.

तात्यासाहेबांना त्यांचें मरण जणूं काय प्रत्यक्ष दिसले होतें असें झालेल्या एकंदर प्रकारावरून वाटते. त्यांच्या षष्ठ्यब्दिपूर्ति समारंभाचे वेळींच त्यानीं सांगितलें होतें कीं आपलें आयुष्य आतां थोडेंच राहिलें आहे. आपल्या आयुष्याच्या त्यावेळेला त्यांनीं टाइपरायटरच्या घंटेची उपमा दिली होती. ती घंटा वाजल्यानंतरही ज्याप्रमाणें चारदोन अक्षरें टाइप करतां येतात तसें त्यांच्या उर्वरित आयुष्याबद्दल आहे असें ते म्हणाले. पण आपणां सर्वांच्या सुदैवानें त्यानंतरही त्यांना सुमारें पंधरा वर्षांवर आयुष्य लाभलें व त्याचा त्यांनीं स्वतःच्याच नव्हे तर आम्हां सर्वांच्याच दृष्टीनें अक्षरशः सद्व्यय केला. मरेपर्यंत त्यांचें लिहिणें वाचणें चालू होतें. त्यांना आलेले मरण फारच थोडयांच्या नशिबीं येतें. त्यांना थोडा फार त्रास काय झाला असेल तो खरा. पण त्यांच्या कुटुंबीयांना त्यांची शुश्रूषा करावीच लागली नाहीं. तात्यासाहेब भीष्माचार्यांच्या सारखे इच्छामरणी होते. त्यांच्या प्रेत यात्रेला लाख पाऊण लाख लोक होते. सर्व हिंदुस्थानांतून त्यांच्या मृत्यूबद्दल दुखवट्याचे संदेश आले यायरूनच त्यांची कीर्ती किती दूरवर

पसरली होती याची कल्पना येईल. लोकमान्य टिळकांच्या पश्चात् एवढा थोर महाराष्ट्रीय मृत्युमुखीं पडल्याचें तात्यासाहेब केळकरांचेंच उदाहरण.

वयाच्या २४ व्या वर्षी कै. लोकमान्यांचे सहकारी म्हणून पुण्याला ते आले ते कायमचेच. १८९६ पासून १९४७ पर्यंतचीं पन्नास वर्षे त्यांनीं पुण्यांत घालविलीं. लोकमान्यांना केसरी मराठा चालविण्याला मदतनीस व त्यांचा लॉक्लास चालविण्याला जोडीदार या दृष्टीनें केळकरांना घेण्यांत आलें तेव्हांपासून केसरी मराठा, लोकमान्य व राष्ट्र यांची अविरत सेवा त्यांनीं केली. त्याकालांत सातारला वकिली करावयाला लागलेल्या गृहस्थानें लोकमान्यांचे व त्यांच्या कार्यातील त्यांचे सहकारी बनणें यांतच केळकरांचा फार मोठा त्याग होता. पण केळकरांनीं तो केला. टिळकांच्यामुळें त्यांना मिळालेला मोठेपणा मिळाला असें म्हणणारे म्हणोत. सर्वस्वी तें चूक नव्हे, पण सर्वस्वी ते बरोबर नव्हे. केळकरांनीं अंगावर पडलेल्या जबाबदारीला व आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर आणि चिकाटी, अविश्रांत श्रम यांच्याहि, जोरावर पेलून धरलें यांतच त्यांचा खरा मोठेपणा आहे. लोकमान्यांचा सहवास दैवानें लाभला त्यांना पण त्यांच्यासारखाच तो अनेकांनाही लाभला होता. पण त्या अनेकांपैकीं कितीसे तात्यासाहेबांच्या योग्यतेला चढले, व लोकमान्यांच्या कार्याला उपयोगी पडले याचा विचार लोकांनीं करणें बरें. तात्यासाहेबांनीं केसरी मराठ्याच्या संपादकांचें काम केलेंच, टिळकांच्या राष्ट्रीय चळवळीचा देशव्यापी पसारा संभाळला व वाङ्मय, इतिहास नाटक, काव्य यांत भरपूर अवगाहन केलें. हें त्यांना कसें काय साधलें हाच मोठा प्रश्न आहे. सभा संमेलनें, पुस्तकांना प्रस्तावना लिहिणें, राजकीय कार्यासाठीं दौरे, म्युनिसिपॅलिटी, बँका, कौन्सिलें यांतील कामकाज हें करून केसरी मराठ्याचे अग्रलेख सजविणें, आयर्लंडचा इतिहास, इंग्रज व मराठे, हास्यविनोद मीमांसा, चरित्रें, नाटकें यांसाठीं करावें लागणारें वाचन यांचा हिशोब त्यांच्यासारख्याची योग्य कल्पना यायला करणें जरूर आहे.

त्यांचें वाचन इतकें अद्यावत् होतें कीं इंग्रजी भाषेतील अगदीं ताजीं ताजीं पुस्तकें ते नेहमीं वाचत असत. त्यांच्या वाचनाचा दुसरा एक मह-

त्याचा परिणाम असा कीं निव्वळ करमणुकीकरतां ते वाचीत नसत. वाचनाचा फायदा इतरांना ते, आपल्या अनुभवाची–ज्ञानाचीं–कौशल्याची–उपमा अलंकारांची त्यांत भर घालून, पुस्तक वा इतर प्रकारच्या लेखन प्रकारांनीं देत असत. त्यांचीं बरींचशीं पुस्तकें या प्रकारचीं आहेत. भारतीय तत्वज्ञान, ज्ञानेश्वरी सारसर्वस्व हीं पुस्तकें वरील आमच्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ देतां येतील. केळकरांची बुद्धी कोणत्याहि विषयांत अप्रतिहतपणें स्वच्छंदानें विहार करीत असे. त्यांनीं जो जो विषय हाताळला त्या त्या विषयांत स्वतःची म्हणून कांहीं तरी भर त्यांनीं घातली. त्यांनीं कोणताही विषय पूर्ण अभ्यासून मग त्यावर आपलीं मतें मांडलीं. लोकमान्यांनीं त्यांना उमद्या घोड्यावर बसविलें खरें पण ते त्याच्यावर रडतरावासारखे न बसतां आरूढ होण्याच्या तयारीनें बसले व स्वतः दमण्यापेक्षां त्या घोडयांनाच दमविलें. ते वक्ते नव्हते तथापि त्यांच्या व्याख्यानाला गर्दी अतोनात होई. त्यांचे विषयप्रतिपादन त्यांच्या विषयप्रतिपादनाच्या शैलीनें व उपमा अलंकार दृष्टांत यांच्या रेलचेलीनें त्यांचें व्याख्यान रसाळ होई.

ते भावनाशील असूनही विकारवश न होतां विवेकानें न्यायान्यायाच्या दोन्ही बाजू पडताळून पाहून निर्णय घेत वा देत असत. कोणत्याही विषयाचा एकांतिक अभ्यास त्यांनीं करून मत मांडलें नाहीं. प्रत्येक प्रश्नाच्या सर्व बाजूंचा विचार करून व आपल्याप्रमाणेंच विरुद्ध पक्षांतील गुणदोष प्रांजलपणें मांडून मग ते आपलें मत सांगत. केळकरांची वृत्ती न्यायाधीशाची होती. पक्षाभिनिवेशानें डुकराच्या मुसंडीसारखें एककली वागणें त्यांना जमलें नाहीं. आपल्या सदसद्विवेक बुद्धीशीं त्यांनीं कधींच प्रतारणा केली नाहीं. खुद्द लोकमान्यांच्यापुढें त्यांनीं आपलें स्पष्ट मत मांडायला सोडलें नाहीं. जनतेच्या टाळीसाठीं त्यांनीं आपल्या मतांना मुरड घातली नाहीं. महात्माजींना त्यांनीं केलेला विरोध सुप्रसिद्धच आहे. स्वार्थासाठीं त्यांनीं तत्वच्युती पत्करली नाहीं. केळकरांच्या इतके स्वार्थत्यागी गृहस्थ विरळाच. शत्रू करील तें सर्व वाईटच व मित्र वा आपला पक्ष करील तें सर्व चांगलेंच असें त्यांनीं कधीं म्हटलें वा मानलें नाहीं. आपली

चूक कबूल करायला जसे त्यांनीं उगीच आढेवेढे घेतले नाहींत तसेंच शत्रूचे गुण मान्य करायलाही त्यांनीं कधीं कांकूं केलें नाहीं. ही गोष्ट वर्णन करायला जितकी सोपी आहे तितकी आचरायला कठीण आहे. सुवर्णमध्य ठरवून त्याला चिकटून राहणें फार अवघड आहे. पक्षांधता व फाजील पक्षाभिनिवेश यांच्या कह्यांत ते कधीं फारसे सांपडले नाहींत. यामुळें शत्रु मित्रपक्षांत ते सारखेच प्रिय असत. त्यांना अतिमानुषपणा व अमानुषपणा दोन्हीं वावडीं होतीं. ते वृत्तीनें मवाळ भासत होते खरे; पण त्याचा अर्थ असा नव्हे कीं भित्रेपणामुळें त्यांच्या हातून प्रखर व जहाल कामगिरी झाली नाहीं. जहालांतले मवाळ व मवाळांतले जहाल असे ते होते. सारासार विवेक–बुद्धीच्या तंत्रानें ते चालणारे असल्याने व कोणच्याही प्रकारचा मोह त्यांना तत्त्वनिष्ठेच्या बाबतींत वश करणारा नसल्यानें जगांत आपलें विचार करून बनविलेले मत कोणापुढेंही मांडायला तें कधींच कचरले नाहींत. महात्माजींसारख्या लोकप्रिय पुढाऱ्याला विरोध करणें ही सामान्य गोष्ट नव्हे. पण महात्माजींच्या लोकप्रियतेला न भितां न्याय्य असणारी गोष्ट त्यांनीं एकदां नव्हे हजारदां बोलून दाखविली.

लोकमान्यांना चिरोल खटल्यांत अपयश आलें व जनतेनें त्यांना तीन लाख रुपये स्वयंस्फूर्तीनें अर्पण करून जेव्हां सोडविले त्यावेळीं लोकमान्यांचे डोळ्या-तून पाणी आले व त्यांनीं बोलूनही दाखविले कीं जनतेनें त्यांना विकत घेतलें. यापुढें लोकमान्य जनसेवेला बांधले गेले. तात्यासाहेबांनीं ती गोष्ट लक्षात ठेऊन टिळकांच्या पश्चात केसरी संस्थेची सर्व जबाबदारी अंगावर पडली तेव्हां-पासून पुढील ८।१० वर्षांत केसरी संस्थेची अशी कांहीं व्यवस्था ठेविली कीं त्यामुळें लोकमान्यांना मिळालेल्या पर्सचे पैसे सार्वजनिक ट्रस्ट्च्यारूपानें त्यांनीं जनतेला परत केले व अशारीतीनें लोकमान्यांना त्यांनीं अनृणी केले. केवढी ही कर्तबगारी ! लोकमान्यांच्या हयातींत केसरीची सांपत्तिक स्थिती यथा तथाच होती. टिळकांचा राष्ट्रीय पसारा एवढा मोठा होता कीं त्यामुळें केसरीवर फार मोठा आर्थिक ताण पडे. टिळकांच्या पश्चात केसरीचा ट्रस्ट् करून १०।१२ वर्षांत केसरीची आर्थिक घडी त्यांनीं अशी सुंदर रीतीनें

बसविली कीं त्यामुळें केसरी संस्था ही एक भरभक्कम पाया असलेली राज-कारणाला वाहिलेली संस्था व्हावी. स्वतःच्या लेखन कौशल्यानें त्यांनीं केसरीची प्रतिष्ठा व वाचक वर्ग अफाट वाढविला सर्व' व्यवहार काटकसरीनें चालविला व संस्थेला भरभक्कम आर्थिक स्थैर्य आणून केसरी संस्थेंत काम करणाऱ्यांची नीट व्यवस्था केली. तात्यासाहेबांच्या कुशल नेतृत्वामुळें हें सर्व झालें.

ते अत्यंत निःस्पृह होते. त्यांनीं जन्मभर स्वार्थत्याग केला होता. तेव्हां मनांत आणलें असतें तर आमरण केसरीचे संपादक राहून चरितार्थाचें साधन केसरीकडून त्यांनीं घेतलें असतें. पण त्यांनीं हळूहळू तोही संबंध सोडला. शेवटची १०।१५ वर्षे या बाबतींत ते सर्वस्वीं स्वतंत्र होते. सर्व-प्रकारचा अनुभव त्यांना मिळण्याची संधी होती केसरीसंस्थेमुळें. व तात्यांनीं निरलसपणें—हें माझें काम नव्हे, त्याबाबीशीं माझा संबंध नाहीं असें सांगून आपलं कितीतरी काम कमी केलें असतें. पण तसें न करतां—सर्व समजाऊन घेतलें व सर्वतोपरी त्या विविध कार्यांची जबाबदारी घेतली. सरकार दरबारींही त्यांचें वजन मोठें होतें. केसरीचा संपादक या दृष्टीनें त्यांच्या घरीं फार वर्दळ असे अखिल हिंदुस्थानांतील मंडळींची. पण तात्यासाहेब सल्ला मसलतीमुळें प्रत्येकाच्या उपयोगीं पडत असत. व हें काम आमरण चाललें. त्यांना कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाचा मान प्रत्यक्ष मिळाला नसला तरी त्यामुळें त्यांच्या कीर्तींत कसलीही उणीव राहीली नाहीं व तो मान मिळाला असता तर त्यांच्या लौकिकांत आजच्यापेक्षां निराळीं भरही पडली नसती.

राजकीय चळवळींत पहिल्या नंबरचे जसे ते नव्हते तसे साहित्य क्षेत्रांत दुसऱ्या नंबरलाही ते ढकलले जाणें शक्य नव्हतें. लोकमान्यांसारखे धडाडीचे पुढारी व सार्वजनिक कार्यकर्ते ते नव्हते असें लोक जेव्हां त्यांच्या संबंधानें बोलतात तेव्हां लोकांचें आश्चर्य वाटतें. राजकारण हें बहुरंगी आहे. लोकमान्यांचें राजकारण निराळें, गांधींचें राजकारण निराळें. टिळक गांधींची

तुलनाच होणें अशक्य. गांधींच्या चळवळींत टिळक फिके पडले असते. केळकरांच्यांत धडाडी नव्हती असें म्हणणारांनीं महात्माजींच्या अनुयायांत त्यांची जागा घेऊं शकतील व त्यांची थोरवी चालवूं शकतील असे त्यांना शोभणारे वारस किती आहेत याचा विचार करावा. लोकमान्य व केळकर यांच्या कर्तृत्वाला काळानें मुरड घातली तशीच महात्मा गांधी व त्यांचे उजवे डावे हात यांच्या कर्तृत्वाला तोच काळ मुरड घालीत आहे. काळ महाप्रबळ आहे. गांधींचा मोठेपणा ज्या काळानें शक्य केला तोच काळ गांधींच्या प्रभावळींतील थोरांना तेवढाच मोठेपणा मिळवून देईल हें शक्य नाहीं. प्रत्येक पुढाऱ्याच्या मोठेपणाचा विशिष्ट काळ असतो. त्याकाळाबाहेर जो पुढारी जगला वा वावरूं लागला तर त्याला पूर्वीचा मोठेपणा चिरटून राहीलच असें कोणालाच म्हणतां येणार नाहीं. शिवाय लोकमान्यांनां त्यांच्या आयुष्यांत नांवें ठेवणारे जसें शेंकडों लोक होते तसेच तात्यासाहेबांनाही होते व आज महात्माजी, पंडितजी व सरदार यांनाही आहेत. तेव्हां एका पुढाऱ्याची दुसऱ्याशीं तुलना करण्यानें कांहीं फायदा नाहीं. लोकमान्यांच्या सहवासांत गांधी नेहरू—पटेल केळकरांसारखे असते तर केळकरांच्या इतका मान सन्मान, केळकरांइतकी विद्वत्ता, समाजसेवा यांपैकीं कोणाला किती मिळाली असती याबद्दल मतभेदच आढळेल. शिवाय केळकरांइतके यांच्यापैकीं टिळकांजवळ कोणी टिकले असते कीं नाहीं हाही प्रश्नच आहे. केळकरांचा टिळकांशीं कांहीं थोडाथोडका मतभेद नव्हता. पण एकमेकांच्या नात्यांत व सार्वजनिक कार्यांत व्यत्यय त्या मतभेदामुळें केळकरांनीं येऊं दिला नाहीं एवढेंच नव्हे तर टिळकांच्या पश्चात टिळकांचें व्यवहारी राजकारण त्यांनीं लोकप्रीतीच्या हांवेनें सोडलें नाहीं. व टिळक-पंथालाच उलट मोठेपण आणलें. टिळक केळकरांसारखी जोडी विरळा.

महात्माजींच्या राजकीय चळवळींत केळकर धडाडीनें पडले नाहींत व टिळकानुयायी महाराष्ट्राला त्या चळवळींत अहमहमिकेनें त्यांनीं पडूं दिलें नाहीं. उलट गांधी चळवळीच्या मार्गांवर टीका करून महात्माजींचे व त्यांच्या चळवळीचे त्यांनीं पायच मागें खेचले असें पुष्कळ लोक म्हणतांना

दिसतात. पण तें बरोबर नाहीं. महात्माजींच्या देशभक्तीबद्दल व थोरवीबद्दल कोणाचेंच दुमत नाहीं. पण केळकर जी टिळकांची परंपरा चालवूं इच्छित होते त्यामुळें देशाचें राजकारण मागें पडलें असतें असें म्हणण्याला पुरावा नाहीं. आज जें राजकारण देशांतील पुढारी करीत आहेत त्याचाच केळकरांनीं पुरस्कार केला. उलट राजकीय दूरदृष्टीचा जो अभाव आज उघड असलेल्या घडामोडींतून मधून मधून दृग्गोचर होत आहे तो केळकर व केळकरपंथीय लोकांच्या मुत्सद्दिगिरीमुळें टळलाही असता. कौन्सिलांत शिरण्याच्या राजकारणाला आज जो भाव आला आहे तो त्या १९२०–३० च्या काळांत येण्याला संधी देण्यांत आली असती तर देशाची प्रगती हटली असती असें कोणालाच म्हणतां येणार नाहीं. स्वराज्य आज जें मिळालें आहे तें देशांतील चळवळीमुळेंच मिळालें आहे व आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा त्यांत मोठा वांटा नाहीं असें कोणीही सूज्ञ म्हणणार नाहीं. आम्ही आमच्या पुढें दिवे ओवाळून घ्यायचे ठरविल्यास तें करतांना कोणीही आपले हात रोखून धरणार नाहीं. आंतरराष्ट्रीय राजकारणामुळें हें झालें हें आम्हीं आमचा विनय म्हणून म्हणतों असेंही कोणा सूज्ञाला म्हणतां यायचें नाहीं. निजस्तुती टाळण्यासाठीं आपण लोकांना मोठेपणा देऊन आपल्याकडे लहानपण घेत असतों तसाही प्रकार येथें नाहीं. गांधींच्या अनुयायांच्या अंगचा स्वार्थत्याग केळकरपक्षीय यांच्यांत नव्हता असेंही कोणाला म्हणतां येणार नाहीं. केळकर व इतर थोर महाराष्ट्रीय बुद्धिवान् मुत्सद्दी म्हणूनच गांधींच्या चळवळींत समरस झाले नाहींत. राजकीय मतभेद हाच त्याच्या बुडाशीं होता व आहे. देशभक्तीचा अभाव व सुखलोलुपता हीं त्याच्या बुडाशीं होतीं असें नव्हे. तर्क व बुद्धीप्रधान माणसांना ते पटलें नाहीं व म्हणून त्यांनीं भाग घेतला नाहीं असा याचा अर्थ आहे. केळकरांच्या चरित्रावरून तो स्पष्ट आहे. केळकरांनीं उगीच पक्षभेद माजविले नाहींत, हेवादावा व मत्सर त्यांच्या मनांत कोणाहि बद्दल नव्हता व खुद्द गांधींपासून सर्वांना ते उपयोगीही पडले, याच्यावरून योग्य तो बोध घेतां येईल. केळकरांच्या सारखा थोर हृदयाचा उदार सद्गृहस्थ वारंवार होणें नाहीं.

महाराष्ट्रांत तर त्यांना अग्रगण्य स्थान होतें. तात्यासाहेबांना शिव्या देणारी मंडळी असंख्य असूनही त्यांच्याबद्दल नितांत आदर बाळगणारी मंडळी त्या असंख्य लोकांच्या हजारोंपटीनीं पुष्कळ होती. लोकमान्य टिळकांचे उजवे हात म्हणून तर ते होतेच. पण त्यांचे केसरी संस्थेचे व राजकारणपरंपरेचेही ते एकमेवाद्वितीयम् वारस होते. साहित्याच्या क्षेत्रांत ते साहीत्याचार्य व साहित्यसम्राट होते. वृत्तपत्रांच्या सृष्टींत मराठी पत्रकारांनीं त्यांना वृत्तपत्र सम्राट ही पदवी अर्पिली आहे. महाराष्ट्राचे अनभिषिक्त राजे म्हणून त्यांना मानीतच. महाराष्ट्र साहित्य परिषद, हिंदुमहासभा वगैरेचे ते अध्यक्ष होतेच. लोकमान्य टिळकांच्या हयातींत सोलापूरच्या प्रांतिक परिषदेचे ते अध्यक्ष होते व ती परिषद त्यावेळीं भरपूर गाजलीही. मध्यवर्ती विधिमंडळांत बरींच वर्षें ते स्वराज्यपक्षातर्फें निवडून गेलेले प्रतिनिधी होते व त्यापक्षाचे विधिमंडळांतील ते प्रतोद होते, काँग्रेस वर्किंग कमिटीचे ते कित्येक वर्षें सभासद होते. दोनदां काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठीं त्यांचें नांव आलें होतें व अगदीं थोड्या म्हणजे ४।२ मतांच्या अंतरामुळेंच ते काँग्रेसचे अध्यक्ष होऊं शकले नाहींत. शेंपन्नास संस्थांशीं त्यांचा जिव्हाळयाचा संबंध होता. पुणें म्युनिसिपॅलिटीचे ते कित्येक वर्षें अध्यक्ष होते. एक पट्टीचे पत्रकार म्हणून त्यांची कीर्ती अखिल भारतांत दुमदुमत आहे.

हिंदुस्थानचे स्टेट्सेक्रेटरी मोर्लेसाहेब हे जसे राजकारणी मुत्सद्दी होते तसेच ते अत्यंत जाडे विद्वान् म्हणून प्रसिद्ध होते. त्यांनीं लिहिलेलीं पुस्तकें विद्वन्मान्य झालीं असून कोणत्याही वाचनालयांत यांच्या ग्रंथांना फार मानाचें स्थान आहे. तात्यासाहेब केळकर ही गोष्ट पुन:पुन:सांगत असत. खुद्द तात्यासाहेबांची ख्यातीही थोर मुत्सद्दी व जाडे विद्वान म्हणून असून कोणत्याही महत्वाच्याच सामान्य वाचनालयांत सुद्धां ज्यांना हक्कानें स्थान मिळालें पाहिजे व ज्यांच्या उणीवेनें ग्रंथालय ओकें ओकें भासेल असेच त्यांचें ग्रंथ आहेत. तात्यासाहेबांचा ज्याज्या संस्थाशीं जिव्हाळयाचा व निकटचा संबंध आला त्यांची यादी मागें अनेकठिकाणीं प्रसिद्ध झालेली आहे. ती यादी ५०।६० संस्थांचा स्पष्ट नामनिर्देश करते. तात्यासाहेबांची ग्रंथसंपदाही अशीच भरीव असून त्याच्यां·

तही ५०।५५ ठळक नांवांची यादी सापडते. तात्यासाहेबांचें लिखाण बरेंचसें प्रसंगोपात्त आहे. तथापि त्यांतही अमोलिक ग्रंथांची भर आहे. आयर्लंडचा इतिहास, इंग्रज व मराठे, हास्यविनोद मीमांसा, लोकमान्यांचें चरित्र, गॅरिबॉल्डीचें चरित्र असलीं पुस्तकें आहेत. विलायतचीं त्यांचीं बातमीपत्रें, दिल्लीचीं बातमीपत्रें वृत्तपत्र वार्ताहरांना अत्यंत मार्गदर्शक आहेत. तात्यासाहेबांनीं हाताळला नाहीं असा विषय नाहीं व त्या विषयाच्या प्रतिपादनांत आपली म्हणून स्वतंत्र भर घातली नाहीं असें कधीं झालें नाहीं. साहित्याच्या सर्वच क्षेत्रांतील त्यांचें लिखाण अव्वल दर्जाचें नसेल, पण साहित्यसम्राट ही पदवी त्यांना लुंग्या सुंग्या वाङ्मय सेवकांनीं दिलेली नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. बडोद्याच्या मराठी साहित्य संमेलनांतील त्यांचें अध्यक्षीय भाषण सर्वच विद्वानांना मार्गदर्शक ठरणारें म्हणूनच मानण्यांत येत आहे.

केळकर हे अभिजात महाराष्ट्रीयांचा एक उत्कृष्ट नमुना होत. त्यांच्या रोमरोमांत महाराष्ट्रीयत्व ओतप्रोत भरलेलें होतें. भलत्याच श्रीमंतीचा हव्यास नाहीं. मिळेल त्या प्राप्तींत समाधान मानून तत्त्वनिष्ठेनें वागायचें ही महाराष्ट्रीयांची वृत्ती. ऐश्वर्याच्या लंब्याचौड्या गप्पा महाराष्ट्रीयांना मारतां येत नाहीत. समृद्धीच्या सुखस्वप्नांत दंग होण्याची त्यांची रींत नाहीं. बुद्धिवादी व तर्कप्रधान असा महाराष्ट्रीय असतो. व म्हणूनच महात्माजींच्या राजकारणांत तो आघाडीवर फारसा दिसत नाहीं. महाराष्ट्रभूमी मूळची समृद्ध नाहीं. कष्ट केल्याशिपाय पोट भरणें नाहीं. कष्ट करायचेंच तर ते लांगूलचालन करून काय म्हणून असें त्याला वाटते प्रामाणिकपणें व निरलस आणि निस्पृहपणें नोकरी करावयाची व मिळेल. त्या भाकरीवर आपली व कुटुंबाचीं गुजराण करावयाची एवढीच त्याची ऐहिक महत्वाकांक्षा. त्याची प्राप्ती म्हणजे कांहीं अपवाद सोडल्यास सामान्य माणसाची प्राप्ती. कमीत कमी त्याच्या गरजा असल्यानें आद्यापेक्षां खर्च जास्त होण्याची सरसहा त्याला भीती नाहीं. महाराष्ट्रीयांची नोकरीतील कमाई साधारण सर्वत्र सारखीच आहे. लायकीपेक्षां अफाट प्राप्ती असलेले महाराष्ट्रीय थोडेच. तेव्हां मिंधेपणानें—ओशाळेपणाने धन्याची हांजी हांजी

करण्याची त्या बिचाऱ्याला जरूरी नाहीं. स्वाभिमानाला बाधा येण्याचा प्रसंग दिसला तर महाराष्ट्रीय सहसा मान तुकावणार नाहीं. नोकरीवर लाथ मारून तो कोठेंही जाऊं शकतो व आपल्या गरजांप्रमाणें प्राप्ती मिळवूं शकतो. तात्यासाहेबांनीं केसरी संस्थेतील नोकरी याच पद्धतीनें केली व आपला संसार काटकसरीनें स्वाभिमान राखून व न्यायाधीशाच्या निःस्पृहपणानें केला व विना दैन्यानें आपली इहलोकीची यात्रा संपविली. अशा माणसांची नांवें समाजांत देणगीदारांच्या यादींत कधीं झळकायचीं नाहींत. मिळणारा पैसा कुटुंबाच्या गरजांना पुरवण्याएवढाच असल्यानें व फावल्या वेळांत ज्ञानलालसा तृप्त करण्याच्या नादांत ही मंडळी रंगत असल्यानें या महिन्याची तड त्या महिन्याला पोंचविण्यापुरतेंच संसारांत लक्ष असायचें. शिल्लक ठेवायजोगी प्राप्तीच नाहीं. तथापि असली मंडळी पैशाच्या रूपानें समाजाला कांहीं देत नसली तरी ज्ञानाच्या रूपानें, सल्ला म्हणून, अंग मोडून काम करून ध्येयनिष्ठेनें समाजाला भरपूर प्रमाणांत उपकृत करून ठेवतात. तात्यासाहेबांनीं असंख्य लोकांना अगणित रीतीनें उपकृत करून ठेविलें आहे. हांवरटपणा नाहीं, कोणाकडून कसली अपेक्षा नाहीं; यामुळें आबालवृद्धांशीं असल्या लोकांची वागणूक सारखीच असते. लोकमान्यांच्या घराचे दरवाजे जसे सर्वांनाच खुले असत तसेच तात्यासाहेबांचेहि होते. शक्य असतांना तात्यासाहेबांनीं कुणाला नकार दिला असेल असे संभवत नाहीं. त्यांचा कामाचा उरक जबरदस्त असल्यानेंच अनेक व्याप त्यांना स्वतःला चिकटवून घेतां आले व स्वतःच्या सदसद्विवेक बुद्धीला स्मरून व लोकांच्या संतोषाला मिळवून त्यांना ते सांभाळतां आले. केळकरांच्या इतका चतुरस्त्र सव्यसाची गृहस्थ वारंवार अवतरणें अशक्य. केसरी संस्थेंत येईपर्यंत विशेष न चमकलेला हा हिरा आपल्या अखंड कर्तृत्वानें पैलू पाडल्याप्रमाणें अधिकाधिक तेजस्वी बनून तळपत राहिला.

जुन्या व जाणित्या पत्रपंडितांनीं, विद्वानांनीं, राजकारणी मुत्सद्यांनीं, साहित्यिकांनीं त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्यासंबंधीं काढलेल्या उद्गारांचें टिपण करून ठेवण्यासारखें आहे. त्यांच्या आठवणी व आख्यायिका संग्रहीत होणारच आहेत. त्यांच्या वाङ्मयाचे सुमारें बारा हजार पृष्ठांचे बारा खंड

प्रसिद्ध झालेलेच आहेत. ते प्रसिद्ध झाल्यानंतरच्या काळांतहि त्यांनीं पुष्कळच लिहिलें आहे. त्या सर्वांचा संग्रह लवकरच प्रसिद्ध होईल. त्यांचें आत्मचरित्रही प्रसिद्ध झालेलें आहेच. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्यासंबंधानें कोण काय बोललें वा कोणी काय लिहिलें तेंही संग्रहित व्हायला पाहिजे. मुंबई येथील मराठी दैनिकें व साप्ताहिकें यांनीं केळकरांच्या मृत्यूनंतर अग्रलेख लिहून या थोर पुरुषाला जी श्रद्धांजली अर्पण केली आहे ती सर्वांनीं पुनःपुनः वाचण्याजोगी व जतन करुन ठेवण्याजोगी आहे. लोकमान्य, प्रभात, विविध वृत्त, त्रिकाळ, काळ, नवयुग यांचे त्या प्रसंगाचें अग्रलेख एकत्र जमवून अभ्यास करण्याजोगे आहेत. केळकरांचें सम्यक दर्शन भावी पिढीला व्हायला पाहिजे असेल तर केळकरांचें वाङ्मयच त्या पिढीनें अभ्यासिलें पाहिजे. एम्. ए. किंवा डॉक्टरेटच्या पदवीसाठीं करावयाच्या अभ्यासू वृत्तीनें एकमेव सर्व केळकर वाङ्मयाचें परिशीलन केल्यास एक वर्षहि पुरणार नाहीं एवढा त्यांचा वाङ्मयोदधी अफाट आहे. येथील प्रभात दैनिकानें त्यांच्या मृत्यूनंतर दररोज त्यांच्यासंबंधीं मजकूर लिहिण्याचा जो उपक्रम केला आहे त्याबद्दल प्रभातकारांचें अभिनन्दन करणें जरूर आहे. टाइम्ससारख्या प्रतिष्ठित दैनिकानें, मात्र केळकरांसंबंधींचा मृत्यूलेख एका स्फुटांत उरकला हें पाहून आश्चर्य वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. केळकरांच्या वाङ्मयसेवेचें महत्त्व टाइम्सकरांना फार नसेल. पण ते चाळीस वर्षांवर वृत्तपत्र व्यवसायांत होते व केसरी मराठा पत्रांसारख्या वजनदार पत्रांच्या संपादकाचे जागेवर होते या दृष्टीनें शिष्टाचार म्हणून तरी त्यांच्याबद्दल टाइम्सनें एकादा अग्रलेख लिहिणें जरूर होतें. पण या प्रतिष्ठित पत्राला एका समव्यवसायी महाराष्ट्रीयबाद्दलचें इतकें कसलें सोयेर सुतक वाटणार! औचित्याचें अगत्य या पत्रानें आपल्याला नाहीं असें दर्शवावें ही गोष्ट आमच्या सारख्या कांहींच्या मनाला लागल्याशिवाय कशी राहील!

वृत्तपत्रकार या नात्यानें केळकरांना अनेकांवर टीका करावी लागली व अनेकांनीं त्यांच्यावर टीका करून त्या टीकांना प्रत्युत्तर देण्याचा प्रसंग त्यांच्यावर आणिला. पण सभ्यतेच्या मर्यादांचें उल्लंघन जराहीं न करितां व त्या

मर्यादांचें कांटेकोरपणानें पालन करून त्यांनीं उत्तर प्रत्युत्तर व टीका प्रतिटीका केलेली आहे. शक्य तोंपर्यंत तात्यासाहेबांनीं टिकाकारांची उपेक्षाच केली व अनुल्लेखाचा उपयोग करून आपल्या टीकाकारांना उगीच प्रसिद्धी दिली नाहीं. या त्यांच्या टीकाकारांत तत्वासाठीं टीका करणारे फार थोडे होते. तात्यासाहेबांच्या संबंधानें मत्सर बाळगूनच त्यांच्यावर फार टीका झाल्या. अशा टीकाकारांची उपेक्षा तात्यासाहेबांनीं मानवी सहनशीलतेच्या आत्यंतिक ठोंकाला जाऊन केली. पण तात्यासाहेबांच्या कडून उत्तर नाहीं, तात्यासाहेबांनीं मौनच स्वीकारलें यामुळें आपली टीका वास्तव आहे अशी शेखी मिरविणाऱ्यांच्या पाठींत सोटा हाणायला व त्यांच्या पापाचा पाढा जनतेपुढें पुरेपूर मांडून त्या टीकाकारांचें उघडें नागडें स्वरूप जनतेपुढें ठेवायलाही तात्यासाहेबांनीं केव्हां केव्हां कमी केलें नाहीं. ‘ बाडग्या पत्राची टारगी टीका ’ यांत क्रॉनिकल पत्राचा घेतलेला समाचार किंवा ‘ बोडसांचें बोडण ’ हे टीकालेख मानसिक तोल राखून पण टीकाकारांचें खरें स्वरूप सूज्ञ जनतेला त्यांच्या मानानें अत्यंत भडक शब्दांत दाखविण्याच्या त्यांच्या पद्धतीचे नमुने होत. त्यांच्या नेमस्त प्रकृतीला कोणाचीच भडक गोष्ट मानवत नसल्यानें टीकाकारांचा शिवराळपणाही त्यांनीं खाजगी व सार्वजनिक जीवनांत हाताळला नाहीं. रोज शिव्या खाणाऱ्या केळकरांचा संयम तपस्वी जनांना लाजवील असाच होता. वृत्तपत्रकारांनीं यापासून पुष्कळ शिकण्याजोगें आहे.

केळकर हे भित्रे गृहस्थ असें म्हणणारे लोकही त्यांना फार अन्याय करतात. केळकरांना महात्माजींचें तुरुंगी राजकारण पसंत नव्हतें. हा तत्वाचा प्रश्न होता. दोघांच्या तत्वांत व कार्यप्रणालींत उत्तर दक्षिण ध्रुवाइतका फरक असतांना तुरुंगांत जाऊन डांबून घेण्याचें राजकारण केळकर खेळले नाहींत म्हणून त्यांना दोष देण्यांत काय अर्थ. लोकमान्यांचे ते शिष्य. लोकमान्यांची परंपरा चालविण्याचें व्रत घेतलेले म्हणून म्हणवीत. पण लोकमान्यांची धडाडी त्यांच्यांत नाहीं असाही उपहास त्यांचे टीकाकार करतात. वर एका ठिकाणीं लिहिल्याप्रमाणें महात्माजींचे शिष्य तरी महात्माजींची जागा योग्य रीतीनें

भरून काढतील का असा प्रश्न विचारणें कोणाही टीकाकाराला शक्य होईल. आम्हांला टीकाच करावयाची नाहीं. पुढाऱ्या पुढाऱ्यांत तुलना करीत बसणेंच आम्हांला अप्रशस्त वाटतें. केळकर सुखासीन वृत्तीचे नव्हते हें त्यांनीं आपण होऊन लावून घेतलेल्या व हौसेनें वाढविलेल्या व्यापाकडे पाहिल्यानें सहज कळतें. तुरुंगांत जाऊन बसणें व केळकरांचा व्याप संभाळणें यांपैकीं कोणतें अधिक कठीण असें कोणी अनुभवी मनुष्यास विचारल्यास प्रामाणिकपणें उत्तर देणारा केळकरांचें व्रत अत्यंत कष्टाचें असेंच कबूल करील.

केळकरांनी तुरुंगवास भोगलाच नाहीं म्हटलें तरी चालेल. पण परकीय सरकारशीं झगडणें म्हणजे अग्निदिव्य करण्यासारखें होय. ते तुरुंगांत गेले नाहींत तरी त्यांच्यावर खटले झालेच. लोकमान्य म्हणत कीं बाटल्या चारी बाजूला ठेऊन त्यांच्यावर टेबल ठेऊन त्यावर नाच करायला सांगितलेंत तरी तो आम्हीं करूं व तोही कौशल्यानें. त्याकाळांत केसरी—मराठापत्रें चालविणें म्हणजें तारेवरचा नाच नव्हे तर बाटल्यावरील टेबलावरचाच नाच होता—अक्षरशः तो विस्तवाशीं खेळ होता. केळकर तो खेळ खेळण्यास कचरले नाहींत. 'खेळ खेळे पण डाई न सांपडे, ऐसाच खेळिया खेळणारा' या ऊक्तीप्रमाणें निर्दय सरकारशीं खेळ खेळायचा पण आपल्या अंगावर डाव तर उलटूं द्यायचा नाहीं असा खेळ अत्यंत कौशल्यानें केळकर खेळले. त्यांच्यावर खटलेंही झालें. कधीं प्रत्यक्ष वकीली केली नसतां कसलेल्या अनुभवी वकीला सारखे ते या खटल्यांच्या वेळीं वागले व न्यायमूर्तींची वाहवाही संपादन केली. व्यवहारीपणा हा केळकरांचा महत्वाचा गुण असल्यानेंच ते हे सर्व मोठ्या कौशल्यानें करूं शकले. उगीच डोंगराला धडकी देणाऱ्यासारखे ते वागले नाहींत हाही एक केळकरांचा थोर विशेष होय.

केळकरांच्या मृत्यूनें महाराष्ट्र पोरका झाला असें म्हणणें लौकिक अर्थानें बरोबर असलें तरी वस्तुस्थिती याच्या अगदीं उलट आहे. केळकरांनीं महाराष्ट्रीयांना एवढी अफाट लौकिकरूपीं संपत्ती ठेविली आहे कीं तिचा नुसता उपभोग घ्यायचें ठरविल्यास आपला देश व विशेषतः महाराष्ट्र प्रगतीचा उन्नत मार्ग चोखाळायला लागल्याशिवाय रहाणार नाहीं. हिमालय

हा जसा पृथ्वीचा मानदण्ड समजण्यांत येतो त्याप्रमाणें कै. तात्यासाहेब केळकर हे महाराष्ट्रीयांच्या थोरपणाचें उपमान समजण्यांत येईल. 'तुम्हांला कोणासारखें व्हावेंसें वाटतें' असा सामान्य माणसाला प्रश्न केल्यास 'केळकरांसारखें' असें कोणालाही म्हणतां येणें शक्य आहे; कारण तात्यासाहेब केळकरांसारखा दीर्घोद्योगी प्रयत्नवादी शोधूनही मिळणें नाहीं. हौस असली, सुखासीनता नसली, आहे या परिस्थितींत गुण्यागोविंदानें व समाधानानें राहून व्यवसायमग्न रहाण्यांतच खरी उन्नती आहे हें पुष्कळांना समजतें पण उमजतें थोडयांनाच. तात्यासाहेब केळकर हे त्या थोड्यांपैकीं एक अग्रगण्य प्रमुख होत. असा थोर पुरुष या महाराष्ट्रांत निपजला व महाराष्ट्रीयांना त्यानें मोठेपण आणून दिलें याबद्दल महाराष्ट्रानें त्यांच्यासंबंधीं अभिमानच बाळगणें जरूर आहे. पाऊणशेंवर्षांचें वय त्यांना लाभलें, व तें सर्व आयुष्य निरोगी अवस्थेंत सुखासमाधानानें काव्यशास्त्रविनोदांत त्यांना कंठायला मिळालें हें जसें त्यांचें भाग्य, तसें आम्हां सर्व महाराष्ट्रीयांचेंही भाग्य. ते आणखी जगते तरी आपणांला पाहिजेच होते. स्वराज्याच्या चळवळींत त्यांनीं आपल्या बहुमोल आयुष्याचीं पन्नास वर्षें घालविलीं व शेवटीं मृत्यूपूर्वीं तें प्राप्त झालेलें त्यांनीं पाहिलें हें त्यांचें भाग्यच. असा भाग्यवान् पुरुष आपल्यांत होऊन गेला व आपणां सर्वांना 'मदायत्तं तु पौरुषम्' म्हणजे काय तें कृतीनें दाखविलें याबद्दल त्या दयाघन परमेश्वराचे मनापासून आभार मानूं या व आपण पोरके नसून भाग्यवान् असल्याबद्दल धन्य मानूं या.

---

# नरसिंह चिंतामण केळकर

( साहित्य, ता. ११ डिसेंबर १९४७ )

## व्यक्ति आणि वाङ्मय

चिरकाल प्रशांतपणें चमकत असलेला एखादा तेजस्वी तारा खळकन् तुटून पडावा, किंवा आपल्या अस्पष्ट पण मधुर मोहिनीनें स्थिरचर भारून टाकणाऱ्या एकाद्या प्रदीर्घ गीताचे सूर एकदम थांबावेत तसें मला तात्यासाहेब केळकरांच्या आकस्मिक निधनाच्या वार्तेनें वाटलें. त्यांच्या चिरविरहाच्या कल्पनेनें व्याकुळ झालेल्या मनांत अनेक आठवणी जाग्या होऊं लागल्या. त्यांची विद्वत्ता, त्यांची रसिकता, त्यांचें सौजन्य, त्यांची कार्यतत्परता इत्यादि गोष्टी सर्वांना परिचितच आहेत. पण त्यांच्या व्यक्तित्वाचे सामान्य लोकांना अज्ञात असलेले अनेक पैलू माझ्या डोळ्यांसमोर उभे राहिले. ते भावनाविन्मुख होते हा प्रचलित असलेला सर्वसामान्य समज थोडाफार गैरसमजच होता. ते भावनाप्रधान नव्हते हें खरें आहे. कांहीं कांहीं विहिरींचें पाणी फार खोल असतें तसें त्यांचें मन होतें. पण त्यांच्या डोळ्यांत उभे राहिलेले अश्रु मी स्वतः पाहिले आहेत. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या मृत्यूनें दुःखित झालेली तात्यासाहेबांची ती मुद्रा, अश्रु आवरण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असतांहि त्यांच्या डोळ्यांत उभें राहिलेलें तें पाणी, अनेक जुन्या आठवणींची उजळणी करीत असतां कंपित झालेला त्यांचा तो स्वर—तेरा वर्षांपूर्वीच्या या गोष्टी जणु कांहीं कालच घडल्या असें अजून मला वाटतें.

हे दोन तात्या डेक्कन कॉलेजापासून एकमेकांचे जिवलग मित्र होते. पण कोल्हटकरांच्या मृत्यूपूर्वी पांचसात वर्षें एका क्षुल्लक कारणानें थोडेसे दुरावल्यासारखे झाले होते ते! ज्या गोष्टीमुळे त्या दोघांच्यामध्ये हा दुरावा उत्पन्न झाला होता ती खरोखर फार लहान—जवळ जवळ विनोदी होती असें म्हटलें तरी चालेल. शेवटी शेवटी कोल्हटकरांच्यांत व आपल्यांत असा

अंतराय उत्पन्न व्हावा ही गोष्ट केळकरांच्या मनाला फार लागून राहिली. कोल्हटकरांच्या मृत्यूनंतर तीनचार वेळां तरी त्यांनी त्या प्रसंगाचा उल्लेख करून 'त्या दिवशीं तसं व्हायला नको होतं' असे उद्गार माझ्याजवळ काढले होते.

मोठीं माणसें कितीहि मोठीं झालीं तरी तीं माणसेंच असतात, हें त्या हकिगतीवरून वाचकांच्या सहज लक्षांत येईल. १९२७ सालच्या पुण्याच्या साहित्य सम्मेलनाचा पहिला दिवस होता तो! कोल्हटकर सम्मेलनाचे अध्यक्ष होते, केळकर स्वागताध्यक्ष होते. कोल्हटकरांच्याबरोबर मीहि केळकरांच्याच घरीं उतरलों होतों. सम्मेलन सकाळीं आठला सुरुं व्हायचें असल्यामुळें त्या दिवशीं केळकरांच्या घरांत जणु कांहीं दुसरी दिवाळीच अवतरली होती. सम्मेलनाच्या निमित्तानें केळकरांच्या घरीं आमच्या शिवाय इतरहि अनेक पाहुणे आले होते. सर्वांच्या आंघोळी उरकून चहा, कॉफी, कोको वगैरे प्रकरणें व्यवस्थित पार पडावींत म्हणून पहाटेपासून केळकर सर्वांना घाई करीत होते. त्याप्रमाणें आम्हीं सर्व वेळेवर तयार रहाण्याचीं धडपड करीत होतों. तिकडे सम्मेलनाचा वेध, इकडे घरांत खुद्द सम्मेलनाचे अध्यक्ष व इतर पाहुणे मंडळी उतरलेली, त्यांची उठाबस आणि सरबराई करण्याची आवश्यकता! पुन्हा घड्याळाकडे पहात केळकर या सर्व गोष्टी लगबगीने आवरीत होते. कोल्हटकरांना स्नानाला उठण्याची सूचना देऊन ते दुसरीकडे गेले. इतक्यांत कुणीतरी गृहस्थ कोल्हटकरांना भेटायला आला. या दोघांच्या कानगोष्टी सुरू झाल्या. घराला लग्नघराचें स्वरूप आलें असल्यामुळें कोल्हटकर अद्यापि आंघोळीला उठलें नाहींत ही गोष्ट त्या गडबडींत माझ्यासुद्धां लक्षांत आली नाहीं. कांही वेळानें तो कोल्हटकरांना भेटायला आलेला गृहस्थ परत निघून गेला. कोल्हटकरांचें स्नान आटोपलें असेल अशा कल्पनेंत केळकर होते. पण अजून त्यांनी आंघोळ कली नाहीं हे लक्षांत येतांच ते अस्वस्थ झाले, इतक्यांत कोल्हटकर त्यांना एका बाजूला नेऊन त्यांच्याशीं हळूहळूं कांहीं बोलूं लागेल. मला वाटलें, सम्मेलनाच्या कार्यक्रमापैकीच कांहीं भानगड असावी ही! त्यांचें तें संभाषण

फार तर चारदोन मिनिटें चालले असेल नसेल ! पण त्यानंतर दोघेही तात्यासाहेब प्रक्षुब्ध झालेले मला दिसले. संमेलनाच्या घाईत मला या आकस्मिक वादळाचें कारण कळणेंहि शक्य नव्हतें. पण साहित्याचार्य झालेले हे दोघे बालमित्र अध्यक्ष व स्वागताध्यक्ष म्हणून जवळ बसलेले पाहून आणि त्यांच्या एकमेकावर मात करणाऱ्या कोटिबाजपणाचें कौतुक करून लोक घरीं परतले नाहींत तोंच दुपारीं तात्यासाहेब कोल्हटकरांनीं केळकरांच्याकडला आपला मुक्काम हलविण्याची भाषा सुरू केली. ती ऐकून मी चकितच झालों. कोल्हटकरांनीं त्याप्रमाणें दुसरीकडे जाण्याचें प्रस्थानहि ठेवलें. केळकरांनी त्या दिवशीं जरा रागानेच 'काय खांडेकर? तुम्हाला इथंच राहायचंय् की दुसरीकडे जायचंय ? असा खोंचक प्रश्न मला केला तेव्हां तर माझी स्थिती अडकित्त्यांत सांपडलेल्या सुपारीसारखी झाली.

त्या दिवशींचा या दोन थोर मित्रांचा एकमेकावरला घुस्सा कशामुळें उत्पन्न झाला होता हें जेव्हां मला पुढें दोघांकडून क्रमाक्रमानें कळलें तेव्हां माझ्या मनांत आलें—उपदेशाप्रमाणे विनोदहि बहुधा दुसऱ्याकरितांच असतो ! त्या दिवशीं जें कांही घडलें तें एवढेंच होतें: कोल्हटकरांना भेटायला आलेला गृहस्थ वऱ्हाडांतल्या एका उपवर वधूचा पिता होता. पुण्यांतलें बऱ्यापैकीं स्थळ त्यानें आपल्या मुलीसाठीं शोधून काढलें होतें. पण आपल्या भावी जामाताचा बाप दारूबाज आहे असा प्रवाद कानांवर आल्यामुळें किंचित् गोंधळून त्या बाबतींतली शहानिशा करून घेण्याकरितां तो कोल्हटकरांच्याकडे आला. तो निघून गेल्यावर कोल्हटकरांनी अजून स्नान केलें नाहीं असें केळकरांना दिसून आलें. लग्नघाईच्यावेळीं कोल्हटकरांनी चालविलेली ही दिरंगाई पाहून केळकर थोडेसे चिडले असावेत ! ते कांहीं बोलणार इतक्यांत कोल्हटकरांनीच त्यांना प्रश्न केला 'काय हो तात्यासाहेब ++ गृहस्थ दारुबाज आहेत कां ?' या प्रश्नाचा आगापिच्छा ठाऊक नसल्यामुळें, सम्मेलनाची वेळ अगदीं जवळ आली असतांना कोल्हटकरांनी आंघोळ करायेचं सोडून पुण्यांतीस 'क्ष' मनुष्य दारुबाज आहे कीं नाहीं

याची चौकशी करीत सुटावें या गोष्टीचा केळकरांना राग आला. ते चिडून म्हणाले 'काळ वेळ तुम्हाला कांहीं कळत नाहीं, तात्यासाहेब! बस्स करा हा तुमचा विनोद!' कोल्हटकर जात्याच भावनाशील होते. शिवाय नेत्र रोगामुळें आणि शारीरिक दुर्बलतेमुळें ते मनाने थोडेसे अधू झाले होते. केळकरांचें हें बोलणें मोठें अपमानकारक वाटून त्यांनीं ते मनाला लावून घेतलें. आणि त्यामुळेच या दोघा स्नेह्यांच्या दीर्घ कालीन मैत्रीवर शेवटी शेवटीं औपचारिकपणाची छाया पसरली.

मात्र केळकरांच्या अंतःकरणांत कोल्हटकरांच्याविषयीं किती स्निग्ध भाव वसत होता याची प्रचीति त्यानंतर तीन वर्षांनीच मला आली १९३० च्या नाताळांत कोल्हटकर खामगांवला अर्धांग वायूचा झटका येऊन (Facial Paralysis) आजारी पडले. त्यावेळीं मी शिरोड्याहून बडोद्याला व्याख्यानाकरितां जात होतों. मला मुंबईतच कोल्हटकरांचे जांवई प्रो. पाटणकर यांची तार मिळाली. मी बडोद्याचें व्याख्यान रद्द करून तत्काळ खामगांवला गेलों. तात्यासाहेब कोल्हटकर अगदीं अंथरुणाला खिळले होते. त्या वेळी त्यांच्या आजारीपणाची बातमी वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होतांच केळकरांचें त्यांना जें पत्र आलें होतें त्यांतली आर्तता अजूनहि मला आठवते. 'आपण दोघेहि आतां जीवन आणि मृत्यु यांच्या सीमेवर उभे आहोंत. झालं गेलं सर्व आपण विसरून जाऊं या!' अशा अर्थाचा त्या पत्रांतला एक परिछेद, केळकर कधींहि भावनांच प्रदर्शन करीत नसले तरी, त्यांचें अंतःकरण स्निग्ध होतें हें सिद्ध करायला पुरेसा होता.

मात्र भावनेनें विवश होऊन तिच्याबरोबर वाहत जाणें त्यांना नेहमींच हास्यास्पद वाटे. विवेक हाच या जगांत मनुष्याचा मुख्य आधार आहे हें त्यांचें जीवनसूत्र होतें. या सूत्रामुळेंच ते भावनाशून्य आहेत असा गैरसमज फैलावूं शकला. त्यांचा सुवर्णमध्यवाद, त्यांचें साहित्यसम्राटपद, त्यांचे राजकारण, कुठल्याहि वादाच्या दोन्ही बाजूंतलें सत्य एकदम जाणण्याची त्यांची शक्ति, यांच्याविषयीं अशाच अनेक विपर्यस्त कल्पना प्रचलित आहेत. केळकरांच्या मृत्यूनंतर भरलेल्या एका सभेंत एका प्रसिद्ध साहित्य-

कानें ' हा प्रसंग शोक करण्याचा नाहीं; फक्त हळहळ करण्याचा आहे ' असे उद्गार काढल्याचें मी ऐकलें. दुःख व्यक्त करण्याचे किती प्रकार या प्रतिभाशाली साहित्यिकांनीं कल्पिलेले आहेत तें देवाला ठाऊक ! कदाचित् त्यांनी त्यांचें एकादें तंत्रहि बनविलें असेल ! पण मनुष्याच्या चिरवियोगानें होणारें दुःख त्याच्या गुणसंपदेवर व उपयुक्तेवर अवलंबून आहे असें गृहीत धरलें तर तात्यासाहेबांच्याबद्दल शोक व्यक्त करूनहि त्यांचा यथार्थ गौरव होईल असें मला वाटत नाही. टिळकांचा मृत्यु हें आधुनिक महाराष्ट्रांतलें सूर्यग्रहण होतें असे म्हटलें तर, केळकरांचें निधन हें त्यांतलें चंद्रग्रहण आहे.

या हळहळणाऱ्या साहित्यिकासारख्या लोकांच्या लक्षांत एक गोष्ट मुळींच यत नाहीं. ती म्हणजे प्रत्येक मोठ्या पुरुषाच्या कर्तृत्वाचें मूल्यमापन कायम ठशाच्या नियमांनीं करतां येत नाहीं ही होय. घारीचे पंख फुलपाखराइतकें सुंदर नाहींत म्हणून तिला दोष देणें, किंवा फुलपाखरूं तिच्याप्रमाणें उंच आकाशांत घिरट्या घालीत नाहीं म्हणून त्याची निंदा करणें, हीं दोन्ही अडाणीपणाची लक्षणें आहेत. वाङ्मयाच्या विविध क्षेत्रांत आपल्यापेक्षां अधिक सुरस वाङ्मय निर्माण करणारे अनेक लेखक झाले आहेत हें खुद्द तात्यासाहेबच मान्य करीत असत. पण तात्यासाहेबांचें साहित्यसम्राटपद केवळ साहित्याच्या एखाद्या शाखेंतल्या अपूर्व प्रावीण्यावर अवलंबून नव्हतें. राजकारणांतहि एकाद्या बिकट क्षणीं गाजविलेल्या तरवारीवर किंवा धडाडीनें केलेल्या चळवळीवर त्यांचें पुढारीपण अधिष्ठित झालेलें नव्हतें. कुठल्याहि विषयांत सर्वांत अधिक गुण न मिळवितां सर्व विषयांतल्या बेरजेच्या बळावर एकाद्या विद्यार्थ्यानं पहिला नंबर पटकवावा, तसें केळकरांचें मोठेंपण होतें. क्रिकेटच्या खेळांत गोलंदाजी, फलंदाजी, क्षेत्ररक्षण इत्यादिकांतलें अप्रतीम कौशल्य पाहून खेळाडूंची निवड करतात हें खरें. पण कुठल्याहि संघांत कांहीं कांहीं असे असतात कीं एकाद्या विशिष्ट अंगांत विलक्षण तरबेज नसले तरी सर्वच अंगांत कौशल्य प्रगट करून आपल्या पक्षाला यश मिळवून देऊं शकतात. अशा पट्टीच्या क्रीडापटूशींच तात्यासाहेबांची तुलना करणें उचित होईल.

तात्यासाहेबांच्या मृत्यूनें महाराष्ट्राच्या अर्वाचीन इतिहासांतल्या अभिमानास्पद आणि अविस्मरणीय अशा कालखंडाची समाप्ति झाली. १८४२ सालीं पारतंत्र्यांत आधुनिक महाराष्ट्राचे सर्वश्रेष्ठ शिल्पकार न्यायमूर्ति रानडे यांचा जन्म झाला. १९४७ सालीं देशाला स्वातंत्र्य मिळालेलें पाहून केळकरांनी देह ठेवला. या एका शतकांत आपल्या प्रतिभेनें, प्रज्ञेनें, सेवेनें आणि त्यागानें जगाला प्रगतिपथावर आणून सोडणारीं अनेक पहिल्या प्रतीचीं माणसें महाराष्ट्रांत निर्माण झालीं. राजकारणांत रानडे, टिळक, गोखले; सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रांत ज्योतिराव फुले, आगरकर, कर्वे; साहित्यांत आपटे, गडकरी, केतकर वगैरेंनी जी कामगिरी केली आहे तिचें विस्मरण महाराष्ट्राला कधींहि पडणार नाहीं. चिपळूणकर, राजवाडे, सावरकार, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, वामनराव जोशी, डॉ. आंबेडकर, केशवसुत, लक्ष्मणराव किर्लोस्कर इत्यादि निरनिराळ्या क्षेत्रांतल्या आणखी अनेक थोर व्यक्तींचा या दृष्टीनें सहज उल्लेख करतां येईल 'रत्नां वा मौक्तिकांहि मूल्य मुळिं नुरे–रमणीची कूस जिथें नृमणि खनि ठरे।' या महाराष्ट्र-गीतांतल्या ओळी म्हणजे भावनेच्या भरांत एका कवीने उच्चारलेली अंध अभिमानोक्ति नसून एकाद्या इतिहासकाराला शोभेल अशी सत्योक्ति आहे. काळपुरुषानें कितीहि कसोटीने निवड केली तरी त्याला या शतकांतलीं शेदोनशें रत्नें आपल्या संग्रहीं नेहमींच ठेवावी लागतील. जिथें बुद्धीची आणि कर्तृत्वाची विशेष उंची असलेले पुरुष असे वारंवार निर्माण होतात, तेथें लोकप्रियता मिळविणें आणि ती चारदोन वर्षें नव्हे तर तब्बल दोन पिढ्या टिकविणें हें फार अवघड काम आहे. पण ही दुःसाध्य गोष्ट केळकरांनी लीलेनें करून दाखविली. त्यांच्या व्यक्तित्वाचें अपूर्व वैशिष्ट्य हेंच आहे. एखादें उत्तुंग शिखर आणि त्यावर सुंदर देऊळ अशा रीतीनें डोळ्यांत भरणारा पर्वत हें केळकरांच्या जीवनाचें प्रतीक होऊं शकत नाही. ती उंच उंच शिखरें नसलेली पर्वतश्रेणी आहे. तिच्या विस्तीर्ण पठारावरून जलधारा वाहत आहेत, मेंढ्यांचे कळप चरत आहेत, फलपुष्पसंपन्न वृक्षवेली डुलत आहेत. केळकरांचे वैशिष्ट्य त्यांच्या सर्वत्रगामित्वांत होतें. केळकर ही एक व्यक्ति नव्हती. ती सार्वजनिक संस्थाच होती.

हें असाधारण वैशिष्टय केळकरांनीं कसें संपदन केलें, त्यांत निसर्गाच्या देणगीचा अंश किती आणि आणि परिश्रमाचा भाग किती इत्यादि गोष्टींची मीमांसा मोठी मनोरंजक होऊं शकेल. केळकर सार्वजनिक जीवनाच्या आखाड्यांत उतरले ते टिळकांचा हात धरून ! ते कीर्ति–शिखरावर चढले ते लोकमान्यांच्या केसरीवर स्वार होऊन ! आणि टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांनीं जी परंपरा चालविण्याचा प्रयत्न केला तीहि बाह्यतः टिळकपंथाचीच होती यामुळें लौकिकदृष्ट्या तात्यासाहेब लोकमान्यांचें शिष्य मानले जातात हें स्वाभाविकच आहे. पण माणसाला जशीं दोन मनें असतात तसेच आयुष्यांत त्याला दोन गुरुहि करावे लागतात असें म्हटलें तर ती कांही केवळ कल्पना ठरणार नाहीं. व्यवहारांत मनुष्य ज्याचा हात धरून जीवन-पर्वताची चढण चढूं लागतो त्याला त्यानें आपला गुरु मानावें व लोक-नीहि हा अमक्या अमक्याचा शिष्य आहे असें म्हणावें यांत कांहींच नवल नाहीं. पण योगायोगानें हात कुणाच्याहि हातांत दिला असला तरी माण-साच्या मनांतला आदर्श अनेकदा निराळा असूं शकतो. तो आदर्श बाहे-रच्या जगाला सहसा दिसत नाहीं, पण तो त्या माणसाच्या कर्तृत्वाला प्रेरणा देतो. त्याच्या मनाची घडण बनविण्याला तो अदृश्य आदर्शच कारणीभूत होत असतो. न्यायमूर्ति रानडे हा केळकरांचा असा आदर्श होता. टिळक हे त्यांचे लौकिक गुरु असले तरी रानडे हे त्यांच्या आत्म्याचे गुरु होते. त्यामुळें केळकरांच्या मनाची घडण, त्यांच्या विविध शक्तींचा विकास आणि त्यांच्या जीवन–दर्शनाच्या कल्पना यांचें टिळकांच्यापेक्षां रानड्यांच्याशींच अधिक साम्य आहे. शंकराच्या तृतीय नेत्राप्रमाणें द्रष्टेपणाचें वरदान रानड्यांना मिळालें होतें. त्यामुळें वृत्तीचे नेमस्त असूनहि ते ध्येयवादाच्या पंखावर आरूढ होत आणि कुणालाहि न पडलेली राष्ट्राच्या उज्वल भवि-ष्याचीं स्वप्नें पाहूं शकत. संतवृत्ति हाहि रानड्यांच्या महनीय व्यक्तित्वाचा अविस्मरणीय असा दुसरा विशेष होता. केळकर द्रष्टे नव्हते आणि संतहि नव्हते. अत्यंत बुद्धिवान आणि कर्तृत्वशाली असे सज्जन संसारी गृहस्थ होते ते ! द्रष्टेपणा व संतवृत्ति हे रानड्यांचे अलौकिक गुण त्यांच्या अंगीं

नसल्यामुळें त्यांचें व्यक्तित्व पन्नास वर्षें महाराष्ट्रांत चमकूं शकले; पण ते लोकांना दिपवूं मात्र शकले नाहींत. हें अंतर एकदां मान्य केलें म्हणजे इतर सर्व गोष्टींत केळकरांनीं रानडयांची परंपरा मोठया उज्ज्वलपणानें चालविली असें महाराष्ट्राला अभिमानानें म्हणतां येईल. त्यांचें कर्तृत्व रानडयांप्रमाणेंच चौरस झालें. विश्रांति म्हणजे कामाचा बदल अशीच या दोघांची विसाव्याची व्याख्या होती. दोघांचींहि घरें लहान-मोठ्या कामाकरितां येणाऱ्या माणसांना अहोरात्र मुक्तद्वार असायचीं. अमुक एका क्षेत्रांत केळकर नाहींत किंवा तमक्या कार्याला केळकरांच्या बुद्धीचा फायदा मिळाला नाही असें महाराष्ट्रांत कधींच घडलें नाहीं. साहित्य सम्मेलनापासून विमाकंपनीपर्यंत सर्व प्रकारचीं अध्यक्षपदें केळकरांनीं भूषविलीं या बाबतींत ते अगदी रेकार्डब्रेकर होते. काव्यापासून राजकारणा-पर्यंत गाडें यथामति यथाशक्ति पुढें नेलें. हें सर्व करतांना लोकप्रियतेपेक्षां लोकसेवा हेंच त्यांचें उद्दिष्ट होतें हे विशेष आहे. लोकप्रियतेच्याच पाठीमागें त्यांना लागायचें असतें तर गांधीवादाच्या महापुरांत प्रवाहाविरुद्ध पोह-ण्याचा निष्फळ प्रयत्न त्यांनीं कधीच केला नसता. पण केळकरांच्या अंगीं रानडयांच्या अष्टपैलु कर्तृत्वाप्रमाणें त्यांचा प्रामाणिकपणाहि उत्कटतेनें वास करीत होता. टिळकपक्षांत असूनहि त्यांनीं कुठलींहि मतें कधीं चोरून ठेवलीं नाहींत. लोकाग्रहास्तव स्वतःला नापसंत असलेला राक्षसपार्ट घेऊन ते राजकारणाच्या रंगभूमीवर एकदा सुद्धां नाचले नाहींत. या बाबतींतली त्यांची स्वतःची एक आठवण मोठी मनोरंजक आहे. सावरकर चरित्राच्या छोट्या प्रस्तावनेंत ते म्हणतात, 'सावरकरांचीं व माझी कांहीं कांही मतें न जुळण्यासारखी त्यांची व माझी मनोरचना आहे हें मला माहीत आहे. मला असें आठवतें की १९०७ सालीं सार्वजनिक सभेंत भरलेल्या ज्या एका जाहीर सभेचा मी अध्यक्ष होतों त्या सभेंत सावरकर हे एक वक्ते होतो व सभेंतून परत जातांना त्यांच्या तेजस्वी वक्तृत्वाची वाखाणणी मी मनांत करीत असतां परदेशी कपड्याची होळी करण्यासारख्या कृत्याविरुद्ध मी बोललों याबद्दल ते मला नावें ठेवीत परत जात असावेत !'

(केळकर वाङ्मय-साहित्य खंड-पृ. ५६८)

वंगभंगानंतर देशांतला लोकक्षोभ स्वदेशी आणि बहिष्कार यांच्या रूपाने सर्वत्र प्रगट होत होता. त्या वेळीं परदेशी कपडयांची होळी हें लोकांच्या मनांत धुमसणाऱ्या असंतोषाच्या आगीचें एक प्रतिबिंब होतें. शिवरामपंत परांजप्यांसारखे कल्पकवक्ते अशा होळीच्या वेळीं जीं भाषणें करीत तीं लोकांच्या भावना चेतविणारीं आणि, समोर पेटलेल्या होळीच्या ज्वाला अधिक तेजस्वी कीं वक्त्याची कल्पकता अधिक तेजस्वी अशा प्रकारचा संभ्रम श्रोत्यांच्या मनांत उत्पन्न करणारीं अशींच असत ! अशा काळांत टिळकांचा उजवा हात मानला जाणाऱ्या केळकरांसारख्या व्यक्तीनें परदेशी कपडयांची होळी करण्याविरुद्ध बोलणें किती गैरसोइचें, किती गैरसमज उत्पन्न करणारें आणि लोकप्रियतेच्या दृष्टीनें किती तोट्याचें होतें हें सहज लक्षांत येण्याजोगें आहे. पण केळकर लोकप्रियतेपेक्षां सत्याचे उपासक होते म्हणूनच ते ही गोष्ट करूं शकले.

केळकरांची ही सत्योपासना निर्भेळ बुद्धीवर उभारलेली होती. भावनेच्या दृष्टिकोनांतून ते कोणत्याहि गोष्टीकडे फार वेळ पाहूं शकत नसत. राजकारणांत काय किंवा मानवी जीवनांत काय बुद्धि आणि भावना यांचा संगम आणि संघर्ष अखंड सुरू असतो. हें केळकरांना कधींच फारसें पटलें नाहीं. आणि या संगमांतून आणि संघर्षांतूनच नवें जग आकाराला येत असते. जें स्वतःला पटलें नाही तें अप्रामणिकपणाचा आश्रय करून त्यांनी कधीं लोकांना सांगितलेंहि नाही. लोकप्रियतेच्या शिखरावरून घसरत खालीं यावें लागलें तरी ते आपल्या या विशिष्ट बुद्धिवादी बैठकीला चिकटून राहिले.

केळकरांचा काळ, त्यांची मनोरचना, ते ज्या वर्गांत जन्माला आले होते त्या मध्यम वर्गाच्या त्या काळांतल्या जीवनमूल्यांच्या मर्यादा, इत्यादिकांमुळे त्यांच्या बुद्धिवादाला बुद्धिजीवित्वाचें स्वरूप आलें. बुद्धिजीवी मनुष्य कितीहि प्रामाणिक झाला तरी फार फार तर सच्चा सुधारक होऊं शकतो. उत्पाताची मग—तो अंतीं समाजाला किती का उपकारक असेना—कल्पनाच त्याला सहन होत नाही. पुस्तकी पांडित्याचा प्रभाव, थोडाफार सुखवस्तुपणा, संकुचित सामाजिक समस्या इत्यादिकांमुळें एका हातांत मानव

धर्मांचा ध्वज आणि दुसऱ्या हातांत अन्यायाविरुद्ध उगारलेला परशु घेऊन अवतरणाऱ्या क्रान्तिदेवतेचें आवाहन मध्यम वर्गांतल्या बुद्धिजीवी मनुष्याच्या अंतःकरणापर्यंत सहसा पोहोचूं शकत नाहीं. निःसंग आणि निर्मळ बुद्धिवाद मात्र क्रांतिकारक होऊं शकतो. कवि, संत, वीर किंवा शास्त्रज्ञ यांपैकी कुठलीहि मनोवृत्ति मनुष्यामध्यें उत्कटत्वानें वास करीत असली म्हणजे त्याचा आत्मा संकुचित वर्तमान कालाच्या, रूढ संकेतांच्या आणि व्यावहारिक यशापयशाच्या सर्व भिंती उल्लंघून पलीकडे जाऊं शकतो. रानड्यांच्यामध्यें अपूर्व बुद्धिप्रकर्षाच्या जोडीला संतवृत्ति होती. टिळक आगरकरांच्यामध्यें त्या संतवृत्तीची जागा वीरत्वानें घेतली होती. म्हणूनच आगरकर सारा समाज विरुद्ध उभा टाकला असूनहि-टाकांत शाई असेपर्यंत आणि हातांत टांक धरण्याचें बळ असेपर्यंत इष्ट असेल तेंच बोलणार अशी गर्जना करूं शकले. ब्रिटिशन्याय-देवतेचे परापाती निकालाला उत्तर देतांना टिळकांनीं जगाच्या इतिहासांत अमर होतील असे उद्गार काढले त्यांचा उगमहि या असामान्य वीर वृत्तींतच येता. सावरकरांच्या व्यक्तित्वांत कवित्व इतकें उत्कट आहे कीं त्यांनी पूर्व वयांत काव्य आणि राजकारण यांत प्रायः कुठलाच भेद केला नाही. त्यांचें पूर्वचरित्र म्हणजे एकाद्या महा काव्यांतल्या नायकाचं जीवनच आहे ! या अद्भुत रम्य कवि-प्रवृत्तीमुळेच बोटींतून समुद्रांत उडी टाकून स्वतःची सुटका करून घेण्याची साहसी कल्पना त्यांना सुचली, इतकेंच नव्हे तर त्यांनीं ती अमलांतहि आणून दाखविली. केळकर त्यांच्या जागीं असते तर असें कांही त्यांच्या मनांत सहसा आलें नसतें; आणि ही कल्पना त्यांच्या मनांत चुकून तरळली असती तर कथा—कादंबऱ्यांतच ती शोभून दिसेल असें म्हणत त्यांनी तिला निरोप दिला असता. उलट दीर्घकालीन शिक्षेच्या कल्पनेने अस्वस्थ होणाऱ्या स्वतःच्या मनाची समजूत घालण्याकरितां ते म्हणाले असते, 'होतंय् तें बरंच होतंय ! एरवी आपल्याला लेखनाला हवी तेवढी सवड कधीच मिळणें शक्य नाही. आतां सरकार आपण होऊन मोठ्या उदारपणानें जर आपला पाहुणचार करायला तयार होतंय तर तो का नाकारा ? फार दिवसांचे लेखनाचे संकल्प तरी या सक्तीच्या एकान्तवासांत सफल होतील.'

ही तुलना केळकरांचें वैगुण्य दर्शित करणारी आहे असें मात्र मुळींच वाटत नाही. मोठ्या माणसाचें लोकांना दिसणारें वैगुण्य त्याच्या वैशिष्ट्यांतूनच उद्भवत असतें. सहानुभूतीनें पाहिलें म्हणजे जो आपण त्याचा विशेष गुण मानतो तोच प्रतिकूल दृष्टीनें विचार केला म्हणजे आपणाला त्याचा अक्षम्य दोष वाटूं लागतो. केळकरांच्या बाबतींतहि असेंच झालें आहे. राजकारणांत ते टिळक किंवा गांधी यांच्या तुलनेनें फार कमी भरतात असें म्हणणारीं माणसें, नदीची समुद्राशीं किंवा मोत्याची हिऱ्याशीं तुलना करण्याची फार मोठी चूक करितात. गांधी समन्वयवादी आहेत, केळकर सुवर्णमध्यवादी होते; तेव्हां ह्या दोघांचें पटायला फारशी हरकत नव्हती; पण स्वभावभिन्नतेमुळे ते दोघ एकत्र येऊं शकले नाहीत अशी अन्यांनीं गांधी आणि केळकर यांच्या संबंधाची मीमांसा केली आहे. पण वस्तुस्थिती अशी आहे कीं या थोर पुरुषांच्या जीवनश्रद्धांत दोन ध्रुवांचें अंतर होतें. केळकर व्यावहारिक बुद्धीला जें पटेल किंवा जें तर्कशुद्ध दिसेल तेवढेंच मान्य करणारे होते. उलट गांधी हे नेहमींच बाहेरल्या लाखों आवाजापेक्षां आंतल्या एका आवाजाला अधिक किंमत देत आले आहेत. अंतःप्रेरणा हा गांधींच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा महत्वाचा भाग आहे. केळकरांना तो कधीच मान्य नव्हता. पदोपदीं आत्म्याला कौल लावणें हा त्यांच्या दृष्टीनें विनोदाचा विषय होता. सर्वसामान्य माणसाच्या दृष्टीनें केळकरांचा हा युक्तिवाद योग्य होता. पण एका गोष्टीचें त्यांना कधींच आकलन झालें नाहीं. ती म्हणजे मानवी जीवन हें सामान्य आणि असामान्य यांचें अत्यंत विचित्र असें मिश्रण आहे ही होय! जीवनविषयक तत्त्वज्ञानाच्या या मर्यादेमुळेंच अत्यंत भव्य, अत्यंत रुक्ष, अत्यंत रम्य किंवा अत्यंत गूढ अशा ज्या वैयक्तिक किंवा सामाजिक अनुभूती असतात त्यांत केळकरांचें मन प्रायः कधींच रमलें नाहीं. संयम, सौम्यपणा, आणि समतोलपणा हींच त्यांच्या प्रकृतीचीं वैशिष्ट्यें होतीं, त्यांची भरारी चंडोलाची होती, गरुडाची नव्हती. राजकारणांत काय किंवा वाङ्मयांत काय त्यांच्या याच व्यक्तित्वाचा सर्वत्र आविष्कार झाला आहे.

पण राजकारणाप्रमाणें साहित्यांतहि केळकरांचे मूल्यमापन करतांना त्यांच्या या वैशिष्ट्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळें त्यांना अनेकदां अन्याय झाला आहे आतां पुन्हा होण्याचा संभव आहे. त्यांना प्रतिभा नव्हती, ते केवळ एक व्यासंगशील लेखक होते, लेखनकामाठीच्या दृष्टीनें त्यांच्या विपुल वाङ्मयाचें कितीहि कौतुक केलें तरी त्यांत लेखनकौशल्य एकंदरीच कमी आहे, अत्युच्च वाङ्मगुणांचा विलास त्यांच्या साहित्यांत शोधूं पाहाणाऱ्याची निराशा झाल्याशिवाय राहाणार नाही, हीं किंवा असा अर्थ सूचित होईल अशीं विधानें अनेक जबाबदार साहित्यिकांनीं दुखवट्याच्या सभांतून करायला सुरवात केली आहे. ती वाचली म्हणजे या साहित्यशौंडींचा वाङ्मयनिर्मितीच्या क्रियेशीं, मराठी वाङ्मयाच्या इतिहासाशीं आणि वाङ्मयमीमांसेच्या मूलतत्वांशीं फार पुसट परिचय असला पाहिजे, किंवा दुसऱ्याच्या कुचेष्टेनें आपली प्रतिष्ठा वाढते या तत्वावर त्यांची अढळ श्रद्धा तरी असली पाहिजे असें वाटूं लागतें. केळकरांना प्रतिभा नव्हती असें म्हणणाऱ्या लोकांची प्रतिभेची व्याख्या प्रचलित समजुतीपेक्षा फार निराळी असावी. ते शेक्सपीअर, टॉलस्टॉय, भवभूति किंवा ह्युगो नव्हते, हें सांगायला या महापंडितांची काय जरुरी आहे ? प्रत्येक वाचक तें जाणतोच जाणतो. पण चराचरांतल्या सौंदर्याचें दर्शन, ग्रहण, स्फुरण; सर्जन, संकलन, आणि विकसन यांपैकी कुठल्याहि शुद्ध अथवा संमिश्र स्वरुपांत प्रतिभा प्रगट होते हें त्यांना मान्य आहे त्यांना केळकरांना प्रतिभा नव्हती हे विधान हास्यापद वाटेल.

एक उदाहरणच देतों—केळकरांचें बहुतेक लेखन सहेतुक असलें तरी तें एका उच्च भूमिकेवरून 'कलेकरितां' कला या तत्वाचें समर्थन करीत असत. बडोद्याच्या अध्यक्षीय भाषणांत तें त्यांनीं इतक्या सरस रीतीनें केलें आहे कीं, पुढें या तत्त्वाचें मंडन करण्यांत प्रो. फडके यांनीं पृष्ठेंच्या पृष्ठें जरी खर्चीं घातलीं असलीं तरी केळकरांच्या पांच मिनिटांच्या प्रतिभायुक्त वकिलींतली ऐट आणि सौंदर्य हीं प्राध्यापक महाशयांच्या प्रतिपादनांत कधींच उतरूं शकलीं नाहींत. केळकर म्हणतात, 'कलाविकासाच्या मागें हेतुसंशोधनाचा गुप्त पोलिस लावून दिला तर अनर्थकारक परिणाम झाल्या-

शिवाय रहाणार नाहींत. वाङ्मयाला नैतिक प्रबंध म्हणणें आणि साखरभाताला नुसता साखरेचा भात म्हणणें हीं दोन्हीहि सारख्याच समंजसपणाचीं आहेत. शिल्पशास्त्रांत कलेच्या दृष्टीनें निरनिराळे आकार बनविणें यांत प्रतिभा कौशल्य दिसून येतें. पण देवळाचें उंच शिखरच सुंदर कां–तर तें आकाशांत ईश्वर आहे असें उंच बोट करून दाखविते म्हणून; अथवा तीन तीन कमानींची जोडीच कां शोभते–तर तिजवरून त्रिमूर्ति ब्रह्मा–विष्णू–महेश्वराची आठवण होते म्हणून असें म्हणणे बरोबर होईल काय? ताजमहालाच्या पांढऱ्या शुभ्र दगडांत जी रंगीबेरंगी कुसर बसविली आहे तिचा नैतिक हेतु शोधून काढणारांनीं ताजमहाल पाहण्यास जाण्याचे श्रम न घेतलेलें बरें! चित्रकार पौराणिक किंवा ऐतिहासिक चित्रें रंगवितो तेव्हां त्याचा हेतु कलेच्या दृष्टीनें सुंदर चित्रें रंगविण्याचा असतो कीं, नीतिबोध करायचा असतो? पोहावयास पडणारा मनुष्य जलक्रीडा करतो ती स्नानाच्या हेतूनें नव्हे! शिकारी क्षत्रिय अरण्यांत मृगयाविलास करतो तो एक दिवस मांस खावयास मिळावे म्हणून करीत नाहीं. गवई दीपराग आळवितो तो अर्थशास्त्रदृष्ट्या मशालजीचा खर्च वांचविण्याकरितां म्हणून नव्हे. तात्पर्य 'अधिकस्य अधिकं फलम्' या न्यायानें कलेच्या दृष्टीनें वाङ्मय सुंदर असून त्यांतूनच नीतिबोध निघण्यासारखा असल्यास दुधांत साखर पडेल. पण ज्याचा हेतु नीतिबोध नाहीं तें वाङ्मय नव्हे हें म्हणणें यथार्थ नाहीं."

केळकरांनी या उताऱ्यांतल्या शेवटच्या वाक्यांत सूचित केलेला सिद्धान्त सर्वस्वी सत्य असला तरी लेखनकला व ललितकला यांच्यातल्या महत्त्वाच्या भेदांकडे दुर्लक्ष केल्यामुळें त्यांची ही वकिली असावी तितकी तर्कशुद्ध नाहीं. तिच्यांत अनेक हेत्वाभास आहेत. पण या प्रतिपादनांतला डौल आणि कल्पकता हीं कुणालाहि मोहक वाटतील अशींच आहेत. अशा प्रकारचें लेखन, प्रतिभेची थोडीफार देणगी असल्याशिवाय कोण करूं शकेल! पंखाशिवाय उडणारा पक्षी आजपर्यंत जगांत कुणी पाहिला आहे काय?

केळकरांच्या वाङ्मयांत परिश्रमानें साध्य केलेला लेखनविलास आहे. प्रतिभेने निर्माण झालेला वाङ्मयविलास नाहीं, असें म्हणण्याकडे जी अनेक

प्रतिष्ठितांची प्रवृत्ति होते तिचें मूळ एकाच गोष्टींत आहे. केळकरांचें सरस असें वाङ्मय १९०८ पासून पुढल्या दीड दोन तपांत प्रगट झालें. तें आज सर्वसामान्य वाचकांकडून तितकेंसें वाचलें जात नाहीं. कॉलेजांतल्या विद्यार्थ्यांकडून किंवा टीकाकार म्हणविणाऱ्यांकडून सुद्धां तें फारसें अभ्यासिलें जात नाहीं. त्यामुळें केळकरांच्या लिखाणांत प्रतिभेच्या झळाळीनें शोभणारें असें कांहीं नाहीं हा समज प्रवृत्त करणें सोपें होऊन बसलें आहे. पण पर्वताची उंची मोजतात ती त्याच्या शिखरावरून, त्याच्या सपाट प्रदेशावरून नव्हे हें, या जाणूनबुजून आडरानांत शिरणाऱ्या टीकाकारांनी अवश्य लक्षांत ठेवावें 'Eminent Victorians' या पुस्तकांत Strife नाटक लिहिल्यानंतर गॉल्सवर्दी लवकरच मृत्यु पावला असता तर त्याची कीर्ति इंग्रजी वाङ्मयांत सध्यापेक्षा अधिक दुमदुमत राहिली असती असें म्हटलें आहे. केळकरांच्या बाबतींतहि तसेंच म्हणतां येईल.

दुसरी एक महत्वाची गोष्ट वाङ्मय मीमांसाकारांनी विसरतां कामा नये. प्रतिभेच्या जाती निरनिराळ्या असतात. ती पल्लवित होण्याचा काळहि प्रत्येक लेखकाच्या आयुष्यांत भिन्न भिन्न असूं शकतो. पन्नाशीची झुळुक लागल्यावर मोठमोठ्या कवींची कल्पकता निस्तेज होऊं लागते आणि त्यावर भावनाशीलता क्षीणत्व पावते असा सर्वसामान्य अनुभव आहे. पण तांब्यांच्या प्रतिभेला याच उतार वयांत मोठा सुंदर बहर आला. आपल्या पूर्ववयांतल्या गोड कवितेला सहज मागें टाकतील अशी संपूर्ण कवनें ते उतारवयांत गाऊन गेले. कुणाची प्रतिभा कोणत्या क्षेत्रांत विशेष फुलूं शकते आणि तिचा तिथला फुलोरा कायम टिकणारा आहे किंवा निर्माल्य होणार आहे या संबंधानेही वाङ्मयांत झटपट नियम बांधणें फार धोक्याचें असतें. कोल्हटकरांनीं नाटककार म्हणून आपल्या हयातीत कीर्ति मिळविली असली तरी मराठी वाङ्मयांत विनोदकार म्हणून त्यांनी मिळविलेलें यशच अधिक उज्वल मानलें जाईल. कथाकाराची प्रतिभा हरिभाऊंच्या अंगीं इतक्या

प्रकर्षानें वास करीत होती कीं गेल्या शतकांत हिंदुस्थानांत निर्माण झालेल्या पहिल्या पांच कादंबरीकारांत शरश्चंद्राच्या जोडीने त्यांचे नांव भारतीय इतिहासकाराला घ्यावें लागेल. पण हरिभाऊंच्या प्रतिभेला अनेक डौलदार पैलू असूनहि सूक्ष्म भावनांचा आणि संघर्षाचा उत्कर्ष साधण्याला आवश्यक असलेली कोमल काव्यदृष्टि तिच्यांत नव्हती. 'वज्राघाताचें' पहिलें प्रकरण किंवा रुपनगरच्या राजकन्येंतला एखादा प्रसंग या विधानाला अपवाद म्हणून दाखवितां येईल. पण रविंद्र किंवा शरच्चंद्र यांच्याशीं तुलना केली म्हणजे कथाकार या नात्यानें त्यांचें हें अंग दुर्बल होतें हें सहज लक्षांत येते. या सर्व उदाहरणांचा निष्कर्ष एकच आहे–जिला आपण प्रतिभा म्हणतो तिचा बहुविध व सर्वस्पर्शी विलास एकाद्याच कलावन्तांत आढळतो. बहुतेक लेखकांवर प्रतिभा आपल्या अनन्त हस्तांपैकीं एखादाच हात वरदहस्त म्हणून ठेवते. या दृष्टीनें केळकरांकडे पाहिलें तर त्यांना प्रतिभा नव्हती असें म्हणणें केवळ धाष्टर्याचेंच नव्हे तर अरसिकपणाचें होईल. त्यांच्या सर्व लिखाणांतून मधून मधून अंगावर गुलाबपाणी शिंपडावें त्याप्रमाणें नाजुक व कल्पक विनोदाचा जो गोड शिडकाव आढळून येतो तो केवळ परिश्रमानें साध्य होणें शक्य नाही. विषय खुलविण्याकरितां किंवा तत्व पटविण्याकरितां अनेकदां ते ज्या मार्मिक उपमा देतात आणि सुंदर अथवा चतुर दृष्टान्त उपयोजितात त्यांची निर्मिती फक्त कल्पक रसिकतेंतून होऊं शकते. केवळ पांडित्यांतून किंवा परिश्रमशीलतेंतून आलेल्या उपमा आणि दृष्टांत हे चित्रपटांतल्या कृत्रिम वेलीला चिकटविलेल्या कागदी फुलांसारखे दिसतात. पण केळकरांच्या उपमादृष्टान्तांत वलीवर उमलेल्या फुलांचे सौंदर्य आहे. त्यांचा नाजुक व मोहक सुगंध आहे. त्यांची कल्पकता ही भावनाशील कवीच्या किंवा जीवनदर्शन करविणाऱ्या कल्पकतेहून भिन्न आहे हें खरें, पण ती जातिवंत हिरकणी आहे. तो बाजारांत चार आठ आण्यांना मिळणारा चमकदार खडा नाही ! त्यांच्या विनोदबुद्धींत कोल्हटकरांच्या चंद्रज्योतीची किंवा गडकऱ्यांच्या ॲटम बॉंबची प्रेक्षकांचें लक्ष वेधून घेण्याची शक्ति नसेल, पण तीहि मराठी वाङ्मयाच्या

दिवाळीच्याआनंदात भर घालणारी शांत आणि शीतल अशी पणतींतली दीपज्योति आहे.

कल्पकता व विनोद–बुद्धि या प्रतिभागुणांच्या विकासाला अनुकूल असेंच क्षेत्र केळकरांना साहित्यांत मिळालें. टिळकांचे सहकारी म्हणून निबंधाच्या द्वारानेंच त्यांना जनमनापर्यंत जावें लागलें. मोठ्या लेखकाचा असा एक विशेष असतो कीं कुठल्याहि परंपरागत वाङ्मय वृक्षाला अखंड पाणी घालून घालून केवळ त्याची फळेंफुलें काढण्याचें कार्यच तो करीत नाही! तर या वृक्षावर आपल्या प्रतिभेचें कलम करून तो त्याला निराळें स्वरूप देतो. केळकरांनीं मराठी निबंधाच्या बाबतींत हें कार्य केलें आहे हें त्यांच्या टीकाकारांनाहि कबूल करावें लागेल. चिपळूणकरांनीं प्रवर्तित केलेला आणि टिळक, आगरकर, परांजपे यांनी संवर्धिलेला हा वाङ्मयवृक्ष १९०८ पासून पुढल्या तपादीड तपांत त्याचीं पानें छाटून, त्याला पाणी घालून आणि त्याच्या विस्तारणाऱ्या शाखांना वळण लावून केळकरांनी कल्पवृक्षासारखा आकर्षक व सर्वप्रसू बनविला. हरिभाऊंच्या कादंबरीकरितां ‘ करमणूक ’ केव्हां येते अशी वाट पाहात महाराष्ट्रांतले लोक जसे दारांत उभे असत तसेच ते १९०८ नंतर केळकरांच्या निबंधाकरितां दर बुधवारीं टपालाच्या शिपायाच्या वाटेकडे डोळे लावून बसूं लागले. केळकरांनीं त्यांची कधीहि निराशा केली नाहीं. तत्कालीन घडामोडीमुळें सुचलेला कोणताहि विषय–मग तो राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक असा कुठलाहि असो केळकर तो हौसेनें आपल्या अग्रलेखाकरितां निवडीत; आणि विपुल माहितीनें, मनोरंजक मांडणीनें, आणि मार्मिक विवेचनानें तो असा रंगवीत कीं, आपण वर्तमानपत्रांतला मजकूर वाचीत नसून श्रेष्ठ वाङ्मय वाचीत आहोंत असा वाचकाला भास व्हावा. मराठी निबंधाचा सारा थाटमाटच त्यांनीं बदलून टाकला. विषय कितीहि रूक्ष असो, त्यांच्या लेखणीचा स्पर्श होतांच तो आकर्षक व्हायचा हें ठरूनच गेलें. पूर्वीचे अनेक निबंध वाचकाला दररोजच्या साध्यासुध्या जेवणासारखें वाटत. केळकरांनीं कुठलाहि निबंध सजवून कसा मांडावा ही कला फार मोठ्या प्रमाणांत यशस्वी करून दाखविली. ताटांत वाढायचें जेवण तेंच असलें तरी ताटाभोंवती रांगोळ्या काढल्या आहेत, मधून मधून लावलेल्या उदबत्त्यांचा सुगंध सर्वत्र दरवळत आहे, वर विजेचा

पंखा सुरू आहे अशा थाटांत होणाऱ्या भोजनाचा आनंद कांहीं निराळा असतो. तो आनंद केळकरांनीं मराठी निबंधांत नव्यानें निर्माण केला. निबंधलेखनाच्या रूपानें त्यांनीं महाराष्ट्रांत ज्ञानदानाची अखंड पाणपोईच घातली होती असें म्हणतां येईल. या पाणपोईंतलें पाणी जितकें विपुल तितकेंच गार आणि सुगंधी असे ही विशेष महत्वाची गोष्ट होय. पूर्वीं मुख्यतः प्रचाराकरितां आणि माहितीकरितां राबविला जाणारा निबंध केळकरांनीं इतक्या लवचिकपणानें हाताळला कीं त्यांचे कांहीं लेख वाचून ते आधुनिक पद्धतीचें लघुनिबंधच लिहीत आहेत कीं काय अशी कल्पना मनांत आल्यावांचून रहात नाहीं. या दृष्टीनें त्यांनीं १९०९ सालीं लिहिलेला 'कलियुगांतली पंधरावी विद्या' हा जाहिरातीवरला निबंध अवश्य पाहावा. त्यांतील छोटासा उताराच खाली देतों –' दुसऱ्या प्रकारच्या जाहिराती गुप्त पोलिसासारख्या असतात. ज्यांनी पिंकपिल्स्‌च्या जाहिराती पाहिल्या असतील त्यांस हें विधान सहज पटेल. ज्याप्रमाणे पांढरा ड्रेस केलेल्या गुप्त पोलिसाचें खरें स्वरूप केव्हां व कसें प्रगट होईल याचा नेम नसतो त्याच प्रमाणें वरून दिसण्यांत कांहीतरी सरळ, सुसंगत असा, व वैद्यक विषयाचा ज्याच्याशी कधीं संबंध मुद्दाम लावावा म्हटले तरी लावणें कठीण, अशा विषयाचा मजकूर वाचीत असतां एकदम पिंकपिल्सवर वाचकास केव्हा ठेच लागेल याचा नेम नसतो. वरील साळसूद मथळा पाहून मजकूर वाचावयास लागावें व निम्माशिम्मा मजकूर वाचूनहि केव्हा कादंबरीचा प्रिय प्राण असा जो शृंगार त्याचा काल्पनिक रस अनुभवीत असतां, तर केव्हा अंगावर रोमांच थरारून सोडणारी एखादी वीर रसपूर्ण गोष्ट वाचीत असतां केव्हा जगांत कचित् प्रसंगी दृष्टीस पडणाऱ्या करुण देखाव्याचें शाब्दिक चित्र पाहून नेत्र अश्रूंनी भरून गेले असतां किंवा कधी कोणाच्या स्वप्नांतहि न दिसणाऱ्या व केवळ अचाट कल्पनेस गोचर असा अद्‌भुत कथाभाग वाचून भुवया वर चढवून डोळे प्रफुल्लित झाले असतां, एकदम 'पिंक पिल्स' हीं अक्षरें दृष्टीस पडतात आणि मग डोळयांत अंजन पडल्यासारखें होऊन व रसमय सृष्टींत हेलकावे खाणाऱ्या कल्पना विमानास मोठें थोरलें भोक पडून, मन जडसृष्टीवर येऊन आपटतें–हा सर्व अनुभव ज्याला आला नाही असा एखादा तरी वाचक असेल काय?

केळकरांच्या विपुल वाङ्मयांतून त्यांच्या विविध–वाग्विलासाचे असे असंख्य नमुने सहज काढून दाखवितां येतील. पण त्यांनीच एकेठिकाणीं

म्हटलें आहे, 'अधिक उतारे किंवा उदाहरणें देणें म्हणजे बाजारांत आंबे खरेदी करण्यास जाणाराने मासला पाहतां पाहतां राशींतले सगळेच आंबे कापून खाण्यासारखें आहे.

लेखकाची प्रतिभा त्याच्या निर्मितींतून जशी प्रगट होते तशी त्याच्या पुढल्या पिढींतल्या लेखकांवर तिचे जे संस्कार होतात त्यावरूनहि तिच्या सामर्थ्याची यथार्थ कल्पना करतां येते. या दुरुन्या कसोटीलाहि केळकर पूर्णपणे उतरतात.

आजच्या नामवंत लेखकांपैकीं प्रो. फडके, माडखोलकर, द. के. केळकर वगैरे अनेक साहित्यिकांनीं केळकरांच्या शैलीचे गुण आत्मसात् केले आहेत. प्रसाद, माधुर्य आणि आकर्षकता हे प्रो. फडक्यांच्या क्षेत्रांतल्या भाषा शैलीचे विशेष मानले जातात. फडक्यांनीं साहित्य क्षेत्रांतल्या उमेदवारीला सुरवात केली तेव्हां केळकर हे मराठीचे मूर्धाभिषिक्त निबंधकार होते,—आणि बंगाली कथांचा अनुवाद करतां करतां मुळांतली किंचित् संस्कृत प्रचुर पण नादमधुर अशी शैली मराठींत अणणारे श्री. विठ्ठल सिताराम गुर्जर लोकप्रिय कथालेखक म्हणून गौरविले जात होते. साहाजिकच त्या वेळच्या तरूण फडक्यांनीं प्रसाद व आकर्षकता या बाबतींत केळकरांच्या पावलावर पाऊल टाकलें आणि माधुर्य गुर्जरांच्या अनुवादित कथांतून आपलेसें केलें.

शैलीकार या नात्याने केळकरांची छाया गेल्या दोन तपांतल्या अनेक प्रमुख मराठी साहित्यिकांवर जशी पडली आहे तशीच साहित्य मीमांसक या दृष्टीनेहि त्यांनी अनेक रसिकांना स्फूर्ति दिली आहे. बडोद्यास साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून त्यांनी केलेल्या भाषणाचा उत्तरार्ध हा मराठी शारदेचा एक असामान्य अलंकार आहे. मध्यभारतीय कवि संमेलनाचें त्यांचें भाषण इतकें गाजलें नसलें तरी तितकेच अभ्यासनीय आहे. त्यांची कोल्हटकर लेख संग्रहाची प्रस्तावना वाङ्मयाच्या अभ्यासकांनीं आदर्श म्हणून पुढे ठेवावी इतकी गुणसंपन्न आहे. केळकर नुसते समीक्षक किंवा टिकाकार नव्हते, ते पहिल्या प्रतीचे प्रतिभावान साहित्यशास्त्रज्ञ होते.

'विसाव्या शतकाच्या' पहिल्या चरणांतल्या महाराष्ट्रीय मध्यम वर्गाचे सर्वश्रेष्ठ प्रतिनिधी असेंच इतिहासाला केळकरांचें वर्णन करावें लागेल. त्यांचा विनोद, त्यांचें तत्त्वज्ञान, त्यांची सौन्दर्यदृष्टी, त्यांचीं जीवनमूल्यें, त्यांच्या आत्म्याच वैयक्तिक आणि वाङ्मयीन आविष्कार, या सर्व गोष्टींत त्यांच्या या प्रतिनिधित्वाचें पूर्ण प्रतिबिंब पडलें आहे. सामान्य आणि असामान्य, संसार आणि

समाज, व्यवहार आणि ध्येयवाद, इत्यादिकांच्या सीमारेषेवर ते सदैव उभे राहिले याचें कारण हेंच आहे. त्यामुळें हजारांत क्वचित् आढळणाऱ्या एखाद्या निःसंग ध्येयवाद्याच्या दृष्टीनें त्यांचें जीवनविषयक तत्त्वज्ञान आणि अशाच एखाद्या निःसीम कलावंताच्या दृष्टीनें त्यांचें वाङ्मय आदर्श ठरणार नाहीं. पण कोणत्याहि काळीं हजारों जीवांत असा बंडखोर आत्मा एखादाच असतो. हजारांपैकीं नऊशें नव्याण्णव माझ्यासारखी सामान्य माणसें असतात. जीवन हा त्यांच्या दृष्टीने यज्ञ नसला तर तो मंगलदीपज्योति असते. अशा सामान्यांना आपल्या चिमुकल्या दीपज्योतिचें पावित्र्य आणि प्रकाश कसा सांभाळावा हें केळकरांचें मधुर व्यक्तित्व आणि बहुविध कर्तृत्व सदैव शिकवीत राहील.

आज सर्वत्र जगांतल्या देवांवर राक्षसांनीं मात केली आहे. हिंसा, अन्याय जुलूम, विषमता यांचीं पिशाचें मानवतेच्या मंदिराला आग लावण्याकरितां पुनः पुन्हा धांवत आहेत. त्यांच्या हातांत सत्ता, संपत्ति, धर्मवेड इत्यादि कोलितें आहेत. या पिशाच्चांना आवरणें आणि त्या राक्षसांचा पराभव करणें हीं कामें आतां केवळ पुढाऱ्यांचीं नाहींत. ती सामान्य जनतेचींच आहेत. तीं पार पाडण्याकरितां आवश्यक असलेली तपस्या कशी करावी, सत्य-संशोधनाकरितां आपली विवेचक बुद्धि कशी वाढवावी, आपल्या शक्तींच्या मर्यादा ओळखून सार्वजनिक कल्याणाच्या कार्याला कसा हातभार लावावा, आणि यशापयशाची फाजील फिकीर न करतां शक्य त्या क्षेत्रांत आमरण सेवाशील राहून मानवतेच्या मंगलमूर्तीची पूजा कशी करावी, याचें रहस्य केळकरांनीं आपल्या अर्धशतकाच्या आयुष्यक्रमांत विशद करून दाखविलें आहे. ते व्यवहारवादी असलें तरी जीवन हें आपण समाजाकडून घेतलेलें ऋण आहे आणि जगणें म्हणजे या ऋणांतून मुक्त होण्याकरितां यथामति यथाशक्ति निरपेक्ष कार्य करीत राहणें होय अशीच त्यांची श्रद्धा होती. ती तशी नसती तर मृत्यूच्या आदल्या दिवशीं त्याला उद्देशून त्यांनीं खालील उद्गार कधींच काढले नसते—

मला जन्मा येतां, तनुभरण कार्या कणकण
दिलें पांचाभूतीं, परत करणें ते निजऋण
तदाधारें सौख्यें सतत जगलों तें मज पुरें
तनुत्यागा ऐसा इतर अनृणा मार्गचि नुरे—

—वि. स. खांडेकर

[library stamp with handwritten number]

# Late Mr. N. C. Kelkar

## ( BOMBAY CHRONICLE 22–10–47 )

( *By*:- JAMNADAS M. MEHTA- )

If there was one individual more than another who approached the ideal of a perfect gentleman in the truest sense of the world, that was the late Mr. N. C. Kelkar. If there was one man who maintained a lofty standard of plain living and high thinking, that was he. If there was one man who combined intrepidity with modesty, and impregnable loyalty to the ideals which he had set pefore himself, that again was he. And if there was one follower of the late Lokmanya Tilak, who represented his political philosophy and social outlook to the full, that once again was Narasinha Chintaman Kelkar. Kelkar died peacefully on the morning of October 14. 1947, in his quiet home in a suburb of Poona which he had designed and built for himself, according to his own ideas of leisure and comfort. When he retired ten years ago from active journalism as the editor of the " Kesari ", he had publicly declared that he had not only finished his professional career, but he was also prepared for an exit from this world without the least fear; he had already implemented all his obligations to his family members and had no qualms of any kind having lived a clean life. He was prepared to meet death willingly without any regrets. He was not known to be expecting any sudden collapse. He was keeping a normally good health. He was pursuing his selfchosen avocations of cultured leisure with all the vigour and energy of a youth but it seems that in the afternoon of the 13th he felt that his hour had came, and he just sat down to write a challenging verse to death. Eight lines of that challenge were completed. I have seen them myself during my condolence visit to Mrs. Kelkar and their family. Mr. Kelkar had written

those lines with a very steady clear hand, he was prepared to leave his mortal ken if his hour had came, and he added that his transition from the world to an unknown destination aroused no fears or repentence in his heart.

### *A Literary Giant*

He had by nature been gifted with a temperament at once warm and tolerant and I do not think that during his long life of 75 years he had ever done anything which would make enemies for him. In fact it can be truly said that he had really no enemies. Everybody, who had any contacts with him, found him receptive of new ideas and willing to communicate his own to those around him, without any complex. He was a profound reader, his studies were catholic and were not limited to questions of a political character. His devotion to the Marathi language was immense and simultaneously with the active life of a politician and a journalist, his literary contributions to history, drama and other fields of intellectual activity are voluminous and in each of them he is in the front rank. In Poona his name is a household word. There were nearly 60 public associations, political, social, economic, historical, educational, etc., in which he was the soul of the entire organisation and even if his activities were confined to non–political subjects, he would have been known as one of the most distinguished and brilliant literary, and scholarly persons. But after every allowance is made for other activities, which were numerous, and intense and in which he shone as well as any other activity, Mr. Kelkar's devotion was mainly to the country's politics and to journalism as a feeder for that activity. He had such supreme mastery of the Marathi language that in a province where there are first class literary men by the score, nobody ever challenged his supreme position and they wondered one and all how a man so immersed in politics should at the same time command such

easy mastery over non-political questions. His Marathi was rich and pure, chaste and simple. He was affectionately called " Sahitya Samrata " i.e. the Supreme Chief of Literary life.

## *" Chela " Of Lokamanya*

Among Lokamonya Tilak's followers, he richly deserved the reputation of being his most ardent, loyal and faithful supporter, though he never paraded this loyalty. He accepted Lokamanya Tilak's leadership when he was barely 24 and never regretted having done so during a life full of achievements of over half-a-century. For 25 years, even after the death of Lokamanya Tilak, he stood out amongst his followers as the standard-bearer of Lokamanya Tilak's political mission.

I have known all those activities as an admirar, follower and colleague. Those who worked with him in different branches whether of history, poetry, education, drama, have frankly and frequently expressed their highest admiration for the simplicity and comradeship which they received from Mr. Kelkar. In politics I know him for over thirty years at the closest quarters. I have drawn inspiration from him whenever there was a period of gloom or despair in the fortunes of Lokamanya Tilak's Party. Nothing daunted him, he never got exeited if defeat came, never elated if success arrived; withoul fuss, without any panic his iron will controlled the situation, restored it within a short time. It was in 1896 that he gave up law for politics as the editor of the " Maratha ". He brought all-India recognition to it. It was the English version of the "Kesari" which was then edited by Lokamanya Tilak himself.

In these days of commercial journalism, " Kesari " has stood all along as an instrument of patriotic influence and vigorous propaganda for mass education, without any regard to the balance sheet, circulation or advertisement. Such has been the righteousness of the men who run the

"Kesari" that its financial success was never in doubt. During the last 50 years the contribution of the "Kesari" not merely as a paper but as the financial force behind the political life of the country is known to all. The "Kesari" has given lakhs out of its profits. It remains a solitary and salutory example of successful patriotic journalism for an umbroken period of three–quarters of a century.

## *Soul Of Poona's Public Life*

When Lokamanya Tilak started the Home Rule League campaign, Mr. Kelkar was virtually his lieutenant and in the course of a few years, the Home Rule sentiment was carried like a flame all across the country with his whole-hearted co-operation. As is well–known, he occupied a prominent position among the conductors of the Parashurambhau College and all its branch institutions. He was a tower of strength to the Itihas Sanshodhan Mandal of Poona, a body which stands matchless for its earnest and scholarly devotion to the historical research. He was the President of the Sarvajanik Sabha of Poona, a member and President of the Poona Municipality. He was the founder and leader of the Responsive Co–operation. He was the first President and founder of the Democratic Swaraj Party. He presided over the Baroda Marathi Literary Conference and was the President of of the Lahore Session of the Hindu Maha Sabha. He was the soul of Poona's Sabha life and young and old alike received encouragement and inspiration from his advice and guidance.

He went as the Secretary of the Indian Delegation in 1909 to England to give evidence before the Joint Parliamentary Committee in the company of Tilak and Mr. V. J. Patel. He was a member of the second Round Table Conference where he very precisely put the case of Tilak school of politics before that body and when Lokamanya was in

jail, he carried on all the activities of the magnetic person ality in a most able manner. As I have stated, he was very modest and humble but he could be fearful as a tiger and indomitable in hissteadfas tnesswherever need arose.

### *An Ardent Social Reformer*

He was an ardent social reformer and could have braved an angry mob in a street jeering at him and perhaps stoning him for advocating an unpopular cause. He was a Congressman for 37 years. He was a non-Congressman for the remaining 14 years of his public life, but whether within or without the Congress he was the same Narsinha Chintaman Kelkar–patriot, nationalist and above all the soul of honour.

The bereavement of his family and friends can neither he measured nor mitigated, but they have this consolation that the whole country and particularly Maharashtra mourn their loss as its own.

---

# Late Mr. N. C. Kelkar

## C. R.'S TRIBUTE

## ( Hindu, Madras, 23–10–1947 )

Condoling the death of Mr. N. C. Kelkar, His Exce' llency Mr. C. Rajagopalachari, Governor of West Bengal- says in a message.

" Another veteran of Indian politics has gone to eternal rest. Among the leaders of the Congress that brought about a radical change of outlook and programme in 1906, and guided the Congress until it was taken over by Mahatma Gandhi in 1920, Shree N. C. Kelkar was in the front rank and was Lokamanya's right–hand man. Since 1920 he had been a vigorous critic of Gandhian politics, but he never let it affect his friendship or respect for Gandhiji or his loyalty to the Congress as an institution.

"Passing phases apart, Shree Kelkar was one of the builders of Indian freedom and his passing away will be an occasion for deep sorrow to all the older men of the Congress who are still alive. He was a most lovable personality and all India will join with Maharashtra in her mourning.

"To the members of the family, the memory of the illustrious dead must take the place of personal affection which must yield to the inescapable limitations of physical life. The rich fruit was ripe for its fall into heaven."

# Late N. C. Kelkar

**( A. B. Patrika, Calcutta, 16-10-1948 )**

We are deeply grieved to learn of the passing of Syt. Narasinha Chintaman Kelkar, the veteran Maharashtra leader, at Poona on Tuesday morning at the age of seventy-five. The present generation may not be well acquainted with the activities of this once-famous political leader but about two decades ago Syt. Kelkar was one of the biggest personalities in the political field of India. He was the right-hand man of Bal Gangadhar Tilak and an important figure in the Congress politics of those days. He also worked for sometime as a member of the Congress Working Committee and acted as Deputy Leader of the Swaraj Party in the Central Legislative Assembly with Pandit Motilal Nehru as its leader. Since the early thirties, however, he withdrew from active politics though he remained all along associated with the Congress. Besides politics Syt. Kelkar was a reputed journalist and a prolific writer on diverse topics both in English and Marathi. He was the editor for about twenty years of the "Kesari", a Marathi bi-weekly founded by Bal Gangadhar Tilak, and during his editorship the paper became a powerful organ of public opinion. The death of this widely revered public-man removes from the country one of the strong links that connected the present era with the one that is fast passing away. Our deep and sincere condolences go to the members of the bereaved family and the numerous friends and admirers of this great son of Maharashtra.

# N. C. KELKAR.

**( Sind Observer, Karachi, 16-10-47 )**

The death of Narasinha Chintaman Kelkar at the age of 75 at Poona removes from our midst, a seasoned politician, a great journalist, scholar and and a keen lawyer. Associated with the late Lokamanya Bal Gangadhar Tilak in an intimate capacity for many years Mr. Kelkar followed him like a true dis-ciple and both of them were of one mind though living in two bodies. With Mr. Kelkar's death the living link with Tilak is cut off.

The political leadership of Maharashtra fell to Mr. Kelkar after the passing away of the Lokamanya and also the editorship of the "Kesari" and the "Mahratta" founded by the great leader. Mr Kelkar undertook literary work during his spare time and his Marathi writings are read with much profit for their deep insight and penetrating analysis. He wrote the life of Lokamanya which is a standard work.

He was also a politician and member of the Central Assembly for some years. Though Congressman, he was not a Gandhi-ite on account of his ideological differences with the Gandhian creed and some years ago he left the Congress and found more in common with the Hindu Mahasabha.

He was a trustee of the property of Lokamanya Tilak and his two papers. Kelkar, like all Maharashtrians of his time lived a life of simple living and high thinking. He had a sweet and suave temper, and while holding his own in any argument political, religious or social, he was ready to see the good points of his opponents though he held fast to his own.

In religion Mr. Kelkar was an orthodox liberal, on social reform he held advanced views, and was an admirer of Gandhiji for his work in the cause of the Harijans in parti-cular and country in general. He was not a great political leader but a very sound and sane patriot with independent views of his own on all matters.

# Mr. N. C. KELKAR.

**( Hitavada, Nagpur, 17-10-47 )**

It was characteristic of the man that a day previous to his death he was busy dictating an article in Marathi on current policital affairs. He told his admirers–it is reported who felicitated him on his Shastiabda poorthi that the celebration of that jubilee in life was some-thing like the warning bell in typewriters which tells the typist that the end is nigh! His writings bear ample evidence of the varied nature of his interests and of his keen sense of humour. The death of Mr. N. C. Kelkar has removed not merely a Maharashtrian but a great Hindu. He was the right hand man of the Lokamanya and after the death of Tilak, was instrumental in keeping up the "Kesari" at the height of its prestige and influence which it still maintains among Marathi papers. He was symbolic of the normal Maharashtrian attitude towards Gandhism and believed in responsive cooperation which he never tired of preaching even against the Congress at its height of power and prestige. Still he participated in the civil disobedience movement of 1930. He attended the second Round Table Conference and was the first President of the Democratic Swaraj Party which was started by him in 1933. Apart from his political and literary interests he was also one who desired the commercial well being of his province and was a promoter of banking, insurance, glass and sugar companies in the Deccan. After th edeath of the Lokamanya there was no other Maharashtrian who was as much respected and revered as Mr. Kelkar on whose worthy shoulders the mantle of that great Indian Brahmin leader had fallen. Mr. Kelkar has died five years after he had passed the Psalmist's allotted span for a normal human life and the country, as well as Maharashtra has lost a great and revered leader whose guidance would have been invaluable in the hard days ahead of the nation. Men such as he never become senile; for they live in the spirit which permeated Browning's wise Rabbi, who said 'Grow old along with me the best is yet to be.'

REFBK-0006974

REFBK-0006974